# महिला, शौचालयं आणि बरंच काही.....



कोरोच्या नेतृत्व विकास कार्यक्रमातून २०११ मध्ये 'राईट टू पी" मोहीम आकाराला आली. अनेक संस्था, संघटना आणि व्यक्तींनी एकत्र येत या मोहिमेला बळकट केले. तळागाळातल्या लोकांनी तळागाळातल्या लोकांसाठी उभी केलेली मोहीम असे हिचे स्वरुप होतं. पण थोड्याच काळात सर्वच स्तरातील हात या मोहिमेत जोडले गेले आणि जोडले जात आहेतच. मुंबईतील महिलांना सार्वजनिक ठिकाणी स्वच्छ, सुरक्षति आणिमोफतमुताऱ्या हव्यात, या मागणीपासून आम्ही सुरुवात केली. गेल्या१० वर्षात ही मागणी अधिक व्यापक झाली. ह्या मोहिमेने आतापर्यंत अनेक वळणे, चढ-उतार अनुभवले. मोहिमेला फक्त मुताऱ्या, शौचालयाच्या पल्याड शहर हक्कापर्यंत आणूनठेवले. ह्या शहराचा भाग असलेल्या उपेक्षति समुदायाला त्यांच्या शहरासाठी हक्क ह्या व्यापक दृष्टीकोनाशी जोडणे यात अभिप्रेत आहे.

आरटीपी हा फक्त अनेक अधिकारांपैकी एक अधिकार आहे जो प्रत्येक व्यक्तीला जात, धर्म,वर्ग आणि लिंग विचारात न घेता मिळायला हवा. हे खरं तर असमानतेचे प्रतिबिंब आहे. जेथे उपेक्षति व्यक्तींचे आवाज दाबले जातात आणि त्यांच्या स्वतःच्या शहरांमध्ये चर्चेपासून आणि निर्णय प्रक्रियेपासून दूर राहतात. उपेक्षति व्यक्तींना त्यांच्या उपजीविकेचा विचार न करता एका रात्रीत स्थलांतरित केले जाते किंवा झोपडपट्टी पुनर्विकास योजनेंतर्गत उभ्या झोपडपट्टीत प्रवेश करण्यासाठी १८ वर्षांहून अधिक काळ संक्रमण शिबिरांमध्ये थांबावे लागते. शहरी पुनर्रचनेच्या अंतिम टप्प्यावर नेहमीच गरीब आणि उपेक्षति असतात. स्मार्ट सिटी हा आज एक गूढ शब्द आहे. फक्त वाय-फाय आणि फ्रीवे स्मार्ट सिटी बनवू शकत नाहीत. वास्तविक स्मार्ट शहरांनी वर्ग, जात, लिंग, वय, लैंगिक प्रवृत्ती, धर्म आणि प्रदेश इत्यादींवर आधारित सर्व विविधतांना संबोधित केले पाहिजे. स्मार्ट शहरे सर्वांसाठी सुरक्षति शहरे असली पाहिजेत. RTP द्वारे, CORO ला शहरीकरण आणि पायाभूत सुविधांच्या विकासासंदर्भात निर्णय घेण्याच्या दृष्टीने उपेक्षति समुदायाचा आवाजाला बळ द्यायचे आहे.

राईट टू पी चा आतापर्यंतचा प्रवास 'हा मुद्दाच नाही"इथ पासून ते जेंडर बजेट, शहर नियोजन आणिधोरणामध्ये समावेश असा चढत्या आलेखाने झाला. सर्वांच्या एकित्रत प्रयत्नांमुळं २०१२ ते २०१४ सार्वजनिक ठिकाणी "पैसे द्या आणि वापरा" या पद्धतीची शौचालये त्याचा अभ्यास , सर्वेक्षण audio-visual documentation आणि त्यातून स्थिती बदलण्यासाठी मागण्या समोर आल्या. पण हे सगळे करत असताना कधी collaboration तर कधी confrontation ची भूमिका सातत्याने घेतली

त्यानंतर मुंबईतील ८७ रेल्वे स्थानकावरील शौचालयेआणि त्याचा अभ्यास केला आणि त्या त्या प्रशासकीय यंत्रणेसमोर अडचणी, आव्हाने आणि ती बदलण्यासाठी पर्याय ठेवण्यात आले. गेली ४ वर्ष लोकांच्या मागणीनुसार आणि पुढाकाराने वस्तीतील सामुदायिक शौचालयांचा अभ्यास द अर्बन प्रोजेक्ट सोबत करत आहोत. नुसता अभ्यास यावर न थांबता धोरणकर्ते म्हणजेचमहानगरपालिकेसोबत या अडचणींवर उपाययोजनाही करत आहोत. हा अभ्यास आणि उपाययोजना करताना लोकसहभागआणि त्यातून लोकनेतृत्व हा कामाचा कणा आहे .

अनेक घटकांसोबत काम करत असताना काही महत्त्वाचे दुवे हाती येत होते. स्त्री आणि पुरूष या घटकांच्या स्वतंत्रपणे नोंदी (gender segregated data) पाहताना लक्षात आले की,'धोरण लोकांसाठी आहे की लोक धोरणांसाठी आहेत? "राईट टू पी" ने हे प्रश्न सातत्याने उपस्थित केले.स्वच्छ भारत सारख्या अभियानानी नंबरवर भर दिला आणि परिणामांचा विचारच केला नाही, जे व्हायचं तेच झालं. पण आपण प्रशासकीय आणि स्थानिक स्तरावरही अनेकांना जोडून घेत यावर उत्तरेही शोधली. राईट टू पीने आता ह्या सर्व घडामोडी अधिक लोकांपर्यंत न्यायच्या ठरवल्या. लोकांची अडचण ओळखून, त्या त्या लोकांना त्यांची जाणीव करून देणे, धोरणपातळीवर त्या अडचणींतून मार्ग काढणे ह्या गोष्टी आतापर्यंत करत होतो. ह्या सर्व लोकांचा प्रवास, तिथे करण्यात आलेले प्रयत्न, त्यामुळे झालेले बदल, यश-अपयश फक्त इथल्या लोकांपर्यंतच मर्यादित राहता कामा नये. ही सर्व स्थित्यंतरे इतर लोकांपर्यंतहीपोहचावी, या सर्व गोष्टींमधून प्रेरणा मिळून आवश्यक तिथे ही चळवळ सुरू व्हावी, याकरताच हा सर्व प्रवास आम्ही लेखी स्वरुपात नोंदवायचा ठरवला.

महिलांनी शौचालयाच्या व्यवस्थापनात यावे, ही मागणी राईट टू पी ने सुरुवातीपासूनच लावून धरली.वस्ती स्वच्छता कार्यक्रमांतर्गत (Slum Sanitation Programme- SSP) अनेक महिला मंडळे ह्या प्रक्रियेत सक्रीय आहेत. अशा अनेक महिला मंडळांशी कोरोना काळात जोडून घेता आले. ह्या महिला अनेक प्रश्नांना तोंड देत होत्या. त्यांच्या संघर्षाच्या, अनुभवाच्या आणि यशाच्या गोष्टी ऐकताना हे कुठेतरी नमूद व्हायला हवे, असे आम्हांला जाणवू लागले. सार्वजनिक स्तरावर शौचालयांकरता महिलांनी कामे करणे यातही लिंग, वर्ग, धर्म आणि जातीव्यवस्था ह्या गोष्टी खूप प्रभाव टाकतात. विशेषतः जात हा मुद्दा या सर्वात खूपच वर्चस्व गाजवतो. कारण आपल्या इथे शौचालयाची स्वच्छता हा मुद्दा अजूनही जातीला घट्ट धरून बसला आहे.

## पुस्तिकेविषयी...

हे दस्ताऐवजीकरण फक्त गोष्टींपुरते मर्यादित न ठेवता, त्यातून वस्तीतील सामुदायिक शौचालयांचे प्रश्न, त्याची महिलांनी शोधलेली उत्तरे आणि काही अनुत्तरीत कोडी समोर ठेवायचा प्रयत्न ह्यामध्ये केला आहे. धोरणात्मक बदल होण्यासाठी, त्याचे नीट विश्लेषण करून मार्ग निघावा असाही आमचा प्रयत्न आहे.

ह्या पुस्तिकेसाठी गेली ६ महिने अनेक आव्हाने पेलत महिलांशी त्यांच्या मंडळाशी, वस्तीतील लोकांशी फोनद्वारे, झूम, गुगल मीट, WhatsApp या माध्यमातून संवाद साधला. ह्या पुस्तिकेत मुंबईतील ३७ मंडळांचा प्रवास शब्दबद्ध झाला आहे. ही पुस्तिका अनेक मुद्द्यांवर प्रकाश टाकते. त्यामध्ये मुंबईतील सार्वजनिक शौचालयांचं वास्तव, मंडळांकडून व्यवस्थापन म्हणजे काय, स्वयंसेवी संस्थेची जबाबदारी आणि वास्तव, महिला सीबीओ शौचालय व्यवस्थापनात कशा पुढे येऊ लागल्या, राजकीय हस्तक्षेप आणि प्रभाव, प्रशासनाची भूमिका, वस्तीची साथ-सोबत, आर्थिक लाभ, इत्यादी गोष्टींवर प्रकाश टाकायचा प्रयत्न केला आहे. ह्या पुस्तिकेसाठी साधना तिप्पनाकजे ह्यांची मेहनत आणि त्यांनी दिलेला वेळ खूप महत्त्वाचा आहे. मुंबई महानगर पालिकेचे निवृत्त विशेष कार्य अधिकारी आनंद जगताप आणि मीनाताई कांबळे ह्यांच्या सहकार्याशिवाय हे घडूच शकले नसते.

कोरो-राईट टू पी आणि स्वच्छता संवर्धन (संस्था) महासंघ संयुक्तपणे ही पुस्तिका आपल्यासमोर आणत आहोत.

कोरो-राईट टू पी टीम

# अनुक्रमणिका...

• पार्श्वभूमीआणि पुस्तिकेविषयी – टीम कोरो-राईट टू पी
• नकाशा

प्रकरण १ –वस्ती स्वच्छता कार्यक्रम आणि सामुहिक शौचालयं
प्रकरण २ – स्वयंसेवी संस्थेची जबाबदारी आणि वास्तव
प्रकरण ३ – महिला मंडळ आणि शौचालय व्यवस्थापन
प्रकरण ४ – राजकीय इच्छाशक्ती आणि प्रभाव
प्रकरण ५ – सुरक्षति आणि हिंसामुक्त शौचालयं
प्रकरण ६ – इतर आव्हानं
प्रकरण ७ – प्रशासनाची भूमिका
प्रकरण ८ – वस्तीचा सहभाग
प्रकरण ९ – स्वच्छतेचं अर्थकारण
प्रकरण १० – सीबीओ आणि वस्ती विकास
प्रकरण ११ – महिलांचा प्रतिसाद
प्रकरण १२ – महिला नेतृत्त्व आणि वैयक्तिक विकास

•गोषवारा
•उल्लेखनीय
•स्वच्छतासंवर्धन संस्था महासंघ

# पार्श्वभूमी

मुंबई नगरीत देशाच्या कानाकोपऱ्यातून लोक रोजगार मिळेल या आशेनं येतात. येणाऱ्या प्रत्येकाच्या पोटाची खळगी देशाची आर्थिक राजधानीमुंबई भरतेच. त्यामुळं मुंबई बाहेरुन लोकं रोजच येत असतात. कुशल आणि अकुशलकामगार वर्ग काही वेळा आधीपासूनच असणाऱ्या चाळी, झोपड्यांमध्ये आसरा घेतात. तर कधी नवीन जागेत वस्ती वसवली जाते. मुंबईच्या राहण्यायोग्य भू भागावरच्या ९ टक्के जमिनीवरझोपड्या वसल्या आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार मुंबईतली ५२ टक्के जनता चाळी, झोपड्यांमध्ये राहते.१० पैकी ४ मुंबईकर या वस्त्यांमध्ये राहतात.मुंबईतल्या या वस्त्यांमध्ये शारीरिक अंतर हा शब्द गायबचं आहे. इथं १० बाय १० फुटांच्या घरात १०-२० माणसं राहतात. १ स्क्वेअर किलोमीटर परिसरात लोकसंख्येची घनता ४५ हजार ते ९१,९९१ इतकीआहे. झोपडपट्टी दादा झोपड्या बांधत गेले. जुन्या झोपडपट्ट्यांच्या चाळी झाल्या.वांद्रे, सांताक्रूझ, गोरेगाव, मालाड, कांदिवली, बोरिवली मुलुंड, भांडूप, कांजूरमार्ग, विक्रोळी, घाटकोपर, चेंबूर, एंटॉप हिल या भागांमध्ये अंदाजे २ हजार झोपडपट्ट्यांचं जाळं अशाप्रकारे घट्ट होत गेलं आहे.

राहण्याकरता आसरा मिळाला. पण या वस्त्यांमध्ये पाणी, वीज, शौचालय या प्राथमिक सोयींचा प्रश्न होताच. पाणी कधी लांबच्या अंतरावरून विकत, कुठल्या सार्वजनिक इमारतीतून तर कधी महापालिकेचे पाईप तोडून मिळवलं जायचं. वीजेच्या बाबतीतही अशीच काहीशी गत होती. साधारण ३०-४० वर्षांपासून या वस्त्यांमध्ये वीज-पाण्याची सोय होऊ लागली. सर्वात गंभीर प्रश्न होता तो शौचालयांचा. खाडीच्या दलदलीच्या भागात, खारफुटीच्या आडोशात, रेल्वे रुळांवर तर कधी उघड्या मैदानात शौचाकरता जावं लागायचं. उघड्यावर शौचाकरता जाणं हे महिलांकरता प्रचंड त्रासदायक असायचं. बऱ्याचदा त्या रात्रीच्या काळोखात इतर महिलांची सोबत घेऊन शौचाकरता जायच्या.या अनधिकृत वस्त्यांमध्ये राहणारे मतदार मात्र अधिकृत आहेत. हळूहळू या वस्त्यांमधली व्होट बँक राजकीय पक्षांना खुणावू लागली. वस्त्यांमधली लोकंही पायाभूत सुविधांकरता म्हाडा, महापालिका आणि राजकीय नेत्यांना भेटायचे.म्हाडा म्हणजेच महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरण वाजवी किंमतीत घर बांधण्यासोबतच नागरिकांना प्राथमिक सुविधाही उपलब्ध करून देतं. गेल्या ५० वर्षांपासून म्हाडा या वस्त्यांमध्ये सार्वजनिक शौचालय बांधून देऊ लागलं. स्थानिक आमदार किंवा खासदार आपल्या निधीतून काही रक्कम म्हाडाला शौचालय बांधायला देते. पण हे शौचालय बांधताना किती लोकवस्ती आहे? महिला पुरुषांचं प्रमाण या गोष्टी पाहिल्या जायच्या नाहीत. ही शौचालयं बांधताना लोकांची गरज, मागणी या मुद्द्यांपेक्षा निधी असला तर शौचालयाचं बांधकाम करायचं या गोष्टीला महत्त्व दिलं गेलं. त्यामुळं म्हाडाची शौचालयं वस्तीच्या गरजेला अपुरी पडायची.पाणी आणि वीजेची सोयही या शौचालयांमध्ये नाही. वस्तीच्या कोपऱ्यावर हे शौचालय बांधलं जायचं. त्यामुळं वस्तीतलं घर आणि शौचालयात खूप अंतर असायचं. काही शौचालय भर वस्तीत बांधली गेली. पण स्वच्छतेच्या नावानं तर इथं बोंबच असायची. कारण म्हाडाच्या या शौचालयांची स्वच्छता आणि देखभालीची जबाबदारी महापालिकेनं किंवा बांधकाम करणाऱ्या कंत्राटदारानं घ्यावी याबाबत स्पष्टता नाही.कधीतरी महापालिकेचे कर्मचारी येऊन सफाई करायचे.लोकं शौचालयाला जाताना घरातून एका डब्यात, टमरेलमध्ये पाणी घेऊन जायचे. तेवढ्याशा पाण्यानं स्वच्छता कशी होणार? कधीतरी वस्तीतले लोकचं वर्गणी काढून या शौचालयांची सफाई करून घ्यायचे. त्यामुळं लोकं परत शौचाकरता उघड्यावरचं बसायचे.

शौचाकरता उघड्यावर जायला लागत असल्यामुळं,महिला सूर्य उगवण्याच्या आधी किंवा सूर्यास्तानंतरच शौचाला जायच्या. नैसर्गिक विधीचाआवेग अशाप्रकारे रोज वर्षानुवर्ष दाबून ठेवल्यामुळं महिलांच्या आरोग्यावर किती वाईट परिणाम होत असेल याचा आपल्याला अंदाज आला असेल. प्रवासात किंवा कामाच्या गडबडीत बराच वेळ लघवी दाबून ठेवल्यामुळं पोटात किती असह्य वेदना होतात. वस्तीतल्या या महिला तर रोजच लघवी आणि शौचाचा नैसर्गिक वेग दाबून ठेवतात. त्यामुळं त्यांच्या मूत्रमार्गात संसर्ग होण्याचं प्रमाण खूप आहे. मासिक पाळीच्या दरम्यान तर या समस्यांमध्ये आणखी भर पडते. उघड्यावर शौच

केल्यामुळं परिसरात दुर्गंधी आणि रोगराईही पसरायची. घाणीच्या साम्राज्यामुळं डुकरं, उंदीर, घुशीचींही इथंच वस्ती असायची. वीज नसल्यामुळं या शौचालयाच्या परिसरात गर्दुले आणि दारूड्यांचा अड्डा असायचा आणि आताही असतो. मुली आणि महिलांची छेडछाड, अश्लील शेरेबाजी, भांडणं, मारामाऱ्या शिवीगाळीचे प्रकारही या शौचालयांच्या परिसरात सर्रास घडतात.बृहन्मुंबई महानगरपालिकेचा पाणी शुद्धीकरण केंद्राचा परिसर भांडूप कॉम्पलेक्स म्हणून ओळखला जातो. पवईला एल एण्ड टी कंपनीच्या मागे हा परिसर आहे. मुंबई महानगराला पाणी पुरवठा करणाऱ्या मोठमोठ्या पाईप लाईन या भागात आहेत. त्यामुळं हा अगदी महत्त्वाचा भाग. इथं महापालिकेच्या मोठ्या अधिकाऱ्यांची सतत ये-जा सुरू असते. ४० वर्षापूर्वी अवघी १०-१२ घरं असणाऱ्या या भागात आता ५ हजार घरांची झोपडपट्टी वसलीय. शहराच्या इतक्या महत्त्वाच्याभागात असूनही भांडूप कॉम्पेक्सच्या परिसरातील लोकं २०१५ पर्यंत उघड्यावर शौचाला बसायचे.


सार्वजनिक शौचालयांमध्ये दोन प्रकार आहेत. ज्यांच्या घरात शौचालय नाही त्यांच्याकरता सामुदायिक शौचालय आणि दुसरं पे एण्ड युजचं.सामुदायिक शौचालयं वस्त्यांमध्ये असतात. म्हाडा किंवा महापालिकेतर्फे ही शौचालय बांधली जातात. झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमांतर्गत बांधली जाणारी शौचालयही यात येतात. पे एण्ड युज शौचालयं रेल्वे स्थानकं, बाजारपेठा, रहदारीची ठिकाणं इथं असतात. प्रत्येक वापराकरता इथं पैसे द्यावे लागतात. ही शौचालयं व्यावसायिक तत्वावर संस्थेद्वारे किंवा वैयक्तिक पातळीवर चालवली जातात.

२०११ च्या जनगणनेनुसार मुंबईतअंदाजे ५३ लाख लोकं झोपडपट्टीत राहतात. जागतिक बँक आणि२०१४ पासून सुरू झालेल्याभारत सरकारच्या स्वच्छ भारत मिशन (शहर)मार्गदर्शक तत्त्वानुसार ३५ पुरूषांकरता एक  आणि २५ महिलांकरता एक शौचकूप असलं पाहिजे. म्हणजेच ५३ लाखलोकांकरता अंदाजे १ लाख ७८ हजारशौचकूप असले पाहिजेत. पणमुंबईत एका शौचकुपाचा वापर ५२ ते १००झोपडपट्टीधारक करतात. मुंबईत म्हाडा, झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम आणि पे एण्ड युज असे सर्व प्रकारचेमिळून साधारण १ लाख शौचकूप सध्या आहेत.परंतु यातली बरिचशी बांधकामं योग्य देखभाल न केल्यामुळं वापराकरता योग्य स्थितीत नाहीत.

वस्तीत शौचालयाची गरज आणि प्रत्यक्ष शौचालयांची संख्या प्रमाण व्यस्त आहे. त्यातही महिलांकडं आणखीनच दुर्लक्ष होतं. वस्तीतलं शौचालय आणि पे एण्ड युज या दोन्ही प्रकारच्या शौचालयांमध्ये महिला शौचालयांची संख्या अपुरीच आहे. त्यामुळं जिथं शौचालय उपलब्ध आहे, तिथंही महिलांना रांगेत खूपवेळ ताटकळत थांबावंच लागतं. पाळीच्या दिवसांमध्ये तर मुली-महिलांच्या त्रासात भरच पडते. सार्वजनिक शौचालयांचा वापर करणाऱ्या महिलांना आरोग्य आणि सुरक्षतिता या दोन्ही पातळ्यांवर लढावं लागतं. महिलांना सुरक्षति आणि गरज असेल तेव्हा शौचालयाचा वापर करण्यात आपल्याकडे कित्येक अडथळे असतात. सार्वजनिक शौचालयाचा वापर करावा लागणाऱ्या सर्वच महिलांना या अनुभवातून जावं लागतं.

मुंबईतल्या वस्त्यांकरता योजना येतचं असतात. पण ग्राउंड रिएलिटी, गरजा आणि त्यांची पूर्तता यांच्यात सांगड घातली जात नाही. प्रशासन आणि राजकीय इच्छाशक्तीचाही अभाव असतो. काहीअंशी नागरिकही उदासीन असतात. परिणामी योजनेचा योग्य परिणाम दिसून येत नाही. पण जिथं जिथं हे तिनही घटक एकत्र येऊन उत्तम काम करत आहेत, तिथं योजनांचा उत्तम प्रभाव दिसून येतो.

# TOILETS OPERATED BY WOMEN IN MUMBAI




Map Designed By -

THE URBAN PROJECT

URBAN DESIGN | PLANING | ARCHITECTURE

www.theurbanproject.in

# L I S T  O F  T H E  M A N D A L S

1 - Ekta Vikas Mahila Mandal ( Antop Hill )
2 - Ashtavinayak Mahila Mandal ( Antop Hill )
3 - Mahila Ekta Seva Mandal ( Wadala )
4 - Tejaswini Foundation ( Sion Koliwada )
5 - Bhumi Swachhata Foundation ( Dharavi )
6 - Pragati Mahila Seva Mandal ( Dharavi )
7 - Guruprasad Seva Samiti ( Bandra East )
8 - Swami Samartha Mahila Sanstha ( Santacruz )
9 - Shree Dattaguru Mahila Mandal ( Mankhurd )
10 - Vishwashanti Mahila Vikas Mandal ( Mankhurd )
11 - Chinchani Maiakka Mahila Audyogik Utpadak Sahakari Sanstha ( Mankhurd )
12 - New Bhimnagar Transit Camp Association ( Govandi )
13 - Ekta Mahila Sahayogita Mandal ( Govandi )
14 - Omkar Sanghatit Mahila va Balvikas Sanstha ( Mankhurd Ghatkoper Link Road )
15 - Savitribai Phule Mahila Mandal ( Ghatkoper )
16 - Sukeshani Mahila Mandal ( Ghatkoper )
17 - Sai Mahila Mandal ( Ghatkoper )
18 - Om Sai Seva Mandal ( Ghatkoper )
19 - Jaihind Mitra Mandal ( Vikhroli )
20 - Nishigandha Mahila Mandal ( Kanjurmarg East )
21 - Gagangiri mahila Audyogik Sahakari Sanstha ( Bhandup )
22 - Tejaswini Mahila Mandal ( Bhandup )
23 - Siddhart Nagar Rahivasi Seva Sangha ( Mulund West )
24 - Savitribai Phule Mahila Mandal ( Jogeshwari Vikhroli Link Road )
25 - Jai Mataji Mahila Mandal ( Powai )
26 - Ekta Mahila Mandal ( Goregoan )
27 - Shivashakti Mahila Mandal ( Goregoan, Santosh Nagar )
28 - Rajashree Mahila Seva Sahakari Sanstha ( Goregoan West )
29 - Shree Mahalaxmi Mahila Sangha ( Goregoan West )
30 - Aryan Mitra Mandal ( Kandiwali East )

# प्रकरण १ – वस्ती स्वच्छता कार्यक्रम आणि सामुहिक शौचालय

मुंबईच्या झोपडपट्ट्यांमध्ये स्वच्छता असावी, लोकांना स्वच्छतेच्या चांगल्या पायाभूत सुविधा मिळाव्यात आणि चांगलं आरोग्य मिळावं, याकरता १९९५ मध्ये मुंबईमहानगरपालिकेनं जागतिक बँकेच्या मदतीनं काही पावलं उचलली. या अंतर्गत वस्ती स्वच्छता कार्यक्रम (Slum Sanitation Program - SSP) राबवायचं ठरलं. या कार्यक्रमाकरता सुरूवातीला जागतिक बँकेनं आर्थिक मदत केली. या कार्यक्रमांतर्गत मुंबईतल्या झोपडपट्ट्यांमध्ये शौचालयं बांधायचं ठरलं. बांधकामाचा खर्च जागतिक बँक करणार, पण या कार्यक्रमात वस्तीला म्हणजेच रहिवाशांनाही सहभागी करण्यात आलं. किंबहुना त्याशिवाय हा कार्यक्रम राबवताच येणार नाही. वस्तीला हे सर्व आपलं आहे आणि आपण ते योग्यरित्या सांभाळलं पाहिजे ही भावना असेल, तरच या सुधारणा टीकून राहतील हा या मागचा उद्देश आहे.

या कार्यक्रमांअंतर्गत शौचालय बांधण्यापूर्वी मुंबई महापालिका निविदा काढूनकंत्राटदार आणि त्याची सहयोगी संस्था म्हणून स्वयंसेवी संस्थेचीनेमणूक करते.शौचालयाच्या बांधकामाची जबाबदारी कंत्राटदाराची आहे. वस्तीतील लोकांना या कार्यक्रमाची माहिती देऊन त्यांना संघटित करण्याची जबाबदारी स्वयंसेवी संस्थेवर सोपवण्यात आली आहे. महापालिकेच्या निविदेमध्ये या जबाबदारींतर्गत काय अपेक्षति आहे याचा स्पष्ट उल्लेख असतो.स्वयंसेवी संस्था (Non-Governmental Organisation-NGO) वस्तीत सर्वेक्षण करते. वस्तीत किती लोक राहतात? महिला आणि पुरुषांची संख्या, शौचालयाची जागा याची माहिती घेते. या कामांकरता स्वयंसेवी संस्थेला मानधन मिळतं. वस्तीत राहणाऱ्या लोकांनीच शौचालयाची देखभाल आणि व्यवस्थापन करायचं, ही मुख्य अट या कार्यक्रमाची आहे. याकरता स्वयंसेवी संस्थेनं वस्तीतल्या लोकांनाकार्यक्रमाची माहिती देऊनचर्चा करणं अपेक्षति आहे.स्वयंसेवी संस्था वस्तीत नियमित संवाद साधून लोकांच्या शंका दूर करतात. वस्तीतल्या लोकांना प्रोत्साहित करून त्यांचंमंडळबनवतात. मंडळ बनवल्यावर १८६० चा सार्वजनिक संस्था नोंदणी अधिनियम आणि पब्लिक ट्रस्ट एक्ट १९५०अंतर्गत नोंदणी होते. सरकारी अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणीकृत सहकारी संस्था किंवा ना नफा ना तोटा तत्वावर आधारलेली कंपनी किंवा नोंदणीकृत अथवा मान्यताप्राप्त बचतगट यांना शौचालय व्यवस्थापनाचा परवाना मिळू शकतो. महापालिकेकडून मंडळाला शौचालयाच्या व्यवस्थापनाचा परवाना मिळतो. या मंडळात वस्तीतले कमीत कमी ७ किंवा जास्तीतजास्त ११रहिवासी असले पाहिजेत. हे लोक या प्रस्तावित शौचालयाचा वापर करणारे हवेत. या मंडळाला काही जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. प्रस्तावित शौचालया करता जागा निश्चितकरणे,महिला, पुरूष, लहान मुले आणि अपंग यांची वस्तीतली संख्या आणि त्यांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन त्याप्रमाणात त्यांच्याकरता टॉयलेट सीटची मागणी करणे. वस्तीच्या गरजेनुसार प्रस्तावित शौचालयाच्या बांधकामाचं संकल्पचित्र महापालिकेनं तयार केलं आहे ना हे पाहणं. वस्तीच्या गरजेनुसार त्यात शक्य असतीली त्या सुधारणा सुचवणं.बांधकामावर देखरेख, बांधकामानंतर देखभाल, स्वच्छता आणि व्यवस्थापन या गोष्टींची जबाबदारी या मंडळाची असते.या मंडळांना Community-Based Organization असं इंग्रजीत म्हणतात. त्याच्या आद्यक्षरांवरून बहुतांश जण या मंडळांना CBO(सीबीओ) म्हणूनच ओळखतात. स्वयंसेवी संस्थेनं प्रशासकीय कामं, बांधकामाचा पाठपुरावा, वीज-पाण्याची जोडणी, मंडळाच्या नावानं सर्व परवानग्या आणि सामंजस्यकरार मिळवण्याकरता मंडळाला मदत करायची असते.महानगरपालिका आणि मंडळांमधील समन्वयाचं काम स्वयंसेवी संस्था करते.

वस्तीत जर आधीपासून सीबीओ असेल तर त्याचं काम, वस्तीचा पाठिंबा पाहून त्या सीबीओची नेमणूक करण्यात येते. शौचालयाच्या बांधकामानंतर वर्षभरात सीबीओ सक्षम करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची आहे.जागेच्या उपलब्धतेनुसार एक मजली किंवा दु मजली बांधकाम करण्यात येतं. आरसीसी पद्धतीनुसार हे बांधकाम असतं. बऱ्याचदा तळमजला हा महिला, लहान मुलं आणि अपंग यांच्याकरता असतो. वरच्या माळ्यावर पुरुषांकरता सोय करण्यात येते.महिला-पुरुष आणि इतर सर्वांकरता मिळून साधारण २०

टॉयलेट सीट एका शौचालय संकुलात (Community Sanitary Complex - CSC) असतात.या शौचालयांमध्ये पाणी आणि वीजेची सोय २४ तास असायला हवी. पाण्याकरता शौचालयांच्या वर पाण्याची टाकी बसवण्यात येते. मलनिसाःरण वाहिन्यांना शौचालय जोडणं, सेप्टीक टँक किंवा जलतल (एक्वाप्रिव्ही) या तीनपैकी कोणत्याही एका पद्धतीनं या शौचालयातील मैल्याची विल्हेवाटकरण्यात येते.शौचालय संकुलाच्या बांधकामाचं आयुष्य साधारण ३० वर्ष गृहीत धरण्यात आलं आहे. या शौचालयाच्या गच्चीवर किंवा आवारात देखभाल करणाऱ्या व्यक्तीच्या राहण्याकरता एक खोली असते.

आधी उल्लेख केल्याप्रमाणं शौचालयाच्या वापराला सुरूवात झाल्यावर शौचालयाच्या स्वच्छतेची आणि देखभालीची संपूर्ण जबाबदारी सीबीओची असते. सीबीओ या कामाकरता व्यक्तीची नेमणूक करते. ही व्यक्ती लोकांचे पास तपासणे, शौचालयाची साफसफाई करणे, पाण्याची उपलब्धता पाहणे, सीबीओनं जर शौचालयाच्या वेळेबाबत काही नियम केले असतील तर, त्याप्रमाणं व्यवस्था करणं ही सर्व कामं ह्या व्यक्तीला करावी लागतात. देखभालीची सर्व कामं करणाऱ्या ह्या व्यक्तीला सर्वजण 'केअरटेकर"च म्हणतात. तुम्हांला प्रश्न पडेल याकरता येणारा खर्च कोण करतं? महापालिका करते का? तर नाही. यातही वस्तीचाच सहभाग असतो. वस्तीतले रहिवाशी स्वतः देखभाल खर्च करत असल्यामुळंच, या सोयी जबाबदारीनं वापरण्याचं भान लोकांना राहतं. वस्तीनं दर महिन्याला काही ठराविक रक्कम सीबीओला द्यायची.सीबीओ वस्तीतल्या प्रत्येक घराला एक मासिक पास देतं. त्यावर कुटुंबातील सदस्यांची संख्या आणि रक्कमेचा हिशोब लिहिण्यात येतो. सीबीओ लोकांकडून महिन्यालाया मासिक पासद्वारे रक्कम गोळा करते. या रक्कमेतून केअरटेकर म्हणजेच स्वच्छता कर्मचाऱ्यांचा पगार, स्वच्छता साहित्य, वीज-पाणी बील हे खर्च केले जातात.शौचालयाचे बांधकामआणि मग देखभाल या सर्व गोष्टींकरता व्यवस्थापक म्हणून सीबीओ काम करतात. महानगरपालिका ठराविक वर्षांकरता सीबीओंची नेमणूक करते.बांधकाम झाल्यावर महापालिका आणि सीबीओ यांच्यात सामंजस्य करार (MOU) होतो. यात कोणत्या शौचालयाच्या देखभाल आणि नियमित कामांकरता कोणत्या सीबीओची नेमणूक झाली आहे, सीबीओच्या जबाबदाऱ्या, महापालिकेच्या जबाबदाऱ्या, नियम आणि नियमांचं उल्लंघन झाल्यावर काय केलं जाईल या सर्वाचा उल्लेख असतो.वस्ती शौचालय संकुल ही बृहन्मुंबई महानगरपालिकेची मालमत्ता असून त्याच्या देखभालीकरता सीबीओची नेमणूक करण्यात येते. या वास्तूच्या सुरक्षेची संपूर्ण जबाबदारी ही सीबीओची असल्याचा उल्लेखही सामंजस्य करारामध्ये करण्यात आला आहे. लॉट १० पासून हा कार्यक्रम विभाग कार्यालयामार्फत राबवण्यात येत आहे. त्यामुळं बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीनं संबंधित प्रभागाचे उपायुक्त या सामंजस्य करारावर हे सही करतात.यासामंजस्य कराराची प्रत सीबीओकडं असणं आवश्यक आहे.

## वस्ती स्वच्छता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतले महत्त्वाचे टप्पे –

जागतिक बँकेच्या आर्थिक मदतीनं हा कार्यक्रम १९९७ ते २००५ या कालावधीत सुरू होता. या काळात पुरुषांकरता २,६७८ टॉयलेट सीट, महिलांकरता २,६७८ टॉयलेट सीट आणि अपंगांकरता ३२४ टॉयलेट सीट बांधण्यात आल्या. जागतिक बँकेनं अर्थसहाय्य केलेल्या या कालावधीला फेज १ म्हणून ओळखलं जातं. या कार्यक्रमाचा दुसरा टप्पा मुंबई महानगरपालिकेच्या आर्थिक मदतीनं२००५पासून सुरू झाला. जागतिक बँकेचं अर्थसहाय्य बंद झालं तरी, जागतिक बँकेच्याच मार्गदर्शक तत्वांनुसारचमुंबई महानगरपालिका हे काम करत आहे.सुरवातीपासूनच आर्थिकवर्ष, बांधकाम कालावधी आणि उपलब्ध निधीनुसार किती शौचालय बांधायची आहेत, हे ठरवलं जातं. पहिल्या टप्प्यात लॉट क्रमांक१ ते ७ लॉट झाले. लॉट म्हणजेच निविदा किंवा कंत्राट. २००५ पासून आतापर्यंत वस्ती स्वच्छता कार्यक्रमांतर्गत शौचालयाच्या बांधकामाचे ४ लॉट झाले. जागतिक बँक या कार्यक्रमातून बाहेर पडल्यावर शौचालय बांधणी आणि शौचालयाच्या संख्येच्या वेगाला ब्रेक लागला.जागतिक बँक या कार्यक्रमात असताना मुंबईतल्या महापालिका, सरकार आणि खाजगी मालकीच्या जमिनीवरील १९९५ पर्यंतच्याझोपड्यांकरता हा कार्यक्रम राबवण्यात येत होता. नंतरच्या काळात '१९९५ पर्यंतच्या झोपड्या"ही मर्यादा काढण्यात आली.

या संपूर्ण प्रक्रियेत कुठेही स्थानिक नगरसेवक, आमदार, खासदार आणि त्यांच्या निधीचा काहीच संबंध नाही. तरीही कंत्राटदार, स्वयंसेवी संस्था आणि सीबीओ या सर्वात मुख्य घटकावर स्थानिक नगरसेवक प्रभाव टाकत असतात.

## जागतिक बँक आणि त्यानंतर झालेलं शौचालयाचं बांधकाम

**तक्ता १**

| एसएसपी टपपा | अंमलबजावणी कालावधी | निविदा नं | शौचालय संकुल | एकूण टॉयलेट सीट | अर्थसहाय्य | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९९७ ते २००५-०६ | १ ते ७ | ३२४ | ५,६८० | जागतिक बँक | बृ.म.पा.वस्ती स्वच्छता कार्यक्रम (SSP) विभाग |
| २ | २००६ ते २०१३ | ८ | १८९ | ४८४९ | मुंबई महापालिका | बृ.म.पा.वस्ती स्वच्छता कार्यक्रम (SSP) विभाग |
| - | २०११ ते २०१४ (स्वच्छ भारत अभियानाला सुरूवात) | ९ | २३५ | ३८४० | मुंबई महापालिका | बृ.म.पा.वस्ती स्वच्छता कार्यक्रम (SSP) विभाग |
| - | २०१६ ते २०१९ | १० | १७४ | ४१६३ | मुंबई महापालिका | विभाग कार्यालय |
| - | २०१९ पासून सुरू | ११ | उद्दीष्ट १२०० | उद्दीष्ट २२,७७४ | मुंबई महापालिका | विभाग कार्यालय |

# प्रकरण २– स्वयंसेवी संस्थेची जबाबदारी आणि वास्तव

वांद्रे पूर्वमधला खेरवाडीचा परिसर, जमिनीच्या अर्थकारणाशी जोडलेला मुंबईतला अगदी महत्त्वाचा भाग आहे. मुंबई जिल्हाधिकाऱ्यांच्या मालकीचीही जमीन राजस्थानी खाटीक समाजाला लीझवर देण्यात आलीय. या जमिनीवर झोपड्या आणि चाळी वसल्या आहेत. त्यामुळं वस्तीतले लोक आणि या समाजामध्ये बऱ्याचदा तणावाचे संबंध असतात. राजस्थानी खाटीक समाज इथं सुविधा मिळू देण्यातही अडथळे निर्माण करतो. ४ हजार लोकवस्तीच्या या भागात शौचालयांची संख्या अपुरी होती. त्यामुळं लोकांना नाईलाजानं परिसरातल्या मोकळ्या मैदानावर शौचाकरता जावं लागे. नागरी सुविधा पुरवणं हे महापालिकेचं काम असल्यामुळं, महापालिकेनं पुढाकार घेऊन इथं शौचालय बांधण्याचं ठरवलं. जयश्री चळगे या भागात गेली २८ वर्ष राहतात. त्या या भागात आरोग्य कार्यकर्ती म्हणून काम करतात. २०१७ मध्ये वस्ती स्वच्छता कार्यक्रमांतर्गत स्वयंसेवी संस्थेनं या वस्तीत सर्वेक्षण केलं. त्यानंतर शौचालयाच्या बांधकामाला सुरूवात झाली. जयश्री या वस्तीत सक्रीय असल्यामुळं त्यांनी महिला मंडळ बनवलं. २०१८ मध्ये व्यवस्थापनाकरता जयश्री यांच्या गुरूप्रसाद सेवा समितीच्या ताब्यातहे शौचालय देण्यात आलं.या शौचालयात तळमजल्यावर महिलांकरता ६, अपंगाकरता १ आणि पहिल्या माळ्यावर पुरूषांकरता ९टॉयलेट सीट्स आहेत. पण या शौचालयात वीज आणि पाण्याचा पत्ताच नव्हता. त्यामुळं वस्ती स्वच्छता कार्यक्रमांतर्गतच बांधलेल्याजवळच्या शौचालयातून तात्पुरती वीज जोडणी घेण्यात आलीय. त्याकरता महिन्याला तीन हजार रुपये या शौचालय व्यवस्थापकाला देण्यात येतात. खूप प्रयत्नानंतर त्यांना महापालिकेकडून पाण्याचा मीटर मिळाला. पण पाणी पुरवठा पुरेसा नाही.महापालिकेकडून गुरूप्रसाद सेवा समितीला सामंजस्य करारहा(MOU) फेब्रुवारी २०२१ पर्यंत मिळाला नव्हता. महापालिकेनं या शौचालयाकरता जिल्ह्याधिकाऱ्यांकडून नाहरकत प्रमाणपत्र न घेतल्यानं त्यांच्या परवानगीशिवाय वीजेचा मीटर मिळण्यात अडचणी येत आहेत.या शौचालयाच्या बाबतीत स्वयंसेवी संस्था आणि कंत्राटदार या दोघांनीही त्यांची जबाबदारी नीट पार पाडली नाही.

धारावीत प्रगती सेवा मंडळहे सीबीओशौचालयाचं व्यवस्थापन करतं. या शौचालयाचा कंत्राटदार आणि स्वयंसेवी संस्था या दोन्हींकरता महापालिकेनं स्पार्क या संस्थेची नियुक्ती केली. स्पार्कनं या शौचालयाकरताची वीज जोडणीस्वतःच्या नावे घेतली.या वीज जोडणीवर व्यावसायिक वापराकरता अशी नोंद होती. त्यामुळं २००७ मध्ये पहिल्याच महिन्यात २० हजार रुपयांचं बील आलं. स्पार्कच्या नावावर असणाऱ्या मीटरचं बील भरण्यास सीबीओच्या अध्यक्षा रोशना शेख यांनी नकार दिला. सीबीओच्या नावावर मीटर करण्याकरता स्पार्क आणि बेस्टच्या ऑफिसमध्ये त्या फेऱ्या मारू लागल्या. २०१० मध्ये तर साडेतीन लाख रुपयांचं वीज बील आलं. रोशना यांनी 'सीबीओच्या नावावर मीटर कराल तरच बील भरेन'', असं कडक शब्दात सांगितलं. याचा चांगला परिणाम झाला आणि लगेचच मंडळाच्या नावावर लाईट मीटर करण्यात आला.

मानखुर्दच्या ओंकार संघटीत महिला व बालविकास संस्थेला २००३ मध्ये शौचालय मिळालं. पण सामंजस्य करार मिळायला २०१२ साल उजाडलं. त्यानंतर पाणी आणि वीज जोडणी सीबीओच्या नावावर झाली. पवईतल्या जय माताजी मंडळाच्या ताब्यात २०१८ मध्ये शौचालय मिळालं. पण फेब्रुवारी २०२१ पर्यंत महापालिकेनं सीबीओला सामंजस्य करार दिलेला नाही. या स्वयंसेवी संस्थेनं बांधकामापूर्वीही वस्तीच्या गरजांबाबत विचारणा केली नाही.

वस्ती स्वच्छता कार्यक्रमांतर्गत बांधल्या जाणाऱ्या शौचालयांमध्ये स्वयंसेवी संस्थांची भूमिका खूप महत्त्वाची आहे. स्वयंसेवी संस्थेनं वस्तीतल्या लोकांना शौचालय बांधणी आणि त्याचं व्यवस्थापन नीटपणे समजावून सांगायला हवं. त्यामुळं लोकांचा या कार्यक्रमातला सहभाग वाढतो आणिव्यवस्थापनासंबंधीचे गैरसमज होत नाहीत.सीबीओलानोंदणी, देखभाल, शौचालय व्यवस्थापनासंबंधीचे नियम, कायदे, संस्था आणि सीबीओ या दोघांच्याही भूमिका याची माहिती सांगायला हवी. यामुळं सीबीओला त्यांची जबाबदारी समजेल आणि त्या कामात पुढाकार घेतील. राजकीय किंवा इतर काही दबाव आले, तर त्याच्यातून मार्ग कसा काढावा याबाबत ही सीबीओला तयार करायला हवं. शौचालयाचं बांधकाम सुरू असताना स्वयंसेवी संस्थेनं वस्तीच्या काही विशेष गरजा,

मागण्या जाणून त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा. बांधकामाच्या दर्जाकडे आणि रचनेकडे चोख लक्ष हवं. कमी पाण्यात मैल्याचा निचरा व्हावा याकरता pour-flush toilets पद्धतीची रचना, हवा खेळती राहावी, महिलांचं खाजगीपण व सुरक्षा याकरता शौचालयांची रचना आणि बांधकामाची पद्धत कशी असावी याबाबत महापालिकेनं तज्ज्ञांच्या मदतीनं बांधकाम आराखडा तयार केला आहे. त्यापद्धतीनंच या शौचालयांचं बांधकाम होतं आहे की नाही, याकडेही स्वयंसेवी संस्थेनं लक्ष द्यायला हवं. सीबीओंना या गोष्टींची माहिती दिली, तर सर्व बाबी नियमानुसार होत आहेत का हे त्या जागरुकतेनं पाहतात. पण कित्येकदा स्वयंसेवी संस्था या पायऱ्या टाळत असल्याचं आढळतं. परिणामी, शौचालयाच्या बांधकामात अनेक त्रुटी आढळतात. वीज-पाणी जोडणी, शौचालयातल्या भांड्यांना पुरेसा उतार नसल्यानं ती वारंवार तुंबणं, जिन्याची सदोष रचना, थोड्या दिवसांतच प्लास्टर निघणं यासारखे प्रकार होतात.

महापालिका बांधकामादरम्यान कंत्राटदाराला पाणी आणि वीज जोडणी घेण्याकरता अनामत रक्कम आणि इतर परवानग्या देते. पण काही कंत्राटदार अनधिकृतरित्या पाणी मिळवतात, तर कधी सीबीओच्या सदस्यांनाच बांधकामाकरता पाणी आणायला सांगतात. वीजेची जोडणीही अशीच टाळली जाते. अशा प्रसंगी स्वयंसेवी संस्थेनं खंबीर भूमिका घेतली पाहिजे. वीज आणि पाणी जोडण्या अधिकृतपणे सीबीओच्या नावानं घेऊन देणं ही स्वयंसेवी संस्थेची जबाबदारी आहे. पण स्वयंसेवी संस्था महापालिकेशी प्रामाणिक न राहता कंत्राटदाराच्या बाजूनं झुकतात. कारण महापालिका स्वयंसेवी संस्थांना थेट मानधन देत नाही. महापालिका बांधकाम करणाऱ्या कंत्राटदाराला संपूर्ण कामाचे पैसे देते. काम पूर्ण झाल्यावरच कंत्राटदार स्वयंसेवी संस्थेला त्यांचं मानधन देतो. पण लवकर मानधन मिळेल, या आशेनं स्वयंसेवी संस्था काही ठिकाणी गोड बोलून किंवा जबरदस्तीनं शौचालय सीबीओंच्या ताब्यात देतात.या प्रकारच्यास्वयंसेवी संस्था कंत्राटदार आणि स्थानिक नगरसेवकाच्या बाजूनं असतात. लोकसहभाग आणि वस्तीशी बांधिलकी या गोष्टींकडे त्यांचं दुर्लक्ष होताना दिसतं. स्वयंसेवी संस्था सीबीओ बनवताना नगरसेवकाच्या सूचनांनुसार काम करताना दिसते. कारण स्वयंसेवी संस्थेला नगरसेवकाच्या त्रासापासून स्वतःला सुरक्षति ठेवायचं असतं.कोणतंही काम, संस्था प्रभागात येताना नगरसेवकाला सलाम ठोकेलच अशी व्यवस्था नगरसेवक करून ठेवतात.

बऱ्याचदा स्वयंसेवी संस्था व्यवस्थापनासंबंधी बाबी हाताळण्याचं प्रशिक्षण देण्याऐवजी,सीबीओंवर हुकुमत गाजवताना दिसतात. सीबीओंचं स्वतंत्र अस्तीत्व निर्माण व्हायलाच देत नाही. बांधकामादरम्यान आणि बांधकाम झाल्यावर स्टँडर्ड ऑपरेशन प्रोसिजर म्हणजेच एसओपीचं (तक्ता क्रमांक २) पालन स्वयंसेवी संस्था आणि मंडळ दोघांनी करणं आवश्यक आहे. ज्या ठिकाणी या एसओपीचं पालन नीट होत नाही, तिथं सीबीओचं काम व्यवस्थित होत नाही. एसओपीतल्या घटकांची तपासणी झालेल्या ठिकाणी,सीबीओंद्वारे शौचालयांचं व्यवस्थापन आणि देखभाल चांगलीहोताना दिसते.

स्वयंसेवी संस्थेनं आपली जबाबदारी चोख बजावल्यावर सीबीओ किती उत्तमपणे कामगिरी करू शकतो, हे सांताक्रूझमधल्या शौचालयाकडे पाहिल्यावर लक्षात येतं. स्वामी समर्थ महिला संस्था व्यवस्थापन करत असलेल्या या शौचालयाला स्थानिकांचं उत्तम सहकार्य मिळत आहे. सीबीओच्या नावे अधिकृत वीज-पाणी जोडणी, बांधकाम झाल्यावर लगेचच स्वयंसेवी संस्थेनं सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करून सीबीओला सामंजस्य करार मिळवून दिला. हस्तांतरण झाल्यानंतरही संस्थेनं स्थानिकांसोबत उत्तम समन्वय साधला. त्यामुळं शौचालयाचं व्यवस्थापन करताना या महिलांना सुरूवातीला आलेल्या अडचणी लवकर दूर झाल्या. शौचालयाच्या वापराकरता जास्त पैसे मोजावे लागणार या गैरसमजामुळं सुरूवातीला स्थानिक लोक शौचालयाच्या बांधकामाला विरोध करत होते. शौचालयाचं बांधकाम, त्याचा वापर, स्वच्छता, देखभाल, सुरक्षा आणि शुल्क याबद्दलची माहिती महिला सर्वांना देऊ लागल्या. स्वयंसेवी संस्थेनं वस्तीच्या गरजा आणि बांधकामाची रचना याबाबत सीबीओकडून माहिती घेतली. त्यानुसार शौचालय संकुलात लहान मुलं आणि अपंगांकरता वेगळ्या शौचालय सीट्स आणि २ बाथरुमची सोय तळमजल्यावर करण्यात आली. महिलांकरता तळमजल्यावर १२ आणि पुरुषांकरता पहिल्या माळ्यावर १२शौचालय सीट या संकुलात आहेत.२०१४ च्या अखेरिस अखेरिस शौचालयाचं उद्घाटन झालं. पण सुरूवातीचे सहा महिने काही व्यक्ती शौचालयाचं खूप नुकसान करत होत्या. सीबीओच्या सदस्यांनी वस्तीत सतत बैठका घेऊन याबद्दल लोकांशी चर्चा

केली. हळूहळू त्रास देणाऱ्या लोकांना त्यांची चूक उमगली आणि नुकसान करणं कमी होऊ लागलं.शौचालय वापराकरता प्रत्येक खोलीला दर महिना पन्नास रुपये पास आणि पास नसल्यास ५ रुपये दर आकारण्यात येतो. सीबीओकडे साडेतीनशे पास आहेत. शौचालयाच्या देखभालीकरता ३ केअरटेकर आहेत. तेच हे शुल्क जमा करतात. केअरटेकर देखभाल खर्च आणि वेतन वगळून यातली काही रक्कम सीबीओला देतात. ही रक्कम सीबीओ बँकेत जमा करते. याच रक्कमेतून शौचालयाच्या दुरूस्तीची छोटी कामंकरण्यात येतात.

स्वयंसेवी संस्थांनी आपली जबाबदारी चोख पार पाडली तर सीबीओ बनवणं, शौचालयाचं बांधकाम ते व्यवस्थापनापर्यंतचे टप्पे सीबीओंना चांगल्या प्रकारे हाताळता येतात. लोकांमध्ये या सुविधेबद्दल मालकीची, आपलेपणाची भावना निर्माण होते. परिणामी लोकसहभागातून देखभाल आणि व्यवस्थापन हा या कार्यक्रमाचा उद्देश सफल होतो.

तक्ता क्रमांक २

## प्रमाणित कार्यप्रणाली तपासणी (SOP)

१) सामुहिक शौचालयाच्या बांधकामासाठी जागा शोधताना स्वयंसेवी संस्थेनं ज्या भागात शौचालयाची सर्वाधिक गरज आहे अशी जागा/समुदाय शोधावा. यात वस्ती स्वच्छता कार्यक्रमात सीबीओ आणि समूहाची (वस्तीची) भूमिका लोकांना स्पष्ट करावी.

२) प्रस्तावित शौचालय संकुलाचा वापर करणाऱ्यांकडून त्यांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकांकरता म्हणजेच सीबीओसाठी संमतीपत्र आणि शौचालयाची गरज असल्याचं मागणीपत्र स्वयंसेवीसंस्थेनं घ्यावं.या संमतीपत्रात सीबीओ कार्यकारी समितीतल्या लोकांचाही उल्लेख असावा.

३) शौचालयाचा वापर करणाऱ्या वस्तीतल्या किमान ५०% लोकांचा पाठिंबा मिळण्याकरता, त्यांच्या पाठिंब्याच्या सह्या मिळवण्याकरता स्वयंसेवी संस्थेनं सीबीओला मदत करावी. याकरता सीबीओ आणि वॉर्ड कर्मचाऱ्यांना लागणारी सर्व मदत स्वयंसेवी संस्थेनं द्यावी.

४) सर्व वापरकर्त्या कुटुंबांना मासिक पास देण्याकरता स्वयंसेवी संस्थेनं सीबीओला मदत करावी. तसेच या पासवर सर्व वापरकर्त्यांची नावं आली आहेत ना हेही तपासणं.

५) शौचालय ताब्यात घेण्यापूर्वी मुंबई महानगरपालिका आणि सीबीओ यांच्यात सामंजस्य करारावर सह्या झाल्याची खात्री करावी. कंत्राटदारानं शौचालय संकुलाचं बांधकाम पूर्ण केल्यावर स्वयंसेवी संस्थेनं बांधकामाचे २ फोटो काढून महापालिकेत द्यावेत.

यासोबतच कायद्याचे पालन करून सीबीओचं यशस्वीरित्या गठन करण्यात आल्याचे पुरावे म्हणून विविध कायद्याद्वारे केलेल्या नोंदणींचे प्रमाणपत्रही स्वयंसेवी संस्था आणि सीबीओनी महापालिकेत द्यावेत.

# प्रकरण ३ – महिला मंडळ आणि शौचालय व्यवस्थापन

आपल्या सर्वांना माहित आहे की, भारतात शौचालयाची स्वच्छता ही नेहमी समाजातल्या विशिष्ट जातींवर लादण्यात आली. कितीही कायदे, समानता घटनेनं दिली तरी ही चौकट मोडली गेली नाही. पण वैयक्तिक पातळीवर येणाऱ्या अनुभवांमधून सामाजिकदृष्ट्या निषिद्ध मानल्या गेलेल्या या क्षेत्रात सर्व जातीतल्या महिला पुढं यायचं प्रमाण वाढू लागलंय.

भूमी फाऊंडेशनच्या विद्या यांचा जन्म धारावीतलाच. लहानपणी त्यांना शौचालयात जाणं नकोसं वाटायचं. कारण तिथं असणारी घाण. लहान मुलांना बऱ्याचदा रस्त्यावरच बसवलं जायचं. अपुऱ्या शौचालयांमुळं प्रचंड गर्दी असायची. मवाली, गर्दुल्यांकडून मुलींची छेडछाड, शिट्ट्या सतत व्हायची. त्यामुळं मुली नेहमी मैत्रीणींच्या सोबतीनं एकत्र जायच्या. फक्त मुलींकरता वेगळं शौचालय झालं तर बरं होईल, अशाप्रकारची चर्चा मुलींमध्ये नेहमी व्हायची. काही मुली शौचालयात जाते सांगून घरातून पळून गेल्या. त्यामुळं काही मुलींच्या आई त्यांच्यासोबत येत असत.

सार्वजनिक शौचालय वापरताना सुरक्षा आणि स्वच्छता हे दोन महत्त्वाचे मुद्दे कोणत्याही वर्गातल्या महिलेच्या मनात सर्वात आधी येतात.शौचालयात किंवा त्याच्या आसपास आपल्यावर अत्याचार होईल का? ही भीती झोपडपट्टीत राहणाऱ्या मुली आणि महिलांना नेहमी असते. याला कारणंही तशीच आहेत. वस्तीतल्या सामुदायिक शौचालयांमध्ये दारूडे आणि गर्दुल्यांचा असणारा गराडा, शिवीगाळ, भांडणं, मारामाऱ्या, मुली-महिलांची छेडछाड, कधी त्यापुढं जाऊन अत्याचार या गोष्टी सर्रास आहेत. यासोबतच अस्वच्छ, धोकादायक आणि अपुऱ्या शौचालयांचा फटकाही महिलांनाच बसतो. अत्याचाराच्या भीतीनं एकमेकींच्या सोबतीनं काळोखात जीव मुठीत घेऊन उघड्यावर शौचाकरता जावं लागतं. महिलांच्या शौचालयात पुरूष बिनदिक्कत शिरणं, दारांना कड्याही नाहीत. त्यामुळं एक महिला शौचालयाच्या आत असली की, बाहेर दोन महिला पहाऱ्याकरता उभ्या राहतात. ही परिस्थिती बऱ्याचशा सामुदायिक शौचालयांमध्ये पाहायला मिळते.स्वतःसोबतच घरातील सदस्यांनाही सार्वजनिक शौचालयाचा वापर करताना येणाऱ्या अडचणीमहिलांना अस्वस्थ करतात.यासारख्या असंख्य गोष्टींमुळं वस्ती शौचालयाच्या उभारणीत महिला पुढाकार घेऊ लागल्या. महिला त्याकरता जिद्दीनं पाठपुरावा करतात. वस्तीतून पाठिंबा, प्रशासकीय आणि इतर गोष्टी अनुकूलअसल्या की कामं लवकर होतात. नाहीतर वर्षानुवर्ष रखडत राहतात.

विक्रोळी पार्कसाईट मध्ये राहणाऱ्या मनिषा वाघमारे यांची मुलं सार्वजनिक शौचालयात जायला नकार द्यायची. मुलांना घरातच शौचालय हवं होतं. किंवा आपण इथून दुसरीकडं राहायला जाऊयात, असा हट्ट मुलं करायची. २००० साली मनिषा वयाच्या १६ व्या वर्षी लग्न होऊन याभागात राहायला आल्या. महिला आणि पुरुषांसाठी वेगळं शौचालय नसल्यामुळं, एकाच शौचालयाचा वापर सर्व करत असत. पाळीमध्ये वापरलेले पॅड आणि कापडाचे तुकडे महिला शौचालयात कुठेही टाकत असत. एक दबंग मनुष्य शौचालय वापराचे पैसे वसूल करायचा. आठवड्यातून एकदाच साफसफाई करायचा. मनिषा यांना मुलांचं म्हणणं पटत होतं. पण दुसरीकडं राहायला जाणं,त्यांना शक्य नव्हतं.मनिषा यांना मुलांच्या रोजच्या प्रश्नांनी हैराण केलं होतं. दरम्यान, विक्रोळीत एका शौचालयाचं काम सुरू असल्याचं मनिषा यांना कळलं. त्या शौचालयाच्या ठिकाणी जाऊन त्यांनी चौकशी केली. त्यावेळी त्यांना तिथं असणाऱ्या स्वयंसेवी संस्थेच्या अधिकाऱ्यांनी सीबीओ आणिशौचालयव्यवस्थापनाबद्दल माहिती दिली.मनिषा यांनी ही माहिती वस्तीतल्या लोकांना दिली. त्यांच्या वस्तीतल्या प्रत्येक सोसायटीचे अध्यक्ष, सचिव आणि मनिषा यांनी २०१२ मध्ये जयहिंद मित्र मंडळाची स्थापना केली. बांधकाम सुरू होण्यापूर्वी आणि बांधकामादरम्यान मनिषा यांनी महापालिकेत कामाचा नियमित पाठपुरावा केला. स्वयंसेवी संस्थेच्याही नियमित संपर्कात राहिल्या. याचा फायदा म्हणजे अवघ्या ९ महिन्यात त्यांच्या संस्थेच्या शौचालयाचं बांधकाम पूर्ण झालं. महिलांकरता खाली ९ आणि पुरूषांकरता वरती ९ असं बांधकाम झालेलं शौचालय फेब्रुवारी २०१३ ला सुरू झालं. मनिषा आणि मंडळाच्या सदस्यांच्या जागत्या पहाऱ्यामुळं इथल्या महिला आणि मुलींना कोणत्याही वेळेला निर्धास्तपणं शौचालयाचा वापर करता येतो. आपल्या मुलांनात्रासातून बाहेर काढण्याकरता मनिषा यांच्यातल्या आईनं पुढाकार घेतला आणि संपूर्ण वस्तीची सोय झाली. शौचालय वापराला

खुलं झाल्यावर संपूर्ण वस्तीनं मनिषा यांचा सत्कार केला. पूर्वी फक्त चार भिंतीमध्ये राहिलेल्या मनिषा यांच्यात या कामामुळं आमूलाग्र बदल झाला. त्या आता महाराष्ट्र सुरक्षा मंडळात सुरक्षारक्षक म्हणून काम करतात.

घाटकोपर पंतनगर भागात ३० वर्षांपूर्वीपर्यंत गटारांवर पत्र्याचा तात्पुरता आडोसा घालून शौचालयं बनवली होती. सर्वांनाच याचा खूप त्रास व्हायचा. म्हाडानं २५ वर्षांपूर्वी शौचालयं बांधलं. पण देखभाल नाही, लाईटही नाही. शौचालयाच्या भांड्याखाली घुशींनी पोखरल्यामुळं भांडी खचू लागली होती. लहान मुलं शौचालयात जायला घाबरायची. एक महिला पडता पडता वाचली. त्यामुळं मग वस्तीतल्या महिलांनी मिळून नवीन शौचालय बांधायचं ठरवलं. या महिलांचं १५-२० वर्षांपासून भजनी मंडळ आहे. त्यांनी नवीन शौचालयाकरता महापालिकेशी संपर्क साधला. या वस्तीत २५०-३०० घरं आहेत. वस्तीतल्या पुरुषांनीही महिलांना प्रोत्साहन दिलं. या मंडळातल्या ११ महिलांनी मिळून २०१५ मध्ये साई महिला मंडळ बनवलं. २०१६ मध्ये शौचालय संकुल बांधून पूर्ण झालंआणि या मंडळालाच शौचालयाचं व्यवस्थापनाचं काम मिळालं. बांधकामा दरम्यान महिला विभागात चारचशौचकूप बांधत होते. पण जागा वाया नाही घालवायची, असं महिलांनी ठरवलं. सीबीओनं कंत्राटदार आणि महापालिकेकडंही मागणी लावून धरली. त्यामुळं महिला आणि पुरूषांना ६-६ टॉयलेट सीटस्‌मिळाल्या. महिला विभागातल्या २ कमोडचा वापर वयस्कर-आजारी पुरूषही करतात. त्यावेळी त्यांच्यासोबत घरातली महिला असते. महिला व्यवस्थापन करत असणाऱ्या शौचालयांमध्ये वस्तीची लहान पण महत्वाची निकडही पूर्ण केली जाते.

गोरेगाव इतल्या संतोषनगर भागात दरवाजे तुटलेले, पडायला आलेलं बांधकाम यामुळं मुलांना रस्त्यावर शौचाकरता बसवायचे. रस्त्यावर सर्वत्र घाणीचं साम्राज्य असायचं. कोणीही नातेवाईक घरी यायचे नाहीत. चोर, दारूडे आणि गर्दुल्यांचाही प्रचंड त्रास होता. शौचालयात मुली आणि महिलांवर अत्याचार व्हायचे. साथीला वस्तीत दादागिरी करणारे लोकही होतेच. घराबाहेर फारसं कोणी पडायचं नाही. ही परिस्थिती बरेच वर्ष होती. २००२ मध्ये वस्तीतल्या महिलांनी नगरसेवकांची भेट घेतली. लोकांना चांगलं शौचालय तर हवं होतं. पण गुंड, चोर आणि गर्दुल्यांच्या भीतीनं सगळे मागे हटत होते. या महिलांमधील एक रीटा कडलक यांनी त्यांच्या घरी मिटींग घेतली. पण लोकं तयार होईनात. शेवटी रीटा आणि त्यांच्या पतीनं लोकांशी बोलून काही जणांना तयार केलं. मग १२ महिलांची नावं काढली आणि शिवशक्ती महिला मंडळ बनवण्यात आलं.२००४ मध्ये २० टॉयलेट सीट असणारं नवीन शौचालय बांधून शिवशक्ती महिला मंडळाला व्यवस्थापन करायला देण्यात आलं.

शौचालय ते वस्ती यातलं अंतर हाही महत्त्वाचा मुद्दा आहे. घाटकोपरमध्ये म्हाडाच्या शौचालयात जाण्याकरता द्रुतगती मार्ग ओलांडून जावं लागायचं. रस्ता ओलांडून शौचालयात जाणं म्हणजे अक्षरशः जीव मुठीत घेणं असायचं. ते टाळायचं असेल तर, वस्तीपासून जवळ २-३ एकर दाट झाडीत जायचं. महिलांना पहाटेच जावं लागायचं. काही वर्षांपूर्वी वस्तीतल्या महिला शौचाकरता झाडीत गेल्या होत्या. या झाडीत चोरांनी लाईटची केबल कापून उघडी टाकली होती. या कापलेल्या केबलवर या महिलांचा पाय पडला. १ महिला शॉक लागून जागीच मरण पावली. २ महिलांना शॉक लागून जखमी झाल्या. यानंतर वस्तीतल्या महिलांनी मंडळ बनवून महापालिकेकडं तगादा लावून वस्तीकरता शौचालय बांधून घेतलं.

महापालिकेकडून व्यवस्थापनाकरता शौचालय ताब्यात घेताना सामंजस्य करार होतो. यात सीबीओनं शौचालय व्यवस्थापन करताना कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत, याचा उल्लेख असतो.यावेळी सीबीओला अनामत रक्कम बँकेत भरावी लागते. शौचालयाची सुविधा मिळावी याकरता सरफुनिसा, शोभा यासारख्या काही महिलांनी स्वतःचे दागिने किंवा घर गहाण ठेवून रक्कम उभारल्याचं मुंबईत पाहायला मिळतं. यावरून अंदाज येईल की, या महिला शौचालय नसल्यामुळं किती त्रासल्या होत्या.

वस्ती स्वच्छता कार्यक्रम जसा पुढे जातोय तसं प्रत्येक लॉटमधल्या नियमांमध्ये सुधारणा, काही मार्गदर्शक तत्वांचा समावेश होत जातो. लॉट क्रमांक १० आणि ११ हे एकाचवेळीसुरू झाले. या लॉटपासून शौचालयाचं व्यवस्थापन करणाऱ्या सीबीओंमध्ये ३३%महिला सदस्या असल्याचं पाहिजेत असं नमूद करण्यात आलं. पुरुषांच्या सीबीओंमध्येही महिला प्रतिनिधीत्व दिसू लागलं.

त्यामुळं आता पुरुष सीबीओ व्यवस्थापन करणाऱ्या शौचालयांमध्ये महिलांच्या समस्यांकडे दुर्लक्ष होणार नाही.

सीबीओला वस्तीतल्या ५०% रहिवाशांचा पाठिंबा असला की त्यांना शौचालयाचं व्यवस्थापन सोपवलं जातं. आरोग्य आणि स्वच्छता यांचा संबंध सीबीओला कळणं आवश्यक असतं. त्याशिवाय शौचालयाचं व्यवस्थापन नीटपणं होत नाही. सीबीओ बनला आणि त्याला शौचालयाची जबाबदारी सोपवली म्हणजे झालं असं नाही. या सीबीओंना सक्षम करणंही तितकंच महत्वाचं आहे. सीबीओंना आर्थिक व्यवस्थापन, वस्तीशी समन्वय, दबावतंत्र, कायद्याचं जुजबी %ान याबाबतचं प्रशिक्षण स्वयंसेवी संस्थांनी द्यायला हवं. सीबीओंनीही महिन्यातून किमान एकदा वस्तीसोबत बैठक घ्यायला हवी. त्यांना येणाऱ्या अडचणी, यश या बैठकीत सांगितल्या, तर अडचणींतून बाहेर पडायला रहिवासीही मदत करतात. वस्तीतला एकोपा टिकवण्याची अप्रत्यक्ष जबाबदारी सीबीओंनी पार पाडायला हवी.

सीबीओ बांधणीची प्रक्रिया स्वयंसेवी संस्थेनं नीट पार पाडली तर सक्षम सीबीओ तयार होतो. शौचालयाचं हस्तांतरण झाल्यावरही स्वयंसेवी संस्थेनं सीबीओसोबत नियमित संपर्क ठेवायला हवा. या गोष्टी फार कमी होताना दिसतात. या संपूर्ण कार्यक्रमात महिलांची भूमिका ठरवण्यात मुंबई महानगरपालिकेचं पाठबळही खूप महत्त्वाचं आहे.

शौचालय संकुलाच्या दैनंदिन देखभालीकरता सीबीओंकरता अनिवार्य बाबी –

१) शौचालय संकुल ताब्यात घेण्यापूर्वी एसएसपी अंतर्गत निवड झालेल्या सीबीओंनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करावी.

२) शौचालयाचा वापर करणारे लोक, त्यांची यादी आणि त्यांना दिलेल्या मासिक पासाची माहिती सीबीओंना असली पाहिजे.

३) शौचालयातला मैला मानवाद्वारे वाहिला जात नाही ना याची सीबीओनं खबरदारी घ्यावी.

४) महापालिकेच्या नियमांप्रमाणं दैनंदिन स्वच्छता आणि देखभाल होत आहे ना याची काळजी घ्यावी.

५) मासिक पास दर आणि प्रति माणशी दर याबाबतची माहिती शौचालयाच्या दर्शनी भागात लावावी.

६) पाणी आणि वीजेची मासिक देयकं नियमितपणं भरावीत. मुंबई महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी मागणी केल्यावर त्यांना ती दाखवावीत.

७) शौचालयाची स्वच्छता आणि व्यवस्थापन याबाबत वापरकर्त्यांनी तक्रार केल्यास सीबीओनं त्याची दखल घेऊन त्यावर कारवाई करावी.

८) सीबीओनं सर्व नोंदणी अद्ययावत ठेवून आपल्या कामात पारदर्शकता ठेवावी. वस्तीतल्या सर्व लोकांशी सहकार्य आणि उत्तम संबंध ठेवावेत.

९) मुंबई महापालिकेच्या परवानगीशिवाय सीबीओनं स्वच्छता आणि देखभालीकरता शौचालय संकुल इतर कोणाही व्यक्ती अथवा संस्थेला भाड्यानं देऊ नये.

१०) सामंजस्य करार आणि वर उल्लेख केलेल्या बाबींचं उल्लंघन केल्यास सीबीओसोबतचा सामंजस्य करार संपुष्टात येईल.

# प्रकरण ४ – राजकीय इच्छाशक्तीआणि प्रभाव?

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका २०२२ साली नियोजित आहेत. काही नगरसेवकांची निवडणुकांची तयारी कोरोना महासाथीतही सुरू आहे. गोवंडीतलं दत्तगुरू मंडळ व्यवस्थापन करणारं शौचालय संकुल बांधून तयार आहे. पण स्थानिक नगरसेवक "शौचालय मोफत वापरा मी पैसे देईन" असं लोकांनासांगत आहेत. वस्तीतले ६०% लोक पैसे द्यायला तयार आहेत. पण उरलेले लोक नगरसेवकाच्या सांगण्यावरूनमंडळाशी वाद घालत आहेत. या प्रकारामुळं महापालिका सभागृहानंच ठरवलेल्या धोरणांना, उद्देशांना धक्का पोहचतोय. लॉट १० मध्ये स्पष्ट म्हटलं आहे की, वस्ती स्वच्छता कार्यक्रमांतर्गत बांधण्यात येणाऱ्या शौचालयांच्या दैनंदिन स्वच्छता आणि देखभाल या कामांमध्ये वस्तीतल्या रहिवाश्यांना सहभागी करून घेणे. 'पॉईंट १० एसएसपी अंमलबजावणी नियमावली ब नुसार", वस्तीतल्या शौचालय संकुलाच्या देखभाल आणि दुरुस्तीकरता सीबीओला वस्तीतल्या शौचालयाचा वापर करणाऱ्या रहिवाशांकडून पैसे आकारण्याची परवानगी आहे. या रहिवाशांना मासिक पास द्यावेत. सीबीओशी चर्चा झाल्यावर असिस्टंट इंजिनियरच्या परवानगी आणि सहीनं ही रक्कम ठरवण्यात येते.

धारावीतल्या प्रगती महिला सेवा मंडळानं शौचालय बांधणी आणि व्यवस्थापनाकरता २००२ साली मुंबई महानगरपालिकेकडं अर्ज केला. त्यांचा अर्ज मान्य होऊन २००३ मध्ये महिलांकरता १०आणि पुरूषांकरता १० टॉयलेट सीट असणारं एक मजली शौचालय बांधून तयार झालं. पण मंडळाला सामंजस्य करार मिळूनही, शौचालयाचा ताबा काही मिळेना.मंत्री असणाऱ्या स्थानिक आमदारांच्या कार्यकर्त्याला हे शौचालय चालवायला हवं होतं. त्यामुळं प्रगती महिला मंडळाच्या ताब्यात शौचालय देऊ नये, याकरता मंत्री महोदय स्थानिक वॉर्ड ऑफिसवर दबाव टाकत होते.चांगल्या दर्जाचं नवीन शौचालय असूनही, राजकीय दबावामुळं२००७ पर्यंत लोकांना म्हाडाचं अस्वच्छ शौचालय वापरावं लागत होतं. मंडळाच्या सदस्या सतत महापालिकेत खेटे घालत होत्या. त्यांनी शौचालय लवकर सुरू व्हावं, म्हणून विभागात सह्यांची मोहीम उघडली. शेवटी त्यांनी तत्कालीन उपमुख्यमंत्री आर आर पाटील यांची भेट घेतली. त्यांच्यासमोर आपली फिर्याद मांडली. स्थानिक मंडळाला संधी मिळायला हवी हा न्याय लागू झाला. अखेरिस प्रगती महिला सेवा मंडळाला शौचालय देण्यात आलं. याच पठडीतला आणखी एक प्रकार सायन स्टेशन जवळच्या लक्ष्मीबाग परिसरात घडला. या परिसरात सामुदायिक शौचालयाची सुरक्षितता, देखभाल आणि स्वच्छतेचा प्रश्न होता. २०१६ मध्ये या परिसरात वस्ती स्वच्छता कार्यक्रमांतर्गत शौचालय बांधायचं ठरलं. पण नगरसेवकाच्या कृपेनं वस्ती बाहेरचाव्यक्ती त्याचं सीबीओ'स्थानिक" आहे असं दाखवून सर्वेक्षण करत होता. स्थानिक महिलांच्या ही गोष्ट लक्षात आल्यावर त्यांनी यावर हरकत घेतली. लगेच त्यांनीभूमी स्वच्छता फाऊंडेशन नावानं सीबीओ स्थापन केला. स्वयंसेवी संस्थेनंही भूमी स्वच्छता फाऊंडेशनला काम त्याचं सीबीओ'स्थानिक" आहे असं दाखवून सर्वेक्षण करत होता. स्थानिक महिलांच्या ही गोष्ट लक्षात आल्यावर त्यांनी यावर हरकत घेतली. लगेच त्यांनीभूमी स्वच्छता फाऊंडेशन नावानं सीबीओ स्थापन केला. स्वयंसेवी संस्थेनंही भूमी स्वच्छता फाऊंडेशनला काम दिलं. पण नगरसेवकाच्या आडकाठीमुळं महापालिकेकडून ग्रीन सिग्नल मिळाला नाही.२०१८ मध्ये शौचालय बांधून तयार झालेलं. पण नगरसेवकाच्या हट्टापायी ते बंद ठेवण्यात आलं. महापालिकेत वर्षभर फेऱ्या मारूनही अधिकारी काही निर्णय घेत नव्हते. सीबीओनं आमदार, खासदारांचेही उंबरठे झिजवले. नगरसेवकानं २०१९ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान शौचालय मोफत वापरता येईल असं जाहीर केलं. लगेच परत त्याच्या मर्जीतल्या वस्ती बाहेरच्या माणसाला बसवून शौचालय सुरू केलं. भूमी फाऊंडेशननं त्यावर आक्षेप घेतला. खूप भांडणं झाली. पोलीस उपायुक्तांनी त्या माणसाला तिथून जायला सांगितलं. त्यानंतर संस्थेनं सामंजस्य करार मिळाला नसतानाही शौचालय चालवायला घेतलं. नगरसेवकानं परत त्याच्या माणसाला बसवायचा प्रयत्न केला. पण पोलिसांच्या साथीनं महिलांनी कडक भूमिका घेतल्यावर तो पळाला. अखेरिस फेब्रुवारी २०२० मध्ये नगरसेवकाच्या ना हरकतीनंतर महापालिकेतर्फे पत्र मिळालं.

मूळात वस्ती स्वच्छता कार्यक्रमांतर्गत बांधल्या जाणाऱ्या शौचालयांच्या बांधकामाकरता महापालिका थेट निधी देते. त्यामुळं नगरसेवक, आमदार आणि खासदार या लोकप्रतिनिधींचा या शौचालयांशी काहीही संबंध नाही. पण आर्थिक लाभ, व्होट बँक,

कार्यकर्त्यांना खूष करणं किंवा वैयक्तिक फायदा अशा कोणत्याही कारणानं राजकीय पुढारी यात रस घेतात. लोकांचाही समज असतो की नगरसेवक, आमदार, खासदार त्यांच्या निधीतून शौचालय बांधतात. त्यामुळं लोकंही लोकप्रतिनिधींच्या मागे असतात.पण पार्श्वभूमीच्या प्रकरणात उल्लेख केल्याप्रमाणं म्हाडाला आमदार, खासदार त्यांच्या निधीतली काही रक्कम पूर्वी शौचालय बांधणीकरता द्यायचे. वास्तविक वस्तीत मूलभूत सुविधा पुरवणं हे महापालिकेचं काम आहे. पणवस्ती स्वच्छता कार्यक्रमांतर्गत होणारं शौचालयाचं बांधकाम नगरसेवकाच्या निधीतून होतं, असा लोकांचा गैरसमज आहे. नगरसेवकही याविषयी लोकांमध्ये भ्रम निर्माण करतातच. मुंबईतल्या नगरसेवकांचा वर्षाचा निधी १ कोटी ६० लाख रुपये आहे. ज्यामध्ये केवळ एका शौचालयाचा संपूर्ण बांधकाम खर्च निघेल. मग वॉर्डातल्या गटारं, फुटपाथ, अंतर्गत रस्ते, रोडलाईट, पाणीपुरवठा यासारख्या मुख्य कामांकरता निधी कसा मिळणार? ही साधी गोष्ट कोणीही सांगत नाही.व्होटबँकेला आकर्षित करण्याच्या नादात राजकारणी जनतेला गुंगवत राहतात. कंत्राटदार आणि स्वयंसेवी संस्था या दोघांनाही नगरसेवक आपल्या नियंत्रणात ठेवायला पाहतात. स्वयंसेवी संस्था आणि कंत्राटदारावर दबाव टाकून राजकारणी आपल्या मर्जीतल्या लोकांच्या ताब्यात शौचालय द्यायला भाग पाडतात. तर कधी सर्व सोपस्कार नीट पार पाडून पुढे आलेल्या स्थानिक चांगल्या सीबीओंच्या कामात अडथळे आणतात.

शौचालयाचं उद्घाटन करू न देणं, त्यांच्या कामाविषयी, स्वच्छतेबद्दलच्या खोट्या तक्रारी महापालिकेत सतत देऊन त्रास देणं सुरू असतं. राजकीय पक्षात ३०-३५ वर्ष कार्यरत असणाऱ्या काही महिला सीबीओंनाही त्यांच्याच पक्षातल्या नगरसेवक-कार्यकर्त्यांकडून हा अनुभव येतो. कधी कधी नगरसेवक आणि विविध राजकीय पक्ष यांच्यातल्या गटबाजीचा फटकाही सीबीओला बसतो. शौचालयांच्या पाटीवर आपलं नाव लागावं, अशी हौस नगरसेवकांना असते. त्यातूनही सीबीओसोबत तणाव निर्माण होतात. शौचालयाचं काम एका नगरसेवकाच्या काळात सुरू होतं. या नगरसेवकानं सीबीओंना शौचालय मिळवण्याच्या प्रक्रीयेत मदत केली असते. बांधकामादरम्यान निवडणुका होऊन दुसऱ्या पक्षाचा किंवा इतर व्यक्ती नगरसेवकपदी निवडून येतो. बांधकाम पूर्ण झाल्यावर सीबीओ जुन्या नगरसेवकाचं नाव पाटीवर लिहितात. त्यावर नवीन नगरसेवक आक्षेप घेतात आणि वाद होतात. या सर्व गोष्टींचा परिणाम शौचालयाची दुरूस्ती, कामात सहकार्य न करणं, बांधकाम रखडवणं, हस्तांतरण, उद्घाटनात विलंब, खोट्या तक्रारी, लोकांची दिशाभूल करणं असा होतो. बऱ्याचदा १५-२० वर्ष एखादी महिला सीबीओ शौचालयाचं व्यवस्थापन करत असते. शौचालयाची पुनर्बांधणी किंवा दुरूस्ती होते. मग नगरसेवक त्याच्या ताब्यात शौचालय देण्याकरता सीबीओवर दबाव टाकतात. पैशांचं आमिषही दाखवतात. हिंसेचे प्रसंगही येतात. अशा परिस्थितीत सीबीओंनी ठाम भूमिका घेतली पाहिजे. कोरोशी संपर्कात असणाऱ्या सीबीओंकरता या सर्व परिस्थितीत कोरो सपोर्ट सिस्टिम उभारते. नियमाप्रमाणं काम करण्याकरता महापालिका अधिकारी, स्वयंसेवी संस्था आणि सीबीओ यांच्यात उत्तम समन्वय, सामाजिक बांधिलकी असली की या गोष्टी टाळता येणं सहज शक्य आहे. कुर्ला विभागात नगरसेवकाच्या दबावाला उलथून लावताना तत्कालीन आयुक्त सुबोधकुमार यांनी त्या नगरसेवकास महापालिका नियमाचा भंग केल्यास नगरसेवक पद रद्द करण्याचा इशारा दिला होता. ही मात्रा चांगली लागू पडली होती.

काही राजकारणी या गोष्टींना अपवादही आहेत. घाटकोपरमधल्या सरस्वती भोसले यांनी त्यांच्या वॉर्डातल्या रहिवाशांना चांगल्या सुविधा मिळाव्यात, याकरता पुढाकार घेऊन कामं केली. सरस्वती ह्या भागात ४५-५० वर्ष राहत आहेत. त्या स्वतः २००२ ते २०१२ या काळात इथल्या नगरसेविका होत्या. या भागात म्हाडानं ५० वर्षांपूर्वी पत्र्याचे संडास बांधले होते. ह्या बैठ्या शौचालयाची दारं पाण्यामुळं वारंवार कुसायची. दारं खालून तुटायची. महिलांची त्यामुळं खूप गैरसोय व्हायची. सरस्वती निवडून आल्यावर त्यांनी सर्वात आधी शौचालयांकडे लक्ष दिलं. त्यांच्या वॉर्डात त्यांनी स्थानिकांना वस्ती स्वच्छता कार्यक्रमाची माहिती देऊन सहा शौचालयांची कामं सुरू केली. स्थानिक सीबीओ या सर्व शौचालयांचं व्यवस्थापन करतात. सरस्वती सांगतात, "या शौचालयांच्या बांधकाम आणि सर्व सुविधांकरता महापालिका अधिकाऱ्यांचं चांगलं मार्गदर्शन आणि मदत झाली". सरस्वती स्वतः नगरसेविका असल्यामुळं या कामात त्यांना अडचण जाणवली नाही. त्यांच्या घरात २५ वर्षांपासून शौचालय आहे. पण स्वतः महिला असल्यामुळं वस्तीतल्या महिलांचा त्रास

त्यांना दूर करायचा होता. त्याकरता त्यांनी प्रयत्न केले. त्या स्वतः कोणत्याही मंडळात सहभागी झाल्या नाहीत. शौचालयांच्या तक्रारी सोडवण्याकरता प्रयत्न व मदत करायच्या. पदावर असताना या सर्व शौचालयांची त्या नियमितपणे तपासणी करून स्वच्छता आणि इतर गोष्टींवर देखरेख ठेवायच्या.

लोकांच्या सुविधेकरता चांगलं काम करत असूनही बऱ्याचदा आर्थिक फायद्याकरता किंवा वैयक्तिक स्वार्थापायी राजकीय लोकांकडून सीबीओंकरता अडचणी निर्माण केल्या जातात. पण जर लोकप्रतिनिधीनं या कामांकरता पुढाकार घेतला, तर लोकांना पायाभूत सुविधा मिळण्याकरता सोप होतं. अधिकाऱ्यांवरही उत्तम काम करण्याकरता दबाव राहतो.

# प्रकरण ५–सुरक्षित आणि हिंसामुक्त शौचालय

शौचालयाजवळ हिंसा किती होणार? अश्लिल शेरेबाजी, छेडछाड, थोबाडीत मारणं, मारामारी असं तुम्हांला वाटेल. शौचालयांमध्ये डोकावणं, खडे मारणं,एसिड-तलवारीनं हल्ला, दारूडे-गर्दुल्यांचा विकृत वावर, गच्चीचा दुरुपयोग, शौचालयाच्या परिसरात किशोरवयीनांचं फुलणारं प्रेम, त्यावरून होणारी भांडणं-मारामाऱ्या, अशा गोष्टी सार्वजनिक शौचालयांच्या आसपास होतात. महिला सीबीओ शौचालय चालवत असतील तर, या व्यवस्थापक महिलांनाही शारीरिक हल्ला आणि मानसिक हिंसेला सामोरं जावं लागतं.महिलांच्या कामाची झळ त्यांच्या कुटुंबियांनाही बसते. दारं तोडणं, वीजेचा मीटर जाळणं, पाण्याचे नळ-पाईप तोडणं, डस्टबीन जाळणं या प्रकारांनी शौचालयाचंही नुकसान केलं जातं. मुलींचे मोबाईल नंबर आणि अश्लिल मजकूर भिंतींवर लिहिणं हेही सुरू असतं. महिला सीबीओंच्या ताब्यातल्या शौचालयांमध्ये ही यादी वाढत जाणारीच आहे. सीबीओंना कधी पोलिसांचं सहकार्य मिळतं तर कधीदुर्लक्ष होतं.

फिल्मसिटीच्या शेजारिच कांता गणेशन गेली ५०-५५ वर्ष राहतात. त्या दोन वर्षाच्या असताना, त्यांचे आई वडिल दुष्काळात बीडहून इथं कामासाठी आले. तेव्हा वस्ती कमी होती. वस्ती वाढल्यावरही जंगलातच शौचाकरता जावं लागे. वस्ती सुधारणा कार्यक्रमांतर्गत इथं शौचालय बांधण्याचं ठरलं. कांता यांच्या नेतृत्वाखाली महिलांचा संघ बनला. अनेक अडचणींनंतर ७ वर्षांनी २००८ मध्ये बांधकाम पूर्ण झालं. शौचालयाच्या केअरटेकरचं कुटुंबही त्याच्यासोबत शौचालयाच्या वरच्या खोलीत राहायचं. पती, पत्नी आणि दोन तरुण मुलींचं हे कुटुंब होतं. या तरुण मुलींना वस्तीतले गर्दुले आणि दारूडे खूप त्रास द्यायचे. येताजाता या मुलींची छेडछाड सतत सुरू असायची. एकदा मध्यरात्री काही गर्दुले शौचालयात गेले. रात्रीचे बारा वाजल्यानं शौचालय बंद केलं होतं. तर हे लोक जबरदस्तीनं शौचालय उघडायला सांगत होते. केअरटेकरनं शौचालय उघडायला नकार दिला. त्यामुळं चिडलेल्या दारूड्या आणि गर्दुल्यांनी लाथा-काठ्यांनी केअरटेकरला मारायला सुरूवात केली. त्याला वाचवायला त्याचं कुटुंबही खाली आलं. या गर्दुल्यांनी शौचालयात एसिड ओतलं. रात्री दोनच्या सुमारास पोलिसांनी या धुमाकूळ घालणाऱ्यांना पकडलं. शौचालयालाही कुलूप लावलं. कांता यांनी दुसऱ्या दिवशी पोलिसांकडे चावी मागितली. पोलिसांनी बाहेरचा कोणी माणूस केअरटेकर ठेवू नका, असं सांगितलं. त्यावेळी कांता यांनी शौचालय संपूर्ण ताब्यात घ्यायचं ठरवलं. वस्तीत इतकी वर्ष काम करत असल्यामुळं आता काही त्रास होणार नाही, असं त्यांना वाटलं. शौचालयही स्वतःच स्वच्छ करायचं ठरवलं.पण गर्दुले आणि दारुड्यांचा त्रास सुरू झालाच. शौचालयाच्या गच्चीत जाऊन बसणं, शौचालयाच्या आसपास घुटमळणे हे प्रकार सतत सुरू असायचे. "पैसे नका देऊ, पण इथं भांडणं करू नका", अशी विनंती कांता या लोकांना करायच्या. कधी कडक शब्दात बोलून पळवूनही लावायच्या. याचा राग येऊन एकदा हे दारूडे आणि गर्दुले तलवारी घेऊन कांता आणि त्यांच्या मुलींवर धावून आले. कांता आणि त्यांच्या चारही मुली अजिबात घाबरल्या नाहीत. हातात येईल त्या रॉड, सळ्या, सामान घेऊन या लोकांवर धावून गेल्या. कांता गणेशन यांनी त्यावेळी हिंमत केली नसती तर...

पुरुष सीबीओंना येणाऱ्या अडचणींपेक्षा महिला सीबीओंना येणारी आव्हानं वेगळी असतात.स्त्रियांच्या सामाजिक मर्यादांची चौकट इथंही प्रभावानं काम करते.महिलांनी शौचालयाचं व्यवस्थापन करणं या गोष्टीला बऱ्याचदा जात आणि समुदायाचाही आक्षेप असतो. आपल्या जातीतल्या बायका ही कामं करत नाहीत. हे खालच्या जातीतल्या लोकांचं काम आहे. आता शौचालयातून मिळणाऱ्या पैशातून तुमचं घर चालवणार का? किंवा बाईला काय करायचीत घराबाहेरची ही कामं? अशा अनेक टीका, टीप्पणींना महिलांना सामोरं जावं लागतं. कधीकधी तर वस्तीतल्या वयस्कर महिला शौचालयाच्या कामात पुढाकार घेणाऱ्या महिलांच्या पतीला सांगतात की, तो घरी नसताना त्याची बायको इकडे-तिकडे हिंडते. या महिला वस्तीसाठी काम करत असताना स्वतःचा मान-सन्मान, कौटुंबिक शांतता, मानसिक स्वास्थ्य सर्वच खुंटीला टांगतात.धर्म-जात समुदायाचा दबाव काहीवेळा एवढा टोकाचा असतो की, त्यातूनही हिंसा होते. एंटॉप हिल भागात सरफुनिसा खान यांचं एकता विकास महिला मंडळआहे. हे शौचालय तयार असूनही त्याच्याव्यवस्थापनाकरता ३ वर्ष कोणी तयार नव्हतं. सरफुनिसा यांनी मग पुढाकार घेतला. शौचालयाच्या पुरुष विभागात जाण्याकरता जिना चढताना महिला विभागाच्या

आतला भाग दिसायचा. सरफुनिसा यांनी स्वखर्चानं महिला विभागात भिंत बांधली. स्थानिक नगरसेवकाच्या दबावामुळं या शौचालयाला पाणी आणि वीज जोडणीही मिळाली नव्हती. नगरसेवकाच्या कार्यकर्त्याला हे शौचालय हवं होतं. हा नगरसेवक आणि वस्तीहीसरफुनिसा यांच्याच समुदायाची आहे."आपल्या समुदायातल्या महिला असली कामं करतात का? आपल्या धर्मात संडास, बाथरुमचे पैसे खाणं जायज नाही" अशी वक्तव्य हा नगरसेवक वस्तीत करायचा.सरफुनिसा यांनी त्यांच्या घरातून वीज जोडणी घेतली होती. वस्तीतल्या कार्यक्रमांसाठी लोकं शौचालयातली वीज चोरायचे. त्यामुळं येणारं भरमसाठ बील दागिने गहाण ठेवून सरफुनिसांनी भरलं. शौचालयाच्या गच्चीवर पतंग उडवणं, भांडणं, मारामाऱ्या हे रोजचंच असायचं.सरफुनिसांनात्रास द्यायची एकही संधी वस्तीतल्या लोकांनी सोडली नाही. हे लोक त्यांना आजही 'संडासवाली" म्हणूनच हाक मारतात.एकाच पासवर इथं २५-३० जण यायचे. नातेवाईक असल्याचं खोटं सांगायचे. केअरटेकरनं हरकत घेतल्यावर त्याला मारहाण, मीटरबॉक्स आणि कचऱ्याच्या बादलीला आग लावणं हे नित्याचंच झालं होतं. शेवटी केअरटेकर काम सोडून गेला. मग सरफुनिसांचा अपंग मुलगा हे काम करू लागला. लोकं त्यालाही मारहाण करू लागले. वस्तीतल्या महिलांच्या सुविधेकरता सरफुनिसा हे सहन करत होत्या. पण एके रात्री हद्द झाली. शौचालयासमोरची भांडणं, मारामारी विकोपाला गेली. सरफुनिसा यांच्या १८ वर्षीय मुलीचे कपडेच जमावानं फाडले. पोलिसांनी यातल्या चौघांना पकडून सहा महिने तुरुंगात ठेवलं. त्यानंतर परिस्थितीत जरा सुधारणा झाली. पण हा संघर्ष मध्येच उफाळतो. या मुलाखतीच्या ५-६ दिवसांनंतरच नोव्हेंबर २०२० मध्ये त्यांच्या सुनेलाही जमावानं मारहाण केली. एवढं सगळं होत असूनही सरफुनिसा गेली कित्येक वर्ष वस्तीतल्या महिलांचं कौटुंबिक हिंसाचार प्रकरणी समुपदेशन करतात.

स्त्री देहाकडे बघण्याचा निकोप दृष्टीकोन आपल्या समाजात कधी येईल का?'स्त्रीनं कायम तिचं सर्व अंग झाकलेलं ठेवावं. तिनं नेहमी मान खालीच ठेवावी". या मानसिकतेच्या व्यक्ती स्त्री देहाला आससून बघण्यात, तिचं खच्चीकरण करण्यात जास्त पुढे असतात. ही असुरी वृत्ती स्त्रियांना मोकळेपणानं नैसर्गिक विधीही करू देत नाही.मानखुर्दमधल्या समर्थवाडीत ३ वर्षाच्या खटपटीनंतर शौचालयाचं बांधकाम २००३ मध्ये पूर्ण झालं. ओंकार संघटीत महिला संस्थेला व्यवस्थापनाचं काम मिळालं. नियमांनुसार शौचालयाच्या सभोवताली ३-३ फुटांची जागा मोकळी ठेवण्यात आली होती. शौचालयाच्या शेजारी लाकडाची वखार होती. वखारीचा मालक मुंबई महापालिकेत नोकरीला होता. या माणसानं या ३ फूट मोकळ्या जागेत अतिक्रमण करत मातीचा भराव घातला आणि त्याचं बांधकाम उंच केलं. मंडळातल्या महिलांनी त्या माणसाला असं न करण्याकरता विनंती केली. पोलीस तक्रार केली. पण काही उपयोग झाला नाही. या वखारीत टवाळखोर येऊन बसायचे. तळमजल्यावर महिलांचं शौचालय आहे. हे टवाळखोर लोक मुलींना खिडकीतून दगड मारायचे. सांगूनही काही फायदा होत नव्हता. स्थानिक पोलीसही काही करत नव्हते. शेवटी डिसीपींकडे सीबीओच्या महिला तक्रार घेऊन गेल्या. महिला डिसीपींनी याची तात्काळ दखल घेतली. त्या ५० पोलिसांची फौज घेऊन शौचालयाच्या जागी आल्या. सोबत महापालिकेच्या वॉर्ड ऑफिसमधील अधिकाऱ्यांनाही आणलं. अनधिकृत बांधकाम ताबडतोब जमिनदोस्त केलं. ३ फूटाची जागा मोकळी करायला लावली. वखारमालकाला त्याच्या जागेत शौचालयाच्या बाजूनं १५ फूट उंचीची भिंत बांधायला लावली. वखारमालक आणि टवाळखोरांवर कारवाईचं गांभीर्य महिला अधिकाऱ्यांच्याच लक्षात आलं.

तळमजल्यावरील महिला शौचालयांच्या खिडक्यांमधून वाकून पाहणं, खडे मारणं हे प्रकार सर्रास होताना दिसतात. याला विरोध केला तर त्रास आणखी वाढतो.महिला सीबीओ व्यवस्थापन करत असणाऱ्या शौचालयांमध्ये हिंसा आणि तोडफोडीचं प्रमाणही जास्त असतं. पुरुष सरळ दोन हात मारामारी करतात. तर स्त्रिया फक्त शिव्या देणं किंवा मोठ्यानं बोलतात. बाईवर हात उगारला, शस्त्राचा धाक दाखवला, चारित्र्याबद्दल बोललं; तर ती बाई नरमाईची भूमिका घेईल हा सर्वसाधारण समज असतो. तसं घडतंही. छेडछाड, शिवीगाळ, भांडणं यासोबत आर्थिक नुकसानीचं प्रमाणंही महिला व्यवस्थापन करणाऱ्या शौचालयांमध्ये जास्त आहे.शौचालयाच्या बादल्या तोडणं, डस्टबीन पेटवणं, दारं, नळ तोडणं, गल्ल्यातले पैसे चोरणे हे प्रकार सुरूच असतात. व्यसनी लोकांना वस्तीतलं शौचालय हा त्यांचा अड्डा बनवायचा असतो. मुली आणि महिलांची सुरक्षा याकडे महिला सीबीओंचा कटाक्ष असतो. तर कधी

महिलांना व्यवस्थापन करू न देण्यात स्थानिक हितसंबंध असतात.यातून मग महिला व्यवस्थापकांवर हल्ले होतात. कांता गणेशन, सरफुनिसासारख्या महिला धिटाईनं या गोष्टींना सामोऱ्या जातात. पण प्रत्येक स्त्री एवढी धिटाई दाखवू शकत नाही.शेवटी कंटाळून त्या या प्रक्रियेतून बाहेर पडतात.

# प्रकरण ६ - इतर आव्हानं

महिला सर्व क्षेत्रात कामं करतात. स्वतःचं कौशल्य सिद्ध करत आपल्या कामाचा ठसा उमटवतात. असंअसलं तरी एखाद्या महिलेनं काहीही नवीन करायचं झालं तर,"बाई काय करणार"? ही टीप्पणी तिला ऐकावीच लागते. शौचालयांच्या व्यवस्थापनात महिला येऊ लागल्यावर इथंही महिलांना हे ऐकावं लागतंच.महिलांनी'काही करू नये" याकरताही जोरदार प्रयत्न करण्यात येतात. एकत्र आलेल्या महिलांमध्ये फूट पाडणं, सत्तासंघर्षकिंवा जातीपातीच्या भिंतीही उभ्या केल्या जातात.वस्तीस्वच्छताकार्यक्रमांतर्गत बांधण्यात येणाऱ्या शौचालयांचं वैशिष्ट्य म्हणजे यातला वस्तीचा सहभाग किंवा उत्तरदायित्व. मात्र महिला सीबीओ चालवत असणाऱ्या शौचालयाच्या वस्तीतल्या म्होरक्यांकडून शौचालय आणि त्याच्या आसपास अनेक गोष्टी घडवण्यात येतात. बांधकाम सुरू असताना बांधकाम साहित्याची चोरी, बांधकामात अडथळे आणणं, कामगारांना मारहाण, कंत्राटदाराकडून हप्ते मागणं, व्यवस्थापनावरून दोन गटात तणाव,शौचालयांच्या वापराचे पैसे न देणं, शौचालयाची वास्तू आणि सामानाची नासधूस करणं, अस्वच्छता पसरवणं,शौचालयातल्यापाण्याच्या बादल्या, नळ, कचऱ्याचे डबे यांची चोरी, वीज-पाणी चोरी, सीबीओचालकांवर आरोप हे प्रकारही होत असतात. सीबीओंना शौचालय व्यवस्थापनाकरता सरकारकडून पैसे मिळतात, असा वस्तीतल्या रहिवाशांचा समज असतो. त्यामुळं मासिक पासाचे पैसे देण्यास टाळाटाळ केली जाते. परिणामी वीजेचं आणि पाण्याचं बील भरायला सीबीओंना अडचणी येतात. सफाईचं सामान, केअरटेकरचा पगार आणि नासधुसीची दुरुस्ती मुष्कीलीनं भागवलं जातं.

गोरेगाव पश्चिम भागात राजश्री महिला सेवा सहकारी संस्था दत्तक वस्तीचं काम करत होती. या मंडळातल्या महिला शिवसेनेशी संबंधित आहेत. या मंडळाचं चांगलं काम पाहून, वस्ती स्वच्छता कार्यक्रमांतर्गत शौचालयाचा विषय निघाल्यावर काँग्रेस पक्षाच्या स्थानिक नगरसेविकेनं २०१४ मध्ये या मंडळाची शिफारस केली. २०१५ मध्ये बांधकाम सुरू असताना वस्तीत तणावाला सुरूवात झाली. बांधकामादरम्यान दारूडे लोक कंत्राटदाराकडून पैसे घ्यायचे. २०१७ पासून भाजपचे नगरसेवक सत्तेत आहे. उद्घाटनाआधीच या नगरसेवकांनी लोकांना शौचालय वापरण्याकरता खुलं केलं. त्यासोबतच 'या शौचालयाकरता सरकार महिला मंडळाला पैसे देतं. ह्या महिला आपले पैसे लाटतात",अशा अफवा भाजप कार्यकर्ते वस्तीत पसरवायला लागले. यामुळं शौचालयाचा वापर करूनही लोक पैसे देत नव्हते. पैसे मागायला गेल्यावर लोकं भांडणं करायचे. वर्षभर अध्यक्षा, खजिनदार आणि सेक्रेटरी ह्यांनी स्वखर्चानं साफसफाई करून पाणी आणि वीजबीलही भरलं. हळूहळू ह्या तिघींनी वस्तीत जनजागृती केली. लोकवर्गणीतून ह्या गोष्टी करायच्या आहेतहे लोकांना समजावलं. मग लोक पैसे देऊ लागले. तरीही अजून काही लोक पैसे देत नाहीतच. "लोकांना सुविधा हव्यात पण पैसे खर्च करायला नको", असं या पदाधिकारी खेदानं म्हणतात. या भागात मराठी, उत्तर भारतीय आणि ख्रिश्चन लोक राहतात. तळमजला आणि पहिला मजला मिळून २४ टॉयलेट सीट आहेत. मराठी भाषिक पासाची रक्कम देतात. पण अमराठी लोक पैसे न देता भांडणं करतात. ह्या शौचालयाचा वापर साधारण २५० घरं करायचे. लॉकडाऊन काळात भाडेकरू सोडून गेले. त्यामुळं तेही नुकसान झालंच.शेजारील वस्तीतलं शौचालय तोडल्यामुळं, तिथले लोकंही आता ह्या शौचालयाचा वापर करतात. वस्तीतले दारूडे आणि जुगारी गच्चीवर जाऊन दारू पित जुगार खेळतात. पावसाळ्यातही गच्चीवर अड्डा जमवता यावा म्हणून ह्या लोकांनी गच्चीवर छत बांधलं. महिलांनी हे छत तोडलं. पोलिसांकडे कितीही तक्रारी दिल्या तरी कारवाई होत नाही. दारूडे लोक लाथा मारून दरवाजे, पाण्याचे पाईप, लाईट तोडतात. त्यामुळं खर्चात भर पडत असते. विशेष म्हणजे या सीबीओतल्या सर्व महिलांच्या घरातच शौचालय आहे. वस्तीकरता त्या हा त्रास सहन करत आहेत. पण आता रोजच्या त्रासाला ह्या सर्व महिला कंटाळल्या आहेत. त्यामुळं व्यवस्थापन सोडण्याच्या निर्णयाला त्या आल्या आहेत.

महिला सीबीओंकडून आपल्या ताब्यात शौचालय मिळावं याकरता वस्तीतले काही गट प्रचंड मेहनत घेतात. रात्री सिवेज लाईनचं चेंबर उघडून त्यात गोणी, दारूच्या बाटल्या, मोठी मोठी दगडी टाकतात. यामुळं शौचालय तुंबतात.मग महिला सीबीओचं शौचालयाकडं लक्ष नाही, शौचालय तुंबत, अस्वच्छता आहे अशी तक्रार वॉर्ड ऑफिसमध्ये करायची.विशेष म्हणजे न थकता

नियमितपणे ही सर्व मेहनत करणारे लोकही याच शौचालयाचा वापर करतात. अशीच काहीशी परिस्थिती गोरेगाव पश्चिमेतल्याच भगतसिंग नगरमध्येही आहे. २००३ मध्ये बांधलेल्या या शौचालयाचं व्यवस्थापन श्री महालक्ष्मी महिला संघ २०१२ पासून शौचालयाचं करत आहे. या शौचालयाच्या पुनर्बांधणीचं काम २०१८ मध्ये पूर्ण झालं. बांधकामाला सुरवात झाली तेव्हा शिवसेनेच्या नगरसेविका या प्रभागात होत्या. दरम्यान २०१७ मध्ये निवडणूक होऊन भाजप नगरसेविका निवडून आल्या. त्यांचे कार्यकर्ते म्हणतात, "या कालच्या महिलांना शौचालय मिळालं पण आम्हांला नाही मिळालं". त्यामुळं काही ना काही कारणांवरून हे लोक भांडणं करतात. महापालिकेत खोट्या तक्रारी देतात. काही रहिवाशांनाही हे शौचालय चालवायला हवं असल्यामुळं तेही खोट्या तक्रारी देणं, कचरा शौचालयात टाकणं, शौचालयाचं नुकसान करणं हे प्रकार करतात. महापालिकेच्या चौकशीला हा महिला संघ उत्तर देत राहतो. हे प्रकार सतत सुरूच असतात. या सगळ्या प्रकारांना मंडळाच्या सदस्या शांतपणे, संयमाने तोंड देत आहेत.

आरसीसी पद्धतीनं बांधलेल्या या शौचालयांचं आयुष्य साधारण ३० वर्ष गृहीत धरण्यात आलं आहे. बांधकाम झाल्यावर तीन वर्षांपर्यंत कंत्राटदारानं देखभाल, दुरुस्ती करावी असं महापालिकेनं आधीच स्पष्ट केलं आहे. त्यानंतरच्या काळात दुरुस्तीची काही कामं असल्यास महापालिकेतर्फे केली जातात. भांडूप टेंभीपाडा भागात गगनगिरी महिला औद्योगिक सहकारी संस्था २००८ पासून शौचालयाचं व्यवस्थापन करत आहे. केवळ महिलांकरता असणाऱ्या या शौचालयात ३७टॉयलेट सीट्स आहेत. शिवसेनेच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या सुलोचना गोळेया मंडळाच्या अध्यक्षा आहेत. वस्तीतल्या ५०० महिला या शौचालयाचा वापर करतात. सहा महिन्याकरता १२० रुपये असा इथल्या पासाचा दर आहे. पण कोणीही पैसे देत नाही. या सीबीओतल्या२-३ महिला सोडून इतर महिलांना या शौचालयाच्या कामात रस नाही. कारण त्यातून आर्थिक फायदा होत नाही. उलट पदरचेच पैसे खर्च करावे लागतात. शौचालयाच्या काऊंटरवर६५ वर्षांच्या सुलोचना स्वतः बसतात. या शौचालयात २०१४-१५ च्या दरम्यान सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशीन बसवलं. पण महिलांनी थोड्याच दिवसात त्याची मोडतोड केली. पैसे न टाकता मशीनमधून पॅड यावं म्हणून पिना लावून पॅड खेचू लागल्या. यामुळं एक चांगला उपक्रम बंद करावा लागला. पाळीचे कपडे शौचालयात टाकणं, पॅड फेकणं, घरातले कचऱ्याचे डबे शौचालयात धुणं हे प्रकार महिला करतात. या शौचालयाच्या बांधकामाला १२ वर्ष झाली आहेत. प्लास्टर पडलंय, दरवाजे तुटलेत. पहिल्या माळ्यावरच्या शौचालयातलं पाणी तळमजल्यावर गळतं. गेली ५ वर्ष सुलोचना या दुरुस्तीकरता प्रयत्न करत आहेत. शौचालयाचं स्ट्रक्चरल ऑडिट होऊनही २ वर्ष झाली. पण या ना त्या कारणानं शौचालयाची दुरुस्ती होत नाहीये. काही दिवसांपूर्वी निधी नाही आणि आता कोरोनाचं कारण सांगून हे काम होत नाहीये. सुलोचना राजकीय पक्षात कित्येक वर्ष कार्यरत होत्या. स्थानिक नगरसेवक, आमदारांपर्यंत त्यांनी शौचालयाच्या दुरुस्तीबद्दल अर्ज विनंत्या केल्या. पण अजुनही त्यांचं काम होऊ शकलेलं नाही.

वस्तीत कुठंही भांडणं झाली की, त्याचे पडसाद शौचालयावर उमटतात. वस्तीत आपली जरब दाखवण्यासाठीशौचालयाचा वापर केला जातो. शौचालयाची दारं जाळणं, तोडफोड करणं, शौचालयाच्या भिंतीवर लघवी करणं, हाताच्या पंजाचे छाप लावून भिंती खराब करणं, नळ चोरणं, पाण्याच्या बादल्या चोरणं, कचऱ्याचे डबे चोरणं, हे प्रकार तर सर्रास सर्व शौचालयांमध्ये घडतात. सायन कोळीवाड्यातल्या कोकरी आगार भागात तामिळ, उत्तर भारतीय, मुस्लीम आणि मराठी या क्रमानं लोकसंख्या आहे. या परिसरात शौचालयाचं नुकसान करण्यात गुंड प्रवृत्तीचे पुरूष आणि महिला सर्वच आघाडीवर आहेत. इथल्या महिला दारुच्या बाटल्या शौचालयाच्या आत फेकण्यापासून दरवाजे जाळण्याचाही प्रकार करायच्या. या प्रकारांमुळं तेजस्विनी फाऊंडेशनया सीबीओच्या सदस्यांना डोळ्यात तेल घालून पहारा करावा लागतो. सुरूवातीला भीती वाटायची. पण काम करता करता त्यांना हिंमत आली.सीबीओच्या अकरा जणींनी कडक भूमिका घेत, या प्रकारांना आळा घातला. सीबीओकडून वस्तीतल्या महिलांचं समुपदेशन सतत सुरू असतं.

कोरोनोच्या काळात मासिक पास आणि वापरानुसार पैसे देणारेही पैसे देत नव्हते. शासनानं सार्वजनिक शौचालयाचा वापर नि:शुल्क केला होता.अधिकाऱ्यांनी सामुदायिक शौचालयांनाही हा नियम लावला. पण वीज-पाणी बिलाच्या बाबतीत काहीच सवलत

दिली नाही. स्थिती सुधारू लागल्यावरही बऱ्याच ठिकाणी लोक पैसे द्यायला टाळाटाळ करतात. एखादी सुविधा किंवा वस्तुकरता जेव्हा आपण मोल देतो, तेव्हा तिच्या जबाबदारीची भावनाही आपल्यात येते. आपोआप आपण त्या गोष्टींची काळजी घेतो. पण फुकट वापरामुळं, अरेरावीमुळं या जबाबदारीची जाणीव या लोकांमध्ये येत नाही. उलट वर्चस्व स्थापन करण्याकरता सापळे रचतात. काळजीनं सांभाळ करणं हा गुण महिलांमध्ये  नैसर्गिक असतो. याच्या जोरावरच महिला सीबीओ या अडचणींना तोंड देत आहेत. वस्तीला विशेषतः महिलांना सुरक्षति आणि चांगल्या सुविधा मिळण्याकरता धडपड करत राहतात.

# प्रकरण ७ – प्रशासनाची भूमिका

वस्त्यांमध्ये शौचालयं बांधून सीबीओंद्वारं त्यांचं व्यवस्थापन करण्याचा कार्यक्रम १९९७ ते २०१४ या काळात Slum Sanitation Program (SSP) म्हणजे वस्ती स्वच्छता कार्यक्रमांतर्गत विशेष विभागामार्फत राबवण्यात आला.या काळात नियोजन, निविदा आणि अंमल बजावणी करता ९ लॉट निघाले. २०१४ पासून या कार्यक्रमाचं विकेंद्रीकरण झालं. महापालिकेच्या वस्ती स्वच्छता कार्यक्रमाकडून हा कार्यक्रम विभाग स्तरावर सुरू झाला. स्वच्छ भारत अभियानाखालीविभाग पातळीवर काम सुरू झाल्यामुळं, त्या त्या विभाग स्तरावर सहाय्यक आयुक्तांना वस्तीतल्या सामुदायिक शौचालयांसंबंधी सर्व अधिकार देण्यात आले आहेत. या कार्यक्रमाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी दोन सहाय्यक अभियंत्यांवर आहे. यातील एका सहाय्यक अभियंत्यावर (सहाय्यक परिरक्षण) बांधकामाची जबाबदारी आहे. तर दुसरा सहाय्यक अभियंता घनकचरा व्यवस्थापन पाहतो. घनकचरा व्यवस्थापन पाहणाऱ्या अभियंत्यावर स्वयंसेवी संस्था व सीबीओंच्या कामावर देखरेख, सामंजस्य करार ही जबाबदारी आहे. हे दोघंही कार्यकारी अभियंता आणि सहाय्यक आयुक्तांना रिपोर्ट करतात. दुर्दैवानं कित्येक ठिकाणी या सर्वांमध्ये समन्वयाचा अभाव दिसून येतो. याचा फटका सीबीओ आणि शौचालयांना बसतो.लॉट १० करता निविदा २०१५ ला निघून प्रत्यक्ष कामं २०१६ ते २०१९ या काळात झाली. सध्या सुरू असणाऱ्या लॉट ११ करता २०१९ ला निविदा निघाल्या. आता आपण लॉट ११ च्या निविदांमधल्या काही ठळक गोष्टी पाहुयात.

लॉट ११ नुसार प्रत्येक सीबीओच्या कार्यकारी समितीत ३३ टक्के महिला असायला हव्यात.कार्यकारी समितीत महिला आरक्षण सोडलं तर इतर बाबी या आधीच्या लॉटमध्येही आहेतच.बांधकामाचं संकल्पचित्र सीबीओला दाखवून त्यांची अनुमती घ्यावी. शौचालयातला मल वाहून नेण्याकरता कंत्राटदारानं महापालिकेच्या मलनिसा:रण वाहिनीशी जोडणी करून द्यावी. संबंधित परिसरात मलनिसा:रण वाहिनी नसल्यास शौचालय संकुल सेप्टीक टॅंकशी जोडावं.हे काम तपासण्याची जबाबदारी सहाय्यक अभियंता परिरक्षण यांची आहे. बांधकाम आणि हस्तांतरणाच्या तीन वर्षापर्यंत कंत्राटदार सेप्टीक टॅंकची दर तीन महिन्यांनी सफाई करावी. विभागातील कार्यकारी अभियंता आणि कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली हे काम करण्यात यावं. या कामावर विभाग सहाय्यक आयुक्त यांचा मुख्य अधिकार आणि देखरेखअसते. कंत्राटदाराकडून बांधकाम पूर्ण झाल्याचं प्रमाणपत्र मिळाल्यावरचं सामंजस्य करार करून,विभाग सहाय्यक आयुक्त सीबीओच्या ताब्यात शौचालय देणार. या प्रमाणपत्राच्या तारखेपासून १ वर्षाच्या कालावधीत इलेक्ट्रीक, प्लबिंग, प्लास्टर, रंगकाम, टाइलिंग, बोअरवेलदुरूस्ती, मॅनहोलची देखभालआणि इतर लहान दुरूस्तीकाम कंत्राटदारानं करून द्यायचं आहे. आरसीसी कामातल्या दुरुस्ती देखभालाचा कालावधी ६० महिने निश्चित करण्यात आला आहे. पाणी गळती, गच्चीवरील पाण्याची टाकी, सेप्टीक टॅंक याकरता १० वर्षांचं गॅरंटी सर्टिफिकेट कंत्राटदारानं द्यायचं आहे. बांधकाम कसं असावं, वीज-पाणी जोडणी व पुरवठा, पुनर्बांधणी व नवीन काम,महिला आणि पुरुषांकरता स्वतंत्र प्रवेशद्वार असावं. प्रवेशमार्ग पुरेसा रुंद असावा जेणेकरून दोन व्यक्तींना नीट जाता येईल. विशेषत: महिलांना अंग चोरावं लागणार नाही.अतिशय बारिक सारीक बाबींचाही यात स्पष्ट उल्लेख आहे.पण प्रत्यक्षात परिस्थिती काय आहे?

वडाळा आर टी ओ जवळील महिला एकता सेवा मंडळ व्यवस्थापन करत असणाऱ्या शौचालय संकुलाचं उद्‌घाटन ११ मार्च २०१९ ला झालं. अनिता मिश्रा या मंडळाच्या अध्यक्षा आहेत. शौचालयाचा वापर सुरू झाल्यावर७-८ दिवसांतच शौचालय तुंबू लागलं. २३ मार्च २०१९ ला त्यांनी विभाग कार्यालयातपहिली तक्रार दाखल केली. ही माहिती घेईपर्यंत फेब्रुवारी २०२१ पर्यंत तक्रारी दाखल करणं सुरूच आहे. हे शौचालय संकुल सतत का तुंबतंय माहिती आहे? या शौचालयाला मलवाहिनी (सिव्हरेज लाईन) आणि सेप्टीक टॅंक दोन्हीही नाही. सध्या ४ गल्ल्यांपलीकडं असणाऱ्या शौचालयाच्या सिव्हरेज लाईनला स्वखर्चानंतात्पुरती जोडणी केलीय. एकता सेवा मंडळाच्या शौचालयातला मल पंपाच्या साहाय्यानं खेचून या जवळच्या शौचालयाच्या सेप्टिक टॅंकमध्ये सोडला जातो. याकरता हे मंडळ दुसऱ्या शौचालय चालकाला महिन्याला पाच हजार रुपये देतं. ही दोन्ही शौचालयं महापालिकेचीच आहेत. विभाग

कार्यालय या शौचालयचालकाला पैसे नका देऊ असं सांगण्यात आलं आहे. पण पैसे नाही दिले तर, चालक मैला वाहणारा पाईप काढून टाकतो आणि शौचालय बंद होतं. महिलांकरता ७, पुरूषांकरता ७ आणि अपंगाकरता १ टॉयलेट सीट अशी या शौचालयाची क्षमता आहे. अनिता यांनी सहाय्यक आयुक्तांपर्यंत तक्रारी दिल्या. कंत्राटदार गायब आहे.कामगार येऊन मापं घेतात. दोन-चार दिवस फेऱ्या मारतात.पण पुन्हा जैसे थेच परिस्थिती होते. अनिता यांनी याबाबत माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागितली. पण त्याचाही काही उपयोग झालेला नाही. २०२० मध्ये कोरोनाचं कारण सांगून काम टाळलं जात होतं. हे शौचालय सुरू झालं, त्यावेळी असणारे सहाय्यक अभियंता सीपी लॉरी पाठवायचे. त्यांची चार महिन्यांनी बदली झाली. नवीन अधिकाऱ्यांना हे प्रकरण माहित नाही. पण त्यांच्या हाताखालचे कर्मचारी तर जुनेच आहेत. स्थानिक नगरसेविका या कर्मचाऱ्यांवर दबाव टाकून काम करू देत नाही.शौचालयाच्या मालकीच्या सभोवतालच्या मोकळ्या जागेवर कुंपण घालायलाही प्रशासन मनाई करत आहेत. उलट आवारातचं मोठी कचराकुंडी ठेवलीय. वेळेवर कचरा न उचल्यामुळं त्रासात भरच पडतेय. निविदेमध्ये या सर्व कामांबद्दल, जबाबदाऱ्यांविषयी सविस्तर लिहूनही नियमांचं पालन न केल्यामुळं अनिता मिश्रा यांच्या सीबीओला प्रचंड अडचणी आणि मनस्ताप सहन करावा लागत आहे.मलवाहिनी आणि सेप्टीक टँक नाही किंवासेप्टीक टँक मलवाहिनीला जोडला नसल्यामुळं अनेक ठिकाणी सीबीओंना अडचणी येत आहेत. सेप्टीक टँक भरल्यावर तो डिफ्लश करण्यात समस्या येतात. कारण सेप्टीक टँकच्या सफाईकरता लागणाऱ्या गाड्या (Cesspool Vehicle - CP Lorry) महापालिकेकडं एवढ्या प्रचंड संख्येनं गाड्याही नाहीत.

वांद्रे पूर्वमधल्या गुरूप्रसाद सेवा समितीच्या शौचालयाचं उद्घाटन २०१८ मध्ये झालं. पण या शौचालयालाहे प्रकरण लिहेपर्यंत (मार्च २०२१) सामंजस्य करार मिळाला नाही. शौचालय सुरू झालं तरी वीज आणि पाणी जोडणीही मिळाली नव्हती.  सध्या बाजूच्या शौचालयातून महिना तीन हजार रुपये देऊन वीज घेण्यात येते. खटपट करून महापालिकेकडून पाणी, मीटर मिळाला. पण पुरेसं पाणी नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकासकामांतील बाधित लोकांना, गोवंडीतल्या शिवाजीनगर भागात १९७५ च्या आसपास १५० प्लॉटस्वर वसवण्यात आलं. एका प्लॉटमध्ये साधारण २०० घरं आहेत. २०१३ मध्ये इथल्या शौचालयाची दुरूस्ती करण्यात आली. पण निकृष्ट बांधकामामुळं शौचालय खचू लागलं. इतक्या लवकर परत काम करण्यास महापालिकेनं असमर्थता दर्शवली. दुसरीकडे सोय नसल्यामुळं जीव मुठीत घेऊन शौचालयाचा वापर सुरू होता. इथल्या महिला गटागटानं रोज पालिका आणि नगरसेवक कार्यालयाच्या चकरा मारायच्या. अखेरिस नवीन शौचालयाचं काम मंजूर झालं. २०१८ मध्ये स्वयंसेवी संस्थेनं पाठपुरावा करणाऱ्या महिलांना केवळ सभासद बनवून पुरूष मंडळींना सीबीओचे कार्यकारी पदाधिकारी बनवलं. महिलांनी सीबीओ पदाधिकाऱ्यांवर हरकत घेतली. कंत्राटदार, स्वयंसेवी संस्था आणि महिलांमध्ये वादावादी झाली. पालिकेच्या काही अधिकाऱ्यांचं म्हणणं होतं की, महिलांना शौचालयाच्या व्यवस्थापनात रस नाही. पण या महिलांनी मुंबई मिररला वृत्तपत्राला मुलाखत देऊन आम्ही शौचालयाचं व्यवस्थापन करायला तयार आहोत. पालिकेनं आम्हांला संधी द्यायला हवी. विरोधाला सत्कारात्मक पद्धतीनं हाताळल्यामुळं, स्वतः विश्वासानं गोष्टी करू शकतो हे पटवून सांगितल्यामुळं माध्यमातूनही पालिकेवर दबाव आला. अखेरीस महिलांची नावं एकता महिला सहयोगिता मंडळाच्या पदाधिकारी आणि कार्यकारणीमध्ये आली. महिलांना सीबीओमध्ये आरक्षण दिलं पण ते खरंच मिळतंयका? हे तपासलं जात नाही.प्रशासकीय अधिकाऱ्यांमधील संवेदनशीलताही खूप महत्वाची आहे. तरच त्यांना या विषयांतलं गांभीर्य समजू शकतं. अन्यथा कायदे कितीही आले तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी होऊ शकत नाही.राजकीय दबाव किंवा आर्थिक हितसंबंधामुळं काही अधिकारी योजनेला हरताळ फासतात. कित्येक ठिकाणी बांधकामाचा स्ट्रक्चरल रिपोर्ट सीबीओंना न देताच चांगल्या स्थितीतलं शौचालय तोडून पुनर्बांधणीचा घाट घातला जातोय. कांदिवली पूर्वमधील आर्यन मित्र मंडळ व्यवस्थापन करत असणारं शौचालय पुनर्बांधणीच्या नावाखाली जानेवारी २०२१ मध्ये तोडण्यात आलं. २०११ मध्ये बांधण्यात आलेल्या शौचालयातल्या सुविधा आणि बांधकाम सुस्थित होतं. विभाग कार्यालय अधिकारी यापूर्वी दोन वेळा हे शौचालय तोडण्यास आले असता, वस्तीतल्या नागरिकांनीच याला विरोध केला.

स्ट्रक्चरल ऑडिटची मागणी करूनही ते न देता हे शौचालय तोडण्यात आलं. प्रत्येक वेळी नागरिकांना दाबण्याचा प्रयत्न अधिकाऱ्यांकडून झाला. असे प्रकार आणखी काही ठिकाणी सुरू आहेत.

या सर्व गोष्टींवरून लक्षात येतं की, महापालिका धोरण खूप चांगल्या प्रकारे आखते. पण हे धोरण लाभार्थ्यांपर्यंत झिरपतच नाही. कारण या धोरणांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा कार्यक्षम नाही. महापालिकेच्या विभागांमध्ये समन्वय नसल्यामुळं त्याचा फटकाही शौचालयांना बसतो. परिणामी शौचालयांना पाणी, वीज, मलवाहिनी, सेप्टीक टँक आणि इतर सुविधा मिळण्यात अडचणी येतात. महापालिका वीज आणि पाणी जोडण्याकरता अनामत रक्कम कंत्राटदाराला देते. तरीदेखील कंत्राटदार अधिकृत जोडणी घेत नाहीत. कधी कधी जोडणी मिळूनही वर्षानुवर्ष हे मीटर नावावर नसतात. अधिकारी बदलत राहतात, पण कामं होत नाहीत.वास्तविक शौचालयांमध्ये पाणी असणं ही अगदी पायाभूत गरज आहे. वीजेचा संबंध तर महिलांच्या सुरक्षेशीही संबंधित आहे.बांधकाम पूर्ण झाल्यावर कामांची प्रत्यक्ष पाहणी न करता किंवा त्रुटींकडे कानाडोळा करून शौचालयांचं हस्तांतरण केलं जात.या गोष्टींची नीट चौकशी होऊन कडक कारवाई होणं गरजेचं आहे. शहरीकरणाच्या प्रक्रियेत काही गोष्टींकडं दुर्लक्ष झाल्यानंही महापालिका देत असलेल्या सुविधांचा वापर होत नाही. सामाजिक किंवा धार्मिक गोष्टींचं पालन काही समुदायांमध्ये कटाक्षान केलं जातं. चेंबूर, शिवाजीनगर या भागात शौचाकरता बसताना मदिनेच्या दिशेनं तोंड असतं म्हणून महापालिकानं शौचालयाची सुविधा दिली असूनही त्याचा वापर होत नाही. त्यामुळं बांधकामाचं नियोजन, डिझाईन करताना या मुद्द्याकडंही लक्ष दिलं पाहिजे. १ ते ९ लॉटमध्ये केअरटेकरला राहण्याकरता शौचालयाच्या गच्चीवर खोली देण्यात आली होती. पण लॉट १०-११ मध्ये ही सुविधा बंद केली. वास्तविक आपल्याला २४ तास स्वच्छ शौचालयं हवी असतील तर केअरटेकर शौचालयाच्या संकुलात असणं आवश्यक आहे. त्यासोबतच सुरक्षेचा मुद्दाही जोडलेला आहे. महिला शौचालयांची स्वच्छता महिला करते. केअरटेकरचं कुटुंब तिथंच राहिलं तर रात्री उशिराही शौचालय वापरताना महिलांना धास्ती नसते. शिवाय कुटुंबासोबत असणारा पुरुष शक्यतो त्रास देत नाहीत. ही कामं करणाऱ्या व्यक्ती या बऱ्याचदा सामाजिक उतरंडीतल्या खालच्या स्तरातल्या असतात. हा मुद्दाही इथं आहेच.

महापालिका स्वतः किंवा इतर माध्यमातून (सीएसआर) सेवा-सुविधा देते तेव्हा त्या नियमित सुरळीतपणे सुरू राहतील अशी व्यवस्था असणंही गरजेच असतं. अन्यथा ह्या सेवा-सुविधा उभारण्याकरता लागणारे पैसे, श्रम, जागा सर्वच वाया जातात. महिला शौचालयांमध्ये सॅनिटरी पॅड उपलब्ध व्हावं याकरता सॅनिटरी पॅड व्हेडिंग मशीन आणि पॅडची विल्हेवाट लावण्याकरता इनसिनरेटर (ग्हम्र्हीूदी) बसवण्यात येतात. या मशीनमध्ये नियमितपणे चांगल्या दर्जाचे सॅनिटरी पॅड उपलब्ध असायला हवेत. इनसिनरेटरला वीज पुरवठा असायला हवा. महिलांना या दोन्ही मशीन वापरण्याचं प्रशिक्षणही दिलं गेलं पाहिजे. तरच त्याचा उपयोग होणार. नाहीतर महिला शौचालयाच्या भांड्यात, खिडक्यांवर पॅड टाकतच राहतील. लॉट ११ नुसार महिलांकरताही शौचालयांमध्ये मुताऱ्या असायला हव्यात. याची आता काटेकोरपणं अंमलबजावणी व्हायला हवी. कारण शौच करण्याच्या जागीच मूत्रविसर्जन केल्यामुळं विविध प्रकारच्या बॅक्टेरियामुळं महिलांना मूत्र मार्गाचा संसर्ग मोठ्या प्रमाणात होतो.

वस्ती स्वच्छता कार्यक्रमातील विकेंद्रीकरणामुळं वस्ती स्वच्छता कार्यक्रमातली सुसूत्रता, देखरेख कमी होऊन कामाला जरा खिळच बसली आहे. महिला एकत्र आणून त्यांचं सक्षमीकरण या मुद्द्याकडंही दुर्लक्ष होतं आहे.

# प्रकरण ८ – वस्तीचा सहभाग

वस्तीतलं शौचालय हे तिथल्या रहिवाशांकरता आहे. हे शौचालय आपलं आहे आणि आपण त्याची काळजी घ्यायचीय, ही भावना रहिवाशांमध्ये असली की सर्व आलबेल असतं. याकरता रहिवाशांमध्ये एकी असणं, सीबीओला सहकार्य आणि पाठिंबा असणं खूप महत्त्वाचं असतं. नागरी सेवा-सुविधा देणं हे महापालिकेचं काम आहे. त्याचा योग्य वापर करणं ही नागरिकांची जबाबदारी आहे. वस्ती म्हटलं की तिथं वेगवेगळ्या विचारसरणी, जातीचे लोक राहतात. या सर्वांमध्ये एकोपा असणं हे सामुदायिक विकासाकरता खूप महत्त्वाचं आहे. याचा फायदा त्यांचं जीवनमान उंचावण्याकरताच होतो. वस्ती स्वच्छता कार्यक्रमाद्वारे शौचालय बनवण्यापूर्वी, स्वयंसेवी संस्थांनी लोकांचं योग्य प्रकारे प्रबोधन केलं तर तिथं सीबीओंना लोकांचं चांगलं सहकार्य मिळत असल्याचं दिसून येतं. सीबीओही सक्षम होतात. काही ठिकाणी रहिवाशीच सुविधा मिळण्याकरता एकत्र आले आणि त्यांनी यंत्रणांवर चांगला दबाव निर्माण केला. येणाऱ्या अडचणी फक्त सीबीओच्या नाहीत तर त्या संपूर्ण वस्तीच्या आहेत, असं समजून एकत्र विचारविनिमय करून त्यातून मार्ग काढला जातो.

घाटकोपर पंतनगरमध्ये ८० टक्के उत्तर भारतीय, गुजराथी आणि २० टक्के मराठी भाषिकांची वस्ती आहे. इथं जानेवारी २०१५ मध्ये शौचालयाचं बांधकाम सुरू झालं. पण शौचालयाच्या आसपास राहणारे ३-४ जण शौचालयाच्या नवीन बांधकामाला विरोध करू लागले. त्यांच्या घरात स्वतःचं शौचालय होतं. या लोकांकडून बांधकामाचं साहित्य चोरणं, कामगारांना मारहाण, धमक्या देणं आणि पाण्याच्या मोटारची चोरी हे प्रकार सुरू होते. त्यामुळं साई महिला मंडळया सीबीओलासतत पोलीस स्टेशन आणि प्रभागसमितीत चकरा मारायला लागायच्या. सीबीओसोबत वस्तीतल्या इतर महिलाही यायच्या. या प्रकारांना वैतागून पहिला कंत्राटदारही काम सोडून गेला. सोळा महिने हे सर्व सुरू होतं. सर्व महिला कायम एकत्र असल्यामुळं चांगला दबावगट तयार झाला. वस्तीतली चार लोक सोडून बाकी सर्व एकत्र असल्यानं पोलिसांनीही साई महिला मंडळाला सहकार्य केलं. बांधकामादरम्यान सीबीओशी नीट चर्चा करण्यात आली.आराखड्यात महिला विभागात चारच टॉयलेट सीटची रचना होती. सीबीओनं जागा आहे तर ती वाया नाही घालवायची, अशी भूमिका घेतली. आपली मागणी कंत्राटदार आणि महापालिकेकडं लावून धरली. त्यामुळं महिला आणि पुरूषांना समान६-६ सीटस्मिळाल्या. महिला विभागातल्या २ कमोडचा वापर वयस्कर-आजारी पुरूषही करतात. त्यावेळी त्यांच्यासोबत घरातली महिला असते. सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशीन आणि इनसिनरेटरचा वापर महिला योग्यपणं करतात. डिसेंबर २०१९ ला रस्तारुंदीकरणाच्या कामादरम्यान महिला शौचालयाच्या पायऱ्या तुटल्या. त्यासोबत शौचालयालागून गटारांचं बांधकामही सुरू होतं. यावेळी नाल्यावरील पूल तोडण्यात आला. यामुळं महिलांना खूप वळसा घालून शौचालयात जावं लागे. त्यात कोरोनाचं संकटही आलं. कोरोनामुळं गल्ल्या बंद केल्या होत्या. लोकं दारासमोरून जाऊ देईनात. वयस्कर महिलांना अडचणी येऊ लागल्या. या आधी सर्व कामांकरता सहकार्य करणाऱ्या स्थानिक नगरसेवकानं ६ महिने लक्षचं दिलं नाही. मे २०२० मध्ये सीबीओनं वस्तीतल्या लोकांशी संवाद साधला. सीबीओनं पुढाकार घेत वस्तीतून ५० हजार लोकवर्गणी जमवली. अवघ्या ८ दिवसात लोखंडी पूल बांधला. लोखंडी पूल सरळ महिला शौचालयाच्या पायऱ्यांना जोडला.स्वयंसेवी संस्थेकडून सीबीओ आणि वस्तीचं समुपदेशन योग्यरित्या झालं की, वस्तीला याचा फायदा होतो. या वस्तीतल्या रहिवाशांमधील समंजसपणा आणि सहकार्यामुळं साई महिला मंडळाच्यामहिलांचाही हुरूप वाढला.या महिलांना आता व्यवसाय करण्याची इच्छा आहे.

मुंबईतलं पहिलं सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशिन २०१५ मध्ये मानखुर्दमधील चिंचणी मायक्का महिला संस्थेच्या शौचालयात बसवण्यात आलं. वर्षातून दोन वेळा इथल्या पासधारकांची मिटींग घेण्यात येते. महिला आणि पुरुषांची स्वतंत्र मिटींग होते. त्याची फळ्यावर सूचना लावण्यात येते. लोक मोठ्या संख्येनं उपस्थित असतात. संस्थेला शौचालय चालवताना काय अडचणी येतात हे सीबीओच्या अध्यक्षा सुरेखा अलदर लोकांसमोर मांडतात आणि त्यांच्याकडूनच उपाय मागतात. लोक उत्स्फुर्तपणे सूचना, उपाय सांगतात. त्यानुसार सुरेखा उपाय करतात आणि अडचणीतून मार्ग निघतो. वर्षातून एकदा संपूर्ण रहिवाशांसोबत वार्षिक सभा ही झालीच पाहिजे. सीबीओ पदाधिकाऱ्यांची बैठक, पदाधिकारी आणि कार्यकारणी सदस्य यांच्या मासिक बैठका प्रत्येक ठिकाणी व्हायला

हव्यात. अशा त्रिस्तरीय बैठकांमधून अडचणी आणि समस्यांवर मार्ग तर निघतोच. सोबत सीबीओच्या कामातली पारदर्शकताही लोकांसमोर येते. सीबीओवरही चांगलं काम करण्यासाठी रहिवाशांचा दबाव राहतो.

पण काही ठिकाणी शौचालयाचं बांधकाम हेच अंतीम कार्य मानलं गेलं. शौचालय बांधून त्याचं व्यवस्थापन नीट होत आहे. पण या कामाची सूत्रं हाताळण्याकरता वस्तीतल्या आणखी व्यक्तींनाही तयार केलं पाहिजे. उपक्रमांचा विस्तार करायला हवा. तरचं ही विकासाची प्रक्रिया अखंड सुरू राहिल. नवीन नेतृत्व तयार होईल.पण हे काम पुढं न जाण्यामागंही अनेक घटक आहेत. जाती व्यवस्था, गरजेपुरतं शिक्षण आणि त्यामुळं नोकरीच्या मागे धावणारा कनिष्ठ मध्यमवर्गीय समाज यांच्या गरजा, संघर्ष वेगळा असतो. शौचालयाचा प्रश्न मिटल्यावर केवळ त्याची देखभाल यापुरतंच अशा वस्त्यांमधल्या सीबीओचं काम मर्यादीत राहतं. सीबीओच्या सदस्याही नोकरी करणाऱ्या असतात. रोजगाराकरता नोकरीचा संघर्ष इथं असतो. शिक्षण आणि सामाजिक स्तरामुळं विचारप्रक्रिया वेगळी असते. काही मतभेद झाले तर बऱ्याचदा संवादानं ते सुटतात. त्यामुळं पायाभूत सुविधा मिळण्याकरता इथले रहिवासी एकत्र आले आणि ती मिळाल्यानंतर ती टिकवून ठेवत आहेत. याव्यतिरिक्त त्यांच्या काही अपेक्षा नसतात. त्यामुळं वस्तीकरता आणखी कोणत्या कामांचा ते विचारही करत नाहीत.

स्वयंसेवी संस्थेकडून सीबीओ आणि लोकांचं प्रबोधन नीट नाही झालं तर ही व्यवस्था पूर्णपणे अपयशी ठरते. म्हणजे लोकांना शौचालय हवं त्याकरता सीबीओ तयार होतं, शौचालयाचं बांधकाम होऊन त्याचा वापरही सुरू होतो. पण या सर्वात लोकांचा सहभाग आणि पाठिंबा नंतरही हवा असतो. तरच ही व्यवस्था सुरळीतपणे चालू शकते. शौचालयाच्या बांधकामानंतरही सीबीओ आणि वस्तीतल्या लोकांमधील संवाद, समन्वय नियमित असायला हवा. जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोडवरच्या मिलिंद नगरमध्ये २००८ पासून खटपट केल्यावर २०१२ मध्ये शौचालय झालं. सावित्रीबाई फुले महिला मंडळ यासीबीओच्या ताब्यात हेशौचालय दिलं. पण सामंजस्य कराराच दिला नाही. शौचालय वापरासाठी खुलं झाल्यावर वस्तीत तणाव निर्माण होऊ लागला. लोकांना शौचालय मोफत वापरायला हवं आहे. त्यातचं वस्तीतल्या काही दबंगगिरी करणाऱ्या मुलांचाही त्रास सुरू झाला. या मुलांना हे शौचालय चालवायला हवं आहे. त्यांनी शौचालयाच्या आजूबाजूच्या जागेवर बांधकाम केलं आहे. लोकं शौचालय वापरतात, पण त्याचे पैसेही देत नाहीत. पैसे भरण्यावरून केअरटेकरला मारहाण केल्यामुळं प्रकरण पोलीस स्टेशनला गेलं. लोकांचं आणि पोलिसांचं म्हणणं जर महापालिकेचं शौचालय आहे तर पैसे का भरायचे?या वस्तीत दलित समाजाचं प्राबल्य आहे. हा मुद्दाही इथं महत्त्वाचा ठरतो. सर्वांनी एकत्र येऊन एखादी गोष्ट केली तर ती व्यवस्थित तडीस जाईल ही गोष्ट लक्षात येत नाहीये. 'आपलं शौचालय आपली जबाबदारी" याची जाणीव लोकांना करून दिली नाही. सीबीओकडूनही याकरता समन्वय साधला जात नाहीय. कारण सीबीओसाठीची स्टँडर्ड ऑपरेशन प्रोसिजर इथं नीट झाली नाही. त्यामुळं कायद्याच्या चौकटीत राहून काम करण्याकरता सीबीओलाही अडचणी येत आहेत.

महिलांशी बोलताना एक गोष्ट लक्षात आली ती म्हणजे, जवळपास सर्व महिला सीबीओ सदस्यांच्या घरात शौचालय आहे. पण कोणे एके काळी आपण ज्या त्रासातून गेलो; तसा त्रास घरात शौचालय नसलेल्या महिलांना, मुलींना होऊ नये याकरता या महिला पुढाकार घेताना दिसतात. वस्तीतल्या रहिवाशांना विशेषतः महिलांशी संपर्क साधून हे काम होऊ शकतं हा विश्वास त्या देतात. लोकजागृतीकरता स्वयंसेवी संस्थांची भूमिका इथं खूप महत्त्वाची ठरते. सीबीओ आणि वस्तीनं एकत्र येऊन काम केलं तर, चांगला दबावगट तयार होतो. राजकीय किंवा प्रशासकीय पातळीवरील अडचणी नीट हाताळल्या जातात. मानवविकासाचा आलेख वाढीला या गोष्टी पोषक ठरतात.

# प्रकरण ९ –स्वच्छतेचं अर्थकारण

आतापर्यंतच्या प्रकरणात आपण पाहिलं की, बहुतेक सीबीओंना आर्थिक भार सहन करत काम करावं लागतं. शौचालय वापरणारे सर्व रहिवासी मासिक पास किंवा वापराचे पैसे देत नसल्यामुळं सीबीओंना अनेक अडचणींना सामोरं जावं लागतं.ना नफा ना तोटा या तत्वावर सीबीओंची नोंदणी झाली आहे. मंडळाला आर्थिक लाभ तर सोडा; बऱ्याच महिला पदरमोड करून शौचालयाची स्वच्छता, देखरेख, वीज-पाण्याची बीलं भरतात. पण वस्तीला सुविधा मिळावी या हेतुनं या महिला काम करत राहतात. काही ठिकाणी मात्र स्वयंसेवी संस्था, सीबीओ यांनी चांगलं काम केल्यामुळं किंवा सीबीओनं कडक भूमिका घेतल्यामुळं; शौचालय वापराचे पैसे न देणारे लोकं फार कमी संख्येनं आहेत. सर्व खर्च भागून काही सीबीओंच्या खात्यात काही रक्कम शिल्लक राहते. हे सीबीओ आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण आहेत.आता मुद्दा हा आहे की या अतिरिक्त पैशाचावापर कसा होतो? आर्थिक लाभ घेताना सामाजिक ऋणांकडं पारडं झुकतं की वैयक्तिक लाभाकडं... खूप कमी मंडळ सामाजिक उत्तरदायित्व म्हणून या पैशाचा करतात. काही सीबीओ पदाधिकारी हा पैसा वैयक्तिक नफा म्हणून घेतात. त्यामुळं वस्ती आणि पालिका अधिकाऱ्यांमध्ये गैरसमज होतो की, शौचालय हे उत्पन्नाचं साधन बनतंय. यातून मग मंडळात संघर्ष होतो. संस्था कोणाला द्यायची यावरून वस्तीत भांडणं होतात. सीबीओला देखभाल खर्च भागवण्याइतपतही पैसे मिळत नसतील तर, सीबीओ विभाग कार्यालयात अडचणी घेऊन येतात. तेव्हा त्यांना अधिकाऱ्यांकडून 'तुम्हांला परवडत नसेल तर बंद करा" असं ऐकावं लागतं

धारावीतल्या प्रगती महिला सेवा मंडळानं २००७ मध्ये शौचालय व्यवस्थापन सुरू केलं,तेव्हा मासिक पासाच्या रकमेवरून लोकांसोबत खूप भांडण व्हायची. लोक पासाचे पैसे द्यायचे नाहीत. एका पासवर कितीही लोक यायचे. त्यामुळं या सीबीओनं पासाची पद्धत बंद करून सरळ प्रति माणशी शौचालय वापराचे पैसे घेण्यास सुरवात केली. यामुळं रोजची भांडणं थांबली आणि मंडळाच्या बँक खात्यात पैसे जमा होऊ लागले. पण महापालिकेनं आखून दिलेल्या मासिक पासाच्या नियमाच्या विरूद्ध ही कृती आहे.या आर्थिक लाभामुळं या शौचालयामध्ये  गुंतवणूक केली जाते. शौचालय जितकं चकाचक तितके जास्त लोक त्याचा वापर करणार. २०१९ मध्ये स्वच्छ सर्वेक्षणाकरता दिल्लीहून केंद्रीय अधिकारी आले होते. त्यावेळी याच बचतीच्या पैशातून सीबीओनं चार लाख रुपये खर्चून शौचालयाचे दरवाजे, भांडी, बदलली, प्लास्टर आणि रंगकाम केलं.२०२० मध्ये कोरोना लॉकडाऊनच्या काळात बरेच लोकं वस्ती सोडून गेले. शौचालय वापराची ५००-६०० जणांची संख्या आता २००-३०० वर आली आहे. या काळात सीबीओनं वस्तीतल्या रहिवाशांना मोफत मास्क वाटप केलं. कांदिवली पूर्वमधल्या आर्यन मित्र मंडळानं त्यांना मिळणाऱ्या आर्थिक लाभातून वस्तीसाठी अनेक उपक्रम राबवले. त्यामुळंच त्यांना वस्तीतून चांगला पाठिंबा मिळतो. मंडळातर्फे रक्तदान शिबीरांचं आयोजन, एचआयव्ही, टीबी रुग्णांना वैद्यकीय मदत मिळवून देणं ही काम आर्थिक लाभातून केली जायची. वस्तीत कोणालाही कोणत्याही प्रकारची वैद्यकीय मदत हवी असल्यास या सीबीओकडून लगेचच त्यांना मदत केली जायची. दुर्दैवानं या आर्थिक फायद्याच्या लालसेनंच वस्तीतल्या काही लोकांनी महापालिका अधिकाऱ्यांशी संगनमत करून,हे शौचालय तोडलं.शौचालय चांगल्या स्थितीत असूनही स्ट्रक्चरल ऑडिट न करता हे शौचालय जानेवारी २०२१ मध्ये तोडलं.

जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोडवरचं सावित्रीबाई फुले महिला मंडळानं शौचालय देखभालीकरता केअरटेकरची नेमणूक केली आहे. हा केअरटेकर महिन्याला तीन हजार रुपये मंडळाला देतो. केअरटेकरनं सीबीओला मासिक रक्कम देणं ही बाबही लॉटच्या नियमबाह्यच आहे.मंडळ ही रक्कम बँकेत जमा करते. त्यामुळं गेल्या ८ वर्षांपासून मंडळाच्या नावे बऱ्यापैकी शिल्लक जमा झाली आहे. पण हे मंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम असूनही वस्तीतल्या लोकांकरता काहीच कार्यक्रम घेतले जात नाही. सीबीओ आणि वस्तीत समन्वय नसल्यामुळं फक्त बँक खातं सक्षम होत आहे. वस्तीला याचा काहीच लाभ होत नाही.

एंटॉप हिलमधील मोतीलाल नेहरू नगर भागातलं अष्टविनायक महिला मंडळ आणि त्याच्या अध्यक्षा बिना गुप्ता हे या अर्थकारणातलं वेगळं प्रस्थ म्हणून नावारुपाला आलं आहे. सोबतीशिवाय चार भिंतीच्या बाहेर कधी न पडलेली महिला शौचालय

सुरूवात करते आणि मग हळूहळू महापालिकेची कंत्राट मिळवू लागते. या सर्व काळात व्यक्ती म्हणून तर त्यांच्यात बदल झाला. सोबतच आर्थिकदृष्ट्या झालेला विकास अचंबित करणारा आहे. २०१६मध्ये घराच्या बांधकामादरम्यान बिना यांचा संपर्क तत्कालीन नगरसेविका आणि माजी महापौर श्रद्धा जाधव यांच्याशी आला. श्रद्धा जाधव यांनी बिना यांना संस्था बनवून शौचालय चालवण्यासंदर्भात विचारलं. बिना यांनी सुरूवातीला नकार दिला. त्यांच्या पतीनंही नकार दिला. कारण हा भाग तसा महिलांकरता असुरक्षति होता. श्रद्धांनी पूर्ण सहकार्य करण्याचं आश्वासन दिलं. मग चांगली सोय होईल या हेतूनं बिना यांनी होकार दिला. ७ जणांची संस्था बनवली. पण आजूबाजूला राहणारी त्यांच्याच समाजाची उत्तरप्रदेशातल्या वैश्य समाजाची लोकं म्हणू लागली,"घरात बसणारी बाई.ही बाई काय शौचालय चालवणार" ? पण बीनानं आव्हान स्वीकारलं. महिलांसाठी १६ आणि पुरुषांसाठी १६ असं मोठं शौचालय संकुल बांधलं. व्यवस्थित आराखडा, हवा खेळती राहिल असं योग्य बांधकाम, वीज आणि पाणी सर्व गोष्टींची पूर्तता झाल्यावरच स्वयंसेवी संस्थेनं शौचालयाचं हस्तांतरण केलं. यासर्वात स्वयंसेवी संस्था आणि महापालिकेचीही चांगली मदत झाली. केअरटेकर आणि वस्तीतल्या नागरिकांचा जास्त परिचय होऊ नये म्हणून बिना दर सहा महिन्यांनी केअरटेकर बदलतात. यामुळं आर्थिक नुकसानही होत नाही. लेबर कॉन्ट्रक्टरद्वारे दोघाही केअर टेकर ची नियुक्ती करण्यात येते. बिना यांनी 'शौचालय व्यवस्थापन" यापुरतच सीबीओचं काम मर्यादीत ठेवलं नाही. महापालिकेतर्फे निघणाऱ्या विविध कामांच्या निविदा त्या भरतात. सीबीओतल्या पदाधिकारी महिलांचा त्यांना पाठिंबा आहे. इतर महिला त्यांच्यावर टीका करतात. कारण मंडळाला मिळणारं काम त्यांना कमीपणाचं वाटतं. अशी कोणती काम आहेत? आणि त्यात काय फायदा आहे असं तुम्हांला वाटेल. फेब्रुवारी २०१९ मध्ये बिना यांना दत्तकवस्ती सुधारणांचं कंत्राट मिळालं. डंपिंग ग्राऊंडवर कचऱ्याच्या गाड्या मोकळ्या करण्याचंही कंत्राट त्यांना मिळालं आहे. २०२० मध्ये कोरोना उद्रेकावेळी तमिळ संघात विलगीकरण कक्षाच्या सफाईचं कामही त्यांना मिळालं. या सर्व कामांमुळं त्यांना वैयक्तिकरित्या आर्थिक फायदा खूप चांगला होत आहे. त्यांची आर्थिक स्थिती चांगली उंचावली. त्या आता वस्तीत राहत नाहीत. आर्थिक स्तर चांगला असणाऱ्या भागात अधिकृत इमारतीत त्या आता राहतात. त्यांचं स्टेटस वाढल्यामुळं टीका करणारी बिरादरी आता कौतुक करते. २०१५ ची बीना आणि २०२० च्या बीनामध्ये जमीन आकाशातला फरक आहे. पण बिना यांची आर्थिक स्थिती सुधारत असताना वस्तीला याचा काय लाभ झाला का? तर वस्तीत काम होत आहेत. पण वस्तीकरता या नफ्यातून प्रत्यक्ष काहीच काम केली जात नाहीत. या ठिकाणी सामुदायिक विकासावरून नेतृत्वाचं लक्ष वैयक्तिक विकासाकडं वळलं गेल्याचं दिसतं.

वैयक्तिक विकास होताना वस्ती विकास, सामाजिक विकास या गोष्टी मागं पडता कामा नये. कारण या मूळ गोष्टीतूनच तर या सर्व कामाला सुरूवात झाली आहे. सीबीओ बांधणी होत असताना, महिलांमध्ये ही मूल्यही रुजवणं गरजेचं आहे. कारण काही अपवादात्मक स्थितीत सामाजिक काम करता करता वैयक्तिक आर्थिक लाभांवर गाडी वळू शकते.

# प्रकरण १० –सीबीओ आणि वस्ती विकास

कोरोना महामारीमुळं लॉकडाऊन सुरू झाल्यावर अगणित लोकांचे रोजगार सुटले. मीना कांबळे यांनी त्यांच्या वस्तीतल्या काही महिलांना कापडी मास्क, सॅनिटरी पॅड आणि नाईटी बनवण्याचं प्रशिक्षण देऊन रोजगार मिळवून दिला. ह्याचा आणि शौचालयाचा काय संबंध? असं तुम्हांला वाटेल. पण हे प्रशिक्षण आणि मास्क शिवण्याचं काम सावित्रीबाई फुले महिला मंडळ व्यवस्थापन करत असणाऱ्या शौचालयाच्या गच्चीवरील कार्यालयात सुरू आहे. एखादं सार्वजनिक शौचालय वस्तीला ताठ मानेनं, स्वयंपूर्ण जगायला शिकवू शकतं याचं उत्तम उदाहरण हे सीबीओ आहे. मीना केवळ स्वतःच्या शौचालयाकरता मेहनत घेतात असं नाही. महिला मंडळांतर्फे चालवल्या जाणाऱ्या सार्वजनिक शौचालयांचा महासंघ म्हणजे 'स्वच्छता संवर्धन संस्था महासंघा''च्या अध्यक्षा आहेत. कोरोना महामारिच्या काळात त्यांनी अनेक कंपन्यांच्या सीएसआर आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून अनेक सार्वजनिक शौचालयांना स्वच्छता साहित्य आणि सामान उपलब्ध करून दिलं.

वस्ती स्वच्छता कार्यक्रमांतर्गत रहिवाशी संघाचं मुख्य काम शौचालयाचं व्यवस्थापन असलं तरी काही महिला त्यांचं आकाश विस्तारत आहेत. या आकाशात वस्तीचा संपूर्ण विकास हे त्यांचं ध्येय आहे. आपली वस्ती राहण्यायोग्य, इथल्या लोकांचं आरोग्य, रोजगार मिळावा याकरता त्या प्रयत्न करताना दिसतात. वस्तीतली मुलं शाळेत जात असली तरी आजूबाजूच्या वातावरणाचा त्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असतो. परिणामी शाळा गळती सुरू होते. उद्याचे सुशिक्षति नागरिक घडवण्याचं कामही या सीबीओंद्वारे सुरू असतं.

वर उल्लेख केलेलं शौचालय घाटकोपर पूर्वमधल्या कामराज नगरच्या अगदी शेवटच्या टोकाला आहे. २०१७ मध्ये शौचालय सुरू झाल्यावर वस्तीला चांगलाच उपयोग होऊ लागला. महिला, पुरुष आणि अपंग या सगळ्यांकरता मिळून ५२ टॉयलेट सीट या शौचालयात आहेत. या शौचालयात ३५० पास आहेत.सुरवातीला पासाची रक्कम महिन्याला ६० रुपये होती. पण सीबीओचं काम पाहून लोकांनी स्वखुषीनं महिन्याला १०० रुपये द्यायला सुरूवात केली. आता शौचालयाचं लहान-मोठं काही काम असलं तर वस्तीतलेच प्लंबर, वायरमन ही कामं मोफत करून देतात.

शौचालयाच्या गच्चीवर मंडळाचं कार्यालय आहे. इथं नवरा-बायकोमधली भांडणं मिटवणं, किशोरवयीन मुला-मुलींचं समुपदेशन ही कामही सुरू असतात. मीना यांनी ६ बचतगट सुरू केले. बचतगटातल्या महिला मासे, भाजी, कपडे, साबण यांची विक्री करतात. या भागातल्या मुलांचं शाळा गळतीचं प्रमाण खूप जास्त आहे. वस्तीतले मुस्लीम समुदायातले पालक मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत उदासीन आहेत. मुलांना शाळेत शिकवलेलं कळत नाही अशी अनेक कारणं आहेत. मीना यांना शिक्षणाची आवड असूनही परिस्थितीमुळं शिक्षण पूर्ण करता आलं नाही. त्यामुळं त्यांना ह्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणावं असं मनापासून वाटतं होतं. त्या पालकांशी सतत संवाद साधतात. शौचालयाच्या गच्चीतच त्यांनी पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांकरता अभ्यासिका सुरू केली. मुलांना योग्य मार्गदर्शन मिळावं याकरता त्यांनी डी.एड. प्रशिक्षति शिक्षकिाही नेमली आहे. मुलांना यामुळं चांगला फायदा होऊ लागला आहे. ह्या मुलांच्या पालकांच हातावर पोट आहे. त्यामुळं मीना विविध संस्थांच्या माध्यमातून मुलांना वह्या, पुस्तकं, शालेयपोयोगी सामान, पोषण आहार उपलब्ध करून देतात. पारधी समाजातल्याएकल पालकांची मुलंही इथं बरिच आहेत. एका १२ वर्षाच्या मुलाला आई नाही आणि वडिल लक्ष देत नाही. गेले २ वर्ष त्याची संपूर्ण जबाबदारी मीना यांनी घेतलीय. मुस्लीम महिलांकरता मीना यांनी रात्रशाळा सुरू केली होती. मात्र ही केवळ ८ दिवसच सुरू होती. आता पुन्हा ही शाळा सुरू करण्याकरता त्या प्रयत्न करत आहेत. त्यांच्या पतीची त्यांना उत्तम साथ आहे. त्यामुळंच लग्नानंतर मीना यांनी बारावीपर्यंत शिक्षण घेतलं.

मीना यांनी शौचालयासोबतच ही सर्व काम झपाट्यानं सुरू केल्यामुळं राजकीय कार्यकर्त्यांचा त्रासही बंद झाला. मुली आणि महिलांच्या सुरक्षेकरता शौचालयाच्या बाहेर आणि पॅसेजमध्ये सीसीटिव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. कॅमेरे बसवल्यावर गर्दुल्यांचा त्रासही कमी झाला. एका माणसांनं सुरूवातीलाच काही कारणानं शौचालयाचं गेट तोडलं. या माणसाला मंडळाच्या महिलांनी चांगला

चोप दिला. यामुळं शौचालयाच्या मालमत्तेचं नुकसान करण्याची हिंमत परत कोणाचीही झाली नाही.

कोरोना महामारीच्या काळात मीना यांनी स्वतःचं शौचालय सांभाळलचं. पण मुंबईतल्या अनेक शौचालयांना मदत मिळवून देण्यात प्रचंड मेहनत घेतली. पासाचे किंवा रोजचे पैसेही लोक देऊ शकत नव्हते. त्यामुळं शौचालयाच्या देखभालीचा खर्च कसा करावा हा मंडळांसमोर प्रश्न होता. मुंबईत सार्वजनिक शौचालय देखभाल करणाऱ्या मंडळांचा स्वच्छता संवर्धन संस्था महासंघ कार्यरत आहे. सार्वजनिक शौचालयांची देखभाल करताना येणाऱ्या अडचणीतून मार्ग काढण्याचं काम हा महासंघ करतो. मीना यांची यावर्षीच महासंघाच्या अध्यक्षपदी निवड झाली. महामारीच्या काळात युनिसेफ आणि अनेक मोठ्या कंपन्यांनी सीएसआरच्या माध्यमातून साफ-सफाईचं साहित्य, हात स्वच्छ करण्याचं मशीन, हात धुवायचा साबण असं बरंच सामान उपलब्ध केलं. मुंबईतल्या २५विभागांमधील महासंघाचे सदस्य असणाऱ्या शौचालयांना याचा पुरवठा करण्यात आला. यासोबतच काही संस्थांनी धान्य, मास्क, इतर घरगुती सामानही दिलं. याचं वाटप वस्तीत करण्यात आलं. लॉकडाऊनमुळं अनेकांचे रोजगार गेले. वस्तीतल्या याच नागरिकांची कोरोना लॉकडाऊन काळात उपासमार होऊ लागली. फक्त लॉकडाऊनच्या काळातच नाही तर कायमस्वरुपी उत्पन्न मिळेल असं काहीतरी केलं तर यावर तोडगा निघेल, असं मीना यांना वाटू लागलं. ही कोंडी फोडण्याकरता शौचालयाच्या गच्चीचा वापर करण्याचं त्यांनी ठरवलं. मीना वस्तीतल्या महिलांना शिवणाचं प्रशिक्षण देत होत्याच. त्यांनी एका गारमेंट कंपनीतून थोड्या दिवसांकरता ४ शिलाई मशीन घेतल्या. त्यावर या महिलांनी मास्क शिवायला सुरुवात केली. मग घाटकोपरमधील जेथो संस्थेला याबाबत कळल्यावर त्यांनी मंडळाला ४ मशीन विकत घेऊन दिल्या. मीना यांच्या ओळखीतल्या फॅशन डिझाईन करणाऱ्या मुलींनी हे मास्क, त्याकरता लागणार कापड याबद्दल मार्गदर्शन केलं. मास्कसोबतच उशांचे कव्हर्स, हॅण्डबॅग, पर्सेसही त्यांनी डिझाईन करून दिली. महिला उरलेल्या कापडापासूनही तोरणं, पुष्पगुच्छ बनवतात. याच मार्केटिंगही उत्तम झाल्यानं महिलांना चांगला लाभ होत आहे. यातूनच उत्साह वाढल्यानं केंद्र सरकारच्या खादी ग्रामोद्योग मंडळातर्फे महिलांकरता खादीचं कापड आणि त्यापासून बनवायच्या वस्तूं त्यानंतर कापडीसॅनिटरी पॅड प्रशिक्षण महिलांना दिलं. यापुढंही मुलींना आणि महिलांना वेगवेगळी प्रशिक्षण देण्याकरता विविध संस्थांच्या संपर्कात आहेत. मीना नुसतं प्रशिक्षण देऊन थांबत नाहीत, तर या प्रशिक्षणाचा उपयोग करून रोजगार मिळवून देण्याकरताही प्रयत्न करतात. मीना आणि मंडळाच्या या प्रयत्नांमुळं वस्तीत खूप चांगले बदल झाल्याचे मानखुर्दमधल्या चिंचणी मायक्का महिला सहकारी संघातर्फेही अनेक उपक्रम सुरू असतात. दरवर्षी या शौचालयाचा वाढदिवस साजरा करतात. दोन वर्षांपूर्वी त्यांनी शौचालयाच्या गच्चीवर माहेरघर सुरू केलं. व्यसनी नवरा, भांडणं, अत्याचार यामुळं महिलांना खूप त्रास होतो. कधीकधी घरातून बाहेर काढलं जातं. अशा वेळी या महिलांना आधार आणि समुपदेशनाचं काम या माहेरघरात चालायचं. या महिलांची समजूत काढून त्यांना शक्य असेल ते प्रशिक्षण देणं, मुली लहान वयात भरकटू नयेत याकरता त्यांचं समुपदेशन करणं हे महत्त्वाचं काम इथं होत असे. या संस्थेतर्फे दत्तकवस्ती सुधारणा काम, पीएमजी कॉलनीत सिझनप्रमाणं संस्थेतर्फे फुलांपासून ते खाद्यपदार्थ विक्रीचे स्टॉल लावण्यात येतात. महिलांना स्वयंपूर्ण बनायला मदत करणाऱ्या या सीबीओच्या अध्यक्षा सुरेखा या एक चांगल्या शेतकरीही आहेत. सुरेखा यांचं लहानपण मुंबईतल्या फुटपाथवर गेलं. १४-१५ व्या वर्षी स्वतःच लग्न केल्यामुळं त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावं लागलं. आपण केलेली चूक मुलींनी करू नये म्हणून त्या वस्तीतल्या मुलींशी संवाद साधतात. महिलांना कौटुंबिक अत्याचारातून सोडवून स्वतःच्या पायावर उभं राहण्याकरता हिंमत देतात, प्रशिक्षणही देतात.

सीबीओंनी आपल्या कक्षा रुंदावल्या तर वस्तीत कसा फरक पडतो हे या दोन्ही उदाहरणावरून दिसून येतं. या उपक्रमांचं लोण सर्व वस्त्यांमध्ये पसरलं तर वस्त्यांमधील जीवनमूल्य, सामाजिक भान वाढायलाही मदत होणार आहे.

# प्रकरण ११ –महिलांचा प्रतिसाद

"मी रात्री १० वाजताही एकटी सार्वजनिक शौचालयात जाते. मला भीती नाही वाटत", धारावीत राहणारी १२ वर्षांची श्वेता सांगते. तिच्याच शेजारी राहणाऱ्या मेधा या भागात १५ वर्षांपासून राहतात. त्या सांगतात, "पूर्वी सोबत बघूनच शौचालयात जावं लागायचं. नाकातले केस जळतील असा वास यायचा. पण आता सोबतीचीही गरज नाही आणि स्वच्छताही असते". वांद्रे पूर्वमधील कंचन गिरी ही १८ वर्षीय मुलगी त्यांच्या वस्तीतल्या महिला व्यवस्थापन करणाऱ्या शौचालयांना १० पैकी ९ गुण देते.

वस्तीमध्ये शौचालयाची गरज सर्वात जास्त कोणाला असते तर ती महिलांना. पुरुष कामाच्या निमित्तानं १४-१५ तास घराबाहेर असतात. कामाच्या ठिकाणी त्यांना शौचालय उपलब्ध असतं. बाहेर असताना सार्वजनिक शौचालय किंवा सरळ उघड्यावर आपलं काम पुरुष आटोपतात. वस्तीतल्या महिला कामाकरता बाहेर जात असल्या तरी तो वेळ कमी असतो. बऱ्याचदा महिला कौटुंबीक जबाबदारी, मुलांना सांभाळत घरात राहूनच करता येईल अशी विविध कामं करत असतात. या महिला'२४ँ७" घरातच असतात. त्यामुळं वस्तीतल्या शौचालयांची सर्वात जास्त गरज त्यांना असते. महिला लोकसंख्येत ५०% असल्या तरी वस्तीतल्या शौचालयांची संख्या समसमान नसते.

आपल्याला माहितीच आहे झोपडपट्टीतल्या घरांचं आकारमान किती असतं ते. ८ बाय १० फुटाच्या खोलीतच हॉल, किचन आणि बेडरूम सर्व असतं.या घरात किमान ८-१० माणसं असतात.इथल्याच एका कोपऱ्यात असते छोटीशी मोरी. या मोरीतच आंघोळ, कपडे-भांडी धुणं करायचं.अशा परिस्थितीतखाजगीपणा कितीसा असणार? एखादीला मासिक पाळी दरम्यान कापड किंवा पॅड बदलायचं असेल तर घरात असणाऱ्या सर्वांना बाहेर जावं लागतं. मुलगी किंवा महिला पॅड वापरत असेल तर त्याची विल्हेवाट कशी लावायची ही समस्याही असतेच. अशातच कोणी पाहुणा-रावणा असला तर त्या स्त्रीची आणखीनचं कुचंबणा होते.महिलेच्या लैंगिक अवयवांबाबत दूषित पूर्वग्रह असल्यामुळं या गोष्टींची चर्चा अजूनही दबक्या आवाजातच होते. या वस्त्यांमध्ये तर याबद्दल शब्दही काढला जात नाही. हल्ली हल्ली काही स्वयंसेवी संस्था मुलींना, महिलांना याबाबत माहिती देत असल्यामुळं जरा जागृती होऊ लागलीय. पण अजून बराच पल्ला गाठायचा आहे. आपण याआधी पाहिलं की महिलांना दिवस उजाडायच्या आधी किंवा मावळल्यानंतरच शौचाकरता जावं लागायचं. पण फार लवकर किंवा फार उशीराही जाता येत नाही. सार्वजनिक शौचालय असलं तरी रात्री तिथं सुरक्षेचा मुद्दा हा जास्त गंभीर असतो. त्यामुळं महिला घरातल्या मोरीतच लघवी करतात. आरोग्य आणि स्वच्छतेचेबिकट प्रश्न निर्माण होतात. या गोष्टींमुळं महिलांना मूत्रमार्गात संसर्ग होण्याचे प्रमाण जास्त आहे. वस्तीतल्या सार्वजनिक शौचालयांत महिलांकरता स्वतंत्र मुताऱ्या नसल्यामुळं शौच आणि मूत्र विसर्जनाकरता एकाच टॉयलेटसीटचा वापर होतो. त्यामुळंही मूत्रमार्गातल्या संसर्गाचं प्रमाण वाढतं.

महिला सीबीओ शौचालयांचं व्यवस्थापन करण्यामागं हे सर्व महत्त्वाचे मुद्दे आहेत. महिला सीबीओ शौचालयांची देखभाल करू लागल्यावर यासर्व अडचणीतून मार्ग निघू लागला. बहुतांश पुरुषांना या सर्व गोष्टी समजतच नाहीत. किंवा ते उघडपणे बोलतंही नाहीत. त्यामुळं सार्वजनिक शौचालयाचं बांधकाम आणि वापर करताना जेंडर सेन्सिटिव्हीटीच्या मुद्द्याकडं दुर्लक्ष व्हायचं. महिला व्यवस्थापनात पुढं येऊ लागल्यावर वर सांगितलेल्या गोष्टींकडं चांगलं लक्ष दिलं जाऊ लागलं.सुरक्षा आणि स्वच्छता हे दोन महत्त्वाचे मुद्दे महिला सीबीओंच्या शौचालयात असतात. त्यामुळं आता कोणत्याही प्रहरी महिलांना बिनधास्तपणं शौचालयाचा वापर करता येतो. शौचालय परिसरात सीसीटिव्ही असल्यामुळं सुरक्षा आणखी चोख झाली. पाळीच्या दिवसांमधला खाजगीपणा जपला जात आहे. अगदी लहान घरातल्या मुली, स्त्रिया शौचालयातच येऊन पॅड बदलतात. या घरातल्यापुरूष सदस्यांना आता घराबाहेर जावं लागत नाही. पाण्याची उपलब्धता असल्यानं पाळीतली स्वच्छताही सुकर होऊ लागली. सॅनिटरी पॅडही शौचालयात उपलब्ध होत आहे. त्याची विल्हेवाटही तिथंच इन्सिनरेटरमध्ये लावली जाते.

काही ठिकाणी शौचालयाची गच्ची किंवा समोरिल जागेचा खूप चांगल्याप्रकारे वापर केला जात आहे. पवईतल्या जय माताजी महिला मंडळानं शौचालया बाहेरील मोकळ्या जागेत स्वतःच्या खर्चानं फरशी घातली. प्रखर उजेडाचे दिवेही बसवले. वस्तीतल्या मुलांना

खेळायला मोकळी जागा नाही. या जागेवर येऊन मुलं खेळतात. महिला संध्याकाळी, रात्री गप्पा मारायला इथं जमतात. महिलांकरता अनेक कार्यक्रमही इथंच आयोजीत करण्यात येतात. वस्तीतल्या महिलांना दोन घटका मोकळं बसायला या जागेचा खूप चांगला वापर होत आहे. शौचालयाची सोय झाली आणि दोन घटका विरंगुळ्याला जागा मिळाल्यानं महिला आनंद व्यक्त करतात.

एंटॉप हिलमध्ये राहणाऱ्या ३४ वर्षीय शाहीन अश्रफ सांगत होत्या की, "शौचालयांची अपुरी संख्या त्यातही अस्वच्छ शौचालय यामुळं खूप त्रास व्हायचा. रमझानच्या महिन्यात तर खूप वांदे व्हायचे. पहाटे उठून नंबर लागेपर्यंत खूप वेळ लागायचा. मग काय सरळ आम्ही उघड्यावर जायचो. रात्री जायचंही टाळायचो कारण शौचालयात किडे असायचे आणि लाईटही नसायची. मग तसंच कळ दाबून राहायचो. महिला सीबीओच्या शौचालयात लाईट, पाणी, स्वच्छता सर्वच आहे. शौचालयात जायचं असेल आणि घरात कोणी नसेल तर छोट्या बाळांनाही आम्ही शौचालयात घेऊन जातो. अम्मा काऊंटरवरच असते. आम्ही आत असेपर्यंत ती बाळांना पाहते. लहान मुलंही आईसोबत नसली तरीही एकटी जातात. आम्हांला कसली चिंता वाटत नाही".

घाटकोपरमधल्या कामराजनगरातल्या महिला आणि मुलींना स्वच्छ, सुरक्षित शौचालय मिळालचं. त्यासोबत तिथंच विविधं प्रशिक्षण मिळू लागल्यानं रोजगारही मिळत असल्यानं स्वतःच्या पायावर उभं राहता येत असल्याचा आनंद दिसत होता.

महिला सीबीओ व्यवस्थापन करणाऱ्या शौचालयांचा वापर करणाऱ्या जेवढ्या महिलांशी आमचं बोलणं झालं त्या सर्व महिलांनी शौचालयांमध्ये चांगला बदल झाल्याचं सांगितलं. सार्वजनिक शौचालय व्यवस्थापनाकरता महिलांच्या ताब्यात दिल्यास त्यांची स्वच्छता आणि सुरक्षितता चांगल्या प्रकारे राखली जाते, यावर यासर्व जणींचं एकमत आहे. शौचालय व्यवस्थापनात आणखी महिलांनी पुढं यायला हवं असंही त्या म्हणतात. महिलांना या क्षेत्रात अधिक संधी उपलब्ध झाल्या तर महिला-मुलींची चांगली सोय होईल.

# प्रकरण १ २ – महिला नेतृत्व आणि वैयक्तिक विकास

"शौचालयाच्या कामामुळं संघटितपणं काम कसं करावं, नेमक्या कोणाकडे आपलं काम घेऊन जावं आणि त्याचा पाठपुरावा करावा हे लक्षात आलं. त्यामुळं मेहनत वाया नाही गेली. पूर्वी फक्त कर्मचाऱ्यांकडे जायचो, अधिकाऱ्यांकडे जायचो नाही. कामाची पद्धत लक्षात आली. सर्वांना घरातूनही चांगला पाठिंबा मिळतो. एकमेकींची घरची काम सांभाळून दोन दिवस आधीच भेटीचं नियोजन व्हायचं. प्लॉटमध्ये एकत्र भेटून मगच पुढे नगरसेवक, अधिकाऱ्यांकडे जायचो.. अगदी नगरसेवकाला भेटायला जातानाही प्लॉटमधील तरूण मुलं नगरसेवकाच्या कार्यालयात जाऊन बसायचे. नगरसेवक आला की मुलंआम्हांला कळवायची. मुलं तिथून निघायची आणि आम्ही तिथं पोहचायचो. अशाप्रकारं व्यवस्थित नियोजन करून आम्ही कामं केली. रहिवासी आणि महिलांची एकी, संघटन एवढ्या मोठ्या प्रमाणात दिसल्यानं समाजवादी पक्षाचा नगरसेवक इरफान खान यांच्यावर काम करण्याचा दबाव निर्माण झाला", गोवंडीतल्या एकता महिला सहयोगिता मंडळाच्या महिला अगदी उत्साहानं त्यांची माहिती देतात. या सर्व महिला गृहिणी आहेत. भाजीपाला आणणं, मुलांना शाळेत ने-आण करणं या व्यतिरिक्त फारशा घराबाहेर कधी जायच्या नाहीत. पण शौचालयाच्या मुद्द्यावरून या महिला केवळ घराबाहेर पडल्या नाहीत, तर कामं करण्यासाठीची यशस्वी रणनीतीही त्यांनी आखली. गरजा आणि सुरक्षतिता यांचा मेळ घालत त्यांनी आपल्या शौचालयाच्या डिझाईनबद्दल मागण्या लावून धरल्या. आता या महिला बालवाडी सुरू करण्याच्या विचारात आहेत. आपण काहीतरी करू शकतो हा विश्वास त्यांच्यात आला आहे. आर्थिक स्वावलंबनाकरतात्याकौशल्य विकास प्रशिक्षण घेणार आहेत. याकरता प्लॉटमध्येच हॉल बांधण्याच्या विचारात त्या आहेत.

प्रत्येक महिलेला वाटत असतंच की, आपल्याला चांगली सुविधा मिळावी. पण याकरता पुढाकार कोण घेणार हा प्रश्न असतोच. समस्येनं गंभीर रुप घेतलं किंवा मग काही वैयक्तिक अनुभवांवरून महिला एकटीनं तर कधी गटानं पुढं येतात. शौचालयाच्या या कामांमुळं काही महिलांमध्ये आमूलाग्र बदल झाल्याचं पाहायला मिळालं. मनिषा वाघमारे यांचा जन्म मुंबईतलाच. लहान वयातच आई वारली आणि लग्नही १ ५-१ ६ व्या वर्षी झालं ते ही मुंबईतच. महानगरात राहूनही त्या घराबाहेर कधीही पडायच्या नाहीत. कधी जाणं झालं तरी कोणाच्या तरी सोबतीनंच जायच्या. मुलांना सार्वजनिक शौचालयाच्या वापरादरम्यान येणाऱ्या अडचणी पाहून त्या अस्वस्थ होत होत्या. हिंमत करून त्यांनी शौचालय बांधकामासंदर्भातली माहिती, सीबीओ याबद्दलची माहिती मिळवली. वस्तीतल्या लोकांचं मंडळंही तयार केलं. तिथल्या समाजकंटकांच्या त्रासाविरोधातही वस्तीला एकत्र आणलं. केवळ वैयक्तिक नाही तर मंडळाच्या विकासाकडंही लक्ष दिलं. शौचालयाच्या निमित्तानं घराबाहेर पडलेल्या मनिषा यांना स्वतःतल्या क्षमतांची जाणीव झाली. तीन मुलं लहान असतानाही त्या महाराष्ट्र सुरक्षा मंडळाच्या परिक्षेला बसल्या आणि उत्तीर्णही झाल्या. या परिक्षेकरता शारीरिक क्षमता चाचणी बऱ्यापैकी कठोर असते. त्यातही त्यांनी चांगली कामगिरी केली. पहिल्या प्रयत्नात त्यांना हे यश मिळालं. गेली ८ वर्ष त्या महाराष्ट्र सुरक्षा मंडळावर सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत आहेत.मनिषांप्रमाणंचं बिना गुप्ता याही मुंबईतल्याच. पण त्याही एकटीनं कधी घराबाहेर पडल्या नाहीत. बिना शौचालय व्यवस्थापनासोबतचं महापालिकेच्या इतर कामांची कंत्राटही त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून घेतात. या सर्व कामांमुळं त्यांच्यात राजकीय इच्छाशक्ती ही जागृत झाली आहे. त्यामुळंच त्या महापालिका निवडणूक लढवण्याची तयारी करत आहेत.

विविध सीबीओंसोबत संवाद साधताना आम्हांला जाणवलं की काही ठिकाणी सीबीओच्या सर्व सदस्यांमध्ये बदल झाला आहे. त्यांच्यात आत्मविश्वास आला. आपणही काहीतरी करू शकतो हा विश्वास आलेला दिसतो. गट म्हणून पुढं येऊन काम होत असल्याचं दिसतं. संपूर्ण गटाचा विकास होत आहे. नवीन संधी शोधणं सुरू आहे किंवा त्यावर काम सुरू आहे. पण काही ठिकाणी फक्त त्या सीबीओतली अध्यक्षा किंवा सचीव पुढं जाताना दिसत आहे. मंडळातल्या इतर सदस्या नेतृत्वाच्या फक्त हो ला हो करताना दिसतात. याही पुढं जाऊन फक्त शौचालय सुरू करताना गट होता. पण पुढं नेतृत्व विकसित झाल्यावर गट जिथं होता तिथंच राहिला आणि नेतृत्व खूप पुढं निघून गेलं. गटाची क्षमता बांधणी करताना ह्या गोष्टींकडंही लक्ष देणं गरजेचं आहे.

# गोषवारा

• सुरक्षा, स्वच्छताआणि स्वत:सोबतच घरातील सदस्यांनाही सार्वजनिक शौचालयाचा वापर करताना येणाऱ्या अडचणी महिलांना अस्वस्थ करतात. यामुळं वस्ती शौचालयाच्या उभारणीत महिला पुढाकार घेऊ लागल्या.

• समान वाटणी, काळजी घेणं, देखभाल करणं आणि न डगमगता संकटांचा सामना करणं हे भाव महिलांमध्ये नैसर्गिकरित्या असतात. गरज पडली तर तलवारीची तळपही त्या दाखवतात. त्यांच्या या सर्व गुणांची झाक त्या करत असलेल्या प्रत्येक कामांमध्ये दिसून येते. सामुदायिक शौचालयांचं व्यवस्थापन करतानाही हे गुण दिसून येतात. महिलांना ठराविक कालावधीनंतर क्षमता बांधणी प्रशिक्षण द्यायला हवं. सीबीओ बनवल्यावर हे प्रशिक्षण लगेचच दिल्यास वैयक्तिक पातळीवर असणाऱ्या गुणांचा अंदाज येऊन एकित्रतपणं सामुहिक पातळीवर उपयोग चांगला होईल. यामुळं शौचालयाचं व्यवस्थापन आणखी प्रभावीपणं करता येईल. लॉट ११ मध्ये याचा उल्लेख आहे पण त्याआधीच्या लॉटमधील सीबीओंनाही हे प्रशिक्षण द्यायला हवं. लॉट ११ नुसार याची प्रत्यक्ष अंमलबजावणीही व्हायला हवी. या प्रशिक्षणात वस्तीचं समुपदेशन, राजकीय अडचणींशी सामना, कायद्याची प्राथमिक माहिती, हिशोब, जमाखर्च या विषयांचाही समावेश हवा.

• प्रस्तावित सामुहिक शौचालयाच्या बांधकामाचं संकल्पचित्र सीबीओ आणि वस्तीला बांधकामापूर्वी दाखवण्यात यावं.याबद्दल सीबीओला कागदोपत्री असणाऱ्या अधिकाराची प्रत्यक्षही अंमलबजावणी करण्यात यावी.

• या शौचालयांचं व्यवस्थापन करणाऱ्या सीबीओ ना नफा ना तोटातत्त्वावर रजिस्टर आहेत. शौचालयाच्या स्वच्छता आणि देखभालीकरता पैशाची आवश्यकता असते. याकरता लागणारी रक्कम सीबीओंना मासिक पासाच्या माध्यमातून गोळा करण्याची परवानगी महापालिकेनं दिली आहे. पण सीबीओला है पैसे गोळा करण्यात अडथळे येतात. कधी संपूर्ण सीबीओचा सहभाग नसल्यानं फक्त पदाधिकाऱ्यांनाच पैशांचा मुद्दा माहित असतो. तर कधी लोकवर्गणीबद्दल जागृती नसते. वीज आणि पाणी बिलाचा खर्च, जमाखर्च याबद्दल लोकांना विश्वासात घेऊन सांगितलं नाही तरी लोकं पैसे देणं टाळतात. नियमित पैसे देणारे आणि न देणारे लोकं याची माहिती वस्तीत करून दिली पाहिजे.

• महिला सीबीओंनी सक्तीनं पैसे वसूल केले तर वस्तीत संघर्ष होतो. महापालिका रस्त्यावर थुंकणाऱ्या लोकांवर क्लीनअप मार्शलद्वारे दंड वसूल करते तसं शौचालय अस्वच्छ ठेवणाऱ्यांवरही दंडात्मक कारवाई केली पाहिजे. स्वच्छतेच्या सुविधा चांगल्या ठेवणाऱ्या सीबीओंना आर्थिक मदत किंवा बक्षीस दिलं तर सीबीओंना प्रोत्साहन मिळेल.

• कोरोना महामारीच्या काळात सामुदायिक शौचालयांचा वापरही मोफत करण्यात आला. त्यामुळं वीज, पाणी आणि स्वच्छतेचा खर्च भागवताना सीबीओंना खूप त्रास झाला. वास्तविक या परिस्थितीत वीज आणि पाणी बिलात सवलत मिळायला हवी होती.

• सामुदायिक शौचालय बांधताना महापालिकेनं फ्लोटींग पॉप्युलेशन म्हणजेच तात्पुरत्या कालावधीकरता एखाद्या भागात राहणारी लोकसंख्याही गृहीत धरली पाहिजे.

•नियमांना बगल देत व्यवसायिक तत्वावर शौचालय व्यवस्थापन करणाऱ्या किंवा सीबीओच्या नावानं महापालिकेची इतर कामही मिळवणाऱ्या सीबीओंबाबतची भूमिका महापालिकेनं स्पष्ट करायला हवी. वैयक्तिक लाभ टाळून 'संपूर्ण वस्तीचा विकास" या धोरणावर काम करण्यावर भर दिला पाहिजे.

• गावात पाणवठे असायचे किंवा देवळाच्या आवारासारखी एखादी मोकळी जागा असते. जिथं महिला बसून एकमेकींसोबत गप्पा-गॉसिप करायच्या. पण शहरात विशेषतः झोपडपट्टीत अशी ठिकाणंच नाहीत. त्यामुळं घरात काही त्रास असला, कोणाला काही सांगावसं वाटलं तरी ती सोय नसल्यानं घुसमट व्हायची. महिला शौचालयांची चांगली सोय झाल्यामुळं वस्तीतल्या महिलांना मोकळं होण्यासाठी हक्काचं ठिकाण मिळालं. अनेक शौचालयांच्या समोरच्या मोकळ्या जागेचा वस्तीतल्या महिलांना दोन घटका निवांत गप्पा मारायला आणि मुलांना खेळण्याकरता उपयोग होतो. काही उपक्रमांकरताही या जागेचा वापर करतात. महापालिकेनं प्रत्येक सामुहिक शौचालयाच्या आसपास अशी जागा राखीव ठेवल्यास त्याचा चांगला वापर करता येईल.

• बऱ्याचदा मानधन लवकर मिळावं म्हणून स्वयंसेवी संस्था महापालिकेशी प्रामाणिक न राहता कंत्राटदाराच्या बाजूनं झुकतात. बांधकामातल्या त्रुटींकडं दुर्लक्ष करतात. लोकसहभाग आणि वस्तीशी बांधिलकी या गोष्टींकडे त्यांचं दुर्लक्ष होताना दिसतं. स्वयंसेवी संस्था सीबीओ बनवताना नगरसेवकाच्या सूचनांनुसार काम करताना दिसते. स्वयंसेवी संस्था व्यवस्थापनासंबंधी बाबी हाताळण्याचं सीबीओंना प्रशिक्षण देण्याऐवजी, त्यांच्यावर हुकुमत गाजवताना दिसतात.एसओपीतल्या घटकांची तपासणी झालेल्या ठिकाणी, सीबीओंद्वारे शौचालयांचं व्यवस्थापन आणि देखभाल चांगली होताना दिसते.

• वस्ती स्वच्छता कार्यक्रमांतर्गत बांधल्या जाणाऱ्या शौचालयांच्या बांधकामाकरता महापालिका थेट निधी देते. त्यामुळं नगरसेवक, आमदार आणि खासदार या लोकप्रतिनिधींचा या शौचालयांशी काहीही संबंध नाही. पण आर्थिक लाभ, व्होट बँक, कार्यकर्त्यांना खूष करणं किंवा वैयक्तिक फायदा अशा कोणत्याही कारणानं राजकीय पुढारी यात रस घेतात. लोकांचाही समज असतो की नगरसेवक, आमदार, खासदार त्यांच्या निधीतून शौचालय बांधतात. त्यामुळं लोकंही लोकप्रतिनिधींच्या मागे असतात. व्होटबँकेला आकर्षित करण्याच्या नादात राजकारणी जनतेला गुंगवत राहतात. कंत्राटदार आणि स्वयंसेवी संस्था या दोघांनाही नगरसेवक आपल्या नियंत्रणात ठेवायला पाहतात.

• लोकांमध्ये या शौचालयांची मालकी आपली आहे ही जाणीव निर्माण झाली तर ते आपोआप त्या वास्तूची काळजी घेतील. मालमत्ता व सुविधांची देखभाल आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे शौचालय हिंसामुक्त होण्याकरता हे खूप महत्त्वाचं आहे.

• शौचालय महिला स्नेही असण्याकरताही प्रयत्न केले पाहिजेत. याकरता महिलांशी कसं वागावं, महिलांबद्दल शौचालयाच्या भिंतीवर अश्लिल लिखाण न करू देणं, त्यांचे मोबाईल नंबर न लिहिणं याकरता केअरटेकरला प्रशिक्षण द्यायला हवं.

• लॉट ९ च्या अखेरीस शहरी भागातही स्वच्छ भारत अभियान सुरू झालं. यात शहरी भागात शौचालय बांधणीवर भर देण्यात आला. त्यामुळं लॉट ९ मधील काही शौचालय संकुलं स्वच्छ भारत अभियानमध्ये दाखवण्यात आली आहेत. २०१४ ते

२०१६ हा कालावधी एक लॉट संपून दुसऱ्याची प्रक्रीया सुरू होण्याचा काळ आहे. २०१४ पर्यंत हा कार्यक्रम SSP या एका स्वतंत्र विभागाच्या अंतर्गत राबवण्यात येत होता. पण स्वच्छ भारत अभियान सुरू झाल्यावर स्थानिक पातळ्यांवर २४विभाग कार्यालयांमध्ये हा कार्यक्रम विकेंद्रीत करण्यात आला. याची झळ कार्यक्रमाला बसली.

- लॉट क्रमांक १० आणि ११ हे एकत्रच सुरू झाले. या लॉटपासून शौचालयाचं व्यवस्थापन करणाऱ्या सीबीओंमध्ये ३३%महिला सदस्या असल्याच पाहिजेत असं नमूद करण्यात आलं. पुरुषांच्या सीबीओंमध्येही महिला प्रतिनिधीत्व दिसू लागलं. त्यामुळं आता पुरुष सीबीओ व्यवस्थापन करणाऱ्या शौचालयांमध्ये महिलांच्या समस्यांकडे दुर्लक्ष होणार नाही.

- महापालिका उत्तम धोरणं आखते पण त्याची अंमलबजावणी होणंही तितकंच महत्त्वाचं आहे.

# उल्लेखनीय....

शौचालयांचं व्यवस्थापन करताना त्यात सुरळीतपणा यावा किंवा लोकांना अधिक सुविधा मिळाव्यात या गोष्टींकडंही काही महिला सीबीओविशेष लक्ष देत आहेत. शौचालयाच्या आसपास तणाव निर्माण होऊ नये, याकरताही वेगळ्या पद्धतीया महिला सीबीओ राबवत आहेत. महिला व्यवस्थापन करत असणाऱ्या शौचालयांच्या बाहेर, प्रवेशद्वारं आणि आतल्या मोकळ्या जागी सीसीटिव्ही कॅमेरे बसवले आहेत.यामुळं गैरकृत्य करणाऱ्यांवर चाप बसतो. किंवा काही गैरकृत्य झाल्यास त्याबाबत पुरावे उपलब्ध असतात. महिला सीबीओ व्यवस्थापन करत काही शौचालयांमध्येपर्यावरणाला पोषक प्रयत्नही केले जात आहेत.

- सीबीओ वस्ती विकासात किती महत्वाची कामगिरी बजावू शकते याचा प्रत्यय घाटकोपरमधील कामराज नगरमधल्या सावित्रीबाई फुले महिला मंडळात येतो. वस्तीत शौचालय बांधणीसाठी या मंडळाच्या अध्यक्षा मीना कांबळे यांनी मेहनत घेतलीच. सोबत वस्तीत रस्तेबांधणीकरताही प्रयत्न केले. वस्तीतल्या रहिवाशांना चांगली जीवनशैली, चांगल्या पायाभूत सुविधांकरता त्या प्रचंड मेहनत घेतात. त्यांच्या कामामुळं सुरवातीला असणारा राजकीय विरोध आता गळून पडला आहे. सामुदायिक शौचालयाच्या गच्चीचा वापर लोकांच्या कल्याणाकरता कसा करता येईल याचं त्यांनी उत्तम उदाहरण जनतेसमोर ठेवलं आहे. मुली, महिलांना विविध कौशल्य प्रशिक्षण शौचालयाच्या गच्चीवर देण्यात येतं. कोरोना काळात तर त्यांनी या महिलांना रोजगारही मिळवून दिले. वस्तीतल्या मुलांच्या शिक्षणाकरता या गच्चीवर शिकवण्याही घेतल्या जातात.
- गोरेगाव पश्चिममधल्या भगतसिंग नगर इथं श्री महालक्ष्मी महिला संघ २०१२ पासून शौचालयाची देखभाल करत आहे. २० सीटसच हे शौचालय आहे. तळमजला अधिक वरचा मजला असं बांधकाम असणाऱ्या शौचालयांमध्ये महिलांचं शौचालय तळमजल्यावरच असतं. पण या शौचालयात महिलांचं शौचालय वरच्या मजल्यावर ठेवण्यात आलं आहे. गच्चीचा गैरवापर होऊ नये याकरता ही योजना केली आहे. स्थानिक लोकांकडून नेहमीच गच्चीचा वापर दारूच्या पार्ट्यांसाठी करण्याकरता मंडळावर दबाव असतो. पण मंडळाच्या सदस्या एकित्रतपणे या दबावाला विरोध करतात.
- महिला शौचालय वरच्या मजल्यावर असण्यासोबतच या शौचालयाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वीजेकरता सौरऊर्जेचा वापर. एका स्वयंसेवी संस्थेनं सौरऊर्जेचे पॅनेल आणि उपकरण मंडळाला दिलं आहे. यामुळं वीजबीलाचाखर्च वाचत आहे. हल्ली कंपन्यांचे सामाजिक बांधिलकी निधी (सीएसआर) उपलब्ध असतात. त्यांची मदत घेऊन किंवा मंडळानं स्वतःचा काही राखीव निधी ठेवला तर सीबीओ व्यवस्थापन करत असणाऱ्या शौचालयांना सौरऊर्जेचा पॅनेल बसवता येतील. त्याद्वारे शौचालयाला वीजपुरवठा करता येईल.
- विक्रोळी पार्क साईटमधील जयहिंद मित्र मंडळाच्या शौचालयात रेन वॉटर हार्वेस्टिंग करण्यात येत आहे. हा भाग संपूर्ण डोंगरावर आणि उतारावर वसला आहे. शौचालय डोंगरावर आहे. भौगोलिक मर्यादामुळं शौचालयापर्यंत महापालिकेच्या पाईपलाईन मधून पाणी पुरेसं मिळत नाही. शौचालयाच्या आवारात दोन बोअरवेल बांधूनही पाणी मिळालं नाही. लोकं घरातून पाणी आणून साठवतात. मग या मंडळानं सरळ पावसाचं पाणी साचवायचं ठरवलं. त्याकरता आवारातचं टाकी बांधली. शौचालयाच्या गच्चीवरचं पाणी पाईपद्वारं या टाक्यांमध्ये साठवण्यात येतं. यामुळं शौचालयाची पाण्याची पूर्ण गरज भागली जात नसली तरी याचा चांगला उपयोग होत आहे.

# स्वच्छता संवर्धन संस्था महासंघाची उद्दीष्ट्य-

• झोपडपट्टीत सामुदायिक शौचालयाचे व्यवस्थापन करणाऱ्या, विशेषतः वस्ती स्वच्छता कार्यक्रमात सहभागी असलेल्या सीबीओंना संघटीत करणे.

• सामुदायिक शौचालयाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी घेतलेल्या सीबीओंना त्यांची भूमिका व कर्तव्य याबाबत माहिती देणे. त्यासोबतचक्षमता बांधणीकरताप्रशिक्षण देणे.

• सीबीओ प्रतिनिधी, पदाधिकारी यांना संघटीत करणे. स्वच्छतेच्या कामात सुधारणा आणण्याकरता उपक्रम राबवणे.

• स्वच्छता आणि आरोग्य यातील परस्पर संबंध लोकांना समजावून सांगणे.

• स्वच्छताआणि पाणी याबाबतच्या मानवी हक्कांची माहिती देणे.

• स्वच्छतेच्या सेवा अधिक परिणामकारकपणे राबविण्याकरिता मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शासन आणि इतर शासकीय विभागांशी संपर्कसाधणे. वस्तीमधील शौचालायांची निर्मिती, दुरुस्ती आणि व्यवस्थापनामध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी सीबीओ आणि सरकार यांमध्ये समन्वय साधणे.

• लोकवर्गणी आणि सीबीओंना सहकार्य करण्यासंबंधी झोपडपट्टीमधील वापरकर्त्यांमध्ये जागृती करणे.

• उपजीविका आधारित प्रकल्पांची निर्मिती करून सीबीओंना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणे.

• सामुदायिक शौचालयांच्या स्वच्छता आणि व्यवस्थापनात येणारा खर्च कमी करण्याकरता सौर उर्जा, पाणी पुनर्वापर प्रक्रिया, बायोगॅस इ. प्रकल्प राबवणे.याकरतामहापालिकेशी समन्वय साधून खाजगी व सार्वजनिक कंपन्यांकडून सीएसआर निधी मिळवणे.

• मुंबई शहरातील शौचालयांचे व्यवस्थापन अधिक पारदर्शक करण्यासाठी आधुनिक तंत्र%ानाचा वापर करून शौचालये स्मार्ट बनवणे. स्वच्छतेचं इंडिकेटर बसवणे. गंधवेध वायुवेध (स्मेल डिटेक्टर) आणि मोबाईल एपद्वारे स्वच्छतेच निरिक्षण करणे.

• सामुदायिक शौचालये वस्ती पातळीवर समुदाय विकासाची केंद्र म्हणून विकसित करणे. महानगरपालिकेच्या विविध विकास योजना, सामाजिक उपक्रम, लसीकरण, आपत्ती व्यवस्थापन यात महापालिकेला सहाय्य करणे.

• झोपडपट्टीतील नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी महिला, लहान मुले, वृद्ध आणि अपंग व्यक्तींच्या सोयींसाठी काम करणे.

• स्वच्छता व पाणी या संदर्भात शासन, महानगरपालिका यांच्याकडून ठरविण्यात येणारी धोरणे, योजना आणि अंमलबजावणी या कामात महत्वाचा हितसंबंधक म्हणून भाग घेणे. लोकाभिमुख धोरणांकरता आग्रह करणे आणि ती राबविण्यात सक्रीय सहभाग घेणे.

आपण आमच्या ध्येय व धोरणांशी सहमत असाल तर आजच महासंघाचे सदस्य व्हा. महासंघ आपला आहे, आपणच त्यास बळकट करूया.लक्षात घ्या, महासंघ हे सहकार्य व समन्वय साधणारे व्यासपीठ आहे.

आमचा संपर्क

## १) अनिता मिश्रा

### महिला एकता सेवा मंडळ, वडाळा आर टी ओ मोनोरेल डेपो

११ मार्च २०१९ रोजी अनिता मिश्रा यांच्या संस्थेच्या शौचालयाचं उद्घाटन झालं. ७-८ दिवसांत शौचालय तुंबू लागलं. २३ मार्च २०१९ ला बीएमसीत तक्रार दाखल केली. तेव्हापासून आतापर्यंत सतत तक्रारी दाखल करणं सुरूच आहे. या शौचालयाला सांडपाणी वाहून नेणारी पाईप लाईन आणि सेप्टीक टँकही नाही. सध्या दुसऱ्या टॉयलेटच्या सुवेज लाईन, सेप्टिक टँकमध्ये सोडलं जातं. मोटर लावून मैला खेचला जातो. ही तात्पुरती व्यवस्था अजूनही सुरूच आहे. याकरता केअरटेकरनं ३-४ हजाराचा पाईप खरेदी केला. या दोन टॉयलेटमध्ये ४ गल्ल्यांपेक्षा फार अंतर नाही. इथेमहिलांकरता ७,पुरुषांकरता ७ आणि अपंग १ एवढ्या सीटस आहेत.
उपायुक्तांपर्यंत कित्येक तक्रारी दिल्या. प्रत्येक वेळी तक्रार दिल्यावर माप घेतात. दोन तीन दिवस फेऱ्या मारतात. मग पुन्हा जैसे थे. आरटीआय टाकूनही उपयोग झाला नाही. २०२० मध्ये तात्पुरती व्यवस्था करून २९ ऑगस्टला शौचालय परत सुरू केलं गेलं. पण ही व्यवस्था जास्त दिवस टिकली नाही.आता वर्षभर कोरोनाचं कारण पुढे करण्यात येत आहे. बीएमसीच्या मेंटेनन्स विभागाशी संपर्क साधला. शौचालय बांधकामाच्या वेळी असणाऱ्याज्युनियर इंजिनिअरना ही गोष्ट माहित असल्याने तेसीपी लॉरी पाठवायचे.पण चार महिन्यांनी त्यांची बदली झाली. नव्या अधिकाऱ्यांना याबाबत माहीत नाही. पण ज्युनियर स्टाफजुनाच आहे. त्यांना सर्व प्रकरण माहीत असूनही ते काम करत नाहीत. यामागचे सर्वात मोठे कारण स्थानिक नगरसेविका आहेत. स्थानिक नगरसेविका कृष्णा रेड्डी यांना हे शौचालय त्यांच्या कार्यकर्त्यांना व्यवस्थापनाकरता द्यायचे असल्यामुळे त्या महापालिका अधिकाऱ्यांवर काम न करण्याकरता दबाव टाकतात. दुसरीकडे शौचालयाबद्दल तक्रारी वारंवार दाखल करतात. नगरसेविकेने महिन्याला हप्ता देण्याची मागणीही अनिता मिश्रा यांनी धुडकावून लावल्याने नगरसेविका अनिता यांना सतत त्यांच्या संस्थेकडून व्यवस्थापन काढून घेण्याची धमकी देत राहतात. अनिता मूळच्या उत्तरप्रदेशच्या असल्याने, त्यांच्या परप्रांतिय असल्याचा मुद्दाही पुढे केला जातो.
या सगळ्यात वापरकर्त्यांचे सहकार्यही नाही. लोकं पाईपांवरून चढतात त्यामुळे पाईप फुटतात. बाहेर बसवलेले सीसीटीव्ही कॅमेरेही तोडले. एका व्यक्तीने तर शौचालयाच्या खिडक्यांना चक्क बांबू बांधले आहेत.वापरकर्ते मासिक पासाचे पैसेही देत नाहीत. फक्त मोजकेच लोक देतात. त्यामुळं देखभालीचा खर्च भागवणेही अनिता यांना मुष्किल होते. मध्यंतरी शौचालय बंद असूनही १५ हजार रुपये लाईटबील आले. पाण्याचे बील तर अजून आलेच नाही. शौचालयाच्या शेजारीच मोठी कचराकुंडी आहे. इथला कचरा वेळच्यावेळी उचलत नाहीत. त्यामुळं खूप घाण पसरते. अनिता प्रत्येक गोष्टीचं पत्र बीएमसीत टाकतात. पण काम होतंनाही. महिला शौचालयात सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशीन आहे. पण पॅड चांगल्या क्वालिटीची नाहीत म्हणून कोणी वापरत नाही. वापरलेले पॅडइनसिनेटर मशीनमध्ये पण टाकत नाही किंवा डस्टबीनमध्येही टाकतनाही. खिडकीवर ठेवतात किंवा टॉयलेटमध्ये टाकतात. त्यामुळे टॉयलेट चोकअप होतं. महिलांना सांगूनही काही फरक नाही पडत. अनिता यांना पाच लाख रुपये मिळाले असं संस्थेच्या महिलांमध्ये कोणीतरी पसरवले. त्यामुळे या महिला सदस्या आणि अनिता यांच्यामध्येही तणाव निर्माण झाला. वस्तीत लोकजागृतीकरता फिरायलाही या महिला तयार नसतात.

अनिता यांच्या घरातून त्यांना त्यांचे पती आणि दोन्ही मुलांचा चांगलं सहकार्य मिळतं. पण आता मुलं या रोजच्या कटकटींना वैतागून नाराज आहेत. त्यांच्या धाकट्या मुलाला शौचालयाच्या वापराचे पैसे मागितल्यानं गुंडाकडून धमकीही मिळाली.
एवढा त्रास होऊनही अनिता या व्यवस्थापनातून माघार का घेत नाही असा प्रश्न पडतो. त्या सांगतात, "हे शौचालय बंद झालं तर महिला आणि मुलींचे हाल होणार. रस्त्यात टपोरी बसले असतात. वृद्धांचे हाल होतील.मध्येमध्ये जेव्हा शौचालय बंद असतं तेव्हा लोक मला हे सांगतात". त्याचाही उपयोग नाही. आता कोरोनाचं कारण पुढे करतात.या कामाविषयी अनिता यांना काय प्रेरणा आहे असं विचारल्यावर त्यांनी सांगितलं, "माझ्या वैयक्तिक आयुष्यात जे घडलं ते दुसऱ्या कोणाबरोबर घडू नये असं मला वाटायचं. खूप सोडून

दिलेल्या अत्याचार झालेल्या महिला आजूबाजूला होत्या. या महिलांकरता काम करण्याकरता मी संस्था स्थापन केली. आमच्या इथं टॉयलेट नव्हतं. खूप लांब जावं लागायचं. जवळ टॉयलेट बनवलं पण ते उघडतच नव्हते. विचारलं तर काम बाकी आहे असं दरवेळी सांगायचे. १५ ऑगस्ट २०१८ ला मी संस्थेच्या वतीनं कार्यक्रमाचा बॅनर लावला होता. नगरसेवकाच्या मुलानं आमच्या संस्थेबाबत विचारणा केली असता त्याला कोणीतरी माझ्या बद्दल सांगितलं. त्याला माझी संस्था रजिस्टर असल्याचं कळलं. त्यानं मला टॉयलेट पाहणार का विचारलं. मी म्हटलं म्हणजे त्यात काय करायचं. तो म्हणाला, काही नाही. फक्त देखरेख करायची. मला वाटलं, ठीक आहे. जर माझ्यामुळं हे टॉयलेट सुरू होतंय तर माझी संस्था पाहिलं ना. पण मला टॉयलेटच्या बाबतीत काहीच माहीत नव्हतं.पण आजूबाजूला चर्चा सुरू झाली. ही युपीवाली आहे. ही भैय्याणी येऊन काय काम करणार. सर्वेच्या वेळी पण खूप भांडणं झाली. ही युपीवाली कशाला हवी. आम्ही आहोत ना इथं. उद्घाटनच्या वेळीही खूप भांडणं झाली. लोकं नगरसेविकेला फित कापूनच देत नव्हते. मर्डर होईल कोणाचा तरी अशी भीती वाटली. त्यानंतर एका आठवड्यानं पोलीस आणि महापालिकेवाल्यांच्या उपस्थितीत उद्घाटन झालं. अडिच वर्ष झाली तरी भांडणंही सुरूच आणि शौचालय तुंबणंही सुरुच आहे. गर्दुले, दारूड्यांचा, गुंडांचाही त्रास प्रचंड होतो. आता माझ्याकरता हा इज्जतीचा प्रश्न आहे”.

ठळक नोंदी –

- सांडपाण्याची लाईन सेप्टीक टँक नाही
- संस्थेचं दुर्लक्ष. बांधकाम नीट न करताच हस्तांतरण
- मात्र हस्तांतरण करार मिळाला नाही. पाणीपट्टीही नावावर नाही.
- बीएमसीचंही दुर्लक्ष तक्रारींची दखल नाही घेत. उपायुक्तांपर्यंत तक्रारी
- नगरसेविकाकृष्णा वेणी रेड्डीयांचा त्रास, त्यांच्या माणसांना चालवायला हवं. म्हणून धमक्या दिल्या जातात.
- केअर टेकरनं पाईप आणला.शेजारच्या टॉयलेटमध्ये सांडपाणी सोडतो. त्याचा तीन हजार हप्ता द्यावा लागतो. पाच हजारची मागणी
- स्वत:सारखी परिस्थिती दुसऱ्या महिलांवर येऊ नये म्हणून संस्था बनवली. २० जून २०१८ मध्ये संस्था रजिस्टर.
- गर्दुले, दारूडे आणि गुंडाचा त्रास
- पासाचे पैसे नाही मिळत. स्वखर्चानं स्वच्छता
- कोरोकडून स्वच्छता साहित्याची मदत
- उत्तर भारतीय असल्याचाही त्रास

# २) मनिषा वाघमारे

## जयहिंद मित्र मंडळ, विक्रोळी पार्क साईट

मनिषा वाघमारे वयाच्या १६ व्या वर्षी लग्न होऊन विक्रोळी इथं २००० मध्ये राहायला आल्या. उंबऱ्याबाहेरचं काहीच माहित नव्हतं. या परिसरात ८० टक्के उत्तर भारतीय आणि २० टक्के मराठी वस्ती आहे. वस्तीही गलिच्छ आणि शौचालयातही खूप अस्वच्छता असायची. बीएमसीनं ६ सीटचं शौचालय वस्तीत बांधलं होतं. महिला आणि पुरुषांसाठी वेगळं शौचालय बांधलं नसल्यामुळं, एकाच शौचालयाचा वापर सर्व करत असत. महिला पाळीमध्ये वापरलेले पॅड आणि कापडाचे तुकडे शौचालयात कुठेही टाकत असत. एक उत्तर भारतीय दबंग मनुष्य शौचालयाचे पैसे वसूल करायचा पण आठवड्यातून एकदाच साफसफाई करायचा. त्यामुळं प्रचंड घाण शौचालयात आणि त्याच्या आजूबाजूलाही असायची. मनिषाची मुलं या शौचालयात जायला नकार देत. ते म्हणायचे घरातच शौचालय हवं. आपण इथून दुसरीकडं राहायला जाऊयात. मनिषांना मुलांचं म्हणणं पटत होतं. पण दुसरीकडं जाणं एवढं सहज नव्हतं.

विक्रोळीत एका शौचालयाचं काम सुरू असताना स्वयंसेवी संस्थेचे अधिकारी जे पी मेहतानी यांच्याबद्दल कळलं. मनिषा यांना मुलांच्या रोजच्या प्रश्नांनी हैराण केलं होतं. मेहतानी यांची भेट घेऊन मनिषा यांनी शौचालयासंबधी सांगितलं. मेहतानी यांनी मनिषा यांना बीएमसी शौचालयाची पुनर्बांधणी करून महिला एकत्र येऊन शौचालयाची देखभाल करू शकतात, याबद्दल मार्गदर्शन केलं. मनिषा यांनी त्यांच्या वस्तीतल्या ६ सोसायटीतल्या लोकांच्या भेटी घेतल्या. लोकांनाही आवडलं. २००० साली प्रत्येक सोसायटीच्या अध्यक्ष, सचिव आणि मनिषा अशी मिळून संस्था स्थापन करण्यात आली. जयहिंद मित्र मंडळ असं नाव देण्यात आलं. मनिषा यांची दिवसरात्र धावपळ सुरू झाली. दरम्यान शौचालयाच्या जवळ राहणाऱ्या माणसाचा त्रास सुरू झाला. ड्रेनेज टाकी तिथं बांधायला त्यानं विरोध केला. त्यातून बांधकाम कामगारांना मारहाणही केली. दारू पिणाऱ्या लोकांचाही त्रास सुरू होता. यांच्या विरुद्ध पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी मनिषांना मदत केली. वस्तीत वर्षानुवर्ष राहणाऱ्या उत्तर भारतीय समाजातल्या काही समाजकंटक मुलांना हे शौचालय स्वतःच्या ताब्यात हवं होतं.त्यांच्या समाजाची वस्ती जास्त असल्यामुळं हुकुमतीसाठी आणि पैसे कमवण्याचं साधन म्हणून त्यांना हे शौचालय हवं होतं. त्यांनी मनिषा यांना त्रास आणि धमक्या द्यायला सुरूवात केली. पण मनिषा यांनी स्वच्छता आणि शौचालय बांधणी चांगलंच मनावर घेतलं होतं.अध्यक्ष बनण्याकरता या समाजकंटकांनी मनिषा यांच्या संस्थेच्या नावाशी साधर्म्य असणारं जयहिंद युवा मित्र मंडळ उघडलं. बांधकामाकरता लागणारं पिंपात भरलेलं पाणी ओतणं, कामगारांचं सामान विकणं ह्या गोष्टी करायचे. मनिषा यांनी पोलीसांची मदत घेतली. आणि त्यांचा बंदोबस्त केला. बांधकाम सुरू होण्यापूर्वी आणि बांधकामादरम्यान मनिषा यांनी महापालिकेत कामाचा नियमित फॉलोअप घेतला. स्वयंसेवी संस्थेच्याही त्या नियमित संपर्कात राहिल्या. याचा फायदा म्हणजे अवघ्या ९ महिन्यात त्यांच्या संस्थेच्या शौचालयाचं बांधकाम पूर्ण झालं. महिलांकरता खाली ९ आणि पुरूषांकरता वरती ९ असं बांधकाम झालेलं शौचालय फेब्रुवारी २०१३ ला सुरू झालं.

अजूनही अधूनमधून समाजकंटकांचा त्रास होतो. पण मनिषांमध्ये शौचालयाचं काम आणि महाराष्ट्र सुरक्षा मंडळातल्या नोकरीमुळं आमूलाग्र बदल झाला आहे. मनिषा आणि त्यांच्या संस्थेतल्या सदस्यांच्या जागत्या पहाऱ्यामुळं इथल्या महिला आणि मुलींना कोणत्याही वेळेला निर्धास्तपणं शौचालयाचा वापर करता येतो. शौचालयाचं बांधकाम पूर्ण झाल्यावर या चाळीतल्या लोकांनी मनिषा यांचा सत्कार केला.

हा भाग संपूर्ण डोंगरावर आणि उतारावर वसला आहे. शौचालय डोंगरावर आहे. भौगोलिक मर्यादामुळं पाणी पुरेसं मिळत नाही. दोन बोअरवेल बांधूनही पाणी मिळत नाही. घरातून पाणी आणून साठवतात. पावसाळ्यात रेन वॉटर हार्वेस्टिंगनं काही प्रमाणात पाणी साचवतात. दोन-तीन जण शौचालयात जाताना पडले. त्यानंतर राम कदम यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी त्यांच्या निधीतून या सहा चाळी ते शौचालयापर्यंतची वाट पेव्हर ब्लॉकनं बांधून दिली.

२७० कुटुंबांना फायदा. साफसफाई व्यवस्थित. गेले ८ वर्ष एकच केअरटेकर आहे. तोच पैसे गोळा करतो. काही जण देतात, काही देत नाहीत. केअरटेकर संस्थेला दर महिना पाचशे रुपये देतो. महिलांशी शौचालयात स्वच्छता राखण्याबाबत दर दोन महिन्यांनी संवाद साधावा लागतो. पॅडची विल्हेवाट नीट लावण्याकरता.

ठळक नोंदी –

- स्वतःच्या मुलांच्या मागणीमुळं शौचालय बनवण्याचा निर्णय
- रेन वॉटर हार्वेस्टिंग
- भौगोलिक अडथळा, डोंगर उतारावरची वस्ती त्यामुळं पाण्याची समस्या. २ बोअरवेलला पाणी नाही
- ९ महिन्यात काम, अतिशय जलद
- स्वतः सतत पाठपुरावा बीएमसी आणि स्वयंसेवी संस्थेसोबत
- बांधकामादरम्यान टपोरी उत्तर भारतीय मुलांचा त्रास. बांधकाम साहित्य चोरी, पाणी ओतणं
- साधर्म्य असणाऱ्या नावानं जयहिंद युवा मंडळ उघडलं
- महाराष्ट्र सुरक्षा मंडळ २०१२ पासून सेवेत
- प्रशिक्षण आणि शौचालयाचं काम एकत्रच सुरू
- २७० मूळ लोक पण बाजूच्या शौचालयाचं काम सुरू असल्यानं १३०० चा लोड
- दारुड्यांचा त्रास अजूनही होतो. लाईट आणि मशिनची चोरी करतात
- भारती बावधानी, नगरसेविका, मेहतानी आणि जगताप सरांची खूप मदत
- आधीची मनिषा साधी भोळी आता धीट धाडसी
- संस्थेतर्फे आणखी काही काम नाही करत. मनिषाने कोरोना काळात भाजीचा व्यवसाय सुरू केला.

# ३) बिना गुप्ता

## अष्टविनायक महिला मंडळ, मोतीलाल नेहरु नगर, एंटॉप हिल

३६ वर्षीय बीना यांच्या संस्थेचं शौचालय एंटॉप हिल इथं आहे. वडिलांच्या नोकरीच्या जवळचं ठिकाण म्हणूनबीना यांचं कुटुंब १९९५ च्या आसपास मालाडहून एंटॉप हिल भागात स्थलांतरीत झालं. त्या दरम्यान इथं खाडीचा परिसर, बाहेर शौचालयाला जाण्याकरता मुली आणि महिलांना खूप त्रास व्हायचा. शौचालय लांब आणि लाईटही नाही. त्यामुळं रात्री उघड्यावरचं शौचाला जावं लागायचं. चरसी आणि दारूड्यांचीही भीती असल्यामुळं पुरूषही रात्री शौचालयाचा वापर टाळायचे. पुढं १९९९ ला बिना यांचं लग्न झालं. त्या पतीसोबत त्याच परिसरात राहू लागल्या. दरम्यान दोन वेगवेगळ्या संस्थांनी ह्या भागात शौचालय बनवली. पण गर्दुले आणि दारूड्यांचा त्रास प्रचंड प्रमाणात होत होता. शौचालयाचे दरवाजे तोडणं, शिड्या तोडणं. तिथलं सामान विकणं हे प्रकार सुरूच राहिले. त्यामुळं ह्या संस्थांनी काम सोडली. त्यामुळं लोकांना शौचालयाकरता त्रास व्हायचा. मुली आणि महिलांची छेड काढणं, अर्वाच्च भाषा हे प्रकारही सुरू होतेच.

२०१६ मध्ये घराच्या बांधकामादरम्यान बीना यांचा संपर्क तत्कालीन नगरसेविका आणि माजी महापौर श्रद्धा जाधव यांच्याशी आला. श्रद्धा जाधव यांनी बीना यांना संस्था बनवून शौचालय चालवण्यासंदर्भात विचारलं. बीना यांनी सुरूवातीला नकार दिला. त्यांच्या पतीनंही नकार दिला. कारण असुरक्षति भाग. श्रद्धांनी पूर्ण सहकार्य करण्याचं आश्वासन दिलं. मग चांगली सोय होईल या हेतूनं त्यांनी होकार दिला. ७ जणांची संस्था बनवली आणि सर्वे केला. बीएमसीच्या अधिकारी त्रिवेणी माने ह्यांनी त्यांना सहकार्य केलं. पण आजूबाजूची लोकं म्हणू लागली, ही बाई काय शौचालय चालवणार. घरात बसणारी बाई. पण बीनानं आव्हान स्वीकारलं. शाखाप्रमुखानेही सर्वे आणि कागदपत्रांच्या पूर्ततेकरता मदत केली. बांधकामाच्या डिझाईनकरताही मदत केली. महिलांसाठी १६ आणि पुरुषांसाठी १६ असं मोठं शौचालय संकुल बांधलं. स्वच्छता आणि क्लीयर व्हेंटिलेशनची सोय. वीज आणि पाणी सर्व गोष्टींची पूर्तता झाल्यावरच स्वयंसेवी संस्थेनं शौचालयाचं हस्तांतरण केलं. स्वयंसेवी संस्थेचीही चांगली मदत झाली.

मात्र जुलै २०१७ मध्ये शौचालयाचं बांधकाम पूर्ण झाल्यावर भाजपची कृष्णा वेणी रेड्डी नगरसेविका झाली. तिला उद्घाटन करायची इच्छा. त्यामुळं जबरदस्तीनं केलं. दोन दिवसांत कार्यकर्त्यांनी घाण केली. मग बीनानं परत स्वच्छता केली. श्रद्धा जाधव महापौरांना आणून उद्घाटन केलं. त्यावरून मग प्रचंड वादावादी सुरू.

३००-४०० घरं या शौचालयाचा वापर करतात. सुरक्षति आणि स्वच्छ शौचालय वापरायला मिळत असल्यामुळं लोक खूष.

नगरसेविका आणि तिचे कार्यकर्ते सतत त्रास देतात. शौचालयात काही तरी लिहिणं, आत दारूच्या बाटल्या, सिगरेट ठेवून त्याचे फोटो काढून बीएमसीला पाठवणे. हे सतत सुरू. शौचालय काढून घ्यायची धमकी. पाईपलाईन रात्री तोडणं. प्लास्टिक पीव्हीसीचे पाईप ब्लेडनं कापणं सोपं. सतत तोडणं.

कृष्णा ला महिन्याला आठ हजार २०१९ सुरूवातीपासून शेवटी हप्ता देणं सुरू केलं. पाईप लाईन कापायची रात्री लोकांना सांगून

ठळक नोंदी –

- उद्घाटनाचा घोळ. एका नगरसेविकेनं कल्पना आणि बांधायला सहकार्य, पाठिंबा. पण पुढच्या नगरसेविकेचा त्रास
- लोकोपयोगी, सर्वांना फायद्याचं स्वच्छ शौचालय देऊनही आर्थिक मुद्द्यांवरून राजकीय लोकांकडून अडचणी निर्माण करण्यात येतात.
- नगरसेविकेला २०१९ पासून महिन्याला हप्ता देणं सुरू. त्यानंतर आता त्रास नाही.
- त्यापूर्वी सतत पाण्याचे पाईप रात्री कोणाला तरी सांगून कापणं. शौचालयात दारूच्या बाटल्या, सिगरेट ठेवून त्याचे

फोटो काढणं. सतत बीएमसीत खोट्या तक्रारी देणं. दंड भरायला लावणं.

• तिच्या कार्यकर्त्याला शौचालय चालवायला द्यायचं आहे. निवडून आल्यावर तीन महिन्यात शौचालय काढून घ्यायची धमकी

• दर सहा महिन्यांनी केअर टेकर बदलते. महिला मुलींच्या सुरक्षेकरता, स्थानिकांशी जास्त परिचय होऊ नये आणि काही आर्थिक नुकसान होऊ नये याकरता

• लेबर कॉन्ट्रक्टर द्वारे केअर टेकर ची नियुक्ती. दोन जण असतात

• संस्थेपुरतं मर्यादीत ठेवलं नाही. स्वयंसेवी संस्थेच्या प्रशांतने सांगितलं.

• सतत बीएमसीत फेऱ्या मारून काही काम मिळेल याची चौकशी.

• २०१९ फेब्रुवारी महिन्यात दत्तक वस्ती सुधारणाचं कंत्राट मिळालं. मार्च मध्ये मोटर लोडिंग कचरा भरण्याचं काम. २०२० तामिळ संघात कोरोना विलगीकरण कक्षाच्या सफाईचं कंत्राट

• या कामांमुळं आर्थिक फायदा चांगला... स्वतःमध्येही बदल.. आर्थिक उलाढाली चांगल्या सुरू आहेत

• दोन वर्षापासून वडाळा इथं राहतात. वडिल शौचालयाजवळ बसतात

• २०२२ च्या महापालिका निवडणुकीची तयारी सुरू आहे. भाजपकडूनच

• वैश्य समाजामधून उत्तरभारतीय बिरादरीमधून सुरुवातीला टीका. टॉयलेटमधून मिळालेले पैसे खाणार.. पण आता तिचं स्टेटस वाढल्यानं कौतुक. पतीची चांगली साथ.

• भाजपामध्ये सक्रिय.. शिवसेना तिकिट देणार नाही म्हणून.. राजकीय गोष्टींचा फायदा कसा करायचा याची समज आली

• २०१५ ची बीना आणि २०२० च्या बीनामध्ये जमीन आकाशाचा फरक

## ४) ज्योती चळगे

### साई महिला मंडळ, पंतनगर, घाटकोपर

या भागात ८० टक्के उत्तर भारतीय, गुजराथी आणि २० टक्के मराठी समुदायाची वस्ती आहे. सर्व भाग वस्तीआणि चाळीचा आहे. ३० वर्षापूर्वीपर्यंत गटारावर तातुरता पत्र्याचा आडोसा घालून शौचालय होती. यामुळं सर्वांनाच खूप त्रास व्हायचा. बीएमसीनं साधारण २५ वर्षांपूर्वी शौचालय बांधले. पण देखभाल नाही, लाईटही नाही. त्यामुळं बिकट अवस्था झाली होती. शौचालयाच्या भांड्याखाली घुशींनी पोखरल्यामुळं भांडी खचू लागली होती. लहान मुलं जायला घाबरायची. एक महिला पडता पडता वाचली. त्यामुळं मग वस्तीतल्या महिलांनी मिळून नवीन शौचालय बांधायचं ठरवलं. या महिलांचं १५-२० वर्षांपासून भजनी मंडळ आहे. त्यांनी बीएमसीशी नवीन शौचालयाकरता संपर्क साधला. या वस्तीत २५०-३०० घरं आहेत. वस्तीतल्या पुरुषांनीही सहकार्य केलं. त्यांचंच म्हणणं महिलांना कोणी अडवू शकणार नाही. त्यामुळं तुम्हीच एकत्र येऊन करा. अकरा जणी एकत्र येऊन संस्थेची स्थापना होऊन सर्वे झाला. जानेवारी २०१५ ला बांधकाम सुरू झालं.  पण शौचालयाच्या आसपास राहणारे ३-४ जण या नवीन शौचालयाच्या बांधकामाला विरोध करू लागले. त्यांच्या घरात स्वत:चं शौचालय होतं. त्यातल्या एका महिलेचा पती पोलीस होता. ती त्यावरून धमक्या द्यायची. मूळात या जागी बीएमसीचं आधीपासूनच शौचालय होतं. या माणसांचं म्हणणं होतं की, ‘लोक इथून समोरून जातात. ते घाण करणार घरासमोर“. त्यामुळे ही विरोध करणारी माणसं बांधकामाचं साहित्य चोरणं, कामगारांना मारहाण आणि धमक्या देतचं होती. त्यामुळं सतत पोलिस स्टेशन आणि बीएमसीला चकरा टाकायला लागायच्या. संस्थेच्या सदस्यांसोबत वस्तीतल्या इतर महिलाही यायच्या. या एकीमुळेच पोलिसांनी मंडळाची साथ दिली. कामगारांना मारहाण, पाईप, लाईट मीटर, पाण्याच्या मोटारची चोरी यामुळं पहिला कंत्राटदार काम सोडून गेला. सोळा महिने हे सर्व प्रकार सुरू होते. या अडचणींना न घाबरता महिलांनी चिकाटी सोडली नाही. अखेरिस जुलै २०१६ ला उद्घाटन झालं. महिलांकरता ६, पुरुषांकरता ६ सीटस्आहेत. महिला विभागात २ कमोड आहेत.

ठळक नोंदी-

- एकीच बळ. सर्व महिला कायम एकत्र.. त्यामुळं चांगला दबावगट निर्माण झाला. प्रत्येक कामाकरता, अडचणीकरता सर्व महिला एकत्र जातात..
- शौचालयाच्या शेजारी राहणाऱ्यांचा विरोध. पाईप, सिमेंट, सामान चोरी, कामगारांना मारहाण. पोलीस तक्रारी.. पोलिसांनी मंडळाची बाजू घेतली.
- बांधकामादरम्यान एकानं जिना काढायलाही विरोध केला. त्यानं लाईट मीटर आणि पाण्याची मोटार काढून खराब केली.
- जानेवारी २०१५ ला बांधकाम सुरू. जुलै २०१६ ला उद्घाटन
- त्रास देणारे लोकांनी बांधकाम झाल्यावर त्यांच्या शौचालयाच्या सांडपाण्याचा पाईप सार्वजनिक शौचालयाच्या पाईपला जोडला.
- बांधकामादरम्यान संस्थेच्या गरजा विचारल्या. महिला विभागात ४ च सीट बांधत होते. पण जागा आहे ना ती वाया नाही घालवायची. ही मागणी संस्थेनं कंत्राटदार आणि बीएमसीकडे लावून धरली. त्यामुळं महिला आणि पुरूषांना ६-६ सीटस्मिळाल्या.
- महिला विभागातल्या २ कमोडचा वापर वयस्कर-आजारी पुरूषही करतात. त्यावेळी त्यांच्यासोबत घरातली महिला असते.

- शौचालयाच्या वरून टाटाची पॉवर लाईन जात असल्यामुळं बैठंच शौचालय. महिला आणि पुरूषी विभागात मध्ये भिंत. त्याला दरवाजा. दोन्ही विभागांना स्वतंत्र प्रवेश द्वार. वरती गच्चीत केअरटेकरच्या राहण्याची सोय. तो २४ तास असतो.
- उत्तम स्वच्छता, पाण्याची सोय. दिवसातून ३ वेळा सफाई. त्यामुळं सर्व खूष. ५ हजार लीटरची पाण्याची टाकी
- महिला आणि मुलींकरता सुरक्षति. सॅनिटरी पॅड करता मशिन बसवलं. इनसिनेटरची व्यवस्थाही आहे. ज्या महिलांना इनसिनेटर वापरता येत नाही, त्या महिला वापरलेले पॅड डस्टबीनमध्ये टाकतात.
- नगरसेवकानं बांधकामादरम्यान पाणी जोडणी आणि इतर कामांमध्येमदत केली. पण डिसेंबर २०१९ ला रस्तारुंदीकरणाच्या कामादरम्यान सहकार्य नाही केलं. त्यामुळं महिला शौचालयाच्या पायऱ्या तुटल्या. शौचालयालागून गटारांचं बांधकाम काढलं. नाल्यावरील पूल तोडण्यात आला. यामुळं महिलांना शौचालयात जायला खूप फिरून वळसा घालून जावं लागे. त्यात कोरोनाचं संकट. कोरोनामुळं गल्ल्या बंद. लोक दारासमोरून जाऊ देईनात. वयस्कर महिलांना खूप अडचणी येऊ लागल्या.
- संस्थेनं वस्तीतल्या लोकांशी संपर्क साधला. ५० हजार लोकवर्गणी जमवून २०२० मे महिन्यात लोखंडी पूल ८ दिवसात बांधला. नगरसेवकानं ६ महिने लक्षचं दिलं नाही. लोखंडी पूल सरळ महिला शौचालयाच्या पायऱ्यांना जोडला.
- मासिक पास ५० रुपये. अर्धे लोक पैसे देतात. रात्री १२ ते ४ शौचालय बंद असतं. पण गरज असेल तर उघडतात.
- संस्थेला आर्थिक फायदा होत नाही. त्यामुळं केअरटेकरच्या हातून घेण्याचा विचार. पगारी केअरटेकर ठेवणार
- संस्थेला काही व्यवसाय करण्याची इच्छा आहे. सरकारी काम वगैरे. मार्गदर्शनाची गरज.

## ५) सरफुनिसा खान

### एकता विकास महिला मंडळ, शेख मिस्सी दर्गा, एंटॉप हिल

गेली ४२ वर्ष सरफुनिसा या भागात राहतात. लहानपणी आंध्रप्रदेशमधील मदनपल्ली या आपल्या गावाहून त्या आपल्या आजी-आजोबांसोबत इथं आल्या. मूळचे उत्तरप्रदेशचे असणाऱ्या याच भागातल्या व्यक्तीसोबत १६ व्या वर्षी त्यांचा विवाह झाला. सरफुनिसा इथं आल्या तेव्हा हा जंगलासारखा होता. इथून थोड्या अंतरावरच खाडी आहे. त्यांच्या पतीचं घर मेन रोडला लागूनचफुटपाथला चिकटून होतं. पूर्वी त्यांच्या घरासमोरच मासे पकडायचे. हा संपूर्ण झोपडपट्टीचा हा भाग आहे. बीएमसीनं ४० वर्षापूर्वी इथं ३ शौचालय बांधली. पण ही शौचालय सतत तुंबायची. त्यामुळं लोक खारफुटीतच शौचाकरता जायचे. हा भाग टेकाडावर वसलेला आहे. सांडपाणी, गटाराची व्यवस्था नव्हती. लोकही सगळा कचरा किंवा पाणी घराबाहेर फेकायचे. बीएमसीनं त्यानंतर २ वेळा शौचालय बांधली. पण ड्रेनेज लाईन नसल्यामुळं शौचालयाचं पाणी लोकांच्या घरात घुसायचं.

गेली २५ वर्ष नगरसेवक असणाऱ्या व्यक्तीनं २००० साली २० टॉयलेट सीटस्च आणि २ स्नानगृह असणारंशौचालय बांधलं. पण ३ वर्ष हे शौचालय कोणी चालवायला घेतलं नव्हतं. कारण याकरता १ लाख २० हजार रुपये डिपॉझिट भरायचं होतं. सरफुनिसा या काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्ती म्हणून २००० साली काम करू लागल्या होत्या.सरफुनिसा अंधेरीतल्या एक संस्था, महाविद्यालयीन मुलांसोबत परिसरात एडस्जनजागृतीचं काम करायच्या. गाणी आणि पथनाट्य, घरोघरी भेटी या माध्यमातून हे काम चालायचं.हमीद बिडवाल या व्यक्तीनं त्यांना संस्था बनवायला सांगितली. त्याचंही या विभागात शौचालय आहे. २००३ ला हमीदच्या शौचालयाच्या उद्घाटनादरम्यान स्पार्कचे लोक आले होते. सरफुनिसांच्या संस्थेबाबत कळल्यावर त्यांनी बांधून तयार असणारं शौचालय त्यांच्या संस्थेला चालवायला सांगितलं. सुरूवातीला त्यांनी आणि पतीनं नकार दिला. कारण अकबर सुलैमान भाग ही चांगली वस्ती नाही. शिवाय त्या राहतात त्या भागातही हे शौचालय येत नाही. शेवटी त्या तयार झाल्या. सर्वे सुरू असताना लोकांनी शौचालयाकरता पैसे देण्यास नकार दिला. मग दिडशे रुपयांना तयार झाले. कागदपत्र दिले पण पैसे काही दिले नाहीत. खूप दमछाक झाली. लोकंही उलटसुलट चर्चा करायची. एक बाई टॉयलेट काय चालवणार... सरफुनिसा फक्त शौचालयाचं व्यवस्थापन करत नाही तर पदरचे पैसे खर्च करून सुरवातीपासूनच शौचालयाची देखभाल आणि दुरुस्तीचा खर्च करतात. वापरकर्ते पैसे न देणं, भांडणं आणि गुंडांची दहशत हे इथले प्रमुख मुद्दे आहेत. या भांडणांमध्ये सरफुनिसा यांच्या मुलीवर आणि सुनेवरही अत्याचार करण्यात आले. एवढं होऊनही सरफुनिसा वस्तीतल्या मुली आणि महिलांकरता शौचालय व्यवस्थापन करत आहेत. त्यांच्याच समुदायाच्या महिलांना सरफुनिसा शौचालय व्यवस्थापन करत असल्यामुळं सुरक्षति वाटतं. या महिलांकरता कौटुंबिक समुपदेशन, शिवणकाम आणि काही इतर कोर्सेस घ्यायच्या. सध्या हे सर्व बंद असलं तरी वस्तीतल्या महिलांना सरफुनिसांचा मोठा आधार असल्याचं या महिलांशी बोलताना जाणवलं.

ठळक नोंदी–

- डिपॉजिटसाठी पैसे जमत नव्हते तर सरफुनिसा यांनी स्वतःचं घर गहाण ठेवून रक्कम उभी केली. आणि बँकेत डिपॉझिट भरलं.
- २५ हजार खर्च करून उद्घाटनाचा बडेजाव केला. सर्व पक्षाच्या लोकांना बोलावून त्यांचा सत्कारही केला.
- शौचालय सुरू झालं आणि त्यांच्या नवऱ्याचं निधन झालं. तरीही काम सुरूच ठेवलं.
- शौचालय सुरू झाल्यावर पाणी आणि वीज नसल्याचं लक्षात आलं. पुरुषांच्या शौचालयात भांड्याला उतार नव्हता. त्यामुळं शौचालय तुंबू लागलं. पाण्याच्या टाकीवर चढायला शिडी नाही. प्लास्टर निघू लागलं. जिन्यावरुन चढून पुरुष शौचालयात जाताना महिला विभाग दिसायचा.

- हे सर्व काम त्यांनी स्वखर्चानं केलं.
- त्यांचा मुलगा सौदीला कामाला होता. तो पैसे पाठवायचा. त्यातून पुरूष शौचालयाची ५ भांडी बदलली. महिला विभागात भिंत बांधली. प्लास्टरींग करून संपूर्ण शौचालयाला टाईल्स लावल्या.
- शौचालयाला वीज जोडणीच दिली नसल्यामुळं सरफुनिसा यांनी त्यांच्या घरातून वीज जोडणी दिली. लोकं वस्तीतल्या कार्यक्रमांसाठी शौचालयातून वीज चोरायचे. त्यामुळं भरमसाठ बील येऊ लागलं. दागिने गहाण ठेवून त्यांनी १८ हजाराचं वीजबील भरलं. मग ऑगस्ट २००३ ला कनेक्शन मिळालं.
- बीएमसीत चकरा मारूनही पाणी जोडणी मिळत नव्हती. आयुक्तांची एका कार्यक्रमाच्या वेळी भेट घेऊन त्यांना सांगितलं. लगेच जोडणी मिळाली. पण वर्षभर मीटर लावून बीलचं दिलं नाही. अधिकारी बदलायचे पण नावावर पाणी नाही.
- लोक पासाचे पैसे द्यायचे नाहीत. संस्थेत २७ जण सदस्या. त्यांना उत्पन्न मिळत नसल्यानं त्यांच्या कुरबूरी सुरू झाल्या.
- गावची जमीन विकून मुंबईतलं घर सोडवलं.
- गर्दुले, टपोरींचा खूप त्रास. शौचालयाजवळ मुलं-मुलींची प्रेमप्रकरण. गच्चीवर पतंग उडवणं. भांडणं, मारामाऱ्या रोजचच
- एका पासवर २५-३० जण यायचे. नातेवाईक असल्याचे खोटे सांगायचे. केअरटेकरला मारहाण. डस्टबीन, मीटरबॉक्स जाळले.
- सरफुनिसा यांच्या अपंग मुलाला मारहाण झाली. १८ वर्षीय मुलीचे कपडे फाडले.
- पोलिसांनी ४ जणांना अटक करून सहा महिने तुरूंगात
- वस्तीतले लोक संडासवाली म्हणून नाव ठेवतात ही खंत
- २००५ मध्ये गच्चीवर कार्यालय सुरू केलं. तिथं पार्लर, मेहंदी आणि शिलाईकामाचं प्रशिक्षण. महिला अत्याचाराच्या केसेस हाताळणं सुरू. पूर्वी घरीच करायचे
- २००५ ला सर्व स्वखर्चानं काम केल्यावर, स्थानिक नगरसेवकानं त्याच्या माणसाच्या ताब्यात देण्याकरता प्रयत्न सुरू केले. धार्मिक दबावही आणला. मुस्लीम हे काम करत नाहीत. संडास बाथरुमचे पैसे खाणं जायज नाही. ती म्हणाली मेहनतीनं कमावून खाते. कुराणमध्येच लिहिलं आहे परिस्थितीनुसार काहीही करता येतं. मग कॉंग्रेस पार्टीचा दबाव आणू लागला.
- सहा महिने धावपळ करून स्वतःच्या खर्चानं सर्व काम केलं. आधी कोणी शौचालय चालवायला तीन वर्ष तयार नाही. पाणी वीजेची व्यवस्था केली.
- पास देत नाही म्हणून नगरसेवकच खोट्या तक्रारी करू लागले. पण दारू पिऊन त्रास देणाऱ्यांना पास न देण्याची भूमिका तिनं घेतली. सुरक्षेसाठी
- २०१० ला दिवसाला बाराशे रूपये उत्पन्न होतं.
- सरफुनिसा दबावाला झुकत नाही हे पाहून स्थानिक नगरसेवकाने सरफुनिसा व्यवस्थापन करत असलेल्या शौचालयाशेजारीच २०१० मध्ये आणखी एक शौचालय बांधलं शेजारी. झोपडपट्टी पुनर्विकास कार्यक्रमामुळं वस्ती कमी झाली. त्यामुळं पास कमी, उत्पन्न कमी झालं.
- नळांची, सामानाची चोरी.. लाईट तोडणं, डस्टबीन जाळणं प्रकार सुरूच असतात. अपंग मुलगा प्लबिंग शिकला.

## ६) रंजना गबाळे वय - ४५ वर्ष आणि रेखा सातव वय - ३८ वर्ष

### जय माताजी महिला मंडळ, पवई

भांडूप कॉम्पलेक्स म्हणून ओळखला जाणारा महापालिकेचा पाणी शुद्धीकरण केंद्राचा भाग. पवईला एल एण्ड टी कंपनीच्या मागचा भाग. मुंबई महानगर पालिकेचा पाणी शुद्धीकरण प्रकल्प आणि मोठ्या मोठ्या पाईप लाईन या भागात आहेत. अगदी महत्त्वाचा भाग. त्यामुळं महापालिकेच्या मोठ्या अधिकाऱ्यांच्या सतत ये-जा सुरू असायची. ४० वर्षापूर्वी अवघी १०-१२ घरं असणाऱ्या या भागात आता ५ हजार घरांची झोपडपट्टी वसलीय.

२६ वर्षापूर्वी रंजना लग्न होऊन बुलढाण्याहून इथं आल्या. तेव्हा या भागात लाईट, पाणी नव्हतं. उघड्यावर शौचाकरता जावं लागे, तेही अंधारात. रेखा यांचा जन्म पवईतलाच.इथं दिवसभर अधिकाऱ्यांची ये-जा सुरू असायची. वस्तीच्या बाजूला मिठी नदीचा काठ. अंधार पडू लागला की, महिला एकत्र जमून शौचाकरता जायच्या. म्हाडानं ३० वर्षापूर्वी ४ शौचालयं बांधली होती. पण त्यांची अवस्था अतिशय वाईट होती. स्वच्छतेच्या नावानं बोंब होतीच. लाईट, पाणी नाही, गर्दुल्यांची भीती यामुळं या शौचालयाचा वापर कोणी करत नसे. मुली, महिला तर रात्री नऊ नंतर बाहेरच पडत नसतं. मुंबईच्या इतक्या महत्त्वाच्या भागाजवळ ही वस्ती असली तरी प्राथमिक सुविधाही नसलेला हा भाग. सुविधा नसल्यामुळं इथल्या लोकांकडे नातेवाईक यायलाही टाळायचे.

२०१६ मध्ये एका स्वयंघोषित समाजसेवकानं शौचालय बांधण्याची तयारी सुरू केली. पण फक्त दोनच सीटस्‌च. त्याच्यासोबत अपुऱ्या शौचालयावरून स्थानिक महिलांचे वाद झाले. त्याला लोकांची साथ नव्हती. कारण दोन सीटचं शौचालय कोणाला पुरणार? पोलीसांनी समाजसेवकाला माघार घ्यायला लावली. मग रंजना आणि रेखासोबत आणखी काही महिला एकत्र आल्या आणि त्यांनी मनसे नगरसेवकांची भेट घेऊन त्यांची अडचण सांगितली. त्यांनी संस्था बनवून शौचालय चालवण्यासंदर्भात सांगितलं. महापालिकेचे संवेदनशील अधिकारी आणि नगरसेवकानी मदत केली. २०१७ ला १५ सदस्या मिळून संस्था तयार करण्यात आली. सहा महिने सर्वेचं काम सुरू होतं. स्वयंसेवी संस्था आणि मंडळानं मिळून २५० लोकांचा सर्वे करण्यात आला. स्वयंसेवी संस्थेनं गरजा विचारल्या नाहीत. शौचालयाचं बांधकाम सुरू झालं आणि गर्दुल्यांचा त्रासही वाढला. कामगारांचे मोबाईल, बांधकाम साहित्याची चोरी व्हायची. पोलिसांकडं तक्रार दिल्यावर. त्यांनी कारवाई केली.

जानेवारी २०१८ मध्ये शौचालयाचं उद्‌घाटन झालं. पण अजूनही सामंजस्य करार मिळालेला नाही.

ठळक नोंदी –

- या शौचालयामुळं महत्त्वाचा भाग हागणदारीमुक्त झाला
- शौचालयामुळं इथल्या घरांची किंमत ५-६ लाखावरून १५-२० लाखापर्यंत गेली
- स्वयंसेवी संस्थेचं दुर्लक्ष. अजून MOU नाही मिळाला
- महिलांकरता खाली २० आणि पुरूषांकरता वरती २४ सीटसच शौचालय बांधलं. पण ऑफिस नाही. स्वयंसेवी संस्थेनं गरज विचारली नाही.
- निवडणुकीनंतर शिवसेनेची नगरसेविका निवडून आल्या. वॉर्डात फिरकत नाही. स्थानिक शाखाप्रमुखाचा त्रास सुरूवातीला खूप होता. आता जरा कमी झाला आहे.
- कच्च बांधकामामुळे खूप अडचणी येतात. प्लास्टर निघाल्यानं सतत खालच्या शौचालयात गळती होते. स्वच्छ शौचालय पण गळतीमुळं घाण होते.
- २४ तास केअरटेकर. गच्चीवर ताडपत्री बांधून त्याची राहण्याची सोय करण्यात आली आहे.
- पाण्याचा तुटवडा. फक्त ८ तास पाणी पुरवठा. बोअरवेल करता येत नाही कारण मिठीचं प्रदुषित पाणी येणार.
- पाण्याची टाकी फुटली. पिंपात पाणी भरून ठेवतात. यामुळे कोरोना काळात हाल झाले. लोकही पाणी नसल्यामुळे

वाद घालायचे.

- संस्थेचे सर्व सदस्या एकत्र काम करतात.
- गर्दुल्यांचा त्रास खूप होतो. गर्दुले गल्ल्यातले पैसे चोरतात आणि केअरटेकरला मारहाणही करतात. याला अटकाव करण्याकरता शौचालयाच्या बाहेर सीसीटिव्ही कॅमेरे बसवले, लाईटचे फोकस लावले. पोलिसांनी अटक केली.
- त्यामुळे आता महिलासुरक्षित आहेत. शौचालयाबाहेर मोकळी जागा आहे. तिथंसंस्थेनं स्व-खर्चानं फरशी टाकली. इथंमहिलांकरता विशेष कार्यक्रम घेतले जातात. मुलांना खेळायला मोकळी जागा मिळाली.
- संस्थेतर्फे मुलांकरता नियमित स्वच्छता जागृती कार्यक्रम आणि खाऊ वाटप करण्यात येतं. बचतगट बांधणी केली.
- मासिक पासाचे पैसे सर्व वापरकर्ते देत नाहीत. संस्था सदस्य वैयक्तिक पैसे काढून वीज-पाणी बिलं भरतात.
- संस्थेला दत्तक वस्ती सुधारणा, रस्ते सुधारणा काम मिळाली
- टॉयलेटचा वाढदिवस साजरा करण्यात येतो.
- संस्थेला ऑफिसची गरज आहे.
- संस्था घरोघरी जाऊन आरोग्य, पाळीविषयी मुली आणि महिलांना माहिती देतात. या विषयावरमोकळेपणानं बोलतात. संस्था घरगुती हिंसाचाराच्या केसेसही हाताळते.

## ७) विद्या माने, ४२ वर्ष

### भूमी स्वच्छता फाउंडेशन, लक्ष्मी बाग, सायन स्टेशन जवळ, धारावी

विद्या यांचा जन्म धारावीतलाच. लहानपणी त्यांना शौचालयात जाणं नकोसं वाटायचं. कारण तिथं असणारी घाण. लहान मुलांना बऱ्याचदा रस्त्यावरच बसवलं जायचं. अपुऱ्या शौचालयांमुळं प्रचंड गर्दी असायची. मवाली, गर्दुल्यांकडून मुलींची छेडछाड, शिट्या सतत व्हायची. त्यामुळं मुली नेहमी गटानं, मैत्रीणी एकत्र जायच्या. मुलींची नेहमी चर्चा व्हायची फक्त मुलींकरता वेगळं शौचालय झालं तर बरं होईल. काही मुली शौचालयात जाते सांगून घरातून पळून गेलेल्या. त्यामुळ काही मुलींच्या आईसोबत येत असत. खूप घाण त्यामुळं शौचालयातून शी करून कधी एकदा घरी जाते असं व्हायचं.

१४ वर्षापूर्वी विद्या लक्ष्मीबागेत राहायला आल्या. इथं गर्दुल्यांचा प्रचंड त्रास होता. गर्दुले त्यांच्या घराबाहेरच बसायचे. सुरवातीला विद्यांनी  बोलून समजावले पण काही फरक न पडल्याने सरळआक्रमक पवित्रा घेत हुसकावलं. त्यामुळे एका गर्दुल्याने विद्यांना धमकी दिली. पण त्यालाच कोणीतरी मारलं आणि त्यानंतर गर्दुल्यांचा त्रास बंद झाला.

विद्या एका खाजगी शाळेत शिपायाचं काम करतात. समाजसेवेच्या आवडीमधून २०१६ ला त्यांनी वस्तीत बचतगट बांधले. एका वस्ती बाहेरच्या संस्थेकरता स्वयंसेवी संघटनेतर्फे इथं शौचालयाकरता सर्वे सुरू होता. विद्या यांनी बाहेरच्या संस्थेकरता हरकत घेतली. नगरसेवकाच्या समुदायातल्या आणि  मर्जीतल्या लोकांची ही संस्था होती. त्यात स्थानिक कोणीच नव्हतं. विद्या यांनी दोन दिवसात संस्था उभारली. स्वयंसेवी संस्थेनं विद्याच्या संस्थेला काम दिलं. पण नगरसेवकाच्या आडकाठी मुळे महापालिकेकडून ग्रीन सिग्नल मिळाला नाही.

२०१७ डिसेंबरमध्ये जुनं शौचालय तोडण्यात आलं. पण शौचालय कोणत्याही संस्थेकडे हस्तांतरण केलं नाही. विद्या आणि सदस्या सतत आमदार, खासदारांकडेही फेऱ्या मारत होत्या. नगरसेवकाच्या विरोधामुळं बीएमसी विद्या यांच्या संस्थेला शौचालय व्यवस्थापन करण्यास देत नव्हती. शौचालय बांधून तयार झालं होतं. पण नगरसेवकाच्या हट्टापायी ते बंद ठेवण्यात आलं. महापालिकेत वर्षभर फेऱ्या मारूनही अधिकारी काही निर्णय घेत नव्हते.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान नगरसेवकानं शौचालय मोफत वापरता येईल असं जाहीर केलं. दुसऱ्या दिवशी एका बाहेरच्या माणसाला बसवून शौचालय सुरू केलं. विद्याच्या संस्थेनं त्यावर आक्षेप घेतला. खूप भांडण झाली. पोलीस उपायुक्तांनी बाहेरच्या माणसाला तिथून जायला सांगितलं. त्यानंतर संस्थेनं पेपर मिळाले नसतानाही,शौचालय चालवायला घेतलं. पाणी आणि वीज जोडणीही नव्हती. नगरसेवकानं हे शौचालय मोफत घोषित केल्यामुळं लोकं पैसेही देत नव्हते. नगरसेवकानं परत त्याच्या माणसाला बसवलं.. तो नंतर पळून गेला..

अखेरिस ऑक्टोबर २०१९ मध्ये बीएमसीचं पत्र मिळालं. पण फेब्रुवारी २०२० मध्ये नगरसेवकाच्या ना हरकतीनंतर महापालिकेतर्फे सामंजस्य करारभूमी फाऊंडेशनच्या हातात मिळाला.

विशेष नोंदी -

- स्वयंसेवी संस्था, महापालिका अधिकारी, नगरसेवक सर्वांनी दुर्लक्ष
- बांधकामाच्या गरजांबाबतस्वयंसेवी संस्थेनं विचारलं नाही.
- स्वयंसेवी संस्थेचं मार्गदर्शन नाही
- मर्जीतल्या आणि विभागाबाहेरच्या संस्थेला काम देण्याकरतानगरसेवकाचा हट्ट.
- शौचालयाचं बांधकाम पूर्ण होऊनही नगरसेवकाच्या आडमुठेपणामुळं लोकांना २ वर्ष त्रास सहन करावा लागला.

# ८) जयश्री चवळे, ५७ वर्ष

## गुरूप्रसाद सेवा समिती, वांद्रे पूर्व

खेरवाडीतला हा भाग जमिनीच्या अर्थकारणाशी जोडलेला आहे. जयश्री ४० वर्षांपूर्वी लग्नानंतर या भागात आल्या. पुण्यात माहेर असणाऱ्या जयश्रींना बाहेर उघड्यावर शौचाला जायचं माहित नव्हतं. माहेरी सर्व सुविधा असणाऱ्या जयश्रींना मैदानात डबा घेऊन जाताना खूप लाज वाटायची. महिला रात्री अंधारात सोबतीनं जायच्या. डोक्यावर पदर घेऊन तोंड लपवून बसायच्या. ४ हजार लोकवस्तीकरता फक्त एकच शौचालय होतं.

जयश्री महापालिकेत २८ वर्ष स्वयंसेवी महिला आरोग्य कार्यकर्ती म्हणून काम करतात. यात त्यांना वस्तीत लसीकरण, कुटुंबनियोजनसंबंधी काम करावी लागतात. साथी दरम्यान वस्तीतल्या लोकांची माहिती घेणे आणि त्यांना माहिती देणं ही काम असतात.

२०१७ मध्ये एक स्वयंसेवी संस्था आली. आणि या संस्थेनं शौचालय बनवण्याच्या कामाला सुरूवात केली. जयश्री या वस्तीत कार्यक्षम असल्यामुळं त्यांनी संस्था बनवली. स्वयंसेवी संस्थेनं सर्वे करून फाईल बनवून दिली. २०१८ जानेवारी मध्ये जयश्रीच्या संस्थेला शौचालय ताब्यात मिळून उद्घाटन झालं. पण वीज आणि पाण्याचा पत्ता नव्हता. महिलांकरता ६ शौचालय व १ अपंगांकरता खाली आणि पुरूषांकरता ९ शौचालयं वरती असं बांधकाम आहे.

कलेक्टरच्या मालकीची ही जमीन असून राजस्थानी खाटिक समाजाला लीझवर देण्यात आलीय. इथल्या चाळी बहुतांश भाड्यानं दिल्या आहेत. हा संपूर्ण भाग झोपडपट्टीचा आहे. खाटीक समाजाचा या रहिवाशांना सुविधा देण्यास विरोध आहे. जमिनीचं अर्थकारण आहे. गर्दुल्यांचा त्रासही आहेच. पोलीसांत तक्रार दिल्यावर पोलीस चकरा मारतात. त्यामुळं मुलींना सुरक्षति वाटतं. सध्या बाजूच्या शौचालयातून महिना तीन हजार रुपये देऊन वीज घेण्यात येते. खटपट करून महापालिकेकडून पाणी मीटर मिळाला. पण पुरेसं पाणी नाही. महिला सॅनिटरी पॅडच्या मशिनचा वापर करतात. स्वच्छता व्यवस्थित आहे. मासिक पास ६० रुपये आहे. पण याचे पैसे सर्वच देतात असं नाही. कोरोना काळात लोकांना मोफत वापरू दिलं. लोकांना या शौचालयामुळं सुविधा मिळाल्याचं विद्या सांगतात.

ठळक नोंदी –

- दोन सरकारी कार्यालयात समन्वय नसल्यामुळं नागरी सुविधा मिळण्यात अडचण. मुंबईतले मोक्याच्या जागेवरिल आर्थिक महत्त्व
- सामंजस्य करार झाला नाही. त्यामुळं अधिकृत वीज आणि पाणी व्यवस्था नाही.
- स्वयंसेवी संस्थेनं, कंत्राटदारानेही नीट काम केलं नाही.
- जमिनीची प्रचंड किंमत असणारा भाग
- राजस्थानमधील खाटिक समाजाचं पुनर्वसन करण्यासाठी सरकारनं लीझवर दिलेली जमीन. मालकी कलेक्टरकडे
- अनेक सर्वे नंबर असणाऱ्या जमीनी
- खाटिक समाजाला भाडेकरूंना आणि अनधिकृत वस्ती करणाऱ्यांना कोणत्याही सुविधा न देता हुसकवायचं आहे.
- मतांकरताआमदार-खासदार निधीतून काही शौचालयांचं बांधकाम झालं आहे.
- जीआरच्या मदतीनं शेजारील जुनंशौचालय तोडूनबीएमसीनं नवीन बांधलं.. खाटीक समाजाकडून कोर्टात केस दाखल करण्यात आली. यावेळी नागरी सुविधा पुरवणं बीएमसीचं काम हा मुद्दा कोर्टासमोर ठेवण्यात आला. एका संस्थेची जागा, दुसरी संस्था लोकांच्या सुविधेकरता घेत आहे, असं महापालिकेनं कोर्टात सांगितलं. अशाप्रकारे शौचालयाचं बांधकाम झालं.

- खाटिक समाजाच्या एका व्यक्तीकडून सतत महापालिकेत, कलेक्टर ऑफिसमध्ये संभ्रम निर्माण करणारी माहिती दिली जाते. अधिकारी बदलत जातात. कोणत्याही अडचणीत न येण्याकरताअधिकारी लक्ष देतनाही. या भागात आणखी शौचालयाची गरज नसल्याचं भासवलं जातं. दोन्ही शौचालय तोडण्याकरता खाटिक समाजातल्या व्यक्तीचे प्रयत्न सुरूच असतात. कलेक्टर ऑफिसमधून नाहरकत प्रमाणपत्र दिलं जात नाही. त्यामुळं वीज जोडणीचं काम रखडलं आहे.
- नगरसेवकाचं सीबीओला चांगलं सहकार्य मिळत आहे.
- कोवीड काळात सीबीओनं पिशव्या बनवल्या. यामुळं महिलांना रोजगार प्राप्त झाला.
- सीबीओचं ऑफिस नाही. सीबीओत दुमतही आहे. वस्तीत आपापसांत भांडणाचा फटकाही बसतो.

# ९) रोशना शेख वय - ४२ वर्ष

## प्रगती महिला सेवा मंडळ, धारावी

रोशना यांचा जन्म धारावीमधलाच. त्यांच्या लहानपणी शौचाकरता उघड्यावर खाडीत जावं लागायचं. त्या १४-१५ वर्षाच्या असताना त्यांच्या भागात म्हाडानं ६ सीटचं शौचालय बनवलं. पण वेळच्यावेळी साफसफाई होत नसल्यामुळं, प्रचंड अस्वच्छता असायची. त्यामुळं शौचाकरता खाडीवरच जावं लागायचं.

रोशना यांना जसं समजू लागलं, तसं त्या सामाजिक कामात रस घेऊ लागल्या. त्यांच्या भागात गणपती आणि नवरात्री उत्सव साजरा करण्यातही त्यांचा पुढाकार असायचा. काँग्रेस पक्षाच्या त्या कार्यक्षम कार्यकर्त्या झाल्या. गणपती आणि नवरात्री उत्सवाकरता पोलिसांनी त्यांना मंडळाची नोंदणी करायला सांगितली. त्यामुळं मग त्यांनी २००१ मध्ये ११ सदस्यांसह संस्था नोंदणी करता अर्ज केला. २००२ मध्ये त्यांच्या संस्थेला मान्यता मिळाली. दरम्यान बृहन्मुंबई महापालिकेचे विशेष अधिकारी आनंद जगताप यांनी त्याचवेळी रोशना यांच्या विभागात एक बैठक घेतली. जागतिक बँकेच्या योजनेद्वारे शौचालयाचं बांधकाम करून, स्थानिक मंडळ शौचालयाची देखभाल करेल अशी योजना होती. जगताप यांनी रोशना यांच्या मंडळाला या कामाकरता अर्ज करायला सांगितलं. रोशना यांच्या मंडळाला मिळालं.

या विभागात गर्दुले आणि दारुड्यांचा प्रचंड त्रास होता. स्पार्क संस्थेनं शौचालयाच्या बांधकामाला सुरूवात केली. बांधकामाच्या वेळी गर्दुले आणि दारुडे लोक बांधकामाचं साहित्य, सिमेंट, वाळूची चोरी करायचे. मग मंडळानं बांधकाम साहित्य सरळ त्यांच्या घरी आणि भागातल्या देवळात ठेवायला सुरूवात केली. एका वर्षात म्हणजे, २००३ मध्ये १० सीट महिलांकरता आणि १० पुरूषांकरता असं एक मजली शौचालय बांधून तयार झालं. पण प्रगती महिला मंडळाला एमओयू मिळूनही शौचालयाचा ताबा काही मिळेना. त्या विभागाचे आमदार आणि मंत्री एकनाथ गायकवाड यांच्या कार्यकर्त्याला हे शौचालय चालवायला हवं होतं. कार्यकर्त्याला शौचालय चालवायला देण्याकरता गायकवाड महापालिकेवर दबाव टाकू लागले. शौचालय बांधून तयार असूनही मंत्र्याच्या दबावामुळं २००७ पर्यंत लोकांना याचा वापर करता आला नाही. नवीन चांगल्या दर्जाचं शौचालय असूनही राजकीय दबावामुळं लोकांना म्हाडाचं अस्वच्छ शौचालय वापरावं लागत होतं. प्रगती मंडळाच्या सदस्या सतत महापालिकेत खेटे घालत होत्या. त्यांनी शौचालय लवकर सुरू व्हावं म्हणून विभागात सह्यांची मोहीम उघडली. शेवटी त्यांनी तत्कालीन उपमुख्यमंत्री आर आर पाटील यांची भेट घेतली. त्यांच्यासमोर आपली फिर्याद मांडली. स्थानिक मंडळाला संधी मिळायला हवी हा न्याय लागू झाला. आणि अखेरिस प्रगती महिला सेवा मंडळाला शौचालय देण्यात आलं.

शौचालयाला वीज आणि पाणी जोडणी सुरूवातीलाच मिळाली.पण वीज जोडणी स्पार्कनं आपल्या नावावर घेतली होती. आश्चर्याची गोष्ट म्हणजे व्यावसायिक वापराकरता वीज जोडणीची नोंद होती. पहिल्याच महिन्यात वीस हजारांचं बील आलं. स्पार्कच्या नावाच्या मीटरचं बील भरण्यास रोशना यांनी नकार दिला. त्या स्पार्क आणि बेस्टच्या ऑफिसमध्ये मंडळाच्या नावावर मीटर करण्याकरता फेऱ्या मारू लागल्या. २०१० मध्ये साडेतीन लाखांचं वीज बील आलं. रोशना यांनी मंडळाच्या नावावर मीटर कराल तरच बील भरेन असं कडक शब्दात सांगितलं. याचा चांगला परिणाम झाला आणि लगेचच मंडळाच्या नावावर लाईट मीटर करण्यात आला. पाणी जोडणी असली तरी पाणी पुरायचं नाही. त्यामुळं मग रोज हजार रुपये खर्च करून टँकर मागवावा लागायचा. पण २०१४ च्या आसपास पाण्याची आणखी एक जोडणी घेतली. त्यामुळं आता पाण्याची समस्या मिटली आहे. भूमिगत टाकी आणि गच्चीवरील टाकीत पाणी पुरेशा प्रमाणात साठवण्यात येतं.

२००७ पासून २ केअरटेकर सकाळी ५ ते दुपारी २ आणि दुपारी २ ते रात्री १२ या शीफ्टस्‌मध्ये काम करतात. त्यांच्या राहण्याची सोय शौचालयाच्या गच्चीवरच करण्यात आली आहे. सुरूवातीला मासिक पासाच्या रकमेवरून लोकांसोबत खूप भांडण व्हायची. लोक पासाचे पैसे द्यायचे नाहीत. एका पासवर कितीही लोक यायचे. त्यामुळं पासाची पद्धत बंद करून त्यांनी सरळ प्रति माणशी

वापरायचे पैसे घेण्यास सुरू केली. यामुळं रोजची भांडणं थांबली आणि मंडळाच्या बँक खात्यात पैसे जमा होऊ लागले. गेल्या वर्षी दिल्लीहून शौचालय सर्वेक्षणाला अधिकारी येण्यापूर्वी याच बचतीच्या पैशातून रोशना यांनी चार लाख रुपये खर्चून शौचालयाचे दरवाजे बदलणं, भांडी बदलली, प्लास्टर आणि रंगकाम केलं. पण आता हे पूर्ण बांधकामचं परत करण्याची गरज आहे.

रोशना स्थानिक दक्षता समितीच्याही सदस्या आहेत. त्यामुळं या विभागातले तंटे सोडवण्याचं काम त्या करतात. त्यांचं व्यक्तिमत्त्वही धाडसी आहे. त्यामुळं विभागातले टपोरी, चरसी लोक त्यांना वचकून असतात. याचा फायदा महिलांना होतो. त्यांच्या विभागात आणि शौचालयाच्या आसपासही मुलींची छेडछाडीचे प्रकार होत नाही.

सध्या त्यांच्या विभागातल्या बऱ्याच झोपडपट्ट्यांमध्ये विकासक आले आहेत. कोरोनामुळंही बरीच लोकं इथून सोडून गेले आहेत. त्यामुळं पूर्वी ५००-६०० जण वापरणारे शौचालय आता २००-३०० जणच वापरतात. त्यामुळं आर्थिक नुकसान होतंय. लॉकडाऊनच्या काळात पोलीस शौचालयाची स्वच्छता तपासण्याकरता यायचे. त्यांच्या मंडळातर्फे मास्कचं वाटप करण्यात आलं.

ठळक नोंदी –

- वैयक्तिक स्वार्थापोटी लोकप्रतिनिधीने आठ वर्ष नागरिकांना वेठीस धरून पायाभूत सुविधांपासून वंचित ठेवलं.
- बांधकाम साहित्याचं चोरांपासून संरक्षण करण्यासाठी अभिनव युक्ती. सामान सरळ देवळातच संरक्षति ठेवलं.
- स्वयंसेवी संस्थेनं आपली जबाबदारी पार पाडली नाही.
- स्वयंसेवी संस्थेनं वीजेचा मीटर सीबीओच्या नावावर घेण्याऐवजी स्वतःच्या नावावर घेतला.
- वीज मीटरची नोंदणी व्यावसायिक वापराकरता करण्यात आल्याने भरमसाठी वीजबील
- वस्ती सुधारणा कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्वांविरुद्ध मासिक पासाऐवजी प्रती वापर पैसे आकारणी

## १०) रेश्मा सोनकांबळे, वय - ३२ वर्ष

### सावित्रीबाई फुले महिला मंडळ, मिलिंद नगर, तिवारी कंपाऊंड, जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड (जेवीएलआर)

रेश्मा सोनकांबळे या भागात २००७ ला लग्न होऊन आल्या. इथं आल्यावर बाहेर उघड्यावर शौचाला जाणं हा त्यांच्याकरता मोठा धक्का होता. म्हाडाचं सार्वजनिक शौचालय खूप लांब होतं आणि अपुऱ्या संख्येमुळं गर्दी ओसंडत असायची. उघड्या मैदानात शौचाला जाणं रेश्मांना जीवावर यायचं. त्यामुळं त्या दिवसभर जेवायच्या नाहीत. तीन-तीन दिवस शौचाला जाणं टाळायच्या. भर मुंबईत पवईसारखा उच्चभ्रू भागालगत वस्ती असूनही या भागात शौचालयाची पायाभूत सुविधा उपलब्ध नव्हती. २००८ च्या दरम्यान एक स्वयंसेवी संस्था शौचालयाच्या सर्वेक्षणाला आली असता, तत्कालीन स्थानिक नगरसेवकानं त्यांना हाकलून लावलं. वृत्तवाहिन्यांवर बातम्या आल्या, पण तरी त्याचा काही उपयोग झाला नाही.

२००९ मध्ये प्रथा नावाची आणखी एक स्वयंसेवी संस्था सर्वेक्षणाला आली. त्यांनी विभागातल्या महिलांना गट बनवायला सांगितलं. रेश्मा यांनी पुढाकार घेऊन १५ महिला जमवल्या. "आपण पुढे येऊन काहीतरी करूयात. आपली गैरसोय दूर करूयात". असं त्यांनी महिलांना आवाहन केलं. शौचालय व्हावं ही सर्वांचीच इच्छा होती. रेश्मा यांच्या आवाहनानंतर महिला तयार झाल्या. रेश्मा मंडळाच्या अध्यक्षा झाल्या. सर्वेक्षण झालं आणि बांधकामाला सुरूवात झाली. स्वयंसेवी संस्थेनं स्थानिकांच्या अपेक्षा, गरजा याबाबत काहीच माहिती घेतली नाही. बांधकामाचं संकल्पित चित्र आणून दाखवलं. २०१२ मध्ये शौचालयाचं बांधकाम पूर्ण झालं आणि मंडळाकडे हस्तांतरण करण्यात आलं. दरम्यान रेश्मा यांच्या घरात त्यांनी शौचालय बांधलं. त्यामुळं त्यांना सार्वजनिक शौचालयाची गरज पडत नव्हती. तरीही त्या मंडळाचं काम करत होत्या.

२०१२ मध्ये शौचालय वापरासाठी खुलं झाल्यावर वस्तीत तणाव निर्माण होऊ लागला. लोकांना शौचालय मोफत वापरायला हवं होतं. त्यातचं वस्तीतल्या काही दबंगगिरी करणाऱ्या मुलांचाही त्रास सुरू झाला. या मुलांना हे शौचालय व्यवस्थापनासाठी हवं आहे. त्यांनी आजूबाजूच्या जागेवर बांधकाम केलं आहे. शौचालय वापरतात पण त्याचे पैसेही देत नाहीत. पासाचे पैसे २-३ महिने भरले नाहीत, याबाबत केअरटेकरनं विचारलं. म्हणून त्याला मारहाण करण्यात आली. प्रकरण पोलीस स्टेशनला गेलं. लोकांचं आणि पोलिसांचं म्हणणं जर महापालिकेचं शौचालय आहे तर पैसे का भरायचे? त्याचवेळी मंडळाकडे शौचालय चालवण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्र नसल्याचंही लक्षात आलं. स्वयंसेवी संस्था आणि महापालिकेनं मंडळाच्या नावे कागदपत्र दिली नाहित. पाणी आणि वीज मीटर मंडळाच्या नावे आहे. रेश्मा आणि मंडळाच्या सदस्या भांडूप एस वॉर्डमध्ये फेऱ्या मारू लागल्या. या भागातली नगरसेवक ही नामधारी आहे. खरा कारभार शाखाप्रमुखाच्या हाती आहे. नगरसेविकेला वॉर्डाची माहितीही नाही. मनिष नायर हा शाखाप्रमुख सर्व काम करतो. ही नगरसेविका किंवा डमी नगरसेवक दोघंही या प्रकरणात लक्ष घालत नाहीत.

शौचालयाला आठ वर्ष होऊनही अजूनही रेश्मा यांच्या मंडळाला एमओयू मिळालेला नाही. बाकी आवश्यक कागदपत्रेही मिळालेली नाहीत. गंमत म्हणजे या डमी नगरसेवकानचं शौचालयाचं उद्‌घाटन केलं आहे. ज्या मुलांना त्यांच्या ताब्यात शौचालय हवं आहे त्यांना डमी नगरसेवकाचा पाठिंबा आहे. ही मुलं केअरटेकर कोणत्याही कारणानं सतत मारहाण करतात. केअरटेकर पूर्वी गच्चीवर राहायचा पण त्याचा मोबाईल चोरल्यामुळं तो स्वतंत्र खोली घेऊन राहतो. केअरटेकर मंडळाला महिन्याला तीन हजार रुपये देतो. मंडळ ही रक्कम बँकेत साठवते. शौचालयात स्वच्छता व्यवस्थित असते. पण महिला पॅड खिडकीवरच ठेवून देतात.

विशेष नोंदी –

- स्वयंसेवी संस्थेची मदत नीट मिळाली नाही. स्थानिक नगरसेवकाचंही दुर्लक्ष
- महापालिकेकडून सामंजस्य करार न मिळाल्याने अनेक अडचणी

- कागदपत्रांचं हस्तांतरण झालेलं नाही.
- स्वतःच्या घरात शौचालय.
- वस्तीतल्या लोकांशी संवाद समन्वय पुरेसा नाही. त्यामुळं सतत भांडणं. मंडळाला वस्तीतल्या लोकांकरता काही कार्यक्रम घेता येत नाही.
- लोकेशन आर्थिक दृष्ट्या महत्त्वाचं..
- मंडळाची बचत चांगली
- विभाग कार्यालयातून शौचालयाचं बांधकाम झालेलं नाही. लॉट क्र १० नुसार झालंय
- स्थानिक समन्वयाचा अभावामुळं अडचणीत वाढ..

## ११) नमिता राणे, वय - ५० वर्ष

### स्वामी समर्थ महिला संस्था, नवा आग्रीपाडा, रामनगर, सांताक्रूझ

उत्तम महिला संघटन, सक्रिय आणि मदत करणारे नगरसेवक, महापालिका अधिकाऱ्यांचं सहकार्य, मार्गदर्शन आणि स्वयंसेवी संस्थेनं आपली जबाबदारी चोख बजावली की शौचालयाचं काम उत्तमरित्या मार्गी लागतं याचं उत्तम उदाहरण म्हणजे हे शौचालय. हस्तांतरण झाल्यानंतरही स्थानिकांसोबत उत्तम समन्वय साधल्यामुळं हे शौचालय चालवताना महिलांना सुरूवातीला आलेल्या अडचणी लवकर दूर झाल्या. त्यामुळंच कम्युनिटी बेस ऑरगनायझेशन संचलित शौचालय या उपक्रमाचा हेतू इथं उत्तमरित्या साध्य झालेला दिसतो. आता शौचालयाच्या व्यतिरिक्त इतर कामांमध्येही या सीबीओनं पुढाकार घेतल्यास हा उपक्रम आणखी मजबूत होईल.

नमिता राणे १९९५ मध्ये लग्न होऊन नवा आग्रीपाडा इथं राहायला आल्या. या भागात बीएमसीचे शौचालय होते. पण साफसफाईच्या नावानं बोंब होती. कधी १५ दिवस तर कधी चक्क महिनाभरानं साफसफाई व्हायची. विभागातल्या महिला बीएमसीच्या ऑफिसला चक्करा मारून तक्रारी द्यायच्या किंवा स्वतःचं वर्गणी गोळा करून सफाई करून घ्यायच्या. शौचालयातली भांडी, दारंही तुटली होती. २०१२ मध्ये महापालिकेची निवडणूक जाहीर झाली. मनसेच्या उमेदवार प्रचाराकरता विभागात आल्या होत्या. नमिता राणे आणि काही महिलांचा बचतगट होता. या महिलांनी मनसेच्या उमेदवार स्नेहल शिंदे यांना शौचालयाची अडचण सांगितली. त्यांनी शौचालयाचं बांधकाम नक्की करणार असं आश्वासन दिलं. स्नेहल शिंदे निवडून आल्यावर नमिता आणि बचतगटातल्या महिलांनी त्यांची भेट घेतली. स्नेहल शिंदे यांनी महिलांना संस्था बनवायला सांगितली. बचतगटातल्याच १० सदस्यांना घेऊन संस्थेची स्थापना केली. २०१३ मध्ये बीएमसीनं शौचालयाची पाहणी केली. स्वयंसेवी संस्थेद्वारे सर्वेक्षण झालं. २०१३ च्या अखेरिस शौचालयाचं काम सुरू झालं. बचतगटातल्या महिलांनी आपल्या बचतीतून बँकेत ३५ हजार अनामत रक्कम भरली. शौचालयाचं बांधकाम सुरू झालं आणि विभागात काही अफवा पसरू लागल्या. या महिला वर माळा असणारं शौचालय संकुल बांधत आहेत. ते वापरायला पाचशे रुपये डिपॉझीट भरावं लागणारं. महिन्याला शंभर रुपये संस्थेच्या महिलांना द्यावे लागणारं. ही अफवा पसरू लागल्यावर लोक शौचालयाला विरोध करू लागले. बचतगट आणि संस्थेच्या महिला लोकांशी संवाद साधू लागल्या. शौचालयाचं बांधकाम, त्याचा वापर, देखभाल आणि शुल्क याबद्दलची माहिती त्या सर्वांना देऊ लागल्या. आपल्या विभागातल्या सर्वांना विशेषतः महिलांना स्वच्छ शौचालय वापरायला मिळणार हे त्या पटवू लागल्या. बांधकामादरम्यान स्वयंसेवी संस्थेनं महिलांना त्यांच्या गरजा आणि बांधकाम कसं हवं याची माहिती घेतली. महिलांकरता खाली आणि पुरूषांकरता वरती अशी रचना असावी. २ बाथरूम, लहान मुलांकरता २ शौचालयं, पुरूष अपंगांकरता खालीच १ शौचालय अशा गरजा महिलांनी मांडल्या. या सर्वांची पूर्तता करणारं खाली महिलांकरता १२ आणि पुरूषांकरता वरच्या माळ्यावर १२ असं शौचालय संकूल तयार झालं. संस्थेच्या नावावर वीज आणि पाण्याचा मीटर मिळाला. सर्व कागदपत्रांचं संस्थेला नीट हस्तांतरण करण्यात आलं.

२०१४ च्या अखेरिस शौचालयाचं उद्घाटन झालं. पण सुरूवातीचे सहा महिने काही समाजकंटक पुरूष शौचालयांचं खूप नुकसान करत होते. दरवाजे तोडणं, बाटल्यांना सिगरेटनं भोक करणं, लाईट फोडणं, पाईप फोडणं, नळ चोरी हे प्रकार होऊ लागले.

शौचालय वापराकरता प्रत्येक खोलीला दर महिना पन्नास रुपये पास आणि दैनंदिन वापराचे ५ रुपये असा दर आकारण्यात येतो. संस्थेकडे साडेतीनशे पास आहेत. शौचालयाच्या देखभालीकरता ३ केअरटेकर आहेत. तेच हे शुल्क जमा करतात. केअरटेकर संस्थेला महिन्याला काही रक्कम देतात. ही रक्कम संस्था बँकेत जमा करते. याच रक्कमेतून दुरूस्तीची काम केली जाऊ लागली. हळूहळू त्रास देणाऱ्या लोकांना त्यांची चूक उमगली आणि नुकसान करणं कमी होऊ लागलं. या भागात गर्दुल्यांचा त्रास नाही. महिला सुरक्षित आहेत.

बीएमसीनं पाण्याच्या ३ लाईन्स देऊनही पाणी पुरेशा प्रमाणात नाही. जागेची कमतरता असल्यामुळं बोअरवेल खोदता येत नाही. पाण्याची मोटर सतत चालू असल्यामुळं लाईटबील मोठ्या प्रमाणात येतं.संस्थेचं ऑफिस गच्चीवरती आहे. पण ते फक्त

मिटींगकरताच वापरण्यात येतं. अजून दुसरे काही उपक्रम संस्थतर्फे घेतले जात नाहीत. कारण या सर्व महिला कामाकरता बाहेर जातात. हे शौचालय झाल्यामुळं इथल्या जागांचे भाव वाढले आहेत. कोरोना काळात शौचालयाची सफाई उत्कृष्ट ठेवल्यामुळं लोकं खूष होती.

विशेष नोंदी –

- उत्तम महिला संघटन, राजकीय इच्छाशक्ती, स्वयंसेवी संस्थेची चोख कामगिरी आणि प्रशासनाची साथ याचे उत्तम उदाहरण
- सीबीओतर्फे लोकजागृती आणि उत्तम लोक समन्वय
- देखभाल, स्वच्छता खर्च वगळून उरलेली रक्कम सीबीओच्या बँक खात्यात जमा करण्यात येते.या रकमेतून दुरुस्तीची कामे करण्यात येतात.
- शौचालय झाल्यामुळं इथल्या जागांचे भाव वाढले आहेत. कोरोना काळात शौचालयाची सफाई उत्कृष्ट ठेवल्यामुळं लोकं खूष होती.

## १२) सुरेखा अलदर,वय ५२ वर्ष

### चिंचणी मायक्का महिला सहकारी संस्था, सोनापूर, जयहिंद नगर, मानखुर्द

अगदी जन्मापासूनच वैयक्तिक आयुष्यात प्रचंड संघर्ष केलेल्या सुरेखा अलदर यांच्या जिद्दीमुळं अनेकींना जगण्याचं बळ मिळतं हे नक्की. त्या ज्या परिस्थितीतून गेल्या ती वेळ आणखी कोणावर येऊ नये, याकरता त्या प्रचंड मेहनत घेत आहेत. त्या महिलांकरता सपोर्ट सिस्टीम तयार करत आहेत. त्यातूनचं महिला स्वावलंबीही बनल्या आणि विभागाकरता शौचालयही बनलं. त्या गावी असल्या तरी त्यांचा आदर आणि दराऱ्यामुळं शौचालय परिसरात महिला सुरक्षित असतील याची दक्षता सर्वच जण घेतात. सार्वजनिक शौचालयात सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशीन बसवणारं हे मुंबईतलं पहिलं शौचालय आहे.

सुरेखा अवघ्या तीन वर्षाच्या असताना १९७२ चा भीषण दुष्काळ पडला. अंध पती, दोन मुलगे आणि सुरेखाला घेऊन सुरेखाच्या आईनं मुंबई गाठली. सुरेखाची आई धुण्या-भांड्याची काम करत हळूहळू सायन रुग्णालयात आयाचं काम करू लागली. राहायला घर नाही. ती हॉस्पीटलमध्ये राहू लागली. दोन भावांना आजोबांनी वसतीगृहात ठेवलं. सुरेखा वडिलांबरोबर रस्त्यावर राहू लागल्या. भीक मागायची, चार-पाच दिवसांनी आंघोळ करायची. पटरीच्या शेजारील गटाराकडे शौचाला बसायचं. त्याच पाण्यानं आंघोळ करायची. मधली २-४ वर्ष आईसोबतही संपर्क नाही. एका घरात काही वर्ष वरकाम केलं, वर्षभर गावी राहून १२ व्या वर्षी परत मुंबईला आल्या. तेराव्या वर्षी प्रेमात पडून अवघ्या १५ दिवसांत लग्न केलं. आई, भावांनी संबंध तोडले. वडिलांचा पत्ता नाही. नवरा पण कसला इसम, रे रोडमधला गुंडगिरी करणारा, दारुच्या व्यसनात बुडालेला १७ वर्षाचा मुलगा. महिनाभरातच सुरेखाला आपल्या आयुष्यात काय वाढलंय याची कल्पना आली. २० व्या वर्षापर्यंत तीन मुलं पदरात आली. नवरा १५-२० दिवस जेलमध्ये असायचा उरलेले दिवस मारहाण आणि घराबाहेर काढायचा. शेवटी सुरेखानं १९८८ मध्ये रे रोडची खोली विकली. त्या पैशानं मानखुर्दला खोली खरेदी केली.

सोनापूर, जयहिंद नगर म्हणजे आजूबाजूला खारफुटी शौचालय नाही की पाण्याची व्यवस्था नाही. ४-५ महिला मिळून शौचालयाला अंधारात जायच्या. दिवसा जाणं शक्यच नाही. उत्तर भारतीय वाल्मिकी समाजाची वस्ती होती. दारूडे व्यसनी लोकांचंही प्रमाणही खूप होतं. वाल्मिकी समाजातल्या लोकांचे स्वतःचे लाकडी भिंती असणारे वैयक्तिक शौचालयं होती. या शौचालयांना छत नव्हतं आणि खालूनही भांडं नसून खड्डा असायचा. डुकरं येऊन ही विष्ठा खायचे.

सुरेखा माती, रेती उचलण्याचं काम करायच्या. दहा वर्ष दारू विकण्याचा धंदा करायच्या. लहान मुलांना सांभाळायला कोणी नसल्यामुळं त्या हे काम करायच्या. घरातूनच हे करता यायचं. पुढं मुलं जरा मोठी झाल्यावर त्यांनी दारू विक्री बंद करून मासे आणि भाजी विक्री सुरू केली.

२००१ च्या सुमारास स्थानिक खासदारांनी त्यांच्या निधीतून सोनापूरमध्ये सार्वजनिक शौचालयाचं बांधकाम केलं. पण प्रचंड अस्वच्छतेमुळं महिलांचा त्रास काही कमी झालाच नाही. दरम्यान एका महिलेसोबत सुरेखा यांची ओळख झाली. या महिलेनं आपण मिळून महिलांकरता काहीतरी काम करुयात असा प्रस्ताव दिला. सुरेखा यांनी आजूबाजूच्या महिला जमवल्या. पण काही कारणांनी या महिलेसोबत सुरेखा आणि त्यांच्या सोबतच्या महिलांचं पटलं नाही. अन्याय निवारण पूर्ती संस्थेच्या कार्यकर्त्यांसोबत सुरेखा यांची ओळख झाली. त्यांनी बचतगटाबद्दल माहिती दिली. माविमच्या एका अधिकाऱ्यांची ओळख करून दिली. २००४ मध्ये सुरेखा यांनी ८० महिलांना एकत्र आणून एकाच वेळी ५ बचतगट सुरू केले. २००५ ला यातील ५२ महिलांची मिळून चिंचणी मायाक्का महिला सहकारी संस्था तयार केली. यात सर्व महिला अशिक्षित होत्या. बचतगटाच्या महिलांना कर्ज देणं, खाद्यपदार्थ बनवून त्यांची विक्री करणं, समारंभात कॅटरिंगची ऑर्डर घेणे हे उद्योग त्यांचे सुरू होते. २००७ ला त्यांच्या संस्थेनं चांगली भरारी घेतली. १६ आंगणवाड्यांना सकस आहार पुरवठ्याचं कंत्राट त्यांच्या संस्थेला मिळालं. २००५-०६ मध्ये त्यांच्या संस्थेची बँकेत ५ लाखाची ठेव जमा झाली. २००९ ला मानखुर्दमध्ये संस्थेला २ रेशनदुकान मिळाली. त्याकरता स्थानिक उत्तर भारतीय लोकांसोबत मोठा संघर्ष झाला.

प्रकरण अगदी मंत्रालय ते कोर्टापर्यंत गेलं.

२०१३ मध्ये प्रथम संस्थेद्वारे जयहिंद नगरमध्ये शौचालयाकरता सर्वे करण्यात आला. विभागात नेतृत्वशील महिला कोणी आहे का याची त्यांनी माहिती घेतली असता सुरेखा यांचं नाव पुढे आलं. प्रथमने महिला जमतील का विचारलं असता, सुरेखा यांच्या एका हाकेवर पाचशे महिला गोळा झाल्या. सुरेखा यांच्या संस्थेला शौचालयाचं काम मिळालं. ५२ सदस्या महिलांपैकी ११ महिला संस्थेच्या मुख्य कार्यकारिणी सदस्या आहेत. पण सोनापूरच्या शेजारील जनकल्याण सोसायटीनं या शौचालयावर आक्षेप घेतला. बांधकामाची जमीन त्यांच्या मालकीची असल्याचा दावा त्यांनी केला. पोलीस स्टेशनला तक्रारी, सेशन कोर्टात केस दाखल करण्यात आली. सोनापूर मधली वस्ती आणि जनकल्याण सोसायटी यांच्यात प्रचंड वाद होऊ लागले. जनकल्याण मधील लोकं सोनापूर मधील महिलांवर अश्लील शेरेबाजी, शिवीगाळ मोठ्या प्रमाणात करू लागले. या लोकांच्या घरात शौचालयं होते.

या संपूर्ण काळात राहुल शेवाळे, प्रथम संस्था, महापालिका अधिकारी या सर्वांनी सुरेखा आणि संस्थेला भक्कम पाठिंबा दिला. महापालिका अधिकाऱ्यांनी तुम्ही कोर्टात हजर राहत जा. बांधकामांचं आम्ही पाहून घेतो असं सांगत महिलांना आश्वस्त केलं. या सर्व महिला अशिक्षति असूनही त्यांनी शौचालयाकरता लागणारे कागदपत्र नेटानं गोळा केले. विशेषतः सुरेखा यांनी प्रचंड खटाटोप केला. जनकल्याण मधील लोकं कित्येकदा सुरेखा यांच्या वर हल्ला करायला येतं, त्यांना शिवीगाळ करायचे. राहुल शेवाळे यांचे कार्यकर्ते सुरेखांभोवती कोर्टात येजा करताना सुरक्षा कडं करत असत. दोन वर्ष बांधकाम सुरू होतं. अखेर कोर्टानं सोनापूरच्या लोकांच्या बाजूनं निकाल दिला. कारण या शौचालयामुळं ४ हजार लोकांची शौचालयाची सोय होणार होती.

महिलांकरता खाली १३ शौचालय, १ बाथरुम आणि पुरुषांकरता वरच्या माळ्यावर १४ शौचालयं अशी व्यवस्था असणारं बांधकाम तयार झालं. महिलांच्या विभागात लहान मुलांकरताही २ शौचालयं राखीव ठेवण्यात आली आहेत. २०१४ च्या अखेरीस हे शौचालय सुरू झालं. बांधकामा दरम्यान सतत भांडणं, मारामाऱ्या, पोलीस स्टेशन आणि कोर्टात फेऱ्या सुरू होत्या. त्यामुळं सुरेखा यांना त्यांच्या गरजा सांगता नाही आल्या. पण बांधकाम नीट झालं आणि सर्व कागदपत्रांचं योग्य हस्तांतरण झालं.

मुंबईतलं पहिलं सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशिन २०१५ मध्ये या शौचालयात बसवण्यात आलं. या शौचालयाच्या शेजारीच बार असला तरी महिलांना कधीही त्रास होत नाही. सुरेखा यांचा दरारा एवढा जबरदस्त आहे. त्या गावी असल्या तरी परिसरातले लोक ही जबाबदारी पार पाडतात. शौचालयाच्या पाण्याच्या व्यवस्थेकरता बोअर वेल खोदण्यात आली पण तिला पुरेसं पाणी नाही लागलं. त्यामुळं महापालिकेतर्फे पाण्याची लाईन आहे.

या शौचालयात ५०० पास आहेत. दर डिसेंबर महिन्यात जुने पास जमा करायचे आणि मग जानेवारी महिन्यात पास नवीन वितरित केले जातात. सुरेखा वर्षातून दोन वेळा पासधारकांची मिटींग घेतात. महिला आणि पुरुषांची स्वतंत्र मिटींग होते. त्याची फळ्यावर सूचना लावण्यात येते. लोक मोठ्या संख्येनं उपस्थित असतात. संस्थेला शौचालय चालवताना काय अडचणी येतात हे सुरेखा लोकांसमोर मांडतात आणि त्यांच्याकडूनच उपाय मागतात. लोक उत्स्फुर्तपणे सूचना, उपाय सांगतात. त्यानुसार सुरेखा उपाय करतात आणि अडचणीतून मार्ग निघतो.

सुरेखा दरवर्षी शौचालयाचा वाढदिवस साजरा करतात. दोन वर्षांपूर्वी त्यांनी शौचालयाच्या गच्चीवर माहेरघर सुरू केलं. व्यसनी नवरा, भांडणं, अत्याचार यामुळं महिलांना खूप त्रास होतो. कधीकधी घरातून बाहेर काढलं जातं. अशा वेळी या महिलांना आधार आणि समुपदेशनाचं काम या माहेरघरात चालायचं. या महिलांची समजूत काढून त्यांना शक्य असेल ते प्रशिक्षण देणं, मुली लहान वयात भरकटू नयेत याकरता त्यांचं समुपदेशन करणं हे महत्त्वाचं काम इथं होत असे.पण केअरटेकर आणि त्यांच्या कुटुंबाला राहण्याच्या व्यवस्थेकरता गच्चीवरची जागा देण्यात आली आहे. त्यामुळं सध्या माहेरघराचं काम बंद असलं तरी लवकरचं ते सुरू होणार आहे.

सुरेखा अगदी मोकळेपणानं सांगतात सर्व महिलांची टीम मजबूत आहे त्यामुळं हे सर्व उभं राहिलं. वस्तीतल्या लोकांचाही

चांगला पाठिंबा आहे. सर्व श्रेय त्यांचं आहे.

सुरेखांच्या संस्थेतर्फे दत्तकवस्ती सुधारणा काम, पीएमजी कॉलनीत सिझनप्रमाणं संस्थेतर्फे फुलांपासून ते खाद्यपदार्थ विक्रीचे स्टॉल लावण्यात येतात. महिलांना स्वयंपूर्ण बनायला मदत करणाऱ्या सुरेखा या आता एक चांगल्या शेतकरीही आहेत.

विशेष नोंदी –

महिलांकरता सपोर्ट सिस्टम, कोर्ट केस, निरक्षर असूनही उत्तमपणे डॉक्युमेंटेशन आणि कागदपत्र सांभाळणं.

## १३) मिनल कांबळी, वय - ४६ वर्ष

### तेजस्विनी महिला मंडळ, टेंभीपाडा, भांडूप, मुंबई

शौचालयाच्या दुरुस्तीच्या कामाकरता नगरसेवकाकडे सतत तगादा लावणाऱ्या, प्रसंगी त्याकरता दबाव टाकणाऱ्या, आधीच्या मंडळानं जबाबदारी नाकारल्यावर शौचालयाची जबाबदारी घेणाऱ्या, दुरुस्तीचं कामाची पाहणी करताना लोखंडी दरवाजा डोक्यात पडून गंभीर जखमी झालेल्या मिनल यांची कामाची तडफ जराही कमी झालेली नाही.

मिनल यांचा जन्म भांडूपमधलाच. त्या लहान असताना वस्तीतले लोक आधी उघड्यावर शौचाला जायचे. काही काळानं शौचालय बांधण्यात आलं. पण महिला आणि पुरुषांकरता सामायिक शौचालय होतं. पुरुषांच्या मंडळाकडे या शौचालयाची देखभाल करण्याचं कंत्राट होतं. पण त्यांचं या शौचालयाकडे पूर्ण दुर्लक्ष होतं. साफसफाई, लाईट आणि पाणी नाही. देखभालही नीट नसल्यामुळं शौचालयातली भांडी खचत होती, दरवाजे तुटत होते, प्लास्टर पडत होतं, टाकी फुटल्यामुळं सांडपाणी-मैला रस्त्यावर वाहत यायचा. अशी भयंकर अवस्था या शौचालयाची झाली होती. मिनल ह्यांच्या माहेरी शौचालय आहे. त्यांचं माहेर जवळच असल्यामुळं त्या घरातल्या शौचालयाचा वापर करत. पण त्यांच्या घरातले इतर सदस्य हे सार्वजनिक शौचालय वापरायचे. इतर महिलांचे हालही त्यांना पाहवत नव्हते. त्या ह्याच भागातल्या आणि त्यांना समाजसेवेचीही आवड होती. त्यांच्या मैत्रीणी त्यांना काहीतरी प्रयत्न कर असं सतत सांगायच्या. त्यामुळं त्या सतत नगरसेवकाकडं ह्या शौचालयाच्या दुरुस्तीकरता विनंत्या करत होत्या.पण हे शौचालय स्पार्कनं बांधलेले, महापालिकेच्या ताब्यात नव्हतं, मोठ्या निधीची आवश्यकता, मंडळाला महापालिकेची मान्यता नसणं अशा अनेक कारणांमुळं हे शौचालय दुरूस्तही होत नव्हतं. लोकांचे हालही संपत नव्हते.

नोव्हेंबर २०१५ मध्ये एक महिला शौचालयात असताना भांडं खचलं आणि ती महिला खड्ड्यात पडली. तिला दुखापत झाली. मिनल यांनी लगेचच नगरसेवकांना फोन करून, जर तातडीनं शौचालयाची दुरुस्ती केली नाही तर मिडियात जाणार असं सांगितलं. नगरसेवकांनी एमएसडिपीच्या मुख्याधिकाऱ्यांची तात्काळ भेट घेतली. दुसऱ्या दिवशी मुख्याधिकारी शौचालयाची पाहणी करण्याकरता आले. त्यावेळी ४५०-५०० जणांचा जमाव तिथं होता. मुख्याधिकाऱ्यांनी पुरुषांच्या मंडळाला काम करणार का असं विचारलं असता त्यांनी वेळेची सबब पुढे करत काम करण्यास नकार दिला. मग मुख्याधिकाऱ्यांनी लोकांमध्ये कोणाला तरी पुढं येण्याचं आवाहन केलं. स्थानिक नागरिक आणि नगरसेवकांनी मिनल यांना आग्रह केला. मिनल यांनी ही जबाबदारी स्वीकारली. दुसऱ्या दिवशी त्यांनी कार्यालयात जाऊन शौचालय देखभाल प्रक्रिया जाणून घेतली. मिनल यांनी वस्तीतल्या ५ महिलांसोबत मंडळ बनवलं. वस्तीतल्या काही लोकांचा मिनल यांना पाठिंबा मिळत होता. पण पुरुष मंडळातले काही सदस्य आणि वस्तीतले काही लोकं विरोध करत होते. नगरसेवकाला जमलं नाही ते काम ह्या महिला काय करणार किंवा ह्या महिला कामाचे पैसे खाणार असे गैरसमज हे पुरुष वस्तीत पसरवत होते. फेब्रुवारी २०१६ मध्ये मिनल यांच्या मंडळाची नोंदणी झाली. ह्या सहा जणींनी कायद्याच्या चौकटीत राहून काम करायचं ठरवलं. नगरसेवकांसोबत एमएसडीपीच्या कार्यालयात जाऊन कागदपत्र देऊन शौचालय दुरूस्तीकरता निधी संमत झाला. साधारण ऑक्टोबर २०१६ मध्ये दुरुस्तीचं काम सुरू झालं. पण हे काम सुरू असताना पाईप चोरी खूपदा झाली. मग मंडळातल्या सहाही सदस्या आळीपाळीनं कामाच्या ठिकाणी थांबून देखरेख करायच्या. यामुळं कामाचा दर्जाही चांगला राखला जाणार होता. एके दिवशी महापालिका अधिकारी आणि मिनल दुरुस्तीच्या कामाचं निरिक्षण करत असताना, गच्चीवरून तुटलेला लोखंडी दरवाजा कामगारांच्या हातातून पडला. हा दरवाजा मिनल यांच्या डोक्यात पडून त्या गंभीर जखमी झाल्या. हे कामगार पळून गेले. मिनल यांना २२ टाके पडले. त्यांच्या उपचाराचा खर्च कंत्राटदाराने केला. जीवावर बेतलं असतानाही मिनल मागे हटल्या नाहीत. त्यांच्यासोबतच्या महिलाही ठाम राहिल्या. आणि शौचालयाच्या दुरुस्तीचं काम साडेपाच महिने चाललं. मिनल यांच्या मंडळाला या शौचालयाच्या देखभालीचं पूर्ण कंत्राट मिळालं. सर्व कागदपत्र, वीज आणि पाणी मीटर मंडळाच्या नावावर झालं. दुरुस्त झालेल्या शौचालयाचा वापर लोकं करू लागले पण देखभालीकरता पैसे द्यायला बरेच लोक तयार नव्हते. महापालिकेच्या शौचालयाचे पैसे का द्यायचे, तुम्हांला हवेत ते पैसे असे आरोप

करतात. त्यावरून खूप भांडणंही होतात. वर्षाला प्रती घर केवळ तिनशे रुपये वर्गणी असूनही लोकं पैसे द्यायला टाळाटाळ करतात. लोकांना देखभालीच्या खर्चाबद्दल सांगूनही लक्षात येत नाही.

२०१९ मध्ये या शौचालयाचा सर्वे झाल्यावर हे बांधकाम धोकादायक असल्याचा अहवाल मिळाला. त्यामुळं हे शौचालय तोडून त्या जागी नवीन शौचालयाचं काम सुरू आहे. कोरोना महासाथीमुळं हे काम लांबलयं. बांधकाम पूर्ण होईपर्यंत लोकांच्या सोयीकरता पत्र्याचं तात्पुरतं शौचालयं उभारण्यात आलं. पण वस्तीतली काही उनाड मुलं महिलांच्या शौचालयामागे दारू पिणं, गांजा आणि सिगेरट ओढतात. त्यामुळं मुली-महिलांना त्रास होऊ लागला. पोलिसांकडे याबाबतीत अर्ज दिल्यावर पोलिसांनी या मुलांना अटक केली. पण जामिनावर सुटल्यावर या मुलांनी मिनल आणि त्यांच्यसोबतच्या महिलांना बघून घेऊ अशी धमकी दिली. मिनल आणि मंडळाच्या सदस्या न घाबरता ठामपणे उभ्या आहेत.

विशेष नोंदी-

- जीवावर बेतूनही लोकांच्या हिताकरता मिनल पुढे येऊन काम करतात
- दबावगट बनवणं त्याचा वापर करणं, कायद्याच्या चौकटीत राहून काम करणं

## १४) पुष्पा साळ्री, वय - ४० वर्ष

### सिद्धार्थनगर रहिवासी सेवा संघ, मुलुंड पश्चिम

गेली १५ वर्ष पुष्पा या शौचालयाची देखभाल करत आहेत. पुरूष मंडळाच्या नावावर हे शौचालय आहे. इथला केअरटेकर पैशांचा गैरव्यवहार करून पळून गेला. तेव्हापासून या शौचालयाच्या देखभालीचं काम पुष्पाच करत आहेत. पुरुषांचं मंडळ नामधारी आहे. पुष्पा यांचं महिला मंडळही आहे. पण तरीही त्यांच्या नावावर शौचालयाचं व्यवस्थापन मिळालं नाहीये.

पुष्पा या मूळच्या याच वस्तीतल्या. या वस्तीतले रहिवासी बीएमसीच्या रोडवरच शौचाला बसायचे. महिलांना रात्रीच जावं लागायचं. ५-६ जणी सोबतीला पाहून जावं लागायचं. कारण अंधारात सोबत लागायचीच.

२० वर्षापूर्वी म्हाडानं महिलांकरता ३ आणि पुरुषांकरता ३ शौचालयं बांधली. पण पाणी आणि वीजेचा पत्ताच नाही. मेणबत्ती घेऊन रात्री या शौचालयात जावं लागायचं. सफाईच्या नावानं तर बोंब होतीच. त्यानंतर महापालिकेनं शौचालय बनवलं. ते पुरुषांच्या मंडळानं चालवायला घेतलं. पण त्यांनी यात कधी फार लक्ष घातलचं नाही. केअरटेकरही पैशाचा घोटाळा करून पळून गेला. पुष्पा या विभागात सामाजिक कार्यकर्त्या आहेत. पदवीधर पुष्पा पोलीस दक्षता समिती, राष्ट्रवादी पक्षाच्या वॉर्ड अध्यक्षा, विशेष कार्यकारी अधिकारी आहेत. त्यांनी मग आपणहून या शौचालयाच्या देखभालीचं काम हातात घेतलं. एका केअरटेकरची नेमणूक केली. सफाई करणं, तुंबलेली शौचालयं मोकळी करण्यासाठी वॉर्ड ऑफिसशी संपर्क साधणं ही कामं त्या करतात. ४५० घरं या शौचालयांचा वापर करतात. हे शौचालय पुष्पा यांच्या मंडळाच्या नावावर व्हावं याकरता त्या प्रयत्न करत आहेत. गेली १५ वर्ष त्या या शौचालयाच्या देखभालीची सर्व काम करूनही अजून त्यांच्या ताब्यात कागदोपत्री कारभार आलाच नाही.

विशेष नोंदी-

- मूळ व्यवस्थापक जबाबदारी सोडून पळून गेला. त्यामुळं गेली १५ वर्ष पुष्पा यांचे मंडळ व्यवस्थापन करत आहे. कागदोपत्री नाव आधीच्याच मंडळाचे. खूप प्रयत्न करूनही पुष्पा यांच्या मंडळाकडे हस्तांतरण नाही.

## १५) शोभा खिरवळे

### ओंकार संघटीत महिला व बालविकास संस्था, समर्थवाडी, मानखुर्द, घाटकोपर लिंक रोड

२० वर्षांपूर्वी मोठा संघर्ष करून शोभा यांनी वस्तीत शौचालय बनवलं. स्थानिक नगरसेविकेला सांगूनही डागडुजी केली जात नव्हती. त्यामुळं गेल्या वर्षी कर्ज काढून स्वखर्चानं या शौचालयाची दुरुस्ती केली. पण आता गेल्या काही दिवसापासून अचानक ही नगरसेविका हे शौचालय तोडून तिथं नवं बांधण्याच्या प्रयत्नात आहे. या शौचालयाचं स्ट्रक्चरल ऑडिट न करता ही गोष्ट सुरू आहे.वस्तीतल्या नागरिकांनी या विरोधात कोर्ट स्टे आणला, तात्पुरत्या शौचालयाची सोय केली नाही तरी नगरसेविकेकडून हे शौचालय तोडण्याचे प्रयत्न सुरूच आहेत.

मूळच्या साताऱ्याच्या असणाऱ्या शोभा १९८७ ला मुंबईत आल्या. १९९५ पासून त्या मानखुर्दला राहत आहेत. त्यावेळी म्हाडाच्या शौचालयात जाण्याकरता द्रुतगती मार्ग ओलांडून जावं लागायचं. शौचालयात जाणं म्हणजे अक्षरशः जीव मुठीत घेणं असायचं. ते टाळायचं असेल तर, वस्तीपासून जवळ २-३ एकर दाट झाडीत जायचं. महिलांना पहाटेच जावं लागायचं. शोभा त्याकाळात घरातच प्रथमची बालवाडी चालवायच्या. त्यानंतर स्त्रीमुक्ती संघटनेची संयोगिनी म्हणूनही काम करायच्या. यात त्या कचरावेचक, प्लास्टिक वेचकांच्या आरोग्यसमस्या, काम करतानाची आव्हानं-काळजी यासंबंधित माहिती गोळा करणं आणि त्यांना मदत करणं ही कामं करायच्या.

२००० साली अतिशय वाईट घटना घडली. त्यानंतर शोभा खूप अस्वस्थ झाल्या. वस्तीतल्या महिला शौचाकरता झाडीत गेल्या होत्या. या झाडीत केबल चोरांनी केबल कापून टाकली होती. या कापलेल्या केबलवर या महिलांचा पाय पडला. १ महिला शॉक लागून जागीच मरण पावली. २ महिलांना शॉक लागून जखमी झाल्या. शोभा यांना वाटलं, आपण संघटनेचं काम करतो. वस्तीच्या विकासासाठी पावलं उचलायला हवीत. त्यांनी वस्तीतल्या लोकांच्या सह्या गोळा केल्या. हजार माणसांच्या सहीचं निवेदन घेऊन त्या तत्कालिन आमदाराकडे गेल्या. पण आमदारांचं म्हणणं की आपण हे काम करत नाही. स्पार्क संस्था ही कामं करतं. अपनालयाच्या मदतीनं शोभा स्पार्कपर्यंत पोहचल्या. तिथं त्यांना महिला मंडळ बनवून, शौचालयाच्या देखभालीबद्दल माहिती मिळाली. शोभा यांनी लगेचच वस्तीतल्या ११ महिलांना सोबत घेऊन मंडळ बनवलं.

स्पार्कनं येऊन पाहणी केली. पण वस्तीत शौचालयाकरता जागेची अडचण होती. कुर्ला क्रॉस रोडला चिकटून असणारी ही दाट झोपडपट्टी आहे. रस्त्याच्या पलिकडे कलेक्टर मालकीची चार एकर जमीन आहे. पण तिथं शौचालय बांधलं तर रस्ता ओलांडून जाणं हे धोक्याचं होतं. वस्तीतले दोन भाऊ आपल्या राहत्या घराची जागा शौचालयाकरता देण्यास तयार झाले. त्यांना महापालिकेकडून पर्यायी घर देण्यात आलं.

२००० साली शौचालयाचं काम सुरू झालं. दोन हजार लोकसंख्येच्या वस्तीत फक्त साडेसातशे लोकांचा शोभा यांना पाठिंबा होता. शौचालय वापरण्याकरता पासाचे पैसे द्यावे लागणार यामुळं काही लोक विरोध करत होते. तर काहींना त्यांच्या जागेवर शौचालय व्हावं असं वाटू लागलं. त्याबदल्यात महापालिकेकडून जागा मिळेल ही आशा त्यांना होती. शेजारीच मीठाचं गोडाऊन असणाऱ्या माणसानं शौचालयाच्या बांधकामाच्या हादऱ्यामुळं गोडाऊनमध्ये खड्डा पडून ५० हजाराचं नुकसान झाल्याचं सांगत रोज वाद घालायचा. वस्तीतल्या महिलांनी वैयक्तिकरित्या २० हजार गोळा करून या माणसाला दिले आणि वाद मिटवला.

शोभा या कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नाहीत. शौचालयाचं काम सामाजिक संस्थांच्या मदतीनं झालं. त्यामुळं राजकीय पक्षांचे स्थानिक कार्यकर्ते बांधकामाबाबत तक्रारी द्यायचे. तळमजल्यावर महिलांकरता ८ आणि पुरुषांकरता वर ८, दोन्ही मजल्यांवर आंघोळीकरताही व्यवस्था करण्यात आली. बांधकामापूर्वी मंडळाला त्यांच्या गरजा विचारण्यात आल्या नाहीत. केअरटेकरला बसण्याकरताही जागाही ठेवली नाही. वीजेची जोडणी घेतली नाही.

३ वर्षांनी बांधकाम पूर्ण झालं. शौचालयाच्या बाजूनं ३-३ फुटांची जागा नियमांनुसार सुरक्षिततेकरता मोकळी ठेवण्यात आली

होती. शौचालयाच्या शेजारी लाकडाची वखार होती. वखारीचा मालक मुंबई महापालिकेत नोकरीला होता. या माणसानं या ३ फूट मोकळ्या जागेत अतिक्रमण करत मातीचा भराव घातला आणि त्याचं बांधकाम उंच केलं. शोभा आणि मंडळातल्या महिलांनी त्या माणसाला असं करू नको अशी विनंती केली. पण उपयोग नाही झाला. मग त्यांनी पोलीस तक्रार केली पण त्याचाही काही उपयोग नाही झाला. या वखारीत टवाळखोर येऊन बसायचे. तळमजल्यावर महिलांचं शौचालय आहे. हे टवाळखोर लोकमुलींना खिडकीतून दगड मारायचे. सांगूनही काही फायदा होत नव्हता. पोलीसही काही करत नव्हते. शेवटी शोभा विभागाच्या महिला डिसीपींकडे तक्रार घेऊन गेल्या. या महिला डिसीपी तत्काळ ५० पोलिसांची फौज घेऊन शौचालयाच्या जागी आल्या. सोबत महापालिकेच्या वॉर्ड ऑफिसमधील अधिकाऱ्यांनाही आणलं. अनधिकृत बांधकाम ताबडतोब जमिनदोस्त केलं. ३ फूटाची जागा मोकळी करायला लावली. वखारमालकाला त्याच्या जागेत शौचालयाच्या बाजूनं १५ फूट उंचीची भिंत बांधायला लावली. अशाप्रकारे वखारमालक आणि टवाळखोरांचा बंदोबस्त करण्यात आला.

शोभांनी चोरून लाईट घेतली. स्पार्कनं मंडळाच्या नावावर कागदपत्र दिली नाहीत. स्पार्कनं केअरटेकरच्या जागी २-३ मुलांना बसवलं. ही मुलं दारू पिऊन धुडगूस घालायची. त्यांची तक्रार दिली. स्पार्कचे मुख्य जोकीम यांच्याकडे याबाबत तक्रार केली. त्यांचं म्हणणं मंडळाला शौचालय सांभाळायला जमणार नाही. शोभा यांनी जोकीम यांच्याकडे सतत तगादा लावल्यावर त्यांनी शोभा यांना बँकेत एक लाख रुपये ठेव ठेवायला सांगितलं. शोभा यांच्या पतीला मिलमधील नोकरीतून कमी केलं. त्यांना त्याची भरपाई म्हणून काही रक्कम मिळाली. शोभा यांनी यातली रक्कम बँकेत डिपॉझिट केली. २००३ मध्ये शौचालयाचं उद्घाटन झालं. पण संस्थेच्या नावावर एमओयू मिळायला २०१२ उजाडलं. त्यानंतर पाणी आणि वीज जोडणी संस्थेच्या नावावर झाली. नळातून मिळणारं पाणी शौचालयाला अपुरं पडायचं. त्यामुळं टँकरनं पाणी घ्यावं लागायचं. शोभा यांच्या सांगण्यावरून त्यांच्या पतीनं टँकरनं पाणी पुरवठ्याचा व्यवसाय सुरू केला. त्यांचा यात चांगला जम बसला. तीन टँकर झाले. शोभा यांनी त्याच भागात बिल्डींगमध्ये घर घेतलं. २०१८ मध्ये वस्तीतल्या घरी खणल्यावर १० फुटांवर त्यांना चांगलं पाणी लागलं. तिथं मोटर बसवून त्यांनी शौचालयाला पाणी पुरवठा सुरू केला.

२०१७ पासून शोभा शौचालयाच्या प्लास्टर, दरवाजे बदलणं आणि इतर कामांसाठी महापालिकेत, नगरसेविकेत पत्रव्यवहार करत होत्या. नगरसेविकेनं निधी नसल्याचं कारण दिलं. बीएमसी व्यवस्थापकानं त्यांना मंडळानं स्वतः काम करा असं सांगितलं.मंडळाच्या बचतगटामुळं त्यांचे बँकेत ७० हजार रुपये जमा होते. ६ बचतगटांनी मिळून शौचालयाच्या दुरूस्तीकरता बँकेतून साडेचार लाखाचं कर्ज घेतलं. आणखी रकमेसाठी शोभा यांनी त्यांचे दागिने गहाण ठेवले. सप्टेंबर २०१८ मध्ये शोभा यांच्या पतीचं निधन झालं. मंडळानं शौचालयाची सर्व भांडी बदलली, दारं बदलली, प्लास्टरींग केलं, सांडपाण्याची टाकी बसवून शौचालयाची उंची १ फूटानं वाढवली. हे सर्व काम नोव्हेंबर २०१८ मध्ये पूर्ण झालं. साधारण २०१९ च्या सुरूवातीला नगरसेविकेनं हे शौचालय तोडण्याची आणि नवीन बांधत असल्याची नोटीस दिली. स्वतः येऊनही हे शौचालय तोडत असल्याचं ती सांगायची. महापालिकेतून शौचालय तोडण्याकरता लोकही आले. शोभा आणि मंडळानं शौचालयाच्या बांधकामाचं स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट देण्यास वॉर्ड ऑफिसला सांगितलं. तो अहवाल वॉर्ड ऑफिसनं दिला नाही. याआधीच वस्तीतले ४ शौचालय तोडून ४ वर्ष झाले आहेत. त्यांचं बांधकाम अद्याप पूर्ण नाही झालं. त्यामुळं वस्तीतले लोकं महापालिकेचं पथक आलं की त्यांच्याकडे या शौचालयाबद्दल विचारणा करतं. पर्यायी शौचालयाची व्यवस्था न करताच हे शौचालय तोडू शकत नाही. हे सांगूनही ऐकत नसल्यामुळं मग वस्तीतल्या महिलांनी कोर्टात धाव घेतली. कोर्टानं शौचालय तोडण्याकरता स्टे दिला तरी नगरसेविकेच्या धमक्या सुरू आहेतच. गेली १७ वर्ष शोभा यांचं मंडळ उत्तम कामगिरी करत असताना आता नगरसेविकेच्या हट्टापायी त्यांच्याकडून शौचालय काढून घेणं आणि पुनर्बांधणीचं घाट घातला जात आहे.

शोभा यांच्या मंडळातर्फे वस्ती स्वच्छता कार्यक्रम, महिलांकरता शिवणकामाचं प्रशिक्षण देण्यात येतं. मंडळातर्फे बचतगटांची स्थापना करण्यात आली आहे. अनुदानाकरता कागदपत्र तयार करणं आणि इतर गोष्टींचं मार्गदर्शन महिलांना करण्यात येतं. पोलीस

पंचायतही मंडळानं बनवली आहे. महिलांचं समुपदेशन, त्यांचे प्रश्न सोडवण्याचं काम मंडळातर्फे करण्यात येतं. शोभा यांनी स्वत:सोबतच वस्तीतल्या कित्येक महिलांना सक्षम बनवण्यात महत्त्वाचं कामं केलं. त्यांनी महिलांना आर्थिक स्वावलंबीही केलं.

## १६) संगिता ढसाळ, वय - ४८ वर्ष

### सुकेशनी महिला मंडळ, रमाबाई नगर, घाटकोपर

संगिता यांचं मंडळ व्यवस्थापन करत असणाऱ्या शौचालयाच्या बांधकामादरम्यान, ड्रेनेज लाईन टाकायला विरोध करणाऱ्या व्यक्तींकडूनच शौचालयाची टाकी उघडून वैयक्तिक शौचालयाचा मैला त्यात सोडला जात आहे. यामुळं परिसरात दुर्गंधी पसरत आहे.

संगिता राहत असणारी वस्ती म्हणजे म्हाडाच्या जुन्या चाळी आहेत. त्यामुळं त्यांच्याकरता म्हाडानेच सार्वजनिक शौचालयांची व्यवस्था केली होती. या शौचालयांची सफाई मात्र म्हाडाकडून केली जात नव्हती. त्यामुळं वस्तीतल्या महिलाचं वर्गणी गोळा करून हे शौचालय साफ करून घ्यायच्या. या शौचालयाचं बांधकाम खचलं आणि कोसळलं. त्यामुळं वस्तीतल्या लोकांनी तत्कालीन आमदार संजय दिना पाटील यांना शौचालय बांधून देण्याची विनंती केली. त्यांनी शौचालय बांधून दिलं. पण २०१६ मध्ये अवघ्या ५ वर्षातचं कच्च्या बांधकामामुळं हे शौचालयही खचलं. पहाटे सहा वाजता १ व्यक्ती शौचालयाच्या आत असतानाच संपूर्ण शौचालय खचलं. सुदैवानं आजूबाजूच्या लोकांनी त्याला सुखरूप बाहेर काढलं. वस्तीतल्या लोकांना परत शौचालयाची गैरसोय होऊ लागली. त्यांनी परत नगरसेवकाशी संपर्क साधला. पण नगरसेवकानं म्हाडाचं शौचालय असल्याचं सांगत हात वर केले.

मधली माहिती संगिता यांना सांगता आली नाही. संस्थेशी कसा संपर्क केला. वगैरे

प्रथा संस्थेच्या मदतीनं २०१९ मध्ये शौचालय बांधण्यात आलं. २६ शौचालय असणाऱ्या या संकुलात महिलांकरता खाली आणि पुरूषांकरता वर व्यवस्था आहे. संगिता यांच्या सोबत मंडळात ७ महिला आहेत. मंडळाकडे ७० पास आहेत आणि मासिक पासाकरता ६० रुपये दर आहे.

नवीन शौचालयाची ड्रेनेज लाईनही म्हाडाच्या जुन्या शौचालयाच्या जागेतूनच बांधण्याचं काम सुरू होतं. त्यावेळी लाईनच्या समोर घर असणाऱ्या व्यक्तीनं याला प्रचंड विरोध करत वाद घातले. शेवटी कंटाळून मंडळानं नवीन लाईन जुन्या लाईनच्या थोड्या लांबून घेतली. हे कुटुंबही पासाचे पैसे भरून ह्याच शौचालयाचा वापर करायचे. ह्या कुटुंबानं तीन महिन्यांपूर्वी चार नवीन घर बांधली. यात वैयक्तिक शौचालये बांधण्यात आली. या शौचालयांच्या सांडपाण्याची लाईन त्यांनी सार्वजनिक शौचालयाच्या सिवेज टाकीला जोडली. याकरता त्यांनी सिवेज टाकीचा वरचा भाग उघडला. सार्वजनिक शौचालयातून येणारा मैला महापालिकेच्या गाडीतून गोळा केला जातो. सिवेज टाकीत केवळ सांडपाणीच असतं. पण वैयक्तिक शौचालयांच्या जोडणीमुळं तिथला मैला थेट या टाकीत जमा होतो. त्यावर काही प्रक्रीया होत नाही. त्यामुळं इथं दुर्गंधी पसरली आहे. वैयक्तिक शौचालयाची ही जोडणी करत असताना, मंडळानं विरोध करूनही या लोकांनी जबरदस्तीनं ही जोडणी केली.

शौचालयाला मुख्य त्रास स्थानिक टारगट तरुणांकडून होतो. मासिक पासाचे पैसेही द्यायचे नाहीत आणि केअरटेकरला सतत मारहाणही करायची. हे प्रकार तिथं नियमित होत असतात.

# १७) कांता गणेशन वय - ५५ वर्ष

## एकता महिला मंडळ, गोरेगाव, आरे रोड, ३० नं रुट, फिल्मसिटीच्या शेजारी

शौचालयाच्या जवळ हिंसा फारतर किती होणार? छेडछाड, थोबाडीत मारणं जास्तीत जास्त मारामारी असं तुम्हांला वाटेल. पण शौचालयात एसिड हल्ला, तलवारीनं हल्ला, दारूडे आणि गर्दुल्यांची भांडणं, पोलिसांचं दुर्लक्ष असं सतत काही ना काही सुरू असायचं. पण ह्या परिस्थितीतही कांता टिकून राहिल्या. नुसत्या टिकल्या नाहीत तर ह्या सर्व घटनांना धडाडीनं सामोऱ्या गेल्या. आणि आता शौचालयाच्या आसपासचे हे सर्व प्रकार बंद झालेत. या शौचालयाचं बांधकामपूर्ण व्हायलाही ७ वर्ष लागली. या सर्व काळात त्यांच्यासोबत त्यांच्या चार मुलींची भक्कम साथ त्यांना मिळाली. अगदी आता शौचालय चालवण्यासोबत कांता आणि त्यांच्या मुली शौचालयाची सफाईही स्वतः करतात. शिवसेनेच्या जुन्या कार्यकर्त्या असणाऱ्या कांता यांच्या सोबत शिवसेनेचे ज्येष्ठ नेतेही गरज लागेल तेव्हा पाठिशी उभे राहिले.कांता यांचं वैयक्तिक जीवनही खडतर परिस्थितीत तावून सुलाखलेलं आहे.

कांता २ वर्षाच्या असताना त्यांचे आई-वडिल त्यांना घेऊन मुंबईला आले. दुष्काळ पडला होता आणि जालन्याला त्यांच्या गावी ७ मुलांचं पोटं भरणं मुष्कील झालं होतं. त्याचं कुटुंब गोरेगावला फिल्मसिटीत येऊन राहिलं. त्यावेळी फिल्मसिटी झाली नव्हती. एमआयडीसी होती. आजूबाजूला घनदाट जंगल आणि झाडी. वाघ, रानडुक्कर हे वन्यप्राणी आसपास फिरायचे. तिथंच झोपडी बांधून ते लोक राहू लागले. मिळेल ते काम करू लागले. फिल्मसिटी झाल्यावर कांता यांच्या वडिलांना फिल्मसिटीत नोकरी मिळाली. पण आईचं निधन झालं. कांता आणि त्यांचीभावंडं कशीबशी मोठी झाली. शिक्षण काही कोणाचं झालं नाही. फिल्मसिटीच्या शेजारी झोपडपट्टी वाढू लागली. कांता लहान असल्यापासूनच इथं जी काही थोडीफार वस्ती होती, ते सर्वच जंगलात झाडीतच शौचालयाला जायचे. वाढलेली वस्तीही जंगलातच शौचालयाकरता जात होती.

साधारण ४० वर्षापूर्वीची ही गोष्ट आहे. कांता यांनी तिथल्याच एका मुलासोबत स्वतःचं आपलं लग्न ठरवलं.त्याच वस्तीत दोघंही राहू लागले. त्यांचे पती कामाला जायचे आणि सोबत शिवसेनेचे कार्यकर्तेही होते. वस्तीत कामांसाठी, लोकांच्या मदतीकरता नेहमी पुढे असायचे. पक्षातल्या ज्येष्ठ नेत्याचे विश्वासू होते. स्थानिक शाखेचे शाखाप्रमुखही होते. पतीच्या कामामुळं कांता यांनाही वस्तीत मान मिळायचा. त्याही हळूहळू पक्षाच्या कार्यकर्त्या म्हणून काम करू लागल्या. कांता यांची परिस्थिती सुधारली. जरा बचतही होऊ लागली. चार मुली आणि एक मुलगा अपत्य झाली. पण अचानक त्यांच्या पतीला मानसिक विकार सुरू झाला. त्यामुळं कामही सुटलं. तोपर्यंत कांता कधी कामाकरता बाहेर नव्हत्या पडल्या. घरातलं शिजवलेलं अन्नही पती फेकून द्यायचा. कांताना कधी कधी रस्त्यात, वस्तीतले कार्यक्रम, शिवसेनेचे कार्यक्रम यातही पती येऊन मारत असे. औषधोपचारांना काही गुण येत नव्हते. बचत संपू लागली. आणि त्यांची गाडी घसरू लागली. मुलं लहान होती त्यांचे खूप हाल होऊ लागले. कांता बाहेर कामाकरता बाहेर पडल्या. मोठी मुलगी १२ वर्षांची होती. ती लहान भावंडांची काळजी घ्यायची. तत्कालीन आमदार गजानन किर्तीकर कांता आणि पतीची समजूत काढायचे. काही मदतही करायचे. कारण कांता यांचे पती किर्तीकर यांचे विश्वासू साथीदार होते. पण घरातली परिस्थिती खूप बिघडू लागली. शेजारच्या एक बाईंची यावेळी कांता यांना खूप मदत झाली. या बाईंचे पती लष्करात कामाला होते. त्यांनी कांता यांना मुलांना आश्रमात ठेवलं तर शिक्षण, जेवण आणि राहणं अशी सर्व सोय होईल सांगितलं. मुलं शिकली तर परिस्थिती बदलेलं. कांता सुरूवातीला तयार नव्हत्या. पण त्या बाईंनी त्यांची समजूत काढली. मग त्यांनीच कांता यांना सोबत नेलं आणि आश्रम शोधलं. मुलं तिथं राहून शिक्षण घेऊ लागली. कांता भाजी विकू लागल्या. थोडं फार उत्पन्न येऊ लागलं. या परिस्थितीतही त्या वस्तीतल्या लोकांची मदत करणं, पक्षाचं काम करत होत्याच.२००० मध्ये त्यांच्या पतीचं निधन झालं. त्यानंतर दोन वर्षांनी त्यांचा धाकटा मुलगा आजारपणात अवघ्या १४व्या वर्षी वारला. हे दोन्ही धक्के कांताकरता खूप भयंकर होते. मुलींकडे पाहत त्या स्वतःला आणि मुलींनाही सावरू लागल्या. दोन मुली पदवीधर झाल्या. एक मुलगी १२ वी पर्यंत शिकली. घरच्या परिस्थितीमुळं मोठ्या मुलीला शिक्षणाकडे लक्षच देता आलं नाही. हे धक्के पचवून कांता लोकांना विशेषतः महिलांना जमेल तशी मदत करायच्या.

२००१ साली स्पार्क संस्थेच्या ज्योती नावाच्या अधिकारी त्यांच्या वस्तीत आल्या होत्या.त्यांनी वस्तीत शौचालय आहे का याची चौकशी केली. गजानन किर्तीकर यांनी आमदार असताना, ञञञ साली सार्वजनिक शौचालय बांधलं होतं. पण लोकांनी त्याची फारशी निगा राखली नाही. तोडफोड केली. त्यामुळं वस्तीतली लोकं जंगलातच जात होती. प्राण्यांची भीती वाटते पण दुसरा उपाय नाही असं महिलांनी ज्योती यांना सांगितलं. महापालिका आणि स्पार्कतर्फे शौचालय बांधलं तर महिला चालवणार का असं ज्योती यांनी लोकांना विचारलं. सर्वांनी कांता यांचं नाव पुढं केलं. कांतांना बोलवून आणलं. काही प्राथमिक बोलणी झाली. कांता यांना रविवारी वस्तीतल्या लोकांची मिटिंग आयोजित करायला ज्योती यांनी सांगितलं. त्याप्रमाणं मिटिंग झाली. १०० माणसं जमली. वस्तीतल्या लोकांना विशेषतः महिलांना तर शौचालयाची खूप आवश्यकता होतीच. त्यामुळं लगेचच सर्व जण तयार झाले. कांता यांनी वस्तीतल्या १०० महिलांचं मंडळ बनवलं. त्यातल्या ११ जणींची मिळून संस्था रजिस्टर केली. महापालिकेच्या कार्यालयात जाऊन सार्वजनिक शौचालयाकरता काय गोष्टी कराव्या लागतील याची कांता यांनी माहिती घेतली. प्रथा संस्थेनं सर्वे करून घरावर नंबर टाकले. सर्व गोष्टींची पूर्तता झाली आणि २००१ मध्येचबांधकामाला सुरूवात झाली. कांता यांच्या मंडळाच्या नावावर कागदपत्र तयार झाली.

पण बांधकामापासूनच अनेक अडचणींना सुरुवात झाली. नियोजीत शौचालयाची जागा उंचावर होती. बांधकाम साहित्य आणि सामान वर चढवणं खूप कठीण होत होतं. त्यामुळं कंत्राटदार कोणी टिकेना. अर्धवट काम पडलं होतं. त्यात फिल्मसिटी ही या शौचालयाला विरोध होता. त्यांचं म्हणणं होतं की, शौचालयामुळं दुर्गंधी पसरेल. त्यातच संस्थेच्या नावाच्या कागदपत्रांचा गोंधळ झाला. ही कागदपत्रं या भागातल्या दुसऱ्या संस्थेकडे मिळाली. त्यामुळं पोलिसांचाही काही प्रमाणात त्रास झाला.

शिवसेना नेते सुनिल प्रभू यांच्याशी संपर्क साधला. महापालिकेत, स्वयंसेवी संस्थेत सतत पत्रव्यवहार सुरू ठेवला. अशिक्षति असूनही कांता सर्व कागदपत्र घेऊन सर्व कार्यालयांच्या चकरा मारायच्या. सुनिल प्रभूंनी या प्रकरणात लक्ष घालून अखेरिस २००८ मध्ये या शौचालयाचं बांधकाम ७ वर्षांनी पूर्ण झालं.

शौचालयाचं उद्घाटन झालं. वस्तीतल्या लोकांची चांगली सोय झाली. शौचालयाच्या सफाईकरताकेअरटेकर ठेवला. या केअरटेकरचं कुटुंबही त्याच्यासोबत शौचालयाच्या वर राहायचं. दोन तरूण मुली आणि पत्नी असं त्याचं कुटुंब होतं. या तरुण मुलींना वस्तीतले गर्दुले आणि दारूडे खूप त्रास द्यायचे. येताजाता या मुलींची छेडछाड सतत सुरू असायची. रात्री बाराच्या दरम्यान एके रात्री काही गर्दुले शौचालयात गेले. रात्रीच बारा वाजल्यानं शौचालय बंद केलं होतं. हे लोक जबरदस्तीनं शौचालय उघडायला सांगत होते. केअरटेकरनं शौचालय उघडायला नकार दिला. त्यामुळं चिडलेल्या दारूड्या आणि गर्दुल्यांनी लाथा आणि काठ्यांनी त्याला मारायला सुरूवात केली. त्याला वाचायला त्याचं कुटुंबही खाली आलं. या गर्दुल्यांनी शौचालयात एसिड आणून ओतलं. मुलींनी घाबरून कांतांना बोलावलं. रात्री दोनच्या सुमारास पोलीस आले. त्यांनी या धुमाकूळ घालणाऱ्यांना पकडलं. शौचालयालाही कुलूप लावलं. कांता यांनी दुसऱ्या दिवशी चावी मागितली. पोलिसांनी बाहेरचा कोणी माणूस केअरटेकर नका ठेवू असं सांगितलं. स्थानिक माणूस बघा म्हणजे शौचालयाच्या वर कोणी राहणार नाही. कांता यांनी त्यावेळी शौचालय संपूर्ण ताब्यात घ्यायचं ठरवलं. त्या स्थानिक असल्यामुळं आणि इतक्या वर्षांचं त्यांचं काम असल्यानं त्यांना असा काही त्रास होणार नाही. शौचालयही स्वच्छ राहिल, या हेतूनं त्यांनी स्वतःच शौचालय स्वच्छ करायचं ठरवलं.

गर्दुले आणि दारुड्यांचा त्रास सुरूवातीला खूप होत होता. शौचालयाच्या टेरेसवर जाऊन बसणं, शौचालयाच्या आसपास घुटमळणे हे प्रकार सतत सुरू असायचे. कांता या लोकांना विनंती करायच्या पैसे नका देऊ पण इथं भांडणं करू नका. त्या त्यांना पळवून लावायच्या. पण याचा राग येऊन एकदा हे दारूडे आणि गर्दुले तलवारी घेऊन कांता आणि त्यांच्या मुलींवर धावून आले. कांता आणि त्यांच्या चारही मुली अजिबात घाबरल्या नाहीत. हातात येईल त्या रॉड, सळ्या सामान घेऊन त्या या लोकांवर धावून गेल्या. यामुळे कांता यांचा जीव वाचला आणि या गर्दुल्यांवरही जरब बसली आहे.

विशेष नोंदी-

- वैयक्तिक आयुष्य खडतर असूनही वस्तीच्या मदतीसाठी तत्पर
- केअरटेकर, स्वतः आणि कुटुंबावरिल हल्ल्यांना धैर्यानं पलटवून लावलं.
- स्वच्छता आणि देखभाल स्वतः करतात.

## १८) तब्बसूम शेख वय - ४३ वर्ष

### तेजस्विनी फाऊंडेशन, कोकरी आगार, न्यू म्हाडा टेनिस कँप, सायन कोळीवाडा

ह्या भागात तामिळ लोकांची वस्ती जास्त आहे. मारामारी आणि भांडण करणाऱ्यात हे लोक वस्तीत पुढे आहेत. तामिळ लोकांच्या खालोखाल उत्तर भारतीय, मुस्लीम आणि मराठी लोकांची वस्ती इथं आहे. शौचालयाचं नुकसान करण्यात इथं गुंड प्रवृत्तीचे पुरूष आणि महिला सर्वच आघाडीवर आहेत. महिला दारुच्या बाटल्या शौचालयाच्या आत फेकण्यापासून दरवाजे जाळण्याचाही प्रकार करायच्या. या प्रकारांमुळं मंडळाच्या सदस्य महिलांना डोळ्यात तेल घालून पहारा करावा लागतो. सुरूवातीला भीती वाटायची पण तब्बसुम सांगतात, काम करता करता त्यांना हिंमत आली. मंडळाच्या सातही जणींनी कडक भूमिका घेत, या प्रकारांना आळा घातला. हे प्रकार आता जवळ जवळ शून्यावर आलेत.

२००३ पासून तब्बसूम आपल्या कुटुंबियांसोबत कोकरी आगार इथं राहतात. इथं एका बाजूला म्हाडाच्या इमारती, एका बाजूला चाळी आणि वडाळा आरटिओच्या बाजूनं खारफुटीचं जंगल होतं. एक लहान शौचालय होतं. पण ते वस्तीला अपुरं पडायचं. त्यामुळंजिथं जागा मिळेल, तिथं लोकं आपले नैसर्गिक विधी उरकत असतं. यात महिलांचे प्रचंड हाल व्हायचे. यापूर्वी त्या घाटकोपरमध्ये राहायच्या.तिथं त्या एका कंपनीत  नोकरीला होत्या. २००४ मध्ये त्यांच्या पतीचं निधन झालं. मग थोडे दिवसांत त्यांनी नोकरी सोडली आणि सामाजिक काम करायला सुरूवात केली. काँग्रेसची कार्यकर्ती म्हणूनही त्या काम करू लागल्या. इतर लोकांची मंडळ आणि संस्था पाहून, लोकांसाठी काहीतरी करायच्या उद्देशानं तब्बसुम यांनी वस्तीतल्या महिलांसोबत २००८ मध्ये मंडळ बनवलं. महिलांना समुपदेशन, अडिअडचणीला मदत हे मंडळ करू लागलं. या मंडळात मुस्लीम, उत्तर भारतीय, मराठी अशा मिळून ११ जणी आहेत. या वस्तीत २०१८ पर्यंत शौचालयाची मोठी समस्या होती. दलदलीत, झाडीत लोकं कसबसं नैसर्गिक विधीकरता जायचे.

तब्बसुम यांचं मंडळ चांगलं काम करत असल्याचं पाहून २०१७ मध्ये स्थानिक नगरसेवक रविराजा यांनी त्यांना कामाची संधी दिली. वस्ती सुधारणा अभियानांतर्गत बांधकाम सुरू असलेल्या शौचालयाची जबाबदारी नगरसेवकांनी तब्बसुम यांच्या मंडळाला घ्यायला सांगितलं. मंडळाच्या सदस्यांनी एकमेकांत चर्चा करून हे काम स्वीकारायचं ठरवलं. २०१८ ला बांधकाम पूर्ण झाल्यावर मुंबई महापालिकेकडून पत्र  मिळाल्यावर तब्बसुम यांच्या मंडळानं हे शौचालय चालवायला घेतलं. वीजेचं मीटर, पाणी पट्टी मंडळाच्या नावावर लगेचच मिळालं. महिलांकरता खाली १६ आणि पुरुषांकरता पहिल्या माळ्यावर १६ शौचालयं आहेत.

५०० लोक हे शौचालय वापरतात. मासिक पासाची किंमत १०० रूपये आहे. पण पास तिनशेच  बनवले. उरलेले लोक २-५ रुपये रोजचे देणारे आहेत. या रकमेतून मंडळ वीज बील, पाणीपट्टी आणि देखभालीचा खर्च करतात. कोरोनोच्या काळात लोकं मासिक पास आणि रोज वापर करणारेही पैसे देत नव्हते. पण आता मासिक पासधारक पैसे देत आहेत. पण बिनापासवाले काही देत नाहीत.

शौचालय सुरू झाल्यावर वर्षभर खूप त्रास सहन करावा लागला. शौचालयात सतत भांडणं, वाद सुरू असायचे. काउंटरवरच्या केअरटेकरला मारहाण करणे. त्याच्याशी पैशावरून वाद घालणे. बाहेर कुठे वाद झाला तरी त्याचे पडसाद या शौचालयावर उमटायचे. हे गुंड आपला राग व्यक्त करण्यासाठी, त्यांची जरब दाखवण्यासाठी शौचालयाची दार जाळणं, तोडफोड करणं हे प्रकार करायचे. शौचालय वापरल्यावर त्याचे पैसे न देणं, पैसे मागितल्यावर केअरटेकरला मारहाण करणं हे नियमित व्हायचं. शौचालयांच्या भिंतीवर लघवी करणं, हाताच्या पंजांचे छाप लावून गलिच्छ करणं, हे प्रकारही गुंड करायचे. शौचालयाच्या भांड्यात दारूच्या बाटल्या टाकल्यानं शौचालय सतत तुंबायचे. रात्री एक वाजता शौचालय बंद केल्यावर गुंड येऊन शौचालय उघडण्याची जबरदस्ती करायचे. शौचालय उघडत नसल्यामुळं मग दगडी मारणं, लाथा मारणं हे प्रकार रोजचेच असायचे.

महिला शौचालयात नियमितपणे मंडळातल्या सदस्येला थांबावचं लागतं. महिला-मुली नैसर्गिक विधीकरता आल्या की, वेळ घालवत शौचालयातच थांबतात. किंवा इमारतीच्या बाहेर टाईमपास करत थांबतात. गुंड-मवाली लोक मग ह्या महिलांची छेड काढतात.

भांडणं होतात. या लोकांकडे बऱ्याचदा चाकू, तलवारी असतात. मग ह्या महिलांना त्यांचं आवरलं की, शौचालय आणि आसपास सदस्या थांबून देत नाहीत. हे गुंड केअरटेकरसोबतही वाद घालतात. त्याला मारहाण करतात. एकदा केअरटेकरवर तलवारीनं तामिळ भाषिक गुंडांनी हल्ला केला. तलवारीन काऊंटर वार केला आणि तो गुंड तलवार घेऊन बाथरुममध्ये गेला. मग पोलीसांना बोलावलं.आम्ही तक्रार दाखल केली आणि पोलिसांनी कारवाई केली. हा गुंड सह महिने तुरुंगात होता. ह्या कारवाईनंतर आता इथले गुंड जरा शांत झाले आहेत. शौचालयात तलवारी, शस्त्र घेऊन येत नाहीत.

मंडळाकडून महिला समुपदेशनाचं काम आताही सुरू असतंच. महिला अत्याचाराच्या केसेसही तब्बसुम सोडवतात. बचतगट किंवा इतर लघुद्योगांमध्ये इथल्या महिला रस दाखवत नसल्याची खंत तब्बसुम व्यक्त करतात.

विशेष नोंदी-

- शौचालयाच्या मालमत्तेचं नुकसान करण्यात पुरुष आणि महिला दोघंही पुढे
- महिला मंडळाचा २४ तास जागता पहारा
- मंडळातर्फे महिलांना समुपदेशन, अडिअडचणीला मदत
- स्थानिक महिलांमध्ये व्यसनाच प्रमाण अधिक त्याकरताही मंडळातर्फे समुपदेशन

## १९) मीना कांबळे, वय - ४० वर्ष

### सावित्रीबाई फुले महिला मंडळ, कामराज नगर, घाटकोपर

कोरोना महामारीमुळं लॉकडाऊन सुरू झाल्यावर अगणित लोकांचे रोजगार सुटले. मीना कांबळे यांनी त्यांच्या विभागातल्या काही महिलांना मास्क बनवण्याचं प्रशिक्षण देऊन रोजगार मिळवून दिला. ह्याचा आणि शौचालयाचा काय संबंध? असं तुम्हांला वाटेल. पण हे प्रशिक्षण आणि मास्क शिवण्याचं काम सावित्रीबाई फुले महिला मंडळ देखभाल करत असणाऱ्या शौचालयाच्या गच्चीवरील कार्यालयात सुरू आहे.मुलांकरता अभ्यासिका, बचतगट, झेंडावंदन सावित्रीबाईंची जयंती साजरी करणं असे अनेक उपक्रम इथं चालतात. एखादं सार्वजनिक शौचालय वस्तीला ताठ मानेनं, स्वयंपूर्ण जगायला शिकवू शकतं याचं उत्तम उदाहरण हे मंडळ आहे. मीना केवळ स्वतःच्या शौचालयाकरता मेहनत घेतात असं नाही. महिला मंडळांतर्फे चालवल्या जाणाऱ्या सार्वजनिक शौचालयांचा महासंघ म्हणजे 'स्वच्छता संवर्धन संस्था महासंघा"च्या अध्यक्षा आहेत. कोरोना महामारिच्या काळात त्यांनी अनेक कंपन्यांच्या सीएसआर, स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून अनेक सार्वजनिक शौचालयांना स्वच्छता साहित्य आणि सामान उपलब्ध करून दिलं.

मीना कांबळे यांचा जन्म मुंबईतल्या माटुंगा इथं झाला. पाच भावंड असणाऱ्या मीना यांचे वडिल मिल कामगार होते. मिलमधली नोकरी सुटल्यावर त्यांच्या आई घरकामं करू लागल्या. मीनाही आईला मदत करू लागल्या. त्यात त्यांचं शिक्षण सातवीपर्यंत अर्धवट राहिलं. त्यांना शिकण्याची इच्छा होती पण परिस्थितीमुळं शिकता येत नव्हतं. १९९५ ला त्यांचं लग्न झालं. २००६ ला त्यांचं कुटुंब घाटकोपरमध्ये राहायला आलं. खाडिच्या दलदलीत घरं असणारा हा भाग आहे. ही वस्ती मुस्लीम बहुल आहे. शिक्षणाचं प्रमाण जवळपास शून्य असल्यामुळं मिळेल ते काम इथले लोक करतात. घरातल्या महिलांवरही खूप मर्यादा आहेत. या भागातल्या सर्वात मुख्य अडचणी गर्दुले, पाणी आणि शौचालय ह्या होत्या. या भागात पाणी ४-५ किलोमीटर अंतराहून विकत आणावं लागायचं. एका हंड्याला १० रुपये मोजावे लागायचे. नगरसेवकाच्या विरोधामुळं वस्तीत पाण्याची लाईन येत नव्हती. म्हाडाचं शौचालय होतं पण त्याची फारशी चांगली अवस्था नव्हती. साडेतीन हजार लोकवस्तीकरता म्हाडाचं ४० सीटस्‌चं शौचालय होतं.शौचालयाचे लोखंडी दरवाजे आणि कड्या लोकांनी तोडल्या होत्या. दारूच्या बाटल्या शौचालयाच्या भांड्यात नेहमीच टाकत. त्यामुळं शौचालय सतत तुंबायचं. दारूडे आणि गर्दुले यांचा प्रचंड त्रास असायचा. गांजा आणि चरसचा व्यापारही इथं चालायचा. हे लोक मुली आणि महिलांची छेड काढायचे.महिलांच्या शौचालयात पुरूष बिनदिक्कत शिरायचे. भर म्हणजे दारांना कड्याही नाहीत. त्यामुळं शौचालयात जाण्याकरताही महिलांना सोबत घेऊनच जावं लागायचं. एक महिला शौचालयाच्या आत असली की, बाहेर दोन महिला पहाऱ्याकरता उभ्या राहायच्या. लाईट आणि पाणी या पायाभूत सुविधाही नीट नाही. मेणबत्ती, टॉर्च घेऊन रात्रीच्या वेळी जावं लागायचं. सफाईच्या नावानंही बोंबच होती. त्यामुळं वस्तीतल्या महिला आठवड्याला १० रुपये वर्गणी काढून शौचालयाची सफाई करून घ्यायच्या. कधी कधी तर स्वतःच सफाई करायच्या. घरच्या वापराकरता विकत आणलेलं पाणी महिला शौचालयांची सफाई करण्याकरता वापरायच्या. २०१० मध्ये गर्दुल्यांनी शौचालय पेटवलं. लोकांचे खूप हाल व्हायला लागले. त्यामुळं २०१२ मध्ये शौचालयाच्या दुरूस्तीकरता मीना कांबळे आणि वस्तीतले काही लोक महापालिकेच्या कार्यालयात गेले. तिथं त्यांना वस्ती सुधारणा अभियानांतर्गत शौचालय बनवता येईल. महिला मंडळातर्फे त्याची देखभाल करायची ही माहिती मिळाली. वस्तीत बैठक घेऊन महिला मंडळ बनवलं. संस्थेच्या नोंदणीला १ वर्ष लागलं. वस्तीत रस्ता नव्हता. त्यामुळं शौचालयाच्या बांधकामाकरता मोठी वाहनं येऊ शकत नव्हती. मग मंडळानं तत्कालीन खासदारांकडून रस्ता बनवून घेतला. प्रथा स्वयंसेवी संस्थेनं वस्तीत सर्वेक्षण केलं. सर्व सोपस्कार पार पडल्यावर २०१३ मध्ये बांधकामाला सुरुवात झाली.

पण सर्वच राजकीय पक्षांच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी अडथळे आणू लागले. जुनं बांधकामं पाडूही देत नव्हते. काहींचं म्हणणं त्यांच्या पक्षाच्या खासदारातून जुनं बांधकाम झालेयं. तर काहींना त्यांचे प्रतिनिधी मंडळात घुसवायचे होते. कार्यकर्ते काय नगरसेवकही खूप विरोध होता. कारण त्याला डावलून मंडळाला काम मिळालं होतं. जुनं बांधकाम तोडून नवीन बांधकामाच्या पायाकरता केलेलं

खोदकाम नगरसेवकानं खोट्या तक्रारी देऊन चार वेळा बुजवलं. कसबसं करत २०१४ मध्ये बांधकामाला सुरूवात झाली. २ कंत्राटदार बदलले. पहिला कंत्राटदार १ दिवस काम करायचा ४ दिवस काम नाही. गाडीला वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे झेंडे लावून हा कंत्राटदार यायचा. सोबत गाडीला सायरन वाजायचा. त्यावरून वस्तीत तणाव निर्माण झाला. मालाची ने-आण करणाऱ्या गाडीच्या ड्रायव्हरला मारहाण झाली. मग सहा महिने काम बंद झालं. परत दुसरा कंत्राटदार मिळवण्याकरता महापालिकेला पत्रं दिली. २०१५ साली तर बांधकाम थोडंही झालं नाही. दुसऱ्या कंत्राटदारानं सुरूवातीला जोरात काम सुरू केलं. पण पैसे थकले की काम बंद. पुढचा हप्ता मिळाला की त्याचं काम परत सुरू असं व्हायचं. २०१६ ला कामाला जोर मिळाला. बांधकामादरम्यान रहिवासी स्वतःच्या घरातून पाणी द्यायचे. सामानाची गाडी वस्तीत येताना आणि वस्तीत बाहेर पडताना महिला गाडी सोबत असायच्या. नगरसेवकाचं खोट्या तक्रारी देणं सुरू होतंच. त्यानं अनधिकृत झोपड्या बांधायला ट्रक येत असल्याचं पोलिसांना कळवलं. पोलिसांनी काही ऐकून न घेता मंडळाच्या सर्व सदस्यांना एक रात्र पोलिस स्टेशनमध्ये थांबवलं. १ वर्ष बांधकामाचा कालावधी असताना ४ वर्ष काम का सुरू आहे याच्या चौकशीकरता इंजिनियर आणि कंत्राटदारालाही बोलावलं. बांधकामात सिमेंटचा वापर कमी आणि रेतीऐवजी भुसाखडिचा वापर कंत्राटदार करत होता. त्याच्या तक्रारी घेऊन मंडळाच्या महिला रोज महापालिकेत जात होत्या. अखेरिस चार वर्षानंतर म्हणजे २०१७ मध्ये बांधकाम पूर्ण झालं. सप्टेंबरमध्ये उद्‌घाटन झालं. पण बांधकामात दोष खूप होते. २५ हजार लीटरची टाकी शौचालयाच्या गच्चीवर बसवली. पण मोटर कमी क्षमतेची बसवल्यामुळं पाणी वर चढायचं नाही. शौचालयाच्या भांड्याच्या खाली वाळू-सिमेंट नसल्यामुळं भांडी खचू लागली. नळ हातात यायचे. पाईप सुटायचे. मग मंडळानं स्वतःच्या खर्चानंच दुरुस्ती सुरू केली. नगरसेवकाच्या या संपूर्ण कामात मंडळाला कोणतचं सहकार्य नव्हतं. तरी त्याला त्याचं नाव मंडळाच्या पाटीवर हवं होतं. त्यावरूनही त्यानं मंडळासोबत वाद घातले. पण या संपूर्ण काळात महापालिकेच्या इंजिनियरकडून मंडळाला चांगली मदत झाली.

शौचालय सुरू झाल्यावर वस्तीला चांगलाच उपयोग होऊ लागला. महिलांकरता खाली २५, सोबत अपंगांकरताही आणि पुरूषांकरता वरच्या मजल्यावर २७ शौचालय अशी शौचालयाची व्यवस्था करण्यात आली. वस्तीतल्या लोकांकडून मंडळाला चांगली साथ मिळू लागली. या शौचालयात ३५० पास आहेत.सुरवातीला पासाची रक्कम महिन्याला ६० रुपये होती. पण लोकांनी स्वखुषीनं महिन्याला १०० रुपये द्यायला सुरूवात केली. आता शौचालयाचं लहान-मोठं काही काम असलं तर वस्तीतलेच प्लंबर, वायरमन ही कामं मोफत करून देतात.

शौचालयासोबत त्याकरता आणखीही ठोस कारणं होती. मंडळानं फक्त शौचालयाचं बांधकाम आणि देखभाल यापुरतं काम मर्यादीत ठेवलं नाही. शौचालयाच्या गच्चीवर मंडळाचं कार्यालय आहे. इथं वस्तीतल्या लोकांकरता विविध उपक्रम सुरू आहेत. बचतगट बांधणी, मार्गदर्शन, नवरा-बायकोमधली भांडणं मिटवणं, किशोरवयीन मुला-मुलींचं समुपदेशन ही काम तर मीना करतातचं. त्यासोबत मुलांकरता अभ्यासिका, महिलांना व्यवसाय प्रशिक्षण देणं मीना यांनी सुरू केलं.

मीना यांनी ६ बचतगट सुरू केले. बचतगटातल्या महिला मासे, भाजी, कपडे, साबण यांची विक्री करतात. या भागातल्या मुलांचं शाळा गळतीचं प्रमाण खूप जास्त आहे. वस्तीतले मुस्लीम समुदायातले पालक मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत उदासीन आहेत. मुलांना शाळेत शिकवलेलं कळत नाही अशी अनेक कारणं या शाळागळतीसाठी आहेत. मीना यांना शिक्षणाची आवड असूनही परिस्थितीमुळं शिक्षण पूर्ण करता आलं नाही. त्यामुळं त्यांना ह्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणावं असं मनापासून वाटतं होतं. त्यांनी या मुलांच्या पालकांची भेट घेतली. त्यांना शिक्षणाचं महत्त्व त्या सतत सांगत असतातचं. शौचालयाच्या गच्चीतच त्यांनी पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांकरता अभ्यासिका सुरू केली. मुलांना योग्य मार्गदर्शन मिळावं याकरता त्यांनी डी.एड. प्रशिक्षति शिक्षकिाही नेमली आहे. मुलांना यामुळं चांगला फायदा होऊ लागला आहे. ह्या मुलांच्या पालकांचं हातावर पोट आहे. त्यामुळं मीना विविध संस्थांच्या माध्यमातून मुलांना वह्या, पुस्तकं, शालेयपयोगी सामान, पोषण आहार उपलब्ध करून देतात. पारधी समाजातली मुलंही एकल पालकांची संख्याही इथं बरिच आहे. एका १२ वर्षाच्या मुलाला आई नाही आणि वडिल लक्ष देत नाही. गेले २ वर्ष या मुलाचा दिवसभर

सांभाळही मीना करतात. त्याची संपूर्ण जबाबदारी मीना यांनी घेतलीय. फक्त रात्री झोपण्याकरता हा मुलगा स्वतःच्या घरी जातो. मुस्लीम महिलांकरता मीना यांनी रात्रशाळा सुरू केली. मात्र ही केवळ ८ दिवसच सुरू होती. आता पुन्हा ही शाळा सुरू करण्याकरता त्या प्रयत्न करत आहेत.

मीना यांनी शौचालयासोबतच ही सर्व काम झपाट्यानं सुरू केल्यामुळं राजकीय कार्यकर्त्यांचा त्रासही बंद झाला. त्यांच्या पतीची त्यांना उत्तम साथ आहे. त्यामुळंच लग्नानंतर मीना यांनी बारावीपर्यंत शिक्षण घेतलं. मीना यांच्याप्रमाणेच ते ही वस्तीतल्या सुविधांकरता प्रयत्न करतात.वस्तीत पाणी यावं म्हणून त्यांनी जोरदार प्रयत्न केले, त्याला यश आलं. शौचालयालाही आता व्यवस्थित पाणी पुरवठा होतोय. मीना, मंडळाच्या महिला आणि त्यांचे पती स्वतः शौचालयाची देखरेख करतात. सफाईकरता माणूस नियुक्त केलाय. पासाच्या रकमेतून शौचालयाची दुरूस्ती, देखभाल, स्वच्छता कर्मचाऱ्यांचे पगार देता येतात. शौचालयामध्ये तोडफोड होऊ नये, मुली आणि महिलांच्या सुरक्षेकरता शौचालयाच्या बाहेर आणि पॅसेजमध्ये सीसीटिव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. गर्दुल्यांचा त्रासही कॅमेरे बसवल्यावर कमी झाला. एका माणसांनं सुरूवातीलाच काही कारणानं शौचालयाचं गेट तोडलं. या माणसाला मंडळाच्या महिलांनी चांगला चोप दिला. यामुळं शौचालयाच्या मालमत्तेचं नुकसान करण्याची हिंमतपरत कोणाचीही झाली नाही, असं मीना सांगतात.

कोरोना महामारीच्या काळात मीना यांनी स्वतःचं शौचालय सांभाळलचं. पण मुंबईतल्या अनेक शौचालयांना मदत मिळवून देण्यात प्रचंड मेहनत घेतली. पासाचे किंवा रोजचे पैसेही लोक देऊ शकत नव्हते. त्यामुळं शौचालयाच्या देखभालीचा खर्च कसा करावा हा मंडळांसमोर प्रश्न होता. मुंबईत सार्वजनिक शौचालय देखभाल करणाऱ्या मंडळांचा स्वच्छता संवर्धन संस्था महासंघ कार्यरत आहे. सार्वजनिक शौचालयांची देखभाल करताना येणाऱ्या अडचणीतून मार्ग काढण्याचं काम हा महासंघ करतो. मीना यांची यावर्षीचमहासंघाच्या अध्यक्षपदी निवड झाली. महामारीच्या काळात युनिसेफ आणि अनेक मोठ्या कंपन्यांनी सीएसआरच्या माध्यमातून साफ-सफाईचं साहित्य, हात स्वच्छ करण्याचं मशीन, हात धुवायचा साबण असं बरंच सामान उपलब्ध केलं. मुंबईतल्या २५ प्रभागांमधील महासंघाचे सदस्य असणाऱ्या शौचालयांना याचा पुरवठा करण्यात आला. यासोबतच काही संस्थांनी धान्य, मास्क, घरगुती इतर सामानही दिलं. याच वाटप वस्तीत करण्यात आलं. लॉकडाऊनमुळं अनेकांचे रोजगार गेले. मीना वस्तीतल्या महिलांना शिवणाचं प्रशिक्षण देत होत्याच. त्यांनी एका गारमेंट कंपनीतून थोड्या दिवसांकरता ४ शिलाई मशीन घेतल्या. त्यावर या महिलांनी मास्क शिवायला सुरुवात केली. मग घाटकोपरमधील जेथो संस्थेला याबाबत कळल्यावर त्यांनी मंडळाला ४ मशीन विकत घेऊन दिल्या. मीना यांच्या ओळखीतल्या फॅशन डिझाईन करणाऱ्या मुलींनी हे मास्क, त्याकरता लागणार कापड याबद्दल मार्गदर्शन केलं. आता मास्कसोबतच उशांचे कव्हर्स, हॅण्डबॅग, पर्सेसही त्यांनी डिझाईन करून दिलं. महिला उरलेल्या कापडापासूनही तोरणं, पुष्पगुच्छ बनवतात. याच मार्केटिंगही उत्तम झाल्यानं महिलांना चांगला लाभ होत आहे. यातूनच उत्साह वाढल्यानं, मीना आता केंद्र सरकारच्या खादी ग्रामोद्योग मंडळातर्फे महिलांकरता खादीचं कापड आणि त्यापासून बनवायच्या वस्तूंचं प्रशिक्षण घेणार आहेत. इको फ्रेण्डली सॅनिटरी पॅड बनवण्याचाही त्यांचा विचार आहे. या सर्व कामांमुळं खूप महिलांच्या रोजगाराची सोय होणार आहे.

मंडळाचं काम फक्त शौचालयापुरतं न ठेवता मीना यांनी महिलांना एकत्र आणून त्यांना सक्षम करण्याकरता, मुलांना चांगल्या दर्जाचं शिक्षण देणे हे प्रयत्न सर्वांनी सुरू केले तर वस्त्यांमध्ये जीवनाचा दर्जा नक्की सुधारेल.

विशेष नोंदी-

- वस्तीच्या विकासाकरता प्रचंड मेहनत
- सीबीओचं काम फक्त शौचालयापुरत मर्यादीत नाही
- उत्तमपणे नेतृत्वविकास, याचा वस्तीला फायदा
- स्वच्छ शौचालय आणि शौचालयाच्या गच्चीचा विधायक वापर
- मुली आणि महिलांकरता विविध व्यवसाय प्रशिक्षण वर्गाचं आयोजन
- कोरोना लॉकडाऊन काळात महिलांकरता विविध रोजगार उपलब्ध

# २०. संगिता कांबळे, वय - ४७ वर्षे

## विश्वशांती महिला विकास मंडळ, महाराष्ट्र नगर, मानखुर्द

संगिता कामाच्या शोधात १९९७ ला कोल्हापूरहून पतीसमवेत मुंबईला आल्या. गावी नीट काम नाही. तीन मुलांचं पोट भरून शिक्षणाचं कसं करायचं या चिंतेनं त्यांनी मुंबई गाठली. दहावी झाली आणि त्यांचं लगेच लग्न लावून दिलं होतं. त्यांना शिक्षणाची प्रचंड आवड होती. त्यांनी कोल्हापूरात वीट भट्टीवर काम करता करता नर्सिंगचं प्रशिक्षण ८ महिने घेतलं होतं. मुंबईतले सुरूवातीचे दिवस अत्यंत कठिणाईत गेल्यावर त्यांना पेशंट केअरटेकर म्हणून काम मिळालं. कारण त्यांचं नर्सिंगचं प्रशिक्षण अपुरं झालं होतं. अत्यंत हालाखीत ३ वर्ष काढल्यावर त्या मुलांनाही मुंबईत घेऊन आल्या. मग त्यांनी मानखुर्द इथं प्लास्टिकचं एक खोपटं विकत घेतलं. इथं शौचालयाची सोय नव्हतीचं. सर्व वस्ती नो डेव्हलपमेंट झोनवर वसलेली. तिथं समोरचं सामाजिक वनीकरण खात्याच्या जागेत अंधार पडल्यावर ४-५ महिला मिळून शौचाकरता जायच्या. पण टवाळखोर लोक महिलांना दगडी मारायचे. प्रचंड त्रास व्हायचा. एका ओळखीच्या महिलेसोबत त्यांनी स्थानिक नगरसेवकाची भेट घेतली. वस्तीला शौचालयाची गरज असल्याचं सांगितलं. नगरसेवकांनी त्यांना महिला संस्था बनवून रजिस्टर करायला सांगितलं. २००१ मध्ये संगिता यांनी वस्तीत महिलांची बैठक घेतली पण २००४ पर्यंत काहीच हालचाल नाही. संगिता वस्तीला शौचालय हवं म्हणून महापालिकेत चकरा मारायच्या. पण आजूबाजूचे लोक संगिता यांच्या पतीला भडकावायचे. त्यामुळं त्यांची घरात खूप भांडण व्हायची. याला कंटाळून त्यांनी शेजारच्या समतानगर वस्तीत भाड्यानं घर घेतलं. ह्या वस्तीत म्हाडाची शौचालयं होती. पण इथं दरवाजे तुटके होते. दरवाजाखालून आतलं सर्व दिसायचं. त्यांचं प्लास्टिकचं घरं तसंच बंद ठेवलं. एकीकडे तत्कालिन महापालिका उपायुक्त गो. रा. खैरनार सतत कारवाई करत घरं तोडायचे. याच दरम्यान संगिता कोरो च्या संपर्कात आल्या. सर्व शिक्षा अभियानातांर्गत शिक्षणापासून वंचित मुलांना शाळेत आणायचं काम त्यांनी वस्तीत सुरू केलं. २००५ च्या पूरात त्यांनी वस्तीत मोठं काम केलं. दोन्ही घराजवळच्या लोकांना मदत केली. त्यामुळं वस्तीत त्यांचं नाव झालं. नवऱ्याचाही विरोध गळून पडला. याच दरम्यान संगिता कोरोचा कार्यकर्ता प्रशिक्षण कोर्स करत होत्या. त्याच्याच प्रभावातून त्यांनी भाड्यानं राहत असणाऱ्या समतानगरमध्ये शौचालय दुरूस्तीकरता प्रयत्न सुरू केले. वस्तीतल्या महिलांना गोळा करून वॉर्ड ऑफिसला शौचालयाची दुरुस्तीसाठी अर्ज दिला. पण कारवाई होत नसल्याचं पाहून मग संगिता यांच्या नेतृत्वाखाली दोनशे महिलांनी वॉर्ड ऑफिससमोर ठिय्या आंदोलन केलं. उपायुक्त भेटीला आले, पण इंजिनियरनं अनधिकृत वस्तीत सुविधांकरता नकार दिला. संगिता यांनी यावर तीव्र आक्षेप घेतला. शेवटी उपायुक्तांच्या मध्यस्थीनं इंजिनियरनं माफी मागितली. उपायुक्तांनी लेखी आदेश दिल्यावर शौचालयाची दुरुस्ती झाली. पण संगिता इथं भाडेकरू असल्यामुळं शौचालय देखभालीकरता स्थानिक समितीची नेमणूक करण्यात आली. त्यांच्या मालकीचं घर असणारी जमिन नो डेव्हलपमेंट झोनमध्ये येते. मूळ जमिन मालक आणि वस्तीतले रहिवासी यांच्यातला वाद कोर्टात गेला. २०१३ ला कोर्टात या जमिनीच्या वादाचा निकाल लागला. कोर्टानं वस्तीतल्या रहिवाशांना काही रक्कम जमिन मालकाला द्यायला सांगून जमिनी रहिवाशांच्या ताब्यात दिल्या. बऱ्याचशा अडथळ्यांनंतर घरं बांधून झाली. आमदारांशी पत्रव्यवहारांनंतर २०१५ मध्ये या वस्तीमध्ये महिला मंडळाच्या देखरेखीखाली सार्वजनिक शौचालय बांधण्यात आलं. हे शौचालय म्हाडाकडून संगिता यांच्या संस्थेच्या नावावर हस्तांतरण करण्यात आलं. पण बांधकामाचा दर्जा चांगला नसल्यामुळं अवघ्या दोन वर्षातच बांधकामाला तडे गेले. वारंवार संडास तुंबण्याचे प्रकारही लगेचच सुरू झाले. काही लोक सतत शौचालयातले बल्ब, नळ चोरतात. दरवाजे तोडूनही शौचालयाचं नुकसान करतात. महिला-मुली छेडछाडीचं प्रमाण कमी आहे. पण चरस, गांजा ओढून भांडण नेहमी होत असतात. या शौचालयात वस्तीतली एक महिला केअरटेकरचं काम करते. या केअरटेकरलाही वस्तीतले काही लोक त्रास देतात. पैशावरून भांडणं करतात. संस्था या शौचालयातल्या लाभाचे पैसे घेत नाही. हे शौचालय पाडून त्या जागेवर नवीन इमारतीचं बांधकाम सध्या सुरू झालंय. शौचालयाची तात्पुरती पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. तिथंही याच केअरटेकर आहेत.

या सर्व कामांसोबत संगिता यांना २००५ मध्ये आंगणवाडी सेविकेची नोकरीही मिळाली. वस्तीतल्या महिलांकरता त्यांनी

बचतगट बनवले. संगिता यांच्या बचतगटातल्या महिला कौटुंबिक अत्याचार पीडीतांचं समुपदेशन, घरकामगार महिलांना प्रशिक्षण, १५० ठिकाणी शालेय पोषण आहार पुरवठा, बीएमसीचं कॅन्टीन चालवणं, २ रेशनिंग दुकान ही काम करतात. त्यांचा एक बचतगट सी वुड स्टेशनवर पोळी भाजी केंद्र चालवतं. यात खूप चांगला फायदा होतो. त्यांची संस्था सरकारची आहार आणि स्वच्छतेसंबंधी सर्व कामांचं टेंडर भरते. संगिता यांची ही सर्व काम सुरू असताना त्यांनी स्वतःचं अर्धवट राहिलेलं शिक्षणही सुरू ठेवलं. एम ए च्या पहिल्या वर्षापर्यंत त्यांनी दूरस्थ शिक्षण पद्धतीनं शिक्षण घेतलं.

विशेष नोंदी –

- वैयक्तिक अडचणी असूनही वस्तीतल्या महिलांच्या सोयी-सुविधांसाठी धडपड
- स्वयंसेवी संस्थांसोबत काम करता करता स्वविकासासोबतच वस्तीचाही विकास
- वस्तीचा वाद कोर्टात गेल्यावर संपूर्ण वस्तीला एकत्र करून कागदपत्रांची जमवाजमव आणि केस पूर्ण ताकदीनिशी लढून जिंकल्या

## २१) स्मिता सारंग

### निशिगंधा महिला मंडळ, नागरीक स्टोरच्या मागे, कांजूरमार्ग (पू)

स्मिता यांचं लग्नापूर्वीचं आयुष्य वरळीत गेलं. डेअरी क्वाटर्समध्ये राहत असल्यामुळं घरातचं प्राथमिक सोयी होत्या. त्यामुळं लग्नानंतर कांजूरला आल्यावर सार्वजनिक शौचालयाचा वापर करायला लागणं त्यांच्याकरता खूप त्रासदायक होतं. एकतर घर वस्तीत आतल्या बाजूला आणि शौचालय बाजाराला लागून आहे. त्यांच्या चाळीत बहुतेकांच्या घरात शौचालय होती. यात भर म्हणजेवस्तीतल्या शौचालयाची अवस्था अतिशय वाईट होती. पाणीही नव्हतं. घरातून पाणी घेऊन जायला लागायचं. दरवाजे तुटलेले होते. स्मिता यांनी २०१४ च्या सुमारास पुढाकार घेऊन वस्तीतल्या काही महिलांना सोबत घेऊन स्थानिक नगरसेविकेकडे शौचालयाच्या अडचणीबद्दल सांगितलं. नगरसेविकेनं महिलांच्या नवीन शौचालयाची मागणीला होकार दिला. आमदार निधीतून वस्तीकरता शौचालय मंजूर करवून घेतलं. महिला मंडळ बनवून त्यामार्फत देखभाल करावी लागेल असं नगरसेविकेकडून कळलं. मग स्मिता यांनी ११ जणींना सोबत घेऊन मंडळ बनवलं. २०१५ ला शौचालयाचं काम सुरू झालं. पण ते पूर्ण व्हायला तीन वर्ष लागली. कंत्राटदारानं मध्येच काम सोडून दिलं. त्यामुळं दुसरा कंत्राटदाराची नेमणूक करून शौचालयाचं काम पूर्ण केलं.बांधकामाच्या पूर्वी डिझाईनबद्दल वगैरे मंडळासोबत चर्चा नाही केली पण तरीही चांगल्या दर्जाचं बांधकाम झालं. बांधकामादरम्यान सध्याच्या शौचालयाशेजारीच तात्पुरत्या स्वरुपात ६ आसनांची क्षमता असणारं शौचालय उभारण्यात आलं होतं.

शौचालय चालवताना मुख्य अडचण येते ती, हे शौचालय वापरणाऱ्या स्थानिक आग्री आणि गाववाले ख्रिश्चन लोकांना हाताळणं.लाईट किंवा पाणी पुरवठा थोडा वेळ जरी नसला तर हे लोक लगेचच भांडणं करतात. केअरटेकरला मारहाण करतात. त्याची रूम शौचालयाच्या मागेच आहे. स्थानिक लोक दारू पिऊन शौचालयाच्या परिसरात गोंधळ घालतात. केअरटेकरला मारहाण तर नेहमीचीच असते. मुली आणि स्त्रियांना याचा काही त्रास नाही.

साधारण दिडशे लोक रोज ह्या शौचालयाचा वापर करतात. यातले ७० पास असून उरलेले बाजारातले विक्रेते आहेत.

विशेष नोंदी-

- वस्तीचा असहकार असूनही काम सुरू
- मंडळाच्या सदस्याचंही सहकार्य नाही.
- केअरटेकरला मारहाण
- स्वयंसेवी संस्थेनं मंडळासोबत चर्चा केली नाही
- बांधकामाचा चांगला दर्जा

## २२) रीटा कडलक, वय - ५५ वर्ष

### शिवशक्ती महिला मंडळ, संतोष नगर, गोरेगाव, मालाड पूर्व

रीटा यांचा जन्म मुंबईतलाच. माहेर आणि सासर दोन्ही नळटाकी भागातच. पण १९८७ च्या सुमारास त्या पतीसोबत गोरेगावला राहायला आल्या. या नवीन भागात बीएमसीचे शौचालय होतं. पण त्याची अवस्था फार बिकट होती. स्वच्छतेच्या नावानं बोंब होतीच. दरवाजे तुटलेले, पडायला आलेलं बांधकाम यामुळं मुलांना रस्त्यावर शौचाकरता बसवायचे. रस्त्यावर सर्वत्र घाणीचं साम्राज्य असायचं. कोणीही नातेवाईक घरी यायचे नाही. चोर आणि गर्दुल्यांचाही प्रचंड त्रास होता. महिलांच्या शौचालयात पुरूषही जायचे. शौचालयात मुली आणि महिलांवर अत्याचार व्हायचे. एकूणच इथलं शौचालय म्हणजे बजबजपुरी होती. साथीला वस्तीत दादागिरी करणारे लोकही होतेच. घराबाहेर फारसं कोणी पडायचं नाही. ही परिस्थिती बरेच वर्ष होती.

२००२ मध्ये सदाशिव पाटील नावाचे गृहस्थ नगरसेवक म्हणून निवडून आल्यावर त्यांनी सर्वात आधी वॉर्डात शौचालयांची कामं हाती घेतली. रीटा यांनी वस्तीतल्या महिलांसोबत जाऊन नगरसेवकांची भेट घेतली. नगरसेवकांनी त्यांना मंडळ बनवायला सांगितलं. या वस्तीत मराठी, दक्षणि भारतीय, मुस्लीम असा मिश्र समुदाय राहतो. लोकांना चांगलं शौचालय तर हवं होतं. पण गुंड, चोर आणि गर्दुल्यांच्या भीतीनं सगळे मागे हटत होते. रीटा यांनी त्यांच्या घरी मिटींग घेतली पण लोक तयार होईनात. नगरसेवकांनी लोकांना न घाबरता पुढं यायचं लोकांना आवाहन केलं. शेवटी रीटा आणि त्यांच्या पतीनं लोकांशी बोलून काही जणांना तयार केलं. मग १२ महिलांची नाव काढली आणि मंडळ बनवण्यात आलं.स्वयंसेवी संस्थेनं मंडळ स्थापन आणि रजिस्टर करण्याकरता मदत केली. शौचालयाच्या बांधकाम आणि डिझाईनबद्दल मंडळाच्या गरजा विचारण्यात आल्या नाहीत. पण रीटा सांगतात, “आम्हांला जे मिळालं ते पूर्वी पेक्षा खूप पटीनं चांगलं होतं त्यामुळं त्याबद्दल काही बोलायचा प्रश्नचं नव्हता. कारण शौचालयाला दिवसा जातानाही जीव आणि नाक मुठीत धरून जावं लागायचं. रात्रीच्या वेळी तर सरळ उघड्या जागेवरच्या खदानमध्ये जायचो”. २००४ मध्ये बांधकामानंतर शौचालय मंडळाच्या नावावर पूर्णपणे हस्तांतर झालं. २० सीट असणारं बैठं शौचालय बांधलं होतं. मंडळानं शौचालयाची देखभाल करायला सुरूवात केली. पण चोर-गर्दुल्यांचा त्रास सुरू झालाच. दरवाजाच्या कड्या तोडणं, पैसे न देणं, दारू करून भांडणं करणं हे रोजचंच सुरू झालं. आम्ही या त्रास देणाऱ्या लोकांकडे फार लक्ष दिलं नाही. कारण मुलांना त्रास नको व्हायला. सरळ नगरसेवकांना सांगायचो. ते अडचणीतून मार्ग काढायचे. शौचालय व्यवस्थित सुरू होतं. २००७ च्या निवडणुकीतही सदाशिव पाटील विजयी झाले. त्यांच्या कार्यकाळात शौचालयाच्या दुरूस्तीचं काम ते नीटपणे करून द्यायचे. हे शौचालय १० वर्ष व्यवस्थित सुरू होतं. त्या दरम्यान प्रथा संस्था आली. या संस्थेनं एक मजली शौचालय संकुल बनवून देऊ असं सांगितलं. मंडळ तयार झालं. लोकांचं हो-नाही सुरू होतं यात पाच वर्ष गेली. २०१२-१७ मधील नगरसेविका मनिषा पाटील यांनी शौचालय बांधकामाकरता त्यांच्या निधीत तरतूद करून ठेवली होती. २०१७ मध्ये मनिषा यांचा पराभव झाला. शौचालयाचं बैठं बांधकाम पाडून दुसरीकडं तात्पुरत्या शौचालयाची व्यवस्था करण्यात आली.. शौचालयाचं बांधकाम २ वर्ष रखडलं. नवीन नगरसेवक सुहास वाडकर यांना हे शौचालय स्वतःच्या ताब्यात हवं होतं. त्यांनी केअरटेकर बदलण्याचा घाट घातला. २०१८ मध्ये अर्धवट बांधकाम असूनही वाडकर शौचालयाचं उद्घाटन करण्याचा दबाव टाकत होते. शौचालयाचं प्रवेशद्वार अरुंद केलं. वाटेतल्या झाडाच्या फांद्या तोडण्याकरता विनंती केली तरी वाडकर काम उडवून लावत होते. बांधकाम निकृष्ट दर्जाचं झालं. उद्घाटनचा विषय मंडळानं अर्ज लिहून बीएमसी, आमदारांपर्यंत कळवला. आमदारांनी या विषयावर दोन्ही गटांची, बीएमसी अधिकारी बैठक बोलावली. बांधकामाची पाहणी केली. अनेक चुकीचं काम केलं होतं. जिने कमी उंचीवर होते. त्यावर मंडळानं आक्षेप घेतला. त्यानंतर आमदार सुनिल प्रभू यांनी आदेश दिले मंडळ आणि वस्तीच्या गरजेनुसार बांधकाम करा. त्यानंतर बांधकाम पूर्ण झाल्यावर मंडळाच्या ताब्यात शौचालय मिळालं. त्यानंतर नगरसेवक वाडेकर यांनी रीटा यांच्याकडे शौचालयाच्या चावीची मागणी केली. रीटा यांनी नकार दिल्यावर त्यांना धमकी दिली. वाडेकर स्वतःच्या केअरटेकरला घेऊन आले आणि जबरदस्तीने शौचालय ताब्यात घ्यायचा प्रयत्न केला. वस्तीतले लोक आणि मंडळाच्या महिलांनी विरोध केला. इतक्या वर्षांपासून

मंडळ शौचालयाची देखभाल करतेय. आता का बदलायचं असं म्हणत लोकांनी नगरसेवकाला घेराव घातला.या शौचालयावरून आजी-माजी नगरसेवकांमध्ये वाद पेटले. माजी नगरसेवक मंडळासोबत होते. लोकांनी व्हिडिओ शूटिंग केलं. उद्घाटनाचा बॅनर लावण्यावरूनही वाद झाला. पुन्हा एकदा मंडळ काढून घेण्याची धमकी वाडेकर यांनी केली. प्रथा संस्थाही नगरसेवकाच्या सांगण्यावरून शौचालय काढून घेत असल्याचं सांगत होती. दोन दिवसांनी सुरेश प्रभू यांच्या हस्ते उद्घाटन केलं. शौचालय सुरू झाल्यावर बांधकाम निकृष्ट झाल्याचं निदर्शनास आलं. पाण्याची प्रचंड गळती सुरू झाली. एक मजली शौचालय झाल्यावर सीटची संख्याही वाढली महिलांकरता खाली २० आणि पुरूषांकरता वरती २० अशी एकूण ४० शौचालय झाली. त्यामुळं पाणी कमी पडू लागलं. एक दिवस आड पाण्याचा टँकर बोलावायला लागायचा. बोअरवेल करता अर्ज दिला त्याच्यावर काहीच कारवाई नाही झाली. आमदार सुनील प्रभूंनी दोन महिन्यांपूर्वी बोअरवेल करून दिली. कोरोना काळातही नगरसेवकाची मदत नाही. आता मुली आणि महिलांना त्रास नाही.

रीटा स्वतः शिवसेना महिलाआघाडी वॉर्ड उपशाखाप्रमुख आहेत. बऱ्याच वर्षांपासून शिवसेना कार्यकर्त्या आहेत. दोन्ही नगरसेवक शिवसेनेचेच होते.

विशेष नोंदी-

- शौचालयाची योग्य व्यवस्था नसल्यानं रस्त्याचा शौचाकरता वापर
- गुंडाच्या दहशतीमुळे शौचालय बांधणीकरता वस्तीतल्या नागरिक पुढे यायला तयार नाहीत
- या नागरिकांना धीर देऊन सीबीओ स्थापण्याकरता त्यांचे मन वळवले.

- २००४ मधील बांधकाम मोडकळीस आल्यानं २०१८ मध्ये नवीन बांधकाम. पण या बांधकामाचा दर्जा चांगला नाही. त्यामुळं परत हाल सुरूच
- नगरसेवकाला स्वतःच्या ताब्यात शौचालय हवं असल्याने दबावतंत्राचा वापर

## २३. विमल बेलुस्कर वय - ६० वर्ष

### न्यू भीमनगर ट्रान्सीट कॅम्प असोसिएशन बैंगनवाडी हायवे, देवनार कॉलनी, गोवंडी

मुंबईत वेगवेगळ्या भागात राहणाऱ्या लोकांची घर काही कारणामुळं पाडली किंवा बीएमसीच्या कामगारांच्या राहण्याच्या सोयीकरता मुंबई महापालिकेनं ट्रान्झीट कॅम्प बनवला आहे. या ट्रान्झीट कॅम्पच्या आसपास कलेक्टर मालकीच्या जमिनीवर हळूहळू लोकांनी वस्ती वसवली. या वस्तीमध्येचविमल १९८५ पासून राहतात. ट्रान्झीट कॅम्पमध्ये ११६ घरं आहेत. वस्तीत त्याकाळी ५०-६० घरं होती. वस्तीतले लोक ट्रान्झीट कॅंपमधल्याच शौचालयाचा वापर करायची. या शौचालयांच्या सफाईकरता बीएमसीचे कामगार होते. त्याची नीट सफाई व्हायची. हळूहळू झोपडपट्टी वाढत गेली. १७० घर झाली. त्या दरम्यान स्पार्क संस्थेनं या वस्तीकरता स्वतंत्र शौचालय बांधता येईल असं सुचवलं. वस्तीच्या कामांसाठी रहिवाशांची एक स्थानिक समिती होती. या समितीच्या काही सदस्यांच मिळून मग मंडळ बनवण्यात आलं. स्पार्कनं सर्व कागदपत्रं हस्तांतरीत केली. मंडळाच्या नावावर पाणी आणि वीजेचा मीटर नावावर केले. महिलांकरता १० आणि पुरूषांकरता १२ अशा क्षमतेचं हे शौचालय बांधलं होतं. शौचालयाच्या बाहेर २ अतिरिक्त शौचालयही बांधले होते. रात्री उशीरा कोणाला जायचं असल्यास या अतिरिक्त शौचालयांचा वापर करता येत होता. सुरूवातीला मासिक पासाचे पैसे २० रुपये होते. ते नंतर शौचालय तुटेपर्यंत ४० रुपये करण्यात आले होते. या शौचालयाच्या सफाईकरता कंत्राट पद्धतीनं एक कुटुंब होतं. ते तिथचं राहायचे.

या भागात मुस्लीम वस्ती जास्त आहे. नळचोरी, डस्टबीन आणि शौचालयाच्या आतले पाण्याचे डबे चोरी हे प्रकार नियमित असायचे. चोरी थांबण्याकरता प्लास्टिकचे नळ बसवण्यात आले. तेलाच्या जुन्या डब्यांचा वापर शौचालयाच्या आत पाणी ठेवण्याकरता केला. महिला आणि मुलींकरता शौचालय आणि परिसरात सुरक्षति वातावरण होतं. पती-पत्नीला केअरटेकर म्हणून ठेवलेलं आणि मंडळाच्या महिलांची सतत ये-जा सुरू असल्यामुळं मुलींकरता चांगलं वातावरण असल्याचं विमल सांगतात.बांधकाम झाल्यापासून शौचालयाची दुरूस्ती पालिकेकडून करण्यात आली नाही. बऱ्याचदा अर्ज देऊनही बांधकामाची दुरूस्ती पालिकेकडून कधी केली गेली नाही. मंडळानं प्रत्येक वेळी स्वखर्चानंच सर्व दुरुस्ती केली. दरवाजे, नळाची दुरूस्तीही मंडळ यांची दुरूस्ती किंवा बदलणं हे तर मंडळाला स्वतःला करावं लागतंच होतं.

महापालिकेकडून पाच वर्षापूर्वी या शौचालयाची पुनर्बांधणी करण्यात येत असल्यामुळं, शौचालय तोडत असल्याचं पत्र मंडळाला मिळालं होतं.पण १० वर्षापूर्वीपासून या भागात एसआरए ची बोलणी सुरू असल्यामुळं मंडळ आणि वस्तीतल्या लोकांनी शौचालय तोडून पुनर्बांधणीला विरोध केला. अखेर एसआरए योजनेचं काम सुरू झाल्यामुळं,नोव्हेंबर २०२० मध्ये १७० पैकी १०० घरं तोडलीत आणि मंडळाचं शौचालयही तोडण्यात आलं.त्यामुळं सध्या पे एण्ड युज अंतर्गत असणाऱ्या शौचालयाचा वापर वस्तीतले लोक करत आहेत. वास्तविक ट्रान्झीट कॅंपमध्ये एक वर्षापासून नवीन शौचालय बांधून तयार आहे. ह्या एकमजली टॉयलेटचं उद्घाटनही झालं. पण अजून ते वापराकरता स्थानिक नगरसेवक विठ्ठल लोकरे यांनी खुलं केलं नाही. त्यामुळं वस्तीतल्या लोकांना पे एण्ड युज शौचालयाचा वापर करावा लागत आहे. हे शौचालय सुरू झाल्यास वस्तीतल्या लोकांना आणि ट्रान्झीट कॅंपमधील रहिवाश्यांचीही सोय होणार आहे. कारण ट्रान्झीट कॅंपमधील रहिवासीही पे एण्ड युज टॉयलेटचाच वापर करतात.

साधारण २०-२२ वर्ष या शौचालयाचं व्यवस्थापन मंडळानं केलं. या मंडळातर्फे बालवाडी चालवली जायची.

विशेष नोंदी –

- एसआरए योजनेमुळं घरांसोबत शौचालयही तोडण्यात आलं.
- वस्तीतली अजून ७० घर शिल्लक आहेत. त्यांना पे एण्ड युज शौचालयांचा वापर करावा लागत आहे.
- वस्तीच्या शेजारीच असणाऱ्या ट्रान्झीट कॅंपमध्ये २०१९ पासून नवीन शौचालय बांधून तयार आहे. नगरसेवकाच्या आडमुठेपणामुळे उद्घाटन होऊनही हे शौचालय नागरिकांना वापरता येत नाही.

## २४) सरस्वती भोसले वय - ६५ वर्ष

### ओम साई सेवा मंडळ, साईनाथ नगर, घाटकोपर

सरस्वती ह्या भागात ४५-५० वर्ष राहत आहेत. त्या स्वतः २००२ ते २०१२ या काळात इथल्या नगरसेविका होत्या. त्या नगरसेविका झाल्यावर त्यांनी प्रभागामध्ये सर्वात आधी सहा शौचालये नवीन बांधली. या भागात म्हाडानं ५० वर्षांपूर्वी पत्र्याचे संडास बांधले होते. मराठी, गुजराथी आणि उत्तर भारतीय अशी मिश्र लोकवस्ती या भागात आहे. ह्या बैठ्या शौचालयाची दारं पाण्यामुळं वारंवार कुसायची. दारं खालून तुटायची. महिलांची त्यामुळं खूप गैरसोय व्हायची. सतत तक्रारी करत राहायचे. सरस्वती यांचे पती शाखाप्रमुख होते. सरस्वती निवडून आल्यावर पहिलं शौचालयांकडे लक्ष दिलं. त्यांच्या वॉर्डात त्यांनी सहा शौचालयांची कामं सुरू केली. स्थानिक रहिवाशांची मंडळं या सर्व शौचालयांचं व्यवस्थापन करतात. एका मंडळाचे अध्यक्ष सरस्वती यांचे पती आहेत. इतर पाच मंडळांचे पदाधिकारी स्थानिक रहिवाशीच आहेत. त्यांचे पती अध्यक्ष असलेलं आनंद नगरचं शौचालय सर्वात पहिलं सुरू झालं. सरस्वती सांगतात, या शौचालयांच्या बांधकाम आणि सर्व सुविधांकरता महापालिका अधिकाऱ्यांची चांगलं मार्गदर्शन आणि मदत झाली. सरस्वती स्वतः नगरसेविका असल्यामुळं या कामात त्यांना अडचण जाणवली नाही. त्यांच्या घरात २५ वर्षांपासून शौचालय आहे. पण स्वतः महिला असल्यामुळं वस्तीतल्या महिलांचा त्रास त्यांना दूर करायचा होता. त्याकरता त्यांनी प्रयत्न केले. त्या नगरसेविका असल्यामुळं त्या कोणत्याही मंडळात सहभागी झाल्या नाहीत. शौचालयांच्या तक्रारी सोडवण्याकरता प्रयत्न, मदत करायच्या. पदावर असताना या सर्व शौचालयांची त्या नियमितपणे तपासणी करून स्वच्छता आणि इतर गोष्टींवर देखरेख ठेवायच्या. त्यांचे पती अध्यक्ष असलेल्या मंडळाच्या ताब्यातल्या शौचालयाचं बांधकाम अजूनही चांगल्या स्थितीत आहे. मंडळावर नसल्या तरी सध्या शौचालयाचं काम त्या पाहतात. तिनशे लोक ह्या शौचालयाचा वापर करतात. काही लोक मासिक पासाचे द्यायला टाळाटाळ करतात. त्यामुळं आर्थिक लाभ होत नाही. शौचालयाच्या देखभालीचा आणि पाणी, विजेचा खर्च भागतो. दुरुस्ती काही असल्यास त्याकरताही मंडळ स्वतः खर्च करतं. शौचालयाच्या परिसरात महिला आणि मुली सुरक्षति वातावरण आहे.

नगरसेविकांनी पुढाकार घेतला तर लोकांना पायाभूत सुविधा मिळण्याकरता सोप होतं. अधिकाऱ्यांवरही उत्तम काम करण्याकरता दबाव राहतो.

विशेष नोंदी –

- नगरसेवकांनी वस्तीच्या कामात रस घेतला आणि लोकांच्या गरजा ओळखून काम केलं तर संपूर्ण वस्तीला त्याचा लाभ
- पदावर असूनही लाभाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करत वस्तीविकासाला प्राधान्य
- पदाचा वापर प्रशासन आणि नागरिक यांच्यातील मध्यस्थ म्हणून केला

## २५) सुनंदा साबळे (खजिनदार), अश्विनी गाढवे (सचीव), सुशीला (अध्यक्षा)

### प्लॉट नं ११, एकता महिला सहयोगिता मंडळ, शिवाजी नगर, गोवंडी

बैंगनवाडी आणि शिवाजीनगर हे दोन्ही भाग मिळून १५० प्लॉट आहेत. १९७३ ला गौतमनगरची वस्ती एका प्रकल्पाकरता उठवली. तसेच मुंबईत रस्ता रुंदीकरणाच्या कामात घरं गेली, अशा लोकांकरता राहण्याची सोय या प्लॉटस्‌मध्ये महानगरपालिकेनी केली. १९७५ च्या आसपास हे प्लॉट तयार केले. या प्रत्येक प्लॉट मध्ये शौचालय आणि गटार यांची बांधणी आधीच केली होती. त्यानंतर लोक इथं राहायला आले. एका प्लॉटमध्ये समोरासमोर अशी एकूण २०० घर आणि त्याकरता मध्यभागी एक शौचालय संकुल, मुलांना खेळण्याकरता मोकळी जागा अशी रचना इथं महापालिकेनं केली. जमिनीचे एक सारख्या आकाराचे आराखडे करून पालिकेनं लोकांना जमिन उपलब्ध करून दिली. त्या दिलेल्या आकारात स्वखर्चानं लोकांनी घरं बांधली.

या महिला त्यांच्या लग्नापासून २५-२६ वर्षापासून या वस्तीत राहतात. त्यांची कुटुंब १९७५ पासून इथं राहतात. महिलांकरता १० आणि पुरूषांकरता १० अशी या शौचालयांची रचना होती.या शौचालयांची साफसफाई महापालिकेकडून होत असे. २००५ पर्यंत या शौचालयाकरता कायम स्वरुपी सफाई कामगार होते. त्यांच्या राहण्याची सोयही या प्लॉटमध्येच होती. त्यामुळं साहजिकच शौचालयांची सफाई व्यवस्थित व्हायची.पण २००५ नंतर हे कामगार निवृत्त झाले. नंतरचे सफाई कामगार नियमित यायचे नाहीत. त्यामुळं अस्वच्छता असायची. २०१३ मध्ये या शौचालयाची दुरूस्ती करण्यात आली. पण काम निकृष्ट दर्जाचं झाल्यानंशौचालयाचं बांधकाम खचू लागलं होतं. फरशा निखळू लागल्या होत्या. आत गेल्यावर शौचालय कधीही पडेल अशी भीती सतत असायची. एक सफाईकामगारही काम करत असताना खड्ड्यात पडला होता. इथले रहिवासी शौचालयाच्या दुरूस्तीकरता नगरसेवकांकडे, महापालिकेकडे सतत पाठपुरावा करत होती. सुशीला याकरता खूप मेहनत घेत होत्या. पण आमदार, नगरसेवक आणि महापालिका बजेट नसल्याचं कारण नेहमी सांगायचे. कारण २०१३ मध्येच दुरूस्ती झाली होती. त्याला दहा वर्ष झाली नाहीत, त्यामुळं परत दुरूस्ती होणार नाही असं पालिकेचं म्हणणं होतं.२०१८ पासून यासर्वांचे खूप प्रयत्न सुरू होते.या महिला गटागटानं रोज पालिका आणि नगरसेवक कार्यालयाच्या चकरा मारायच्या. दुसरीकडे सोय नसल्यामुळं जीव मुठीत घेऊन शौचालयाचा वापर सुरू होता. स्वतःच पैसे काढून रहिवासी समिती सफाई करून घ्यायचे. मंडळानं रहिवाशांकडून पैसे गोळा करून लाईट कनेक्शनही घेतलं. सफाई आणि लाईट असल्यामुळं ह्या प्लॉटच्या शौचालयाचा वापर इतर प्लॉटमधील नागरिकही करायचे.

अखेरिस नवीन शौचालयाचं काम मंजूर झालं. २०१८ मध्ये स्वयंसेवी संस्था सर्वेक्षण आणि मंडळ बनवण्याकरता आली. सुशीला यांच्या घरात बैठक झाली. यावेळी पाठपुरावा करणाऱ्या महिलांना केवळ सभासद बनवून पुरूष मंडळींना मंडळाचे पदाधिकारी बनवण्यात आलं. यावेळी कोरो कार्यकर्ते महिलांच्या सोबत आले. महिलांनी मंडळ पदाधिकाऱ्यांवर हरकत घेतली. कंत्राटदार, स्वयंसेवी संस्था आणि महिलांमध्ये वादावादी झाली. महापालिकेकडेही या महिलांनी खूप चांगल्या प्रकारे पाठपुरावा केला. त्यामुळं पालिकेवर दबाव निर्माण झाला. पालिकेच्या काही अधिकाऱ्यांचं म्हणणं होतं की, महिलांना शौचालयाच्या व्यवस्थापनात रस नाही. पण या महिलांनी मुंबई मिररला मुलाखत देऊन आम्ही शौचालयाचं व्यवस्थापन करायला तयार आहोत.पालिकेनं आम्हांला संधी द्यायला हवी. विरोधाला सत्कारात्मक पद्धतीनं हाताळल्यामुळं, स्वतः विश्वासानं गोष्टी करू शकतो हे पटवून सांगितल्यामुळं माध्यमातूनही पालिकेवर दबाव आला. याचा परिणाम मंडळाला शौचालय मिळण्यात झाला. त्यानंतर या महिलांची नाव मंडळात पदाधिकारी आणि कार्यकारणीमध्ये आली. महिलांमध्ये हुरूप आला.

नगरसेवक जरी शौचालयाकरता सहकार्य करत नव्हते, तरी महिलांनी त्यांच्याकडेही पाठपुरावा सुरूच ठेवला. कोणाशीही भांडण न करता पाठपुरावा आणि दबाव महिला संघटीतपणे करत राहिल्या. या सर्व प्रयत्नांमुळं कंत्राटदारामध्येही चांगला बदल झाला. त्याच्याकडच्या इतर शौचालयांच्या बांधकामांकरता तो आता कोरोच्या संपर्कात असतो.

एप्रिल २०१९ मध्ये हे शौचालय पूर्ण तोडलं. नवीन बांधकामसुरू झालं. पण कोरोना लॉकडाऊनच्या काळात काम थांबलं. त्यामुळं काम पूर्ण व्हायला १८ महिन्यांचा काळ लागला.

बांधकामाला प्रत्यक्ष सुरुवात होण्यापूर्वी महिलांनी डिझाईन पाहून घेतलं. त्यांच्या गरजांनुसार काही बदलही सुचवले. त्यामुळं त्यांना हवं तसं बांधकाम झालं.त्यात देखरेख करणाऱ्यांकरता बसण्याची सोय, महिलांच्या प्रवेशाच्या जागी पार्टिशन अशा गोष्टी सुचवल्या. बांधकामादरम्यान मंडळाच्या महिला स्वतः देखरेख करायच्या. बांधकामाच्या जागी थांबायच्या. कंत्राटदारासोबत नियमित चर्चा करायच्या. एम वॉर्डच्या अधिकाऱ्यांसोबतही महिलांचा नियमित संपर्क असायचा. कंत्राटदारानं जर महिलांच्या सूचना ऐकल्या नाहीत तर त्या लगेच पालिका अधिकाऱ्यांना नजरेस ही बाब आणून द्यायच्या. यामुळं दबाव निर्माण होऊन बांधकाम चांगलं आणि वेगात झालं.प्लॉटमधल्या सर्व पुरुषांच्या जुन्या शौचालयांमध्ये मुताऱ्या आहेत. पण स्त्रियांच्या शौचालयात स्वतंत्र मुताऱ्या नाहीत. पुरुषांच्या ह्या मुताऱ्या शौचालयाच्या मागील भागात उघड्या आहेत. तिथं गर्दुल्यांचा वावर खूप असतो. महिला आणि पुरूष सर्वच रहिवाशांना ते त्रासदायक आहे. या त्रासामुळं मंडळानं नवीन शौचालयात मुतारी नको ही मागणी ठामपणे मांडली. त्यामुळं होणारा त्रास अधिकाऱ्यांना पटवून सांगितला. यामुळं नवीन शौचालयात मुतारी नाही.अजूनही नवीन बांधकामानंतरही रात्री साडे दहानंतर गर्दुल्यांचा त्रास होतोच.

नवीन बांधकामादरम्यान प्लॉट नं २ मधील शौचालयाचा वापर प्लॉट ११ चे रहिवाशी करायचे. प्लॉट नं २ च्या शौचालयाची सफाई महापालिकेचे कंत्राटी कामगार ४-५ दिवसांनी करतात. डिसेंबर २०२०च्या पहिल्या आठवड्यात हे शौचालय वापराकरता खुलं करण्यात आलं. हे शौचालय एक मजली बांधलं तरी जागेच्या अडचणीमुळं महिला आणि पुरूषांकरता एकच प्रवेश आहे.

फक्त शौचालयाचं बांधकाम नीट करण्यावर या महिला थांबल्या नाहीत. मुतारीकरता जी जागा होती त्याठिकाणी शौचालयाची देखरेख करणाऱ्या २ व्यक्तींच्या राहण्याकरता खोली बांधण्यात आली आहे. त्यांच्याकरता खोलीत पंख्याची, राहण्यायोग्य सोय मंडळानं स्वतः केली. नगरसेवकांच्या निधीतून प्लॉटच्या आतल्या खराब झालेल्या रिकाम्या जागेत फरशा बसवून घेतल्या. याकरता सतत पाठपुरावा केला. मंडळाच्या सदस्या नसलेल्या प्लॉटमधील रहिवासी महिला पुरूषांचाही मंडळाला चांगली साथ मिळत आहे. त्यामुळं नगरसेवकाकडे पाठपुराव्याकरता सर्व जण एकत्र जात असतात. प्लॉटमधल्या साईबाबा मंदिराजवळ त्यांची एकत्र भेटण्याची, बैठकीची जागा आहे. महिन्यातून एकदा तरी सर्व तिथं भेटतात. एक वेळ ठरवून त्यावेळी नगरसेवकाला बोलावलं जायचं. प्लॉटमध्ये एकी आहे हे नगरसेवकाला दाखवून दिलं जायचं. अशाप्रकारे त्याच्याकडून काम करवून घेणं सोपं झालं. या वस्तीत मराठी, मुस्लीम सर्वच राहतात. सर्वजण एकीनं येतात. नगरसेवकाच्या कार्यालयातही वेळ घेऊन मंडळाच्या सदस्या आणि  रहिवासी महिला एकत्र जायच्या. नगरसेवकाकडून शौचालयाच्या आजूबाजूला फरशा टाकणे, प्लॉटच्या गल्ल्यांमध्ये सिमेंट कोबा बनवून घेणे, शुद्ध आणि नियमित पाणी पुरवठा ही काम करवून घेतली.

या प्लॉटमध्ये २५० घरं आहेत. त्यातल्या १५० घरांमध्ये आता शौचालयं आहेत. मंडळाच्या ११ पैकी फक्त एकाच सदस्याकडे घरात शौचालय नाही. या सर्व महिला प्लॉटच्या विकासासाठी इतर रहिवाशांच्या सोयीसाठी एकत्र येऊन झटत आहेत. प्लॉटमधलं शौचालय नीट असेल तर तिथले रहिवासी संघटित असतील, तर त्याचा फायदा हा प्लॉटच्या विकासाकरता आणि सुरक्षेकरता आहे हे या लोकांना व्यवस्थित कळलं आहे. त्यामुळं हे संघटित प्रयत्न झाले. घरात जरी शौचालय असले तरी ड्रेनेज लाईन नसल्यामुळं तुंबण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळं प्लॉटमधल्या सर्वांकरताच सार्वजनिक शौचालय असणं हे गरजेचं आहे.

एम वॉर्डच्या मॅपिंगमध्ये  सेप्टीक टँक सिव्हरेजला जोडले गेले नसल्यामुळं शौचालय वारंवार तुंबत असल्याचं कोरोच्या लक्षात आलं. त्यामुळं या शौचालयाच्या बांधकामादरम्यान यागोष्टीकडे विशेष लक्ष देण्यात आलं. या शौचालयाचा सेप्टीक टँकही आहे आणि तो मुख्य सिव्हरेज लाईनलाही जोडण्यात आला आहे. त्यामुळं इथं शौचालय तुंबण्याची अडचण होणार नाही.

या शौचालयाच्या कामामुळं महिलांमध्ये खूप चांगल्याप्रकारे आत्मविश्वास आला. संघटितपणे काम कसं करावं, नेमक्या

कोणाकडे आपलं काम घेऊन जावं आणि त्याचा पाठपुरावा करावा हे लक्षात आलं. त्यामुळं मेहनत वाया नाही गेली. पूर्वी फक्त कर्मचाऱ्यांकडे जायचो. अधिकाऱ्यांकडे जायचो नाही. ह्या गोष्टी लक्षात आल्या. सर्वांना घरातूनही चांगला पाठिंबा मिळतो.. एकमेकींची घरची काम सांभाळून दोन दिवस आधीचं भेटीचं नियोजन व्हायचं. प्लॉटमध्ये एकत्र भेटून मगच पुढे नगरसेवक, अधिकाऱ्यांकडे जायचो.. अगदी नगरसेवकाला भेटायला जाताना प्लॉटमधील तरूण मुलं नगरसेवकाच्या कार्यालयात जाऊन बसायचे तो आला की महिलांना कळवायचे. मुलं तिथून निघायची आणि महिला तिथं पोहचायच्या. असं व्यवस्थित नियोजन करून महिलांनी काम केली. रहिवासी आणि महिलांची एकी, संघटन एवढ्या मोठ्या प्रमाणात दिसल्यानं समाजवादी पक्षाचा नगरसेवक इरफान खानला त्यांची काम करण्याचा दबाव निर्माण झाला. मताकरता एवढ्या मोठ्या संख्येला नाराज करणं त्याला परवडणार नाही.

आता मंडळाचा पुढचं नियोजन बालवाडी, महिला कौशल्य विकास प्रशिक्षणाकरता हॉल बांधण्याच्या प्रयत्नात आहेत.

विशेष नोंदी –

- सुरवातीला शौचालय पुनर्बांधणीकरता प्रयत्न करणाऱ्या महिलांना सीबीओत स्थान दिलं नाही. काही प्रशासकीय अधिकाऱ्यांची तयारी नव्हती. महिलांनी मिडियाची मदत घेत महिला शौचालय व्यवस्थापनाला तयार असल्याचं सांगितलं. याची दखल पालिकेला घ्यावी लागली.
- महिलांना वस्तीची साथ आणि एकी. संपूर्ण वस्तीनं गटागटानं महापालिका आणि नगरसेवकाकडे जाऊन दबाव निर्माण केला.
- अधिकारी, नगरसेवक, कंत्राटदार आणि संस्था या सर्व ठिकाणी महिला संघटीतपणे जाऊन आपलं म्हणणं मांडत होत्या. त्यामुळं त्यांच्या मागण्यांची दखल घ्यावी लागली.
- नीट नियोजन करून वस्ती शौचालयाचे काम करून घेतले. वस्तीच्या गरजेनुसार बांधकाम रचनेत बदल सुचवले. त्याप्रमाणे काम करवून घेतलं.
- एम वॉर्डच्या मॅपिंगमध्ये सेप्टीक टॅंक सिव्हरेजला जोडले नसल्यामुळं शौचालय वारंवार तुंबतात. त्यामुळं या शौचालयाच्या बांधकामादरम्यान यागोष्टीकडे विशेष लक्ष देण्यात आलं. या शौचालयाचा सेप्टीक टॅंकही आहे आणि तो मुख्य सिव्हरेज लाईनलाही जोडण्यात आला आहे. त्यामुळं इथं शौचालय तुंबण्याची अडचण होणार नाही.

## २६) राजश्री नोडकर वय – ४८ वर्ष

**राजश्री महिला सेवा सहकारी संस्था, जवाहर नगर, रोड नं २०, गोरेगाव पश्चिम, मुंबई.**

राजश्री मूळच्या रायगडमधल्या माणगावच्या. २० वर्षापूर्वी लग्नानंतर गोरेगावात आल्या. त्यांचं दहावीपर्यंत शिक्षण झालं. माणगावमध्येही त्यांना सार्वजनिक शौचालयाचाच वापर करावा लागत होता. सफाई नसल्यामुळं प्रचंड गलिच्छ वस्ती, वीजही नाही अशा परिस्थितीत तिथं जावं लागायचं. त्यामुळं सरळ दिवसा शौचालयात जाणं टाळून रात्रीच्या अंधारात शेतात नैसर्गिक विधीकरता जावं लागायचं. गोरेगावमध्ये आल्यावर या वस्तीत आमदार निधीतून म्हाडाचं शौचालय बांधलेलं होतं. पण इथंही साफसफाईच्या नावानं बोंब होती. वस्तीतल्या महिला पैसे काढून सफाई करून घ्यायच्या. हळूहळू राजश्री यांचा संपर्क शिवसेनेशी आला. तिथं त्यांना बचतगट आणि इतर कामांबद्दल कळलं. त्यांनी मग २०१३ मध्ये स्वतःची संस्था बनवली. संस्थेच्या माध्यमातून दत्तकवस्तीचं काम करू लागल्या. २०१४ मध्ये वस्तीत शौचालयाच्या बांधकामाचा विषय निघाला. काँग्रेसच्या स्थानिक नगरसेविकेनं राजश्री यांच्या संस्थेची शिफारस केली. त्यांच्या संस्थेत त्या अध्यक्षा, सेक्रेटरी आणि खजिनदार जास्त क्रियाशील आहेत. वस्तीत सर्वेक्षण झालं. लोकांनी सहकार्य केलं. सर्वांचा त्यांच्या मंडळाला पाठिंबा मिळाला. पण २०१५ मध्ये बांधकाम सुरू असताना वस्तीत तणावाला सुरूवात झाली. बांधकामादरम्यान दारूडे लोक कंत्राटदारालाही त्रास द्यायचे. त्याच्याकडून पैसे घ्यायचे. भाजप कार्यकर्ते बांधकाम पूर्ण झाल्यावर वस्तीत अफवा पसरवायला लागले. या शौचालयाकरता महिला मंडळाला सरकार पैसे देतं त्यामुळं मासिक पास किंवा दैनंदिन वापराचे पैसे द्यायची गरज नाही. ह्या महिला आपले पैसे लाटतात. असा गैरसमज वस्तीत पसरवू लागले. ह्यामुळं शौचालयाचा वापर करूनही लोक पैसे देत नव्हते. पैसे मागायला गेल्यावर लोकं भांडणं करायचे. वर्षभर अध्यक्षा, खजिनदार आणि सेक्रेटरी ह्यांनी स्वखर्चानं साफसफाई तर केलीच शिवाय पाणी आणि वीजबीलही भरलं. मग हळूहळू ह्या तिघींनी वस्तीत जनजागृती केली. लोकवर्गणीतून ह्या गोष्टी करायच्या आहेत हे लोकांना ह्या तिघींनी समजावलं. मग लोक पैसे देऊ लागले. तरीही अजून काही लोक पैसे देत नाहीतच. लोकांना सुविधा हव्यात पण पैसे खर्च करायला नको असं राजश्री खेदानं म्हणतात. १ हजार लोकवस्ती असणाऱ्या या भागात मराठी, उत्तर भारतीय आणि ख्रिश्चन लोक राहतात. ह्या शौचालयाचा वापर साधारण २५० घरं करतात. तळमजल्यावर महिलांकरता ११, अपंगांकरता १ आणि पुरुषांकरता वर १२ सीटसच शौचालय आहे. मराठी लोक पासाची रक्कम देतात. पण अमराठी लोक पैसे न देता भांडणं करतात. लॉकडाऊन काळात भाडेकरू सोडून गेले त्यामुळं तेही नुकसान झालंच. शेजारील वस्तीतलं शौचालय तोडल्यामुळं तिथले लोकंही ह्याच शौचालयाचा वापर करतात.

२०१७ पासून भाजपचा नगरसेवक सत्तेत आहे.तेव्हाच बांधकामही पूर्ण झालं. उद्घाटनाआधीच नगरसेवकानं लोकांना शौचालय वापरण्याकरता खुलं केलं. आधीच्या नगरसेविकेच्या निधीतून बांधकाम झालेलं तरी भाजप नगरसेवक त्याच्या नावाची पाटी लावण्याकरता दबाव टाकत होता. राजश्री यांनी त्याला विरोध केला. त्याची पाटी लावली नाही. शौचालयाला पाण्याचा खूप त्रास होता. पण नगरसेवकानं त्याकरता काही मदत केली नाही. उलट सफाई नाही अशी तक्रार करत पालिका कार्यालयात बोलावून सुनावलं. आता मंडळानंचं खटपट केल्यावर पालिकेनं पाण्याची जोडणी दिली आहे. त्यामुळं पाण्याची समस्या नाही.

वस्तीतले दारूडे आणि जुगारी गच्चीवर जाऊन दारू पितात. जुगार खेळतात. पावसाळ्यात ह्या लोकांनी गच्चीवर त्यांचे कार्यक्रम करता यावेत यासाठी छत बांधलं. राजश्री आणि सोबतच्या महिलांनी हे छत तोडलं. पोलिसांकडे कितीही तक्रारी दिल्या तरी या दारूडे आणि जुगाऱ्यांवर कारवाई करत नाहीत. दारूडे लोक लाथा मारून दरवाजे तोडतात, पाण्याचे पाईप तोडतात, लाईट तोडतात. त्यामुळं खर्चात भर पडत असते. राजश्री आणि मंडळाच्या इतर महिलांच्या घरातच शौचालय आहे. वस्तीकरता त्या हा त्रास सहन करत आहेत. पण आता रोजच्या त्रासाला ह्या सर्व महिला कंटाळल्या आहेत. त्यामुळं व्यवस्थापन सोडण्याच्या निर्णयाला त्या आल्या आहेत.

विशेष नोंदी-

- लहानपणापासूनच शौचाकरता बाहेर जावं लागतं असल्यानं घाण आणि अस्वच्छतेचा सामना करावा लागल्यानं,

स्वच्छ शौचालयाकरता प्रयत्न

- बांधकाम सुरू करताना लोकांचा पाठिंबा. पण काही राजकीय कार्यकर्त्यांनी स्वार्थाकरता वस्तीत सीबीओबद्दल अफवा पसरवायला सुरवात केल्या. त्यामुळं वस्तीत तणावाचं वातावरण
- सीबीओनं वर्षभर वैयक्तिक वर्गणीतून वस्ती शौचालयाचे वीज आणि पाणी बील भरलं.
- नगरसेवकाला स्वतःच्या नावाची पाटी शौचालयावर हवी असल्यानं सतत त्रास देणं सुरू
- लोकजागृती करूनही काही लोक अजूनही पैसे देत नसल्यानं देखभाल करण्यात अडचणी
- जुगारी आणि दारुड्यांचाही त्रास प्रचंड
- सीबीओच्या सर्व सदस्यांच्या घरात वैयक्तिक शौचालय असूनही वस्तीतल्या इतर महिलांकरता प्रयत्न करतात पण आता नेहमीच्या त्रासाला कंटाळून व्यवस्थापन सोडण्याच्या विचारात.

# २७) कविता खोमणे, सविता

## श्री दत्तगुरू महिला मंडळ, आदरवाडी, मानखुर्द

दोघीही वर्धा जिल्ह्यातल्या. लग्नानंतर दोघीही मुंबईत आल्या. सविताचं शिक्षण तेरावीपर्यंत झालेलं. तेरावी झाल्यावर लगेचच लग्न झालं. इथं आल्यावर दोन वर्षांनी त्यांनी आंगणवाडी सेविकेचं प्रशिक्षण घेतलं. लगेचच त्या कामावर रूजू झाल्या. गावी घरातच शौचालय आहे. त्यामुळं २००० साली इथं आल्यावर सुरूवातीला बाहेर जाणं मुष्किल व्हायचं. हे शौचालय म्हाडाचं होतं. इथं वीज आणि पाण्याची सोय नसतेच. वस्तीकरता पुरेस होतं पण सोयी-सुविधा नसल्यामुळं अडचणीचं होतं. महापालिकेचा माणूस येऊन सफाई करतो. महापालिकेतला माणूस कधी यायचा कधी नाही. मग वस्तीतले लोकच पैसे काढून सफाई करायचे. इथल्या गर्दी आणि अस्वच्छतेमुळं त्यांना खूप त्रास व्हायचा.

नगरसेवकानं वस्तीत नवीन शौचालय बांधण्यात येणार असून, एका मंडळाला व्यवस्थापक म्हणून नेमण्यात येणार असल्याचं, वस्ती बैठकीत सांगितलं. यावरून वस्तीतल्या दोन पुरूष मंडळांमध्ये खूप वाद झाले. मग वस्तीतल्या काही पुरूषांनी महिलांचं मंडळ बनवण्याची सूचना केली. त्रिरत्न प्रेरणा मंडळानं महिला मंडळ बनवण्याकरता मार्गदर्शन केलं. १३ जणींनी मिळून मंडळ बनवलं. सुरूवातीला मंडळाकरता काही लोकांचा विरोधही होता. मग ह्या महिला मंडळानं वस्तीकरता आरोग्य तपासणी शिबीरं, संविधान दिवस, शौचालय दिन, वृक्षारोपण साजरे केले. हळूहळू वस्तीतून विरोध कमी होऊ लागला. अशा रितीनं फेब्रुवारी २०२० मध्ये मंडळांचं रजिस्ट्रेशन झालं.मंडळानं १५० घरांचा सर्वे केला.

शौचालयाच्या बांधकामा दरम्यान मंडळाच्या सर्व सदस्या काटेकोरपणे देखरेख करत होत्या. बांधकामाचा दर्जा, नळ, टाईल्सचा रंग, शिडी कुठे हवी, दरवाजे, पाईप कुठे टाकायचा, बाहेर सिमेंट कोबा याबाबत सर्व महिला सदस्यांनी सांगितलं. त्यांना हवं तसं काम करवून घेतलं. बांधकामादरम्यान आजूबाजूला राहणाऱ्या काही लोकांनी जागेसाठी विरोध केला होता. पण आता तो विरोध मावळला आहे. सेप्टिक टँक शौचालयाच्या खाली बसवण्यात आला आहे. वस्तीच्या आतमध्ये लोकांना सोयीच्या ठिकाणी शौचालय आहे. महिलांकरता ५, पुरूषांकरता ५आणि अपंगांकरता २ अशी फक्त तळमजला शौचालयाची रचना आहे. बांधकाम १५ डिसेंबर २०२० च्या आसपास हे बांधकाम पूर्ण झालं.

शौचालयाच्या व्यवस्थापक सीबीओला विश्वासात न घेता माजी नगरसेवकांनी स्वतःच या शौचालयाचे उद्‌घाटन केले. इतकचं नाही तर लोकांना सांगितलं की हे शौचालय वापरासाठी मोफत आहे. मोफत म्हटल्यावर लोक पैसे कसे देणार?सीबीओ लोकवर्गणी मागायला गेली तेव्हा ७०% लोकांनी पास घेतले होते. पण माजी नगरसेवकाच्या बाजूच्या ३०% लोकांनी पैसे देण्यास नकार दिला. पण यामुळं ज्या७०% लोकांनी पैसे दिले होते, ते लोकही इतर लोक शौचालय मोफत वापरतात मग आम्हीच का पैसे द्यायचे? असं विचारू लागले.सीबीओने परत लोकजागृती करायला सुरूवात केली. वस्ती सुधारणा कार्यक्रमांतर्गत शौचालय बांधणी, देखभाल आणि त्यातील लोकसहभाग हे समजावून सांगितलं. सीबीओनेप्रत्येक घराला १०० रुपये मासिक वर्गणी ठरवली. पण स्थानिक अधिकाऱ्यांनी माजी नगरसेवकाच्या दबावाखाली ४० रुपये मासिक वर्गणी ठेवायला सांगितली. परिणामी शौचालयाचा स्वच्छता आणि देखभाल खर्च भागवला जात नाही. सीबीओ वैयक्तिक मासिक सभासद फी काढून शौचालयाचा देखभाल खर्च भागवत आहे आणि आपली व्यवस्थापनाची जबाबदारी नीटपणे पार पाडत आहे.

वस्तीमध्ये सर्व मराठी भाषिकच राहतात. या मंडळातल्या सर्व महिला शिक्षति आहेत. सर्व महिला एकत्र कोणत्याही कामासाठी जातात. सर्व महिला कामासाठी उत्साही आहेत. कविता सांगतात, त्या आतापर्यंत वीस वर्षात कधी बाहेर पडल्या नव्हत्या. पण आता गावासाठी, समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द आहे. शौचालयाच्या कामामुळं ह्या महिलांमध्ये चांगला हुरूप आला आहे. सर्व महिलांना घरातून चांगला पाठिंबा आहे. कोरोना काळात संकल्प स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून लोकांना मास्क आणि सॅनिटाईझर वाटप केलं.

विशेष नोंदी –

- शौचालयाच्या निमित्तानं घराबाहेर न पडलेल्या महिलांचा सार्वजनिक जीवनाला सुरूवात
- माजी नगरसेवकाच्या आडमुठेपणामुळं वस्ती आणि सीबीओत तणाव
- निवडणुकीवर डोळा ठेवून माजी नगरसेवकाची लोकांना फूस
- वस्ती स्वच्छता कार्यक्रमालाच हरताळ
- सीबीओचा लोकजागृतीचा प्रयत्न पण अजून फारस यश नाही
- वैयक्तिक खर्चातून शौचालयाच्या देखभालीचा खर्च भागवणे

## २८) जयश्री बोभाटे/ रंजना बनसोडे

### श्री महालक्ष्मी महिला संघ, भगतसिंग नगर, गोरेगाव पश्चिम

१९७२ च्या दरम्यान बेस्टचं गोरेगाव आगार झालं. आजूबाजूला खाडीचा परिसर, दलदल होती. कोणीतरी एकानं या दलदलीत मातीचा भराव टाकला आणि झोपडी बांधली. अशीच एक-एक झोपडी वाढत गेली आणि या भागात मातंग समाजाची वस्ती वसली. आता या भागाता मुस्लीम, उत्तर भारतीय, दक्षणि भारतीय सर्वच समाजाची वस्ती आहे. १९८९ पर्यंत वस्तीतल्या छोट्या रोडच्या बाजूलाच एका बाजूस पुरूष आणि एका बाजूस स्त्रिया शौचास बसत. तोपर्यंत वस्तीत वीजही नव्हती. नगरसेवक सुहास सामंत यांनी रिंग रोडजवळ शौचालय बांधलं. वस्ती वाढली होती. त्यामुळं महिलांना हे शौचालय पुरायचं नाही. त्या बाहेरचं जायच्या. कचरा टाकण्याच्या जागीही एका माणसानं वस्ती वसवली. मग सुहास सामंत यांनीच १९९४-९५ मध्ये २४ सीटसच शौचालय बांधलं. २००३-०४ च्या दरम्यान तत्कालीन नगरसेवक दिलीप शिंदे यांनी या शौचालयाची दुरूस्ती केली.२०१२ मध्ये दिलीप शिंदेंच्या पत्नी नगरसेविका झाल्या. त्यांनी २०१२ मध्ये शौचालयाची दुरूस्ती केली. त्यावेळी त्यांनी वस्तीतल्या लोकांनी पुढे येऊन शौचालयाची देखभाल करण्याचं आवाहन केलं. याकरता कोणी तयार होत नव्हत. शर्मा बाई पुढे आल्या आणि त्यांनी मी महिलांच्या मदतीने देखभाल करेन असं सांगितलं. शर्मा बाई आणि इतर १३ जणींचा मिळून बचतगट होता. हाच बचतगट मग शौचालयाची देखभाल करू लागला. वस्तीतून महिन्याला वीस रूपये गोळा करून बचतगट शौचालयाची सफाई करून घेऊ लागला. दरम्यान, २०१६ मध्ये त्रिरत्न प्रेरणा मंडळानं या वस्तीत नवीन शौचालय बांधणीकरता सर्वेक्षण केलं. दिलीप शिंदेंच्या पत्नीच्या निधीतून नवीन बांधकामाचा निधी होता.बचतगटानं त्याकरता मदत केली. २४ सीटस्पैकी १२ शौचालय तोडले. उरलेले १२ शौचालयांचा पर्यायी म्हणून वापर लोक करत होते.

२०१७ मध्ये भाजपची नगरसेविका निवडून आली. २०१८ मध्ये शौचालयाचं बांधकाम पूर्ण झालं. अचानक एके दिवशी या शौचालयाच्या वर व्यवस्थापक म्हणून जय अंबे माता मंडळाचा फलक लावण्यात आला.श्री महालक्ष्मी महिला संघानं यावर हरकत घेतली. महापालिकेत तक्रार दाखल केली. २०१२ पासूनशौचालयाची देखभाल करत असून सर्वेक्षणाकरताही मदत केल्याचं त्यांनी महापालिकेला पटवून दिलं. सर्व कागदपत्र देण्यात आली. बचतगटाचं संस्था म्हणून रजिस्र्टेशन केलं. मग महापालिकेनं महिला संघाला शौचालयाचं हस्तांतरण केलं. वीज, पाणी, एमओयू हस्तांतरीत केलं. या शौचालयाच्या देखभालीकरता १०० रुपये मासिक पास आहे. साधारण ४००-५०० लोक या शौचालयाचा वापर करतात. महिलांकरता ११ सीटस वरती पहिल्या माळ्यावर आणि तळमजल्यावर पुरूषांकरता ८ व १ अपंगांकरता अशा २० सीटसच हे शौचालय आहे. दारूच्या पार्ट्यांकरता गच्चीचा वापर होऊ नये म्हणून महिलांचं शौचालय वरच्या मजल्यावर ठेवण्यात आलं आहे. गच्चीला नेहमी कुलूप लावलेलं असतं. स्थानिक लोकांकडून नेहमीच गच्चीचा वापर दारूच्या पार्ट्यांकरता करण्याकरता दबाव मंडळावर असतो. पण मंडळाच्या सदस्या एकित्रतपणे या दबावाला विरोध करतात. महिला शौचालय पहिल्या मजल्यावर ठेवण्याकरताही पुरूषांनी प्रचंड विरोध केला होता. महिला शौचालय वरच्या मजल्यावर असण्यासोबतच या शौचालयाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वीजेकरता सौरऊर्जेचा वापर. एका स्वयंसेवी संस्थेनं सौरऊर्जेचे पॅनेल आणि उपकरण मंडळाला दिलं आहे.

ह्या शौचालयाच्या मागे म्हाडाचं लहान शौचालय आहे. त्याची देखभालही ह्या मंडळातर्फे केली जाते. याकरता मासिक ३० रुपये मंडळ घेतं. महापालिकेचं शौचालय रात्री ११.३० ते पहाटे ५ दरम्यान बंद असतं. या वेळेत लोक म्हाडाच्या शौचालयाचा वापर करतात.

ह्या शौचालयाला पाणी अपुरं असल्यामुळं टॅंकरनं पाणी आणावं लागतं. स्थानिक नगरसेविका पाणी प्रश्नाकडे दुर्लक्ष करतात. इतरही तक्रारींकडे त्या लक्ष देत नाहीत. टॅंकरने आणलेलं पाणी टाकीत सोडल्यावर बऱ्याचदा स्थानिक लोक टाकीत पाईप घालून हे पाणी

चोरतात. नळ चोरणं, बल्ब चोरणं, गल्ले फोडणं, दारूड्यांची भांडणं हे प्रकार सर्रास करतात. याला अटकावाकरता सीसीटीव्ही बसवण्यात आले आहेत. संध्याकाळी पाच नंतर शौचालयाच्या आसपास आणि वाटेवर दारूडे लोक असतात. त्यामुळं संध्याकाळी मुली-महिला शौचालयात यायला घाबरतात. वस्तीत बरे-वाईट सर्व प्रकारचे लोक आहेत. चांगल्या लोकांसाठी आम्ही काम करतो असं मंडळाच्या सर्व सदस्या सांगतात.भाजप नगरसेविकेचे कार्यकर्ते म्हणतात, "या कालच्या महिलांना शौचालय मिळालं पण आम्हांला नाही मिळालं". त्यामुळं काही ना काही कारणांवरून भांडणं करतात. महापालिकेत खोट्या तक्रारी देतात. काही रहिवाशांनाही हे शौचालय चालवायला हवं असल्यामुळं तेही खोट्या तक्रारी देणं, कचरा शौचालयात टाकणं, शौचालयाच्या मालमत्तेचं नुकसान करणं हे प्रकार करतात. महापालिकेच्या चौकशीला मंडळ उत्तर देत राहतं. हे प्रकार सतत होऊ लागले. या सगळ्याला मंडळाच्या सदस्या शांतपणे, संयमाने तोंड देत आहेत.

विशेष नोंदी –

- सीबीओ आधीपासून व्यवस्थापन करत असतानाही पुनर्बांधणीनंतर नगरसेवकाच्या मर्जीतील मंडळाला व्यवस्थापन देण्याचा डाव
- वैयक्तिक स्वार्थाकरता राजकारण्यांचा मंडळावर आणि शौचालयावर वर्चस्व दाखवण्याचा प्रयत्न
- गच्चीचा गैरवापर होऊ नये याकरता महिला शौचालय वरच्या मजल्यावर तर पुरूष शौचालय तळमजल्यावर
- स्थानिक लोकांकडून नेहमीच गच्चीचा वापर दारूच्या पार्ट्यांकरता करण्याकरता मंडळावरदबाव
- वीजेकरता सौरऊर्जेचा वापर. एका स्वयंसेवी संस्थेनं सौरऊर्जेचे पॅनेल आणि उपकरण मंडळाला दिलं आहे.
- नगरसेविकेचं सहकार्य नाही. पाण्याकरता टँकरवर अवलंबून
- विरोधी लोक सतत खोट्या तक्रारी देतात

## २९) लता गायकवाड वय - ३८ वर्षे

### आर्यन मित्र मंडळ, हनुमान चाळ, कांदिवली (पू)

लता यांचा जन्म कांदिवलीमधलाच. एमए, बीएड, एमएसडब्ल्यू अशा उच्चशिक्षति आहेत. त्यांच्या लहानपणी सर्वजण बाहेरचं शौचालयाकरता जायचे. त्यांच्या वस्तीच्या आजूबाजूला जंगल होतं. तिथंच सर्व जायचे. साधारण ३० वर्षापूर्वी आजूबाजूला म्हाडाची वसाहत निर्माण झाली. मग जंगलात जाणं मुष्किल होऊ लागलं. वस्तीच्या समोरचं एक मैदान आहे. लोक तिथं कचरा टाकायचे. मग लता यांचे भाऊ आणि वस्तीतल्या काही मुलांनी हे मैदान साफ केलं. वस्तीतल्या लोकांनी म्हाडाला या मैदानात सार्वजनिक शौचालय बांधण्याची विनंती केली. म्हाडानं वस्तीकरता शौचालय बांधून दिलं. वस्तीतल्या मुलांचं एक मित्रमंडळ होतं. हे मंडळ कधीतरी पैसे गोळा करून शौचालयाची सफाई करून घ्यायचे. पुढे मंडळातली मोठी मुलं वयानं लहान मुलांना सिगरेट, दारू आणायला सांगायचे यावरून मग लहान मुल मंडळातून वेगळे झाले. २०१० मध्ये या मुलांनीही त्यांचं मंडळ बनवलं. या मंडळात लता यांचे मोठे भाऊही आहेत. लता आणि त्यांची एक मैत्रीणही या १२ जणांच्या मंडळात सामील झाल्या. मंडळातर्फे रक्तदान शिबीरांचं आयोजन, एचआयव्ही, टीबी रुग्णांना वैद्यकीय मदत मिळवून देणं ही काम करत असतात.

२००९ मध्ये म्हाडाचं जुनं शौचालय महापालिकेनं तोडलं. नवीन शौचालय बांधत असल्याचं सांगितलं. लता आणि त्यांच्या सोबतच्या सदस्यांना घनकचरा विभागाच्या अधिकाऱ्यांकडून नवीन शौचालय देखभालीकरता वस्तीतल्या मंडळाला देणार असल्याचं कळलं. लता आणि सर्वांनी मग मंडळाच्या नावाने महापालिकेत अर्ज भरला. २०११ मध्ये लॉटरी पद्धतीनं सोडतीमध्ये त्यांच्या मंडळाला हे देखभालीचं काम मिळालं.

बांधकामाच्या डिझाईनबद्दल वगैरे मंडळाला काही विचारण्यात आलं नाही. वस्तीत सर्वेही आधीच झाला होता. पालिका अधिकाऱ्यांनी मंडळाला बांधकामाकडे लक्ष द्यायला तसेच पाणी देण्याकरता आणि इतर मदत लागली तर करायला सांगितलं. ते काम मंडळ करत होतं. काम सुरू होऊन तीन महिने झाले. अचानक एक दिवस कंत्राटदार पळून गेला. सात महिने कामाचा खोळंबा झाला. पर्यायी शौचालयाची व्यवस्थाही नव्हती. लोक परत जंगलातच जाऊ लागले होते. शेवटी मंडळानं मिडियाची मदत घेतली. बातमी छापून आली आणि महापालिकेततही तक्रारी दिली. अखेरिस काम सुरू झालं. ऑगस्ट २०१२ मध्ये मंडळाच्या ताब्यात शौचालय मिळालं. खाली महिलांकरता २५, अपंगांकरता १ आणि वरच्या माळ्यावर पुरूषांकरता २४ सीट असं एकूण ५४ सीटस्चं शौचालय तयार झालं. साधारण पंधराशेच्या आसपास लोकं या शौचालयाचा वापर करतात. पाणी, वीजमीटर, एमओयू अशी सर्व कागदपत्र मंडळाच्या लगेचच ताब्यात मिळाली. पाण्याकरता बोअरवेल असल्यामुळं पुरेशा प्रमाणात पाणीही उपलब्ध आहे.

एवढी छान व्यवस्था असलेलं आर्थिक फायदा मिळणार शौचालय मिळवण्याकरता वस्तीतलं जुनं मंडळ आणि सध्याची नगरसेविका प्रचंड खटाटोप करत आहेत. म्हाडाच्या शौचालयाची देखभाल करणारं जुन्या मंडळाचे सदस्य रात्री सिवेज लाईनचे चेंबर उघडून त्यात गोणी, दारूच्या बाटल्या, मोठी मोठी दगडी टाकतात. यामुळं शौचालय तुंबतात. आर्यनचे सदस्य मग ह्या साफसफाईच्या मागे लागतात. शौचालय तुंबवणारे लोकही ह्याच शौचालयाचा वापर करतात. दरवाजांवर लाथा मारणे, नळ तोडणे आणि चोरणे हे प्रकारही ह्या लोकांकडून होतात. त्यात भर दारूड्या लोकांची ही असतेच. एक संपूर्ण चाळ तर मासिक पासाचे पैसेच देत नाही. आम्ही वस्तीतले जुने लोक आहोत त्यामुळं आम्ही का पैसे द्यायचे असा उलटा सवाल करतात. मराठी, उत्तर भारतीय आणि मुस्लीम अशी मिश्र वस्ती इथं आहे. मंडळाला आर्थिक फायदा मिळतो, ती रक्कम मंडळ बँकेत जमा करतात. शौचालयाची दुरूस्ती, वाढीव वीज बिल ह्या गोष्टींसोबतच वस्तीतल्या कोणाला वैद्यकीय मदत हवी असल्यास त्याकरता ही रक्कम खर्च केली जाते. शौचालयाची सफाई करणारे ५ जण आहेत. ते शौचालयाच्या गच्चीवरच राहतात. शौचालय २४ तास सुरू असतं. शौचालयात सीसीटीव्ही कॅमेरेही सुरक्षेकरता बसवण्यात आले आहेत. महिला शौचालयांमधून सॅनिटरी पॅड टाकण्याकरता ठेवण्यात आलेले डस्टबीन महिला चोरून नेतात. तीन वेगवेगळ्या आकाराचे डबे ठेवून झाले तरी महिला चोरी करतात.

सध्या वेगळीच समस्या निर्माण झाली आहे. स्थानिक शिवसेना नगरसेविका हे शौचालय तोडून नवीन बांधकाम करण्याकरता दबाव टाकत आहे. हे शौचालय स्पार्कने बांधल असून बांधकामाचा दर्जा चांगला नाही हे कारण देत तोडण्याकरता दोन वेळा पथक पाठवलं. वास्तविक बांधकामाचा दर्जा चांगला आहे. ८ वर्ष झाली आहेत पण मंडळाला किंवा लोकांना बांधकामाबद्दल काहीच तक्रार नाही. सप्टेंबरमध्ये बीएमसी अधिकारी नीलम लाड रेडीमेड टॉयलेट युनिट घेऊन आल्या. तात्पुरती सोय या युनिटमध्ये करत असून सध्याचं बांधकाम तोडणार असं सांगितलं. लोकांनी आणि मंडळानं विरोध केला. मंडळानं स्ट्रक्चरल ऑडिट मागितलं असता कांबळे नावाच्या अधिकाऱ्यानं तुम्हाला मंडळाला अधिकार नाहीत असं म्हणत दमदाटी केली. मंडळानं याबद्दल बीएमसीमध्ये तक्रार केली. तेव्हा प्रकरण थांबलं. पण पुन्हा नोव्हेंबर महिन्यात नीलम लाड पोलीस बंदोबस्तात रेडिमेड टॉयलेट युनिट घेऊन शौचालय तोडायला आल्या. मंडळानं आता माहितीचा अधिकाराखाली माहिती मागवली आहे. तिला उत्तर न मिळाल्यानं अपील केलं आहे. स्ट्रक्टरल ऑडिट, २०१०-११ मध्ये केलेलं बांधकाम एवढ्या लवकर खराब होतं का, स्थानिक नगरसेविकेच्या फंडातून किती शौचालयांचं बांधकाम सध्या सुरू आहे आणि त्याचा खर्च याबद्दल माहिती मिळवण्यात येत आहे. शिवसेनेच्या स्थानिक नगरसेविकेला हे शौचालय चालवायला हवं आहे. या वस्तीच्या बाहेरच्या व्यक्तीला देखभालीकरता नेमायचं आहे. लोकांचाही हे शौचालय तोडायला विरोध असतानाही अखेर हे शौचालय तोडण्यात आलं.

विशेष नोंदी-

- बांधकामाचा दर्जा चांगला असून आणि स्ट्रक्चरल ऑडिट न देताही शौचालयाचे बांधकाम तोडण्यात आले
- स्थानिक नगरसेविकेला सीबीओच्या लाभात स्वारस्य, महापालिका अधिकाऱ्यांना हाताशी धरून नागरिकांचा विरोध असतानाही जबरदस्तीने बांधकाम तोडलं.
- सीबीओतर्फे वस्तीतल्या नागरीकांना वेळोवेळी वैद्यकीय मदत

## ३०) शालिनी कोठारे वय –७२ वर्ष

### श्री रेणुका महिला संस्था मंडळ, असल्का व्हिलेज, घाटकोपर

मूळच्या बेळगावच्या असणाऱ्या शालिनी १९७० मध्ये लग्न होऊन मुंबईतल्या असल्फा व्हिलेजमध्ये आल्या. असल्फा व्हिलेज हा सगळा त्याकाळातही चाळी आणि झोपडपट्टीचा भाग होता. इथं आल्यावर घरात किंवा घराच्या आसपास शौचालय नसणं हा त्यांच्याकरता मोठा धक्का होता. घरापासून काही अंतरावर शौचालयाकरता जावं लागे. पण या सार्वजनिक शौचालयात रात्री काय तर दिवसाही जाणं मुष्कील असायचं. कारण शौचालयाच्या आसपास दारुड्यांचा गराडा पडलेला असायचा. एकटीनं जाणं म्हणजे संकटांना आमंत्रण देणंच होतं. या परिसरातील गुंड आणि दारुड्यांमुळं टॅक्सीवालेही इथं कधी भाडं घेऊन यायचे नाहीत.

हळूहळू शालिनी यांचा मूळचा धाडसी स्वभाव त्यांना स्वस्थ बसू देईना. १९७६ मध्ये त्यांनी शिवसेना पक्षाच्या कार्यकर्त्या म्हणून काम करायला सुरवात केली. त्यातून वस्तीतल्या महिलांना त्या जोडू लागल्या. पक्षाच्या अनेक आंदोलन, मोर्च्यात सहभागी होऊ लागल्या. पंधरा वर्ष त्यांनी महिला आघाडीची शाखाप्रमुख म्हणून काम केलं. त्यावेळी वस्तीतल्या लोकांच्या त्या उपयोगी पडायच्या. त्यांची काम करायच्या. त्यांच्या फटकळ आणि धाडसी स्वभावामुळं पक्षात आणि विभागतही त्यांचा आधीपासूनच दरारा आहे. ही सर्व काम करत असताना वस्तीतल्या सर्व लोकांची नीट शौचालय नसल्यामुळं होणारी गैरसोय त्यांना अस्वस्थ करायची. एकतर वस्तीपासूनच अंतर हा मुद्दा होताच शिवाय म्हाडाच्या या शौचालयात वीज आणि पाण्याची सोय नव्हती. पाणी नसल्यानं भयंकर अस्वच्छता असायची. शौचालयात गेल्यावर तिथले किडे लोकांच्या अंगावर चढायचे. शालिनी झुणका भाकर केंद्र स्थापण्याकरता १९९९ मध्ये रेणुका माता संस्था स्थापन केली होती. काही कारणांनी हे केंद्र बारगळलं. शौचालयाकरता शालिनी वस्तीतल्या महिलांसोबत स्थानिक नगरसेविकेकडे तगादा लावत होत्या. त्यावेळी त्यांना वस्ती स्वच्छता कार्यक्रमाद्वारे शौचालय बांधता येऊ शकत हे कळलं. शालिनी यांनी लागलीच वस्तीतल्या महिलांना या कार्यक्रमाबद्दल सांगितलं. सर्व महिला लगेच तयार झाल्या. इतके वर्ष शालिनी वस्तीत करत असणाऱ्या चांगल्या कामांमुळं त्यांच्या शब्दाला वस्तीत वजन आहे. शौचालयाचं काम मंजूर होऊन बांधकाम सुरू झालं. वस्तीत सर्वेक्षण होऊन कचराकुंडीच्या जागी सर्वांच्या सोयीकरता शौचालय बांधण्याचं ठरलं. गर्दुले आणि दारूड्यांचा त्रास बांधकामादरम्यानही सुरू होता. त्याचा सर्व महिलांनी निकरानं सामना केला. अखेरिस नोव्हेंबर २०११ मध्ये शौचालयाचं बांधकाम पूर्ण झालं. महिलांकरता २२ आणि पुरुषांकरता २२ सीटंस असं मोठं शौचालय बांधण्यात आलं. शौचालयाचा वापर सुरू झाल्यावरही गर्दुले आणि दारुड्यांचा त्रास सुरूच होता. लाईट फोडणं, घाण करणं, दारं खराब करणं हे सगळे प्रकार सुरूच होते. हळूहळू शालिनी यांनी आक्रमक पवित्रा घेत गर्दुले आणि दारुड्यांवर वचक बसवला. या शौचालय संकुलाच्या पाणीपुरवठ्याकरता दोन बोअरवेल आहेत. सांडपाणी व्यवस्था उत्तम आहे. पाणी आणि वीजेचं मीटर संस्थेच्याच नावावर आहेत. सध्या या शौचालयाकडे ६०० पास असून प्रति मासिक पास ५० रुपये आकारण्यात येतात. आजूबाजूला असणारे वर्कशॉप्स, छोट्या कारखान्यातील स्त्री-पुरूष कामगारही या शौचालयाचा वापर करतात. त्यांच्याकरता प्रति वापर ३ रुपये दर आहे. या शौचालयाच्या देखभालीकरता ३ केअरटेकर आहेत. कोरोना महासाथीपासून शालिनी स्वतः शौचालयाची साफसफाई करतात. केअरटेकर जागेवर नसतील तर संस्थेच्या सदस्या स्वतः काउंटरवर बसतात. त्यामुळं आता महिला आणि मुलींना खूप सुरक्षति वाटतं.

ठळक नोंदी –

- राजकीय पक्षाच्या ४० वर्षाहून अधिक काळ कार्यकर्त्या
- मोकळेपणानं अडचणी, संघर्ष व्यक्त केला नाही. स्वयंसेवी संस्थेबद्दल माहिती नाही.
- पक्ष कार्यकर्ती असूनही स्वतःच्याच पक्षाच्या नगरसेवकाकडून अनेक अडचणी आल्या. स्वतःचा कमीपणा किंवा पराजय दिसू नये म्हणून व्यक्त केला नसावा.

- अतिशय धीट, धाडसी पण बोलण्यात फटकळ अशी प्रतिमा
- उजव्या विचारसरणीच्या पक्षासोबत काम करूनही कोरोसोबत स्वतःला जोडलं.
- निरक्षर असूनही आत्मविश्वास आणि मेहनतीच्या जोरावर वस्ती, रहिवाशांकरता चांगली कामं केली आहेत
- राजकीय पक्षाच्या प्रभावातून स्वतःकरता रोजगारनिर्मिती
- विद्यमान नगरसेवकाच्या विरोधाला मैत्रीत बदलले.